म. ग्रं. स. ठाणे.
विषय भू-प्रवास
क्र. 6083
REFBK 0026717
REFBK-0026717

# माझा प्रवास

१८५७ ... कत

REFBK-0026717

कै. वे. शा. सं. विष्णुभट गोडसे

प्रकाशक

प्रतिभा प्रतिष्ठान

**प्रकाशक :-**
प्रतिभा प्रतिष्ठान,
इंडस्ट्रिअल ॲशुरन्स बिल्डिंग,
चर्चगेट, मुंबई २०.

**मुखपृष्ठ :-**
अनिल दाभाडे

**अक्षर जुळणी :-**
अमेय अक्षर जुळणी,
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी : ६११ २४५७.

**मूल्य :-**
२५ रुपये.

१५ ऑगस्ट १९९२

**मुद्रक :-**
रंगनाथ मुद्रण,
सी ३५, श्रीराम इंडस्ट्रिअल इस्टे
आंबेकर मार्ग, मुंबई ३१.

**वितरक :-**
अनुभव वितरण,
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी : ६११ २४५७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
वा. क्र. 683
शाखा

प्रतिभा प्रतिष्ठान

पुरस्कृत

' स्वस्त ग्रंथमाला '

योजनेखालील पुस्तक

पुस्तक प्रकाशन समिती

१ श्री. आय. एम. कांगा
२ श्री. दाजी भाटवडेकर
३ श्री. जी. जी. कुडाळकर
४ डॉ. जयंतराव पाटील
५ श्री. मुश्ताक अंतुले

# प्रास्ताविक

मराठी साहित्याची परंपरा फार श्रेष्ठ आहे. ज्ञानेश्वरांनी 'अमृताते पैजा जिंके' अशी मराठी भाषा लिहिण्याची प्रतिज्ञा केली आणि ती पूर्णही केली. त्यानंतर मुकुंदराज, तुकाराम, नामदेव; रामदास इत्यादी अनेक संतांनी मराठी भाषेला नवे नवे उन्मेष दिले. संतांनी केवळ भक्तीपर वाङ्मय लिहिले असे नव्हे, तर उत्तम साहित्य गुणांनी संपन्न असे अलंकार सरस्वतीला अर्पण केले. शिवकालात बखर वाङ्मयाने मराठी साहित्यात नवे दालन उघडले. त्यानंतर शाहिरी वाङ्मय आणि भूपाळी यांनी काव्याचा खराखुरा मराठी बाणा दाखवला.

अव्वल इंग्रजी काळात मराठी साहित्यात फार थोर विचारवंत साहित्यिक होऊन गेले. विष्णुशास्त्री चिपळुणकर, शिवरामपंत परांजपे, लोकहितवादी, अच्युत बळवंत कोल्हटकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, विनायक दामोदर सावरकर यांनी मराठी वाचकाला केवळ दिपवूनच टाकले असे नाही तर देशभक्तीचा थोर वसा घेण्याची स्फूर्ती दिली. राम गणेश गडकरी, देवल, काकासाहेब खाडिलकर अशा नाटककारांनी दैदिप्यमान नाटके दिली तर हरिभाऊ आपटे आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर या युगप्रवर्तक साहित्यिकांनी कादंबरी आणि विनोद ही स्वतंत्र दालने खुली केली.

साहित्य सम्राट न. चि. केळकर, श्री. म. माटे, गोडसे भटजी, महात्मा फुले, केशवसुत यांच्या पिढीने मराठी साहित्य अधिकच समृद्ध केले. अस्सल मराठी संस्कृतीचे विविध उन्मेष या काळात पहावयास मिळतात. कथा, कादंबरी, आत्मवृत्त, नाटक, ललित निबंध, प्रवास वर्णन अशा अनेक क्षेत्रात या काळात मोलाची भर पडली. यानंतरची पिढी म्हणजे आचार्य अत्रे, प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर इत्यादी श्रेष्ठ साहित्यिकांची. विभावरी शिरूरकर या टोपण नावाने लिहिणाऱ्या मालतीबाई बेडेकर यांनी याच काळात नवी स्त्री स्वतंत्र झाल्याचे आपल्या साहित्यातून प्रकर्षाने सिद्ध केले.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, अनंत काणेकर, पु. ल. देशपांडे, वा. म. जोशी, र. वा. दिघे, आचार्य विनोबा भावे, त्र्यं. शं. शेजवलकर यांनीही मराठी साहित्यात मोलाची भर घातली. ही परंपरा अगदी अलीकडे विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, श्री. ना. पेंडसे, दया पवार, आनंद यादव, जी. ए. कुलकर्णी, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर अशा मातब्बर साहित्यिकांनी पुढे चालू ठेवली आहे.

मराठी भाषेत सुमारे एक लक्ष ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यापैकी उत्कृष्ट परंतु दुर्मिळ (out of print) ग्रंथांची निवड करण्यात आली आहे. या पुस्तकांची शिफारस मुंबई मराठी साहित्य संघाने केली आहे.

अनेक उत्कृष्ट पुस्तकांचे पुनर्मुद्रण होत नसल्यामुळे मराठी सांस्कृतिक जीवनातील एक अमोल ठेवा लुप्त होण्याची भीती होती. त्यामुळे भावी पिढ्या या ग्रंथांना वंचित होण्याची शक्यता होती. म्हणून 'प्रतिभा प्रतिष्ठान'ने अशा पुस्तकांच्या पुनर्मुद्रणाचा उपक्रम आयोजिलेला आहे. मराठी भाषेतील दुर्मिळ आणि उत्कृष्ट ग्रंथ रसिक वाचकाला अल्प किंमतीत उपलब्ध करून देण्याचा 'प्रतिभा प्रतिष्ठान'चा उद्देश आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी स्थापन केलेल्या 'प्रतिभा प्रतिष्ठान' या संस्थेच्या विद्यमाने ही पुस्तके प्रकाशित करण्यात येत आहेत. बॅरिस्टर अंतुले यांनी या प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन आज बरीच वर्षे झालेली असली तरीही त्यांचे मार्गदर्शन आणि सहाय्य या उपक्रमास सतत मिळाले आहे व मिळत राहील अशी आशा आहे.

या उपक्रमास 'हिन्दुस्तान पेपर कार्पोरेशन लिमिटेड' या संस्थेने दिलेल्या सहकार्याबद्दल 'प्रतिभा प्रतिष्ठान' कृतज्ञ आहे.

या उपक्रमाची सुरुवात म्हणून आम्ही खालील पाच पुस्तके प्रकाशित करीत आहोत-

| | |
|---|---|
| पण लक्षात कोण घेतो ! | हरि नारायण आपटे |
| माझा प्रवास | गोडसे भटजी |
| समाधी | दिवाकर कृष्ण |
| ज्योतिर्विलास | शं. बा. दीक्षित |
| दौलत | ना. सी. फडके |

हा ग्रंथप्रकाशनाचा उपक्रम खंड न पडता दीर्घकाळ चालू राहील असा आम्हास विश्वास आहे.

**प्रतिभा प्रतिष्ठान, मुंबई.**
**१५ ऑगस्ट १९९२.**

# मूळच्या हस्तलिखिताचें स्वरूपवर्णन

इ. स. १९०७ मध्यें कै. रा. ब. चिंतामण विनायक वैद्य यांनी ' माझा प्रवास ' अथवा सन १८५७ च्या बंडाची हकीकत (कै.) " वे. शा. विष्णुभट गोडसे वरसईकर मरहूम यांनी लिहून ठेविली ती " संशोधन करून छापविली. चिंतामणराव यांनीं हा ग्रंथ इंदुप्रकाश व चित्रशाळा या दोन आपल्या वर्गीतल्या निरनिराळ्या छापखान्यांत छापविली. याचें कारण असें ऐकण्यांत आहे कीं, पुस्तकाचा विषय ५७ सालचा असल्यामुळें आणि आणि ५७ सालच्या पन्नाशीच्या निमित्तानें तो प्रसिद्ध होत आसल्यामुळें इंग्रज सरकारची ग्रंथावर वक्रदृष्टि होऊन तो जप्तीच्या जाळ्यांत सांपडेल म्हणून कांहीं युक्ती योजून चिंतामणरावांनीं एकाच वेळीं दोन आवृत्त्या तयार ठेविल्या. ते कांहींहि असो. गोडसे भटजींनीं लिहिलेलें मूळ हस्तलिखित भा. इ. सं. मंडळाच्या दप्तरखान्यास नजर करावें असा निश्चय करून शके १८४४ (इ. स. १९२२ ) मध्यें चिंतामणराम वैद्यांनी तें संमेलनप्रसंगी भा. इ. सं. मं. कडे दिलें. त्या वेळीं त्या हस्तलिखिताच्या परिस्थितीबाबत केलेल्या टिपणाप्रमाणें ह्या हस्तलिखिताच्या ' दोन बांधीव वह्या, सहा सुटे बंद व पुरवणी बंद ' याप्रमाणें नोंद करून त्याचा संग्रह केला.

पहिल्या बांधीव मूळ वहींत मजकुराच्या पहिल्या पानावर ३ चा आंकडा मूळचाच आहे. हा आंकडा पोटावर आहे, पाठीवर काहीं नाहीं. पुढील पानावर ४ चा आंकडा आहे, पाठीवर कांहीं नाहीं आणि त्यापुढें कसलेहि आंकडे मूळ मजकूर लिहिणारानें दिलेले नाहीत. वहीच्या प्रारंभीं मलपृष्ठ आहे. तें पहिलें पान कोरें आहे. त्यावर " श्री गजानन प्रसन्न, भाग पहिला, प्रस्तावना " असा मजकूर वहीलेखकाच्या हातचा त्याच शाईचा मोडी-बाळबोधमिश्रित आहे. खाली निराळ्या शाईनें निराळ्या अक्षरांत ' परंतु या नरजन्मास येऊन उत्तम कामें जर मनुष्यानें केली ' अशी ओळ लिहिलेली आहे. या वहीच्या पानांवर मंडळाच्या कारकुनाकडून नवे आंकडे -

तांबड्या शाईंत टाकविले. पोटाला एक व पाठीला एक याप्रमाणें आंकडे टाकले. मलपृष्ठाच्या कोऱ्या पानाला १-२ असे आंकडे टाकले. मूळ पान ३ ला ३ चाच आंकडा पोटावर पडला. पाठीवर ४ त्यामुळें मूळच्या ४ पानाला ५ चा नवा तांबडा आंकडा पडला. ह्याप्रमाणें ९० तांबड्या आंकड्यांपर्यंत संपूर्ण लिहिलेलीं पानें पहिल्या वहींत आहेत. ९१ व्या आंकड्यावर तिसऱ्या भागाची समाप्ति आहे. तेथें मुळांत चार ओळी आहेत. बाकीचें पान कोरें सोडलें आहे. प्रस्तुतच्या छापील पुस्तकांतील पृष्ठ ५७ पाहावें. आमच्या ९२ आंकड्याचे पानावर मूळ लेखकाने फक्त पुढीलप्रमाणें मजकूर मोडींत लिहिला आहे. " या पुस्तकांतील राहिला भाग कालपीचे शहरचे वर्णन व तसेच लखनौचे शहरवर्णन मुख्यत्वेंकरून आहेत. " बाकी पान कोरें आहे. ह्यापुढें दोन पाठपोट कोरीं पानें आहेत. त्यांना मंडळांतील गणकानें तांबड्या शाईनें ९३-९४, ९५-९६ असे पाठोपाठ आंकडे घातले आहेत. मंडळांत वही आल्यावर अधून मधून व आदि-अंतीं भा. इ. सं. मं. असा रबरी शिक्का वहींतील पानांवर उठविलेला आहे.

दुसऱ्या बांधीव वहीत प्रारंभीं एक मोठा बंद दुमडून त्याचें पुष्टिपत्र केलें आहे. त्यावर काहीं जमाखर्ची मजकूर लिहिलेला आहे. त्यानंतरच्या पानांवर मंडळांत घातलेले ९७ पासूनचे पहिल्या वहीच्या पुढील आंकडे सुरू झाले. या दुसऱ्या वहीत पानांवर आंकडे मूळचे कोठेंच नाहींत. येणेंप्रमाणें सलग मजकूर ह्या बांधीव वहीत मंडळाकडून घातलेल्या २८२ आकड्यांशी संपलेला आहे; परंतु विषय संपलेला नाही. 'काशीत प्रतिदिनी' एवढीं अक्षरें २८२ पानाचे शेवटीं आहेत. आणि पुनः पुष्टिपत्राचे मलपृष्ठ प्रारंभीप्रमाणें जोडलेलें आहे. ह्या शेवटच्या पानावरहि जमाखर्ची मजकूर आहे. येणेंप्रमाणें बांधीव म्हणजे शिवलेल्या दोन वह्यांचे वर्णन पूर्ण झालें.


ह्याशिवाय अंजिरी शाईने लिहिलेला लेखकाच्या हातचा लहान पिवळसर बंद निराळा आहे. त्यावर बंदाचा मूळचा आंकडा नाहीं; पण डोकीवर पुढील मजकूर मोडीत आहे. ' बंद १ ओळ ५ वी वर शोध आहे तो ' असा मजकूर आहे. पहिल्या ओळीची सुरुवात ' असा विचार ठरला

की, ' अशी झाली आहे आणि ' श्री क्षेत्र प्रयागास आलो. नंतर कावड ' असा मजकूर शेवटी आहे. ह्यानंतर ६ पुरवणी बंद ' ह्या हस्तलिखिताचे सुटे असे होते. तो प्रत्येक बंद मध्यावर दुमडलेला होता. पैकीं शेवटचा म्हणजे ६ वा बंद अद्यापहि दुमडलेला आहे. काळाच्या प्रभावाने दुमड तुटून ५ पुरवणी बंदांचे १० तुकडे झाले आहेत. पुरवणी बंदांवर क्रमाने १, २, ३, ४ हे आंकडे साधेच आहेत. ५ व ६ आंकड्याजवळ ' पुरवणी बंद ' असा मजकूर मूळचाच लिहिलेला आहे. मंडळांत पहिल्या पुरवणीबंदाचे पाठीमागें, तांबड्या शाईचे आंकडे घातले गेले आहेत. अंजिरी बंद दुमडलेला असला तरी अद्यापि सलग आहे. त्याच्या पोटावर २८३ आंकडा मंडळाकडून पडला आहे; पाठीवर ' कावड ' पर्यंतचा मजकूर अर्ध्या बंदांतच आला आहे; पुढील अर्धा बंद कोरा आहे. मंडळांत पुढील अर्ध्या बंदांचे शेवटीं २८४ आंकडा पडला आहे. २८५ चा तांबडा आकडा कोणत्याही पानावर पडलेला नाही, पण २८५ तांबड्या आंकड्याच्या पिछाडीस नुसता २ हा तांबडा आंकडा आहे. तेव्हां आंकडे घालणाऱ्याचा कांहीं घोटाळा होऊन २८५ आंकडा सुटलेला दिसतो आणि २८३ ते २९६ हे आंकडे पडलेले आहेत. २९६ हा आंकडा पुरवणी बंद ६ ह्या सलग बंदाचे पोटावर तळाला आहे, आणि त्याचे पाठीवरहि तळाला तोच आंकडा घातलेला आहे. हा बंद ह्या हस्तलिखितापैकीं शेवटचा बंद आहे. ह्या बंदावर ग्रंथ समाप्त झाला आहे. तो मजकूर छापील पृ. १८१ वर पाहावा. सही सोडून ६ ओळी मजकूर ह्या बंदावर आहे. बाकी सर्व बंदाची पाठ कोरी आहे. ह्याशिवाय पाठपोट ५-५ ओळी लिहिलेली एक चिरटी ह्या संग्रहातील मुळांतील उपलब्ध आहेत. (छापील पान १६६ ओळी ७ ते १६ - तांबडा आंकडा १२४ चे पुढे )

१९२२ सालीं हस्तलिखित मंडळाकडे देतांना कै. चिंतामणराव वैद्य यांनीं १० मे १९२२ रोजीं कल्याणहून लिहून आणलेले बखरीच्या प्राप्ती विषयींचे वगैरे हकीकत देणारें स्वदस्तुरचें पत्र मंडळाकडे दिलें तें ह्या ग्रंथात पुढील पानावर छापलें आहे. ग्रंथकाराच्या हस्तलिखितांत शेवटीं आपल्या ह्या लेखनाला ' इतिहास ' असें म्हटलें आहे आणि थोडें पुढें ५७ चे बांो

स्मरण असे मुळात लिहिलेलें आढळलें. पहिल्या वहीच्या सुरुवातीला लेखकानेंच ३ चा आंकडा पानावर घातला आहे. तेव्हां १ आणि २ ह्या आंकड्यांचीं पानें ग्रंथकाराच्या हातची पाहिजे होतीं, पण तीं मंडळाकडे दाखल केलेल्या हस्तलिखिताच्या शिवलेल्या वहींत आढळलेलीं नाहीत. कदाचित् त्या पहिल्या पानावर ग्रंथकाराने ग्रंथाचें कांहीं नांव लिहिलेलेंहि असेल. तिसऱ्या पानाची सुरुवात अगदीं सलग ओळ काढून ' आलिबाग जिल्ह्यांत ' ह्या शब्दांपासून केलेली आहे. वहीतील सर्व पानें बिलकूल जागा न सोडतां लिहिलेलीं आहेत. ३ आंकडा घातलेल्या पहिल्या पानावर दोन ओळी जागा कोरी सोडून मग " आलिबाग जिल्ह्यांत " इत्यादि प्रारंभ केलेला आहे. जुन्या पद्धतीप्रमाणे ' श्री गणेशाय नमः ' असा कांहींतरी मजकूर अपेक्षित वाटतो, पण त्यापूर्वी जे कोरें पान वहींत आहे त्यावरील ' श्री गजानन प्रसन्न ' वगैरे मजकूर आम्ही दिलाच आहे. तेथेंही नांव नाहीं. ह्या पानाच्या आधीं पुठ्ठ्यासारखे एक पान आहे, त्यावर पृष्ठ ' १९ श्री शंकर सांब सदाशिव ' आणि एक ' वस्त्रशुद्धि ' चा संस्कृत श्लोक लिहिलेला आहे. तो पुढील पानावरील ' परंतु या ' वगैरे लिहिणाराचा दिसतो. या पृष्टिपत्रावरहि जमाखर्ची आंकडे आहेत. सहस्रबुद्धे नवंबर ३ वगैरे कांहीं मजकूर मोडीत आहे. त्याचा मूळवहीशी कांहीं संबंध दिसत नाहीं. पृष्टिपत्रासाठी जुने निरुपयोगी वाटणारे कागद उपयोगांत आणण्याचा जुना सांप्रदाय आहे. येणेप्रमाणें ह्या हस्तलिखिताचें संपूर्ण बाह्यांग वर्णन चिकित्सकांच्या उपयोगासाठीं येथें दाखल केलें आहे. हें जीर्ण हस्तलिखित श्री. का. न. केळकर, प्रा. न. र. फाटक व श्री. रा. म. आठवले वगैरेंनी अभ्यासासाठीं उपयोगात आणलें आहे. तसेंच चित्रशाळेतर्फे ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठीं २१-९-४८ रोजीं गोडसे वही १ पृष्ठ ८६ चा फोटो घेऊन त्याचा ठसा त्या आवृत्तीला जोडला आहे. जिज्ञासूंना जीर्ण हस्तलिखित वापरण्यास देण्यांत मुळाची झीज वाढते ती टळावी म्हणून अभ्यासकांचे सोयीसाठीं मुळाबरहुकूम पानवार बालबोध लिप्यंतर मंडळांतील दप्तरनवीस कै. शंकरराव जोशी यांच्या करवी सन १९३९-४० च्या सुमारास करवून त्यांचीं बांधीव पुस्तकें मंडळांत ठेविलीं.

# विष्णुभट गोडसे यांचे हस्ताक्षर



# विष्णुभट गोडसे यांचे हस्ताक्षराचें लिप्यंतर

सवंछरी माहे फालगुन व।। मंदवार त्या दिवसी खोपवली मुकामी धर्म-शालेत वस्ती केली तेथे जेवणे करून पाहाटेस गाडीसह घाट चढोन मुकाम दर मुकाम करीत शहर पुणे येथे पोहोचलो. वरसईची गाडी भाड्याची होती ती परत पाठविली त्या गाडीवानाबराबर तीर्थरूपास पत्र सविस्तर मजकुराचे देऊन मुगटा घरी पाठविला व पुण्यांत पायजमा व आगात घालण्याकरिता बंडी व रुमाल वगैरे सरंजाम केला व फराळाचे बराबर करून घेऊन कर्वे कुटुंबास सु।। व आम्ही दोघे कर्वे याणी वाटेने जेवण करण्याकरिता घेतलेली बाई व कर्वे यांची आठ वर्षाची मुलगी इतकी माणसे येक ठिकाणी जेवणे राहाणे होते पुण्यांत येक गाडीची ब्राह्मणांची सोबत लागली होती. असो पुण्यास भाड्याची गाडी इदूरपर्यंत ठरावाची करून चैत्र शु।। ३ रोजी शहर पुणे सोडून वाघोली मुकामी गेलो आता हा प्रथम भाग पुरता करतो मु।। वरसई विष्णुभट गोडसे

## भाग दुसरा २

वाघोलीचा मुकाम सोडून मजल दर मजल जाता जाता नगर शहर जवळ आले तो जंगलात ओढ्याचे काठी दोन्ही बाजूस कणेरी तांबड्या पाढऱ्या बहुत पाहिल्या येक दोन दिवसात लक्ष पुष्पपूजा होई अशा सर्व कणेरी फुललेल्या पाहून बहुत अनंद जाहाला आम्ही पुष्पेही बहुत काढिली नंतर केडगावी वस्ती करून नगर शहरास दुसरे दिवसी दाहा वाजता पोचलो ते वाो.

मूळ वही - पान २१ (तांबडा आंकडा )

# रा. ब. चिंतामणराव वैद्य यांचें पत्र

" माझा प्रवास अथवा सत्तावन सालच्या बंडाची हकीकत " हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यास आज बरींच वर्षे झालीं. १९०७ इ. स. सालीं प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकांत जी मूळ बखर मी थोड्याबहुत फरकानें छापिली आहे ती मूळ बखर भारत इतिहास संशोधक मंडळास मी आज सादर करीत आहे. माझ्या घरी ही मूळ बखर न ठेवता मी ती मंडळास केव्हांतरी सादर करणार होतों परंतु तो सुयोग यंदाच येत आहे हें बरें आहे. एक तर यंदा मजजवळ मंडळापुढें ठेवण्यास कोणताही लेख नाहीं, तेव्हा संशोधन न करतां संशोधकाचें श्रेय घेऊन मजजवळच असलेली बखर मंडळास अर्पण करण्याचें सोपें काम मी करतों. दुसरें कारण असें कीं, यंदा मालवणास रा. कालेलकर हे भेटले होते तेव्हां त्यांनीं मला असा प्रश्न केला कीं, " तुम्ही माझा प्रवास हें पुस्तक लिहिलें आहेत त्यांतील सर्वच हकीकत म्हणजे लिहिणारे विष्णभट गोडसे वगैरे सुद्धां काल्पनिक आहेत कीं काय ? " तेव्हां मी त्यांस विचारिलें कीं, हा प्रश्न थट्टेचा आहे कीं खरा आहे? त्यांनीं लागलीच उत्तर केलें कीं, मी थट्टेनें विचारीत नाहीं खरोखरच विचारतो, कारण ही हकीकत काल्पनिक असेल तर ती एक कादंबरी आहे व इतिहास-जिज्ञासूंस तिचा कांहीं उपयोग नाहीं. आणि मी तर तें पुस्तक इतिहास म्हणून वाचावयास घेतलें आणि कादंबरी वाटली म्हणून ठेऊन दिलें. " असा गैरसमज फार थोड्यांचा होईल ही गोष्ट खरी पण तसाही होऊं नये म्हणून मी त्यांस सांगितलें कीं, गोष्ट मुळींच काल्पनिक नसून ऐतिहासिक आहे आणि मूळ बखर मी यंदाच इतिहास संशोधक मंडळास सादर करतों, तेथें वाटेल त्यानें येऊन पहावी. " त्याप्रमाणें मी मुद्दाम यंदाच ही बखर मंडळास आदरानें नजर करीत आहे. तिसरें कारण शुभस्य शीघ्रं या न्यायानें जास्त दिरंगाई न होतां हें उत्तम पुस्तक मंडळाच्या स्वाधीन होऊन त्यांच्या सुरक्षित संग्रहात जाऊन पडणें अतिशय इष्ट आहे हें होय.

असो, याप्रमाणें जी ही सत्तावन सालच्या बंडाची बखर मी मंडळास देत आहे तिच्या लिहिण्यासंबंधाचा वृत्तान्त थोडासा मी येथें ग्रथित करतों. हिचे लेखक कै. विष्णुभट बिन बाळकृष्ण भट गोडसे हे वरसईचे राहाणारे असून एक विद्वान्, तेजस्वी, उंच, भव्य गोरे पुरुष होते. ते आमचे कुलोपाध्याय असल्याने आमचे

घरीं कल्याण येथें वारंवार येत. मी कॉलेजांतून घरीं येई त्यावेळीं ते आम्हांस बंडाच्या अतिशय मनोरंजक हकीकती सांगत व त्या बहुतेक त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या असून स्वतःच्याच बहुतेक असत- लक्ष्मीबाई झांशीवाली यांच्या पदरीं प्रत्यक्ष किल्ल्यांत वेढ्याच्या दिवसांत ते असल्यानें त्यांच्या हकीकतीला ऐतिहासिक स्वरूप आहे असें मला वाटलें आणि हे एकदां निवर्तले म्हणजे हा ऐतिहासिक साक्षीदार नष्ट होईल असे वाटून मी एक दिवस त्यांना म्हटलें, '' तुम्ही सांगतां त्या सर्व हकीकती संगतवार आम्हांला लिहून द्या, म्हणजे त्या कायम राहतील.'' थोडीशी मी त्यांस लालूचही दाखविली आणि असें सांगितलें कीं, '' याचें जर पुस्तक छापलें तर निदान तुम्हास शंभर रुपये मी देईन.'' ही गोष्ट विष्णुभट यांस मान्य होऊन त्यांनीं त्या दोन वह्या व पुरवणीचे ६ सुटे बंद सुमारें पांच साहा महिन्यांत लिहून काढून मला आणून दिले. मला अतिशय आनंद झाला हें सांगणें नकोच. ती मी तत्काळ के. मालिसन वगैरे इंग्रजी बंडाच्या इतिहासकारांची पुस्तकें वाचून त्यांच्या हकीकतीशी मेळ घालून पाहिला तो बहुतेक बरोबर बसला. एक दोन ठिकाणीं फरक पडला तो क्षम्य आहे; कारण ही बखर १८०५ शकांत लिहिली आहे म्हणजे सन १८८३ तली असून २६ वर्षे बंडानंतरची आहे. इतक्या अवधींत कांहीं मजकूर थोडाबहुत मागें पुढें होणें शक्य आहे. याशिवाय ज्या गोष्टी एक दोन छापणें योग्य नाहीं त्या काढून टाकून मी छापखान्यासाठी प्रत तयार करून कोठें कोठें वाक्यरचना नवीन तऱ्हेची करून ती प्रत प्रसिद्ध कायदेपंडित महादेवराव आपटे यांस वाचावयास दिली. हेतु एवढाच कीं, यांत कांहीं न छापण्यासारखें आहे कीं काय याजबद्दल त्यांचें मत घ्यावें. माधवरावांनी पुस्तकाची तारीफ केली आणि एकदां सुरू केले म्हणजे खालीं ठेववत नाहीं असेंही म्हटलें; पण हा लेखक जिवंत आहे तोंपर्यंत छापू नका असें सांगितलें. वास्तविक पाहतां विष्णुभट गोडसे यांचा बंडाशीं कांहीं संबंध नाहीं ही गोष्ट शाबित होऊन कलेक्टरनें त्यास दोषमुक्त करून घरीं जाऊं दिलें ही हकीकत त्यांत आहेच. मग छापण्यास काय हरकत आहे हें मजला समजलें नाहीं. मी त्यावेळीं कायद्याचाही अभ्यास करीत होतो. परंतु कायद्याचे कामांत माधवराव आपट्यांसारख्यांचा सल्ला न मानणें शक्यच नव्हतें. तेव्हां सन १८८४-८५ मध्ये तयार झालेलें पुस्तक पडून राहिलें, तें विष्णुभट निवर्तल्यावर सन १९०७ मध्यें छापलें गेलें. कबूल केल्याप्रमाणें शंभर रुपये त्यांच्या पश्चात् चिरंजीवांस दिले.

अशी या बखरीच्या लिहिण्याची व पुस्तकरूपानें प्रसिद्ध होण्याची हकीकत आहे. कै. विष्णुभट गोडसे भिक्षुक होते तरी किती मार्मिक व विद्वान् होते तें या दोन वह्यांवरून कोणाच्याही ध्यानांत येईल. त्यांचें अक्षर गोल, सुवाच्य वळणदार असून आश्चर्य हें कीं, एवढ्या समग्र हाती लिहिलेल्या व केवळ स्मरणानें जुळविलेल्या मजकुरांत कोठेंही शोध नाहीं. त्यांची भाषा जुन्या बखरीसारखी असून मोठी जोरदार व वर्णनकौशल्यानें युक्त अशी आहे हेंही वाचकांच्या ध्यानात येईल. शेवटचें वाक्य असें आहे. ' असो. सत्तावनच्या बंडासंबंधानें जें जें स्मरण मजला झालें तें सर्व लिहून ठेविलें आहे. हस्ताक्षर विष्णुभट गोडसे रा।। वरसई ता।। पेण जि. कुलाबा. शके १८०५ सुभानुनाम संवत्सरे माघ शु. ११ गुरुवार इति शम् ''

ता. १० मे १९२२
कल्याण

**चिंतामण विनायक वैद्य**

# अनुक्रमणिका


## भाग १ ला - प्रास्ताविक

विष्णुपंतांचे वडील व मातोश्री- बालपण- विद्यार्जनास प्रारंभ व विवाह- हरिपंत व कृष्णाबाई यांचे विवाह- जणू राम, लक्ष्मण, भरत- बायजाबाई शिंदे यांजकडे सर्वतोमुख यज्ञ- देशाटनाचा संकल्प व त्यातील अडचणी- वडिलांचा उपदेश- अखेर प्रयाणाचा दिवस उगवला- घरच्या मंडळींचा प्रेमळ निरोप- फाल्गुन वद्य ५ शके १७७८.

## भाग २ रा - वाघोलीहून पुढे पान १३

यजुर्वेदी-ब्राह्मणास सर्पदंश- रम्य सातपुडा- क्रांतीची चाहूल- काडतूस प्रकरण- ती जूनची दहा तारीख- महूची छावणी पेटविली- उज्जनी तर गाठली- विष्णुपंत जोशी यांचे बिऱ्हाडी- धारानगरचे राजे पवार- राजेसाहेबांचे उत्तरक्रियेचे वेळचा दानधर्म- ग्वाल्हेरीस बायजाबाई शिंदे यांची भेट.

## भाग ३ रा - झासीवालीचे बालपण पान ३०

गंगाधर बाबा- छबेलीचें लग्न- झाशीस प्रयाण- तात्या टोपी- गुलसराईचे केशवराव यांच्याशी युद्ध व अटक- तात्यांनी कानपूर सर केले- आगबोट प्रकरण- कानपूरची लढाई- श्रीमंतांचे लखनौकडे प्रयाण- श्रीमंतांचे व स्त्रियांचे हाल- ब्रह्मावर्ती कत्तल व लूटमार- सरस्वतीबाईंचे स्मारक उदध्वस्त केले- तात्या टोपीने कालपी सर केली- झासीस मांडवगणे यांचे बिऱ्हाडी.

## भाग ४ था - झासी वर्णन पान ५५

मोरोपंत तांबे यांची भेट- दत्तक प्रकरण- गोऱ्या बायकांस आश्रय- काम्य ग्रहयज्ञ- दानशूर लक्ष्मीबाई- बाईसाहेबांची दिनचर्या- नारायण ~~शास्त्रीबाबांची गोष्ट- झासीवालीची अश्वपरीक्षा- दानशूर बाईसाहेबांचा~~ स्नानविधी- झासीस नाटक मंडळी- बाणपूरचे राजास फितुरीचा सुगावा- झासीवर चाल- तिसरे दिवशीं- आठवे दिवशीं- अकराव्या दिवशीं- फितुरीमुळें शौर्याचा निरुपाय- दुलाजीसिंग परदेशी- दीन झासी- इंग्रजांची फळी फोडून कालपीस प्रयाण- बंड्यातील भीषण दुपार- सर्वत्र लूटमार आणि कत्तल- हालांना सीमा राहिली नाही- मोरोपंत तांबे यांना फाशी.

## भाग ५ वा - कालपीचे मार्गावर पान १०३

चित्रकूटाचे वाटेवर- श्रीमंतांस भेटीचे आमंत्रण व कैद- गुजराथी सावकार- काकांस लूक लागली- श्रीमंतांनी ग्वाल्हेर सर केले- मला नारूनें पछाडलें- श्रीमंतांनी बुंदीकोटा सर केलें- नवे संकट- श्रीमंतांवर नर्मदेची कृपा.

## भाग ६ वा - बिलसियास तुलापुरुष दान पान १३९

नैमिषारण्यांत- अयोध्या नगरींत- वानरांचा उपद्रव- अयोध्येविषयी एक कथा- लखनौ शहरी- हिंगणे यांचे सोबतीने काशीक्षेत्री.

## परिशिष्ट पान १५८

गंगेची कावड- ग्वाल्हेरचे मार्गावर- पुनः एकदा झासीस- नवे संकट व त्यातून सुटका- सत्त्व परीक्षा- नेमावर क्षेत्री- सप्तशृंगास- माता- पितरांची भेट.

ग्रा. क्र. 683

## भाग १ ला

# प्रास्ताविक

### विष्णुपंतांचे वडील व मातोश्री

आलीबाग जिल्ह्यात, पेण ताक्यात वरसई म्हणोन डोंगरनजीक नदीकाठी गांव आहे. त्या गांवात स्वयंभू सीवालय आहे. ब्राह्मण वस्ती पाऊणसे घर आहे. गांवची रीत क्षेत्रासारखी आहे. बहुधा या गांवचे लोक सर्व विचारी असून विद्येचे व बुद्धीचे कामांत हुषार आहेत. या गांवी चितपावन जातीचे गोडसे यांचे कुल आहे. गोडसे हे ऋग्वेदी, शांडिल्य गोत्री बहुत प्राचीन राहणारे. त्या कुलांत माझा जन्म. तीर्थरूपांचे नांव बाळकृष्ण व मातोश्री राधाबाई या नांवाची. माझे नांव विष्णुभट. कनिष्ट बंधु हरिपंत व धोंडभट व भगिनी कृष्णाबाई असी आम्ही आपल्ये आसता, आमचे चुलते केशव भट व रामभट. हे सर्व माझे घराणे विद्वानांचे आहे. फक्त तीर्थरूप मात्र गृहस्त होते. ते लहानपणापासून श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे अमलात विंचूरकर सरदार यांचे पदरी होते. मराठे यांचे राज्याचा भर समाप्त जाहाल्यावर, श्रीमंत पुणे सोडून हिंदुस्थानांत जाण्याचे इराद्याने फौजेसु ।। जात असता तीर्थरूप नर्मदा गंगेपर्यंत गेले. तो प्रकृत फार अशक्त होऊन ज्वर येऊ लागल्याकारणाने शके १७३९ सात वरसईस येऊन पोचले. आणि त्याणी असा नियम केला की, आता सरकारी नोकरी कर्णे नाही, जे प्राप्त होईल त्यात निर्वाह करून येथेच स्नानसंध्यादि पुण्य कर्मे करून वय नेऊ असा विचार करून राहिले. त्यांचा रोजक्रम असा चालत होता. मोठे पाहाटेस उठोन शौचविधी करून, स्नान प्रातःकाळीं जाहाल्यावर संध्या जपादि करून रुद्रैकादशीपूर्वक श्रीची पूजा नऊ वाजता समाप्त करून, मध्ये एक कलाख श्रीभागवत किंवा उपनिषद भागाचा विचार जाहल्यावर स्वयंभू सिवस्थानी जाऊन पूजा करून घरी येऊन पंचमाहायज्ञ करून भोजन जाहाल्यावर पवमान व विष्णुसूक्तादि पठण करून श्रीभगवत्‌गीता अष्टादश अध्ये आवृत्तिचा नेम होता. सायंकाळी चार वाजल्यावर बेलतुळसी फुलें वगैरे आणण्याचा उद्योग करीत

असत. रात्रौ संध्यादि देवपूजा जाहाल्यावर वेदान्तशास्त्रावलोकन करून निद्रिस्त व्हावे. त्याप्रमाो सर्व काळ घालवीत असोन शेवेत रात्रंदिवस तत्पर असावे.

### बालपण

पुढे आमचे जन्म जाहाले. भिक्षुकी घराणे असल्यामुळे यजमानाकडून उत्पन्न होई त्यात व घरची सेते होती त्या उत्पन्नानी निर्वाह होत असे. तो वडील चुलते त्यांचे मनात विभक्त व्हावे, असे आल्यावरून त्रिवर्ग बंधु विभक्त जाहाले. माझा जन्म शके १७४९ श्रावण मासचा आहे. विभक्त जाहाल्याचा शक १७६० मार्गसीर्ष मासी जाहाले. ते समई माझे वय दाहा वर्षाचे होते. विभक्त जाहाल्यावर खर्चवेचाच्या सर्व अडचणी पडूं लागल्या. खऱ्या गरीबीने तर मालाच घातली. तीर्थरूप गृहस्त आम्ही मुले लाहान, भिक्षुकीचे उत्पन्न मुळीच नाही. फक्त सेताचे उत्पन्नावर उपजीविका बराबर होईनाशी जाहाली. तरी तीर्थरूपांनी स्नानसंध्यादिकाचा लोप केला नाही. तीर्थरूपास लीलावती ग्रंथ चांगला माहीत होता. गृहस्त असल्यामुळे भिक्षुकी बाौ परान्नादि वर्ज्य केले होते. परंतु मजला लिहिणे चांगले सांगत असत. बाळबद व मोडी लिहिणे व वाचणे, गुणाकार, भागाकार व व्याजाचे वगैरे हिशोबात तयार केले. घरचे लिहिणे व्यवस्थेसीर, सिलकबंद वगैरे लिहिण्याची समजूत चांगली करून दिल्ही, तों माझें वय दाहा आकराचे झाले. पुढे कोठेतरी बाहेर मजला ठेऊन सरकारी नोकरी लावून द्यावी तों वडील चुलते केशवभट हे रात्रौ तीर्थरूपाजवळ बसून असा निश्चय केला की; गावीं परगावी आपले यजमान वीस बेवीस घरे आहेत. आणि आपल्यापासी मुलगे तूर्त हेच आहेत. मजला तर मुलगा नाही. रामभट यांचे कुटुंब कैलासवासी जाहाल्या कारणाने ब्रह्मावर्तास गेले. तेथे श्रीमंत यांजकडे होमशालेकडे ऋत्विज्य आहेत. पुढे अर्थ संपादन करून लग्न होऊन संतति होणार. आमचे वय जाहाले. त्यापेक्षा यजमानास कुलगुरु नाही असे होणार. असे जाहाल्यानी आपले कुळास हे कर्म उचित नाही. त्यापेक्षा आम्ही दोन सोबती मिळऊन मुहूर्त पाहून संविता सांगण्यास आरंभ करितो. मुलास गृहस्त करून रोजगार करऊन द्रव्य विशेष मिळवून उपभोग कर्णे बरे वाटत नाही. मुलगा विद्वान होऊन यजमानकृत्य पाहून जे द्रव्य प्राप्त होईल त्यातच निर्वाह करील हें फार चांगले. आपला ब्राह्मणपणाचा आचार सोडून राजाची चाकरी कर्णे हें आपल्या उपयोगी नाही. इत्यादि उभयतांचा संवाद होऊन पढण्याबाो विचार ठरला. नंतर सोबत्यांची

व्यवस्था लाऊन संवितेस आरंभ केला. धाकटा बंधु हरिपंत याचा व्रतबंध होऊन स्नानसंध्या रुद्रपवमान श्रावणी वगैरे जें ब्रह्मकर्मास आवस्य लागते तेवढेच पढोन लिहिण्याचा क्रम सुरू ठेवला. संविता ब्राह्मणपदे समाप्त होणार, तों शके १७६८ ज्येष्ठ मासी विद्या सांगणारे केशवभट तात्या हे स्वर्गवासी जाहाले. रामभट हे चुलते हिंदुस्थानात राहून त्याणी आपला विवाह केला. ईश्वरी इच्छेने ते समई वीस मणाचे भाताचे खंडीस रुो नऊ दाहाप्राो दर जाहाला. सर्व जीनस अति स्वस्त होत गेले. तीर्थरूप तर सदासर्वदा आपले ब्रह्मकर्मात होते. मग पैसा मिळण्यास वाटच नाही. आणि आम्हीही वयानी मोठे जाहालो. तथापि बालबध घराणे व तीर्थरूपांचे व मातोश्रींचे वर्तन पाहून लोकांच्या मुली सांगोन यावयास लागल्या. परंतु तीर्थरूप आम्हांस कर्तव्य नाही म्हणोन सांगत असत. याचे कारण गरिबी फार. जवळ पैसा नाही. व सावकारही रुौ देण्यास कोणी नाही. गहाण सेते द्यावी तर भातास दर नसल्यामुळे उपाय नाही. मजला समजूत चांगली आल्यावर, वडील चुलते निवर्तल्यावर यजमानाकडे काही याज्ञिक जाहाल्यास स्वता मजला चालविण्याचे ज्ञान नाही हे मनांत येऊन वरसई गांवातच वेदशास्त्रसंपन्न विनायक जोसी शास्त्री फार समर्थ ब्राह्मण वेदशास्त्र निपुण, काही ज्योतिष भागही आवगत व याज्ञिक तर सूत्रवृत्ति भाष्यांत निस्नात कुंडमंडपपर्यंत संपविलेले असे राहात होते. त्याजकडे जाऊन विनयपूर्वक नमस्कार करून विनंति केली. ती. शास्त्रीबाबा आमचे चुलते केशवभट तात्या कैलासवासी जाहाले, आतां आमचे घरात यज्यमान कृत्ये चालविणारा कोणी नसल्यामुळे हरवक्त अडचणी येतात व येणार. यास्तव माझी प्रार्थनापूर्वक विज्ञप्ति असी आहे की, मी काही वेद व गृहस्तपणाची विद्या केली आहे. व सूत्र पढलो आहे व बाळबद आक्षर बरेच असोन वाचनहि चांगले आहे. याखेरीज आपण सांगाल तें पढून तयार करीन. परंतु धर्मशास्त्राचे भाग काही समजले पाहिजेत. याज्ञिक तर तयार जाहाले पाहिजे. यास्तव आपल्यास प्रांतात लोक मान्य करितात तसी मान्यता येऊन विद्या जाहाली पाहिजे. याज्ञिकाची विद्या खरी गुरूची कृपा होईल तरच विद्यार्थ्यास लौकर येईल. यास्तव आपण पुत्राो मजवर प्रेम ठेऊन सांगण्याचे कबूल कराल तर मी ही विद्या करणार आहे. वेदास आवृत्ति मात्र करणार. पुढे वेदाचे काम पढण्याचे बंद करणार. आपण मेहरबानीने निष्कपटपणे अध्ययन सांगितले पाहिजे, असी विनंति करिताच जोसीबाबा फार आनंदीत होऊन असे सांगितले की, मजला जे विषय कळले आहेत ते अध्ययन निष्कपटपणे आम्ही

सांगू, परंतु थोडी व्युत्पत्ति तयार केली पाहिजे. केवळ वैदिक लोक चालवितात तसी ही विद्या उपयोग नाही. आम्हापासीं पढावयाचे असल्यास आमचे नांव होईल तें केले पाहिजे वगैरे त्यांची बोलणी ऐकून त्याणी सांगितलेले सर्व विचार करून मुहूर्त पाहून रूपावळीस आरंभ केला.

## विद्यार्जनास प्रारंभ व विवाह

पुढे क्रमाने समासचक्र व आमराची कांडे म्हणोन, रघूचे काव्यास आरंभ केला व प्रयोगरत्न म्हणजे नारायण भटी प्रथम परिभाषेपासून पढावयास आरंभ केला. ज्योतिषपैकी मुहूर्तमार्तंड ग्रंथास आरंभही केला. विद्याभ्यास सुरू जाहाल्यावर रात्रं-दिवस तोच घोष चालविला होता. शास्त्री बाबांचे डोळे फार आशक्त, सबब धर्म शास्त्रांचे ग्रंथही मी वाचून त्याणी श्रवण करावे. फावले वेळेस निर्णयसिंधु व मयुख, प्रयोग पारिजात, स्मृत्यर्थ सारादि ग्रंथ पाहण्याचा क्रम ठेविला होता. आणि यजमानाकडे जे याज्ञीक होत गेले ते ते प्रयोग शास्त्रीबाबांचे समक्ष चालवूं लागलो. तो दोन वर्षांनी सर्वांस माहीत होऊन लागलीच विवाह जाहाला. विवाहास खर्च बाो रुपये लागले ते सर्व कर्ज घेतले. मजला समजून आल्यापासून गरीबीने तर माला घातली. मागील दारी पुढील दारी तर दरिद्र फुगड्या घालीत होते. तथापि लोकांचे रुपये कर्जाऊ घेतले नाही. कार्यामुळे घ्यावे लागले.

## हरिपंत व कृष्णाबाई यांचे विवाह

चिरंजीव हरिपंत कनिष्ठ बंधु हा कारकुनीचे विद्येत तीर्थरुपाप्राो जाहला. दोन्ही अक्षरे अति उत्तम व समजूत व व्यवहारज्ञान अति सुरेख जाहले. परीक्षेकरिता दोन वर्षे ठाणे जिल्ह्यांत आला. परंतु परीक्षा पास न झाल्याकारणाने पेणेस सावकरी चाकरी सालाचे रुाो पन्नास खेरीज भोजनखर्च पतकरून राहिला. त्याचे गुण अति उत्तम व व्यवहारात चूक नाही. निस्पृह स्थितीत असे. या कारणाने त्या यजमानाची मर्जी अति बसली. तोही अति विश्वासानी काम करीत असे. यजमानाने त्याजकडे मुखत्यारी असी दिल्ही होती की, एकादे समयी एकादे कुलास १०० रुाो पर्यंत सूटही यजमान नसता द्यावी. एकाद ठिकाणी घेणे जाहल्यास जास्त करारो व्याज आकार करून १०० पर्यंत रुपये घेतहि असे. याप्राो बुध्धीचे योगाने लौकिकास चांगला आल्यामुळे, मुलगी सांगोन येऊन त्याचेहि लग्न जाहाले. ते समयी कर्जाऊ रुाो काढून लग्न केले. धाकटा बंधू धोंडभट हा पढावयास घातला होता. तो अति बुध्धीमान त्याने संवितेचा आध्याय ११ आकरा

संथानी गुरुजीस पाठ म्हणोन दाखवावा याप्रौ बुध्धीचा योग होता. पुढे थोडेच दिवसानी भगिनी कृष्णाबाई इचे लग्न जाहाले. त्या लग्नास रुो लोकांचे कर्जच घ्यावे लागले. वडिलांचे पुण्याईने प्रांतांत लौकीक चांगले रीतीने संपादित जाहाला. याजमुळे पहिपाव्हणा वगैरे जास्त पडू लागला व गांव संबंध्येची किंवा कोणतीहि बाब आली तरी पैशाची झीज सोसून शारीर मेहनत करून लौकिकाची कामे करीत गेलो. तिघेहि थोडे थोडे मिळवणारे जाहालो. परंतु खर्चही जास्त होत चालला. या कार्यावर कार्ये येऊं लागल्यामुळे कर्जाबाो उपाय चालत नाहीसा जाहाला. उत्तम लौकिकामुळे काही कारणानी रुो लागल्यास सावकार लोक बिनहरकत खतपत्र नसता पांच-पांचसे रुो देत असत पत असल्यामुळे लोकांस कर्ज आहे असे समजण्यांत आले नाही.

## जणूं राम, लक्ष्मण, भरत

धोंडभट हा अति बुध्धीमान. पढण्याचे काम बहुतेक संपवीत आला. क्रम पढावयास लागला, तो व्युत्पत्ति म्हणावी असे त्याचे मनात आल्यावरून व्युत्पत्ति चांगली पढू लागला व कविताही चांगली करू लागला. त्यासहि मुलगी सांगोन येऊन लग्न जाहाले. चांगले लौकिकास आल्यामुळे या लग्नास खर्च बराच जाहाला. खर्चास ऐवज सर्व कर्जाऊ घेणे प्राप्त जाहाला. धोंडभट हा दोघांपेक्षा बहुत लहान असे. परंतु त्याचे बुध्धीबळ आम्हापेक्षा जास्त असे. जी विद्या व कला पाहिली ती साध्य करण्यास वेळ लागत नसे. आमचे बंधुत्व अतीच चांगले होते. लहानपणापासूनच कधीहि फाट कोणत्याच कामात पडला नाही. लहानपणी गरिबी फार असल्यामुळे काही कर्णे जाहाल्यास सर्वांचे विचारे ते काम करीत असो. पुढे आमच्या स्त्रिया मोठ्या जाहाल्यावर घरात कमजास्त घरोटी संमधे काही एक गोष्ट जास्त उणी जाहल्यास रात्रौ आम्हापासी बायकांनी सांगितली असता आम्ही दुसरे दिवशी ती || मातोश्रींचे समक्ष ती गोष्ट काढून त्याचा फाड जेव्हाचे तेव्हा दोनचार वेळा केल्यामुळे, पुनः बायका आम्हापासी फाट पडण्याबाो बोलत नाहींशा जाहाल्या व त्याहि मोठे कुलीन घराण्यातल्या असल्यामुळे लौकिकांनी चांगले रीतीने सासूसासऱ्याची सेवा करून त्यांचे आज्ञेने वागत असत. समयी बाहेरचा कोणी गृहस्त पाव्हणा घरी येऊन आठ दिवस राहून जाऊ लागला म्हणजे चौकसी करीत असे की, चौघी बायका घरात व एक मातोश्री आशा आहेत, परंतु यांत सासुरवासिणी किती व माहेरवासिणी किती हे त्यास

समजू नये. चौघीही बहिणीच आहेत की काय अशा घरातील बायका येकविचारे व आम्हास अनुकूल होत्या. आमचे बंधुत्वास उपमा श्रीराम भरत लक्ष्मण यांचीच लोक देत होते. आमच्या मुंजी जाहाल्या नव्हत्या ते समयी शौचास दोघा मिलोन एक पात्र नेत असो. त्या प्रो च मोठे जाहलो तरी तोच क्रम होता, असे म्हणणे प्राप्त आहे. बंधुत्वात अंतर कोठेच नाही. वस्त्रे सर्वांस घेणे ती मी बाजारातून आणावी, सर्वांनी मान्य करावी याप्रो स्थिती अशी होती. पुढे जेव्हा जेव्हा आम्ही बंधु रात्रौ बसावे तेव्हा लोकांचे कर्जा बाो अतिशय काळजी करीत जावी. परंतु कर्ज दूर होण्यास रस्ता नाही, ईश्वरइच्छेने कधी रिणमुक्त होऊ ते खरे.

## बायजाबाई शिंदे यांजकडे सर्वतोमुख यज्ञ

पुढे महाशिवरात्रीचे सुमार शहर पुणे येथे यजमानाकडे अनुष्ठान चालविण्यास गेलो होतो. तेथे असे ऐकण्यास आले की, हिंदुस्थानांत बायजाबाईसाहेब शिंदी ही अग्निहोत्री याजपासून सर्वतोमुख या नावाचा यज्ञ मथुरेस करविणार. त्या यज्ञास एकंदर खर्च सात आठ लक्ष रुो धर्मादाय खर्च होणार. म्हणून बायजाबाईसाहेब यांचे आश्रीत मंडळींची पत्रे पुणे, वाई व नाशिक या ठिकाणी विद्वान् मंडळीस आली आहेत. असे समजताच चौकशी करून पाहिली तो, ती पत्रे दृष्टीस पडली आणि वरसईस येऊन पेणेहून हरिपंत यास बलावून आणून रात्रौ विचार कर्ण्यास आरंभ केला.

## देशाटनाचा संकल्प व त्यांतील अडचणी

त्या विचारांत असे ठरले की, हाली बायजाबाई साहेब याजपाशी वेदशास्त्रसंपन्न बाळकृष्ण भट भाऊ वैशंपायन हे दानाध्यक्ष आहेत. त्याजवर उत्तमप्रकारे लोभ सिंदे सरकारचा व बायजाबाईचा आहे. ते धर्मादायाचे कामांत मुखत्यार आहेत आणि ते आपले आप्त आहेत. तीर्थरूपांचा परिचय चांगला आहे, यास्तव तीर्थरूपांचे नांवाचे पत्र त्याजकडे पाठवावे. पत्रोत्तर आल्यावर विचार कर्णे तो करावा; असा विचार होताच पत्र लिहून पत्ता ग्वालेरीत चावडी बाजारात वेदशास्त्रसंपन्न भाऊसाहेब वैशंपायन दानाध्यक्ष यास प्रविष्ट व्हावा, असे लिहून रवाना करण्यास हरिपंत याजपाशी दिल्हे. दुसरे दिवसी पेणेस डाकेत हरिपंत याणीं टाकिले. तें पत्र ग्वाल्हेरीस जाऊन दानाध्यक्ष यास पोचले. त्याणी त्या पत्राचा विचार करून लागलीच उत्तर दिल्हे. तें पत्र फाल्गुन मासी वरसईस तीर्थरूपासी आले. त्याणी फोडून पाहून मजला जवळ बलावून विचारले की,

आमचे नांवचे पत्र पाठविले परंतु, आम्हांस कळविले नाही याचे कारण काय ? तेव्हा त्यांस असे सांगितले की, वैशंपायन हे आपले आप्त सोयरे धायरे खरे, परंतु हालीचे कालांत ते श्रीमंत आहेत आणि दानाध्यक्षतेचा आधिकार त्याचकडे आहे. याजवरून पत्रोत्तर आल्यावर आपल्यास सहज कळेल, जर करिता पत्रोत्तर नाही आले, तर आपले मनास ताप मात्र होईल, सबब पत्र दाखविले नाही. असे सांगितल्यावर तीर्थरूप असे बोलले की, दूर देश फार आणि तसी तुझी लोकोत्तर विद्वत्ता नाही. त्यापेक्षा जाण्याचा विचार आमचे बुध्धीने येत नाही. हे ऐकून घेऊन स्वस्थ विचारात राहिलो. दानाध्यक्ष वैशंपायन यांची कन्या वरसईस कर्वे इनामदार यांजकडे दिल्ही आहे. तिचे नवऱ्याचे नांवे पत्र ग्वाल्हेरीहून आले. त्यांत मजकूर मी येथें बाईसाहेब सिंदी मथुरेस सर्वतोमुख यज्ञ करणार त्यात खर्च सात आठ लक्ष रुा होणार; यापेक्षा ती मौजही दृष्टीस पडेल आणि फायदाही होईल. आमचे भेटीस बहुत वर्षे जाहाली आहेत. त्यास आपण कुटुंबास सु ।। येण्याचा विचार करावा व येते समयी राजमान्य राजश्री बाळकृष्णपंत आणा गोडसे यांचे चिरंजीव येतील तर त्यासहि बराबर आणावे. इकडे आले आसता भेटीचा लाभ आम्हास होईल, आपल्यास यात्रा घडेल, अशा म ।। राचे पत्र आलेले घेऊन आमचे घरीं आणून वाचिले. तीर्थरूप, मातोश्रीस विचारता सदरी तीर्थरूपांनी उत्तर दिल्हेले पुनः तसेच दिल्हे. हिंदुस्थानात जावे असा माझा निश्चय जाहाला खरा, परंतु कुटुंबाचे मनुष्यांचा विचार येत नाही. मग मी मोठ्या संकष्टात पडलो, तो ती ।। वाो. रा. श्री रामभटकाका हे चुलते विभक्त वरसईस घर शेजारी बांधून राहिले होते. परंतु त्यांचे बंधुत्व व रहस्य चांगले होते. बायकांचे न बने सबब विभक्तपणा केला होता. शेते, माळ, खण, झाडे, पोथ्यापुस्तके वगैरे काही एक वाटणी जाहाली नाही. आपआपले हिशाप्राो सरकारधारा देऊन उत्पन्न वाटून घेत असत. नफानुकसानी बाो कालजीने सर्वत्र एकच आहे, असे समजून निष्कपटपणे उभयता बंधु वागत असत. त्यांचे घरी मी जाऊन ग्वाल्हेरीस जाण्याबाो चा विचार व दानाध्यक्षांकडून आलेले पत्र त्यास दाखविले. त्याणी त्या गोष्टीचे उत्तर केले की, आज रात्री मी विचार करून उदईक तुजला सर्व सांगेन. नंतर दुसरे दिवशी काकाकडे जाऊन विचारिता त्याणी असे कळविले की, मजला लोकांचे देणे थोडेबहुत जाहाले आणि वास्तु नीट करणे आहे, माझा तर वृद्धापकाळ. मजला मुलगा तर एकच असोन त्याजला विद्या होईल असे मजला वाटत नाही. त्यापेक्षा एकवार लोकांचे देणे नाहीसे करून वास्तु चांगली बांधून

ठेवणे आहे. या करिता मी हिंदुस्थानात तुजबराबर येणार. परंतु तूं मात्र माझे बेताने मला सांभाळून घरी आणावे. मी असल्याने उभयतांस सुख होईल, पित्तापुत्राप्राो परदेशात वागून जे द्रव्य संपादित होईल, ते वाटून घेऊ. आता तुझे तीर्थरूपांपासोन तुजला जाण्याबा ।। ची आज्ञा देवविण्याचे काम मी करितो. मी बराबर असल्याने ग्वाल्हेरीस व तेथून झासीस फायदा जास्त होईल, याजकरिता माझा तर निश्चय जाण्या बाो चा कायम जाहाला. असे कनिष्ठ चुलते यांचा विचार ठरल्यानंतर, हरिपंत यास पत्र पाठवून पेणेहून आणोन रात्रौ रामभट काका व तीर्थरूप, मातोश्री व हरिपंत ही सर्व मनुष्यें एकत्र करून विचार सुरू केला. त्यांत प्रथम मी बोलू लागलो. एकंदर आपल्यास कर्ज इस्टेटपेक्षा जास्त देणे जाहाले आहे, याचा विचार पाहाता सर्व कुटुंबाचे अन्नवस्त्र चालून त्यातच जास्त कृत्ये येतील ती केली पाहिजेत. लोकव्यवहार पाहून आपले योग्यतेनुरूप चालता हाली प्रतिवर्षी व्याजब ।। निकाल करता किरकोळ रक्कम पंचवीसपर्यंत नवीन कोणाची दोन महिने मुदतीची घेऊन व्याज द्यावे लागते. ती रक्कम पुनः व्याजी सुरू होते, अशा रकमा तीन चार सालाच्या एकंदर कर्जांत जमा होतात, त्यापेक्षा मजला हिंदुस्थानात जाण्याब ।। आज्ञा द्यावी. कुटुंबाकरिता यत्न केला तर सर्वांचे नसिबाने चांगलेच होईल. मी जरी दूर देशी अद्याप गेलो नाही तरी मजला सर्व भरवसा वाटत आहेत. तशांत ती ।। काका बराबर सांभाळण्याब ।। आहेत, येथून काका व मी मिलोन कर्वे यांचे गाडीत एक भाग गाडीभाडे देऊन सोयी करून जाऊ. कर्वे हे कुटुंबास सु ।। जाणार व आम्हास नेणार. भोजनखर्च वगैरे हिसेरसीने त्यास देऊ. कर्वे आम्हास, आम्ही कर्वे यास जपून असून परदेशी जाऊ. आपले आप्त सोयरे यांचा विचार ग्वाल्हेरहून पत्र आले त्यापेक्षा जावे हेच चांगले असे म्हणतात.

## वडिलांचा उपदेश

ते समयी तीर्थरूप असे बोलले की, हिंदुस्थानात भांग वाटून पितात व तिकडे स्त्रिया आपले चातुर्याने पुरुषास वश्य करतात. इकडून तुम्ही गेल्यावर लवकर तिकडे येणे होत नाही, इत्यादी मजला विचार पडत आहेत. असे बोलणे ऐकून त्याजला असे सांगितले की, विषयादिकांचे उपभोगांनी सुख घेण्याकरिता जात नाही. कुटुंबास रिण जाहल्याब ।। जाणे आहे. आपणहि काळजी करू नये. मी आपल्यास असे कळवितो की, स्त्रियांचे नेत्रकटाक्षाचे वगैरे चातुर्यास वश्य बहुधा

शपथपूर्वक होणार नाही. तशीच भांग वगैरे आमलाचे पदार्थ खाणार नाही, शरीरप्रकृतीस फार प्रकारे जपून राहीन. तशांत त्या देशाचे माहितगार काका बराबर आहेत. ती कालजी आपण बिलकूल करू नये. हाली खर्चास रु ।। १० बराबर दिल्हेत म्हणजे पूरे. असी बोलणी माझी व तीर्थरूपांची मध्यरात्रपर्यंत होऊन अखेर आज्ञा दिल्ही. दुसरे दिवसी हरिपंत व मातोश्री यांचेहि समाधान करून जाण्याचा विचार ठरला. रात्रौ बायको न जाण्याबद्दल सांगू लागली, तेव्हा तिजला सांगितले की, तूं आज तीन महिने दुखणेकरीण आहेस. जिवावरचा आपमृत्यू टळला. तुजला अद्याप काठी हातांत घेतल्याशिवाय बाहेर आंगण्यात जाण्याचे सामर्थ्य नाही. वैद्य यांचे औषध सुरू आहे. हे दिवस उन्हाळीचे आता जातील. आगोटीस मात्र चांगले जपले पाहिजे. प्रकृत हुषार होतां कार्तिक मार्गशीर्ष येईल. आम्ही तरी सराईस माघ मासी घरी येऊ. हे दिवस आता लवकर जातील. तूं स्वस्थ मनाने ती. मातोश्रीची सेवा करून राहावे. माहेरी चालीहून जास्त मात्र आम्ही नसल्यामुळे राहू नये. इत्यादी उभयतांची बोलणी होता होता रात्र सरली. पहाटेस समाधानानी जाण्याबौ विचार ठरला.

## अखेर प्रयाणाचा दिवस उगवला

नंतर दुसरे दिवशी सकाळी काका हे घरी येऊन तीर्थरूपास असें सांगितले की, आम्ही दोघेही हिंदुस्थानात जातो, तुम्ही काळजी न करता येथे राहून दोन्ही प्रपंच पहात जावे. विष्णुब ।। काळजी किमपि करू नये. तो पुत्र मी पिताच आहे. या उपर मजला सांगता येत नाही. त्याजवरून तीर्थरूपांनी मुहूर्त पाहाण्यास सांगितला. माझी मातोश्री फार स्वभावाने गरीब व भावार्थी भोळी असे. तिणे नेत्रांस पाणी काढून असे बोलली की, विष्णु पुन्हा दृष्टीस कसा पडशील तो दिवस सुदिन आहे. मजला बोलण्याचे ज्ञान नाही, सबब मी बोलत नाही. सर्व ऐकून घेत्ये. ते समयी मजला गहिवर येऊन मातोश्रीचे पाय धरून असे सांगितले की तुजला भय मी तिकडे काही नादांनी राहीन हे आहे. तर मी आपले मतलबांपलीकडे नाद धरीन, तर हेच पाय मजला साक्ष आहेत. तूं काळजी करू नको, इत्यादी बोलून तिचे समाधान केले. धोंडभट हा फार लहान तथापि मजला एकांती गाठून दूरदेशी न जाण्याब ।। बोलू लागला ते समयी त्याचेहि समाधान थोड्यात करून असे सांगितले की, मी व काका दोघेही गेल्यावर यजमानाकडे जाण्यास तूंच आहेस. त्यापेक्षा आता वेदास आवृत्ति म्हणून काव्याचा येक श्लोक

रोज करीत जावा. बाकी वेळ राहिला त्यात याज्ञिकाचे प्रयोग म्हणून तयार ठेवावे. बहुत सावधपणे असावे. हरिपंत पेणेस आहे. तीर्थरूपापासीं तूंच आहेस. त्यांचे आज्ञेने त्यांस आम्ही दूरदेशी गेलो हे समजूं देऊ नये. देणेघेणे व्यवहार सर्व हरिपंत पाहील तूं यज्यमान कृत्य व घरखटल्याबा॥ पाहावे. बायकाचे मुलांचे हाल करू नये. मातोश्रीस देवधर्माकरता खर्चास लागते ते तूं देत जावे. तिचे आज्ञेत असावे. रोज तिचे वस्त्र स्वता धूत जावे. कारण तिजला वस्त्र स्वच्छ पाहिजे. ती सुनालेकीपाशी देत नाही. मी हा बहुधा घरी असल्यावरचा नियम चालविला आहे. तूंही कधीकधी धूत असतोस, परंतु आता मात्र मी घरी येई तोपर्यंत चालवावा. इत्यादि बोलणी बोलून समाधान केले. चि. कृष्णाबाई बहीण इजला गंगाजमुनी झारी आणण्याचे कबूल करून समाधान केले तो मुहूर्ताचा दिवस निघण्याबा॥ चा प्राप्त जाहाला. कर्वे याजपासी गाडीचे भाड्यापैकी चतुर्थांश पतुकरून भोजनखर्च ब ॥ ही ठराव केला. मुहूर्ताचे पूर्व दिवसी सर्व तयारी करून पडसी भरली. त्या रात्रीं झोप आली नाही. सर्व मनुष्यें जागीच होती. पहाटेस दोन घटका रात्रौ उठोन शौचविधी मुख मार्जन करून उजाडताच कर्वे याणी गाडी तयार करून बाजारचे नाक्यावर आपण कुटुंबासु ॥ येऊन उभे राहिले आणि आम्हास निरोप पाठविला.

## घरच्या मंडळींचा प्रेमळ निरोप

नंतर ती॥ काका व आम्ही श्रीकुलस्वामिणीस हळदकुंकुम वाहून प्रार्थना करून व ती॥ व मातोश्रीचे चरणावर मस्तक ठेवून नमस्कार करून घरांतून बाहेर पडून गाडीपासी आलो. तेथे इष्टमित्र व वेदशास्त्रसंपन्न विनायक शास्त्रीबाबाही आले होते. त्या सर्वांचे समाधान करून नमस्कार करून निघालो. तो गांवाबाहेरपर्यंत सर्व घरची मनुष्ये आली होती. त्यांचे पुनः सर्वांचे समाधान करून परत फिरविली व ती॥ मातोश्रीचे नेत्रास पाणी येऊन कण्ठ भरून आल्यामुळे बोलण्याचा इलाज चालत नाहीसा जाहाला व माझाहि गळा भरून आला. तथापि मातोश्रीचे कण्ठास मिठी घालून तिजला असे सांगितले की, मी पुरवी तुजपासी कबूल केल्याप्रौ फार जपून शरीरास क्लेश देणार नाही. आणि माघ-फाल्गुनमासी पेस्तर साली घरी येईन. आता कांळजी करू नये. ते समयी मातोश्री असे बोलली की, तुझी भेट पुन्हा होईपर्यंत प्राण कण्ठात ठेवले आहेत. फार मजला बोलता येत नाही. असे बोलून माझे नेत्र आपले पदराने पुसून सर्वांनी

मागे फिरण्याचा आग्रह केला तेव्हा माघारी गेली. परंतु हरिपंत माघारा जाईना. तो आमचेबराबर येक कोशपर्यंत गेला. आम्ही त्यास मागे जाण्याबाॏ बहुत आग्रह केला, परंतु तो जाईना. मग एका झाडाखाली उभे राहून त्याजला बहूत प्रकारें समजून सांगितले. नंतर त्याणे माझे गळ्यास मिठी गच्च मारून धरून नेत्रावाटे पाण्याची धारा चालली होती व कण्ठ अगदींच भरून आला असता असे बोलू लागला की, पहा येक वर्षानीं पुनः येतो म्हणून कबूल केले, त्याजवर लक्ष पूर्णपणे ठेवले पाहिजेत. आपले बंधुत्व कसे लहानपणापासून आहे हे लक्षांत राहिले पाहिजे. जन्मापासून आपले बंधुत्वात वियोगजन्य दुःख जाहाले नाही. ईश्वरे आपलेच बुद्धीस उच्चट देऊन हे परम दुःख प्राप्त आहे. असो श्रीराम वनवासास जातेसमयी जे दुःख भरतास होऊन येण्याचा नियम केला तो चौदा वर्षे चवदावे दिवशी मध्यान्ही सूर्य आला म्हणजे मी तुजला भेटेन. ते समयी भरताने प्रतिज्ञा केली की, त्या दिवसापर्यंत मी ब्रह्मचर्य धारण करून वल्कले नेसून भस्म अंगास लावून कंदफलाचा आहार करून तुमचे पादुकांची पूजासेवा करून नंदग्रामीच राहीन असा नियम त्या कालांत त्याणे केला. या कालाप्राॏ मीही भरताप्रमाणेच नियम केला आहे. मुदतेचे दिवसी राम न आल्यास मी अग्निप्रवेश करीन, तसाच माझाहि नियम आहे. आपण येक वर्षानी न आल्यास संसार सोडून बैरागी होऊन विदेहदशा धारण करून पृथ्वीवर संचार करीन, यात संशय आणू नये. आता आपण स्वस्थ मनानी जावे. पत्रे इकडे लौकर लौकर आली पाहिजेत हे ध्यानात ठेवावे. इकडील प्रापंचाची व मातापिता इत्यादिकांची काळजी किंमपि करू नये. धोंडभट घरी आहे. मी आठा दिवसी घरी येत जाईन. आपण जावे. असो, अशी बोळवणी करीत करीत आणखी पावकोशपर्यंत हरिपंत आला. नंतर सर्वांनी त्यास माघारा फिरविला. मागे जातेसमयी पुनः गळ्यास मिठी मारून कण्ठ मोकळा करून मोठ्याने रडून वारंवार तेच सांगून मी भरताप्राॏ भेटीची वाट पहात आहे, असे बोलून परत वरसईस आला.

### फाल्गुन वद्य ५ शके १७७८

आम्ही पुढे चालते झालो. तो दिवस शके १७७८ कालयुक्तनाम संवत्छरी माहे फाल्गुन व ।। ५ मन्दवार. त्या दिवशीं खोपवली मुक्कामीं धर्मशाळेत वस्ती केली. तेथे जेवणे करून पहाटेस गाडीसह घाट चढोन मुक्काम दर मुक्काम करीत शहर पुणे येथे पोहोचलो. वरसईची गाडी भाड्याची होती ती परत पाठविली. त्या

गाडीवानाबराबर तीर्थरूपास पत्र सविस्तर मजकुराचे देऊन मुगटा घरी पाठविला व पुण्यात पायजमा व आंगात घालण्याकरिता बंडी व रूमाल वगैरे सरंजाम केला व फराळाचे बराबर करून घेऊन कर्वे कुटुंबास सु ।। व आम्ही दोघे व कर्वे याणी वाटेने जेवण करण्याकरिता घेतलेली बाई व कर्वे यांची आठ वर्षाची मुलगी इतकी माणसे एक ठिकाणी जेवणे राहणे होते. पुण्यात एक गाडीची ब्राह्मणांची सोबत लागली होती. असो. पुण्यास भाड्याची गाडी इंदूरपर्यंत ठरावाची करून चैत्र शु ।। ३ रोजी शहर पुणे सोडून वाघोली मुक्कामी गेलो. आता हा प्रथम भाग पुरता करतो. मु ।। वरसई विष्णुभट गोडसे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

### भाग दुसरा

# वाघोलीहून पुढे

वाघोलीचा मुक्काम सोडून मजल दर मजल जाता जाता नगर शहर जवळ आले तो जंगलात ओढ्याचे काठी दोनही बाजूस कणेरी तांबड्या पांढऱ्या बहुत पाहिल्या. एक दोन दिवसात लक्ष पुष्पपूजा होईल अशा सर्व कणेरी फुललेल्या पाहून बहुत आनंद जाहाला. आम्ही पुष्पेही बहुत काढली. नंतर केडगांवी वस्ती करून नगर शहरास दुसरे दिवशी दाहा वाजतां पोचलो. ते वाो राजमान्य नाना जोशी मुळे याजकडे नव्या कारंज्यापाशी पोचलो. तेथे काही दिवस मुक्काम करून पुढे गेलो. जाता जाता हिंदुस्थानात जाणाऱ्या गाड्या दोन वाटेने आढळल्या, त्यात ब्राह्मण यज्ञाकरिता ग्वाल्हेरीस जाणारे होते. त्यांसह मालेगांवचे नदीवर धर्मशाळा आहे त्या धर्मशाळेत उतरण्याकरिता गेलो. तेथे चार पाच गाड्या सोडून सर्व मनुष्यें जेवणाचे तजविजीस लागली होती. आम्हीही विचारणू. [illegible]रून तेथेच राहिलो. तेथे उतरलेले लोकात श्रीमंत बापूसाहेब संगमनेरकर यांची भेट जाहाली. बापूसाहेब यांचे वतनवाडी वगैरे काही उत्पन्न संगमनेरी होते. नेहमी राहणे हरदेहांडे येथे होते. ते हरदेहांड्यास जात होते. बराबर त्यांचे कुटुंब होते. त्यांचे चाकरीची मनुष्यें पाच चार होतीं. हरदेहांडे वं संगमनेर या दोन ठिकाणा मिळून सालीना उत्पन्न त्यांस अविच्छिन्न दोन आडीच हजाराचे व दोन्ही ठिकाणी राहाण्याचे वाडे व जवळही अर्थ बराच असावा असा आजमास आहे. बापूसाहेब हे गृहस्थ फार धैर्यवान् व कुलीन व व्युत्पत्ति चांगली. श्रीभागवत नेहमी वाचीत असत व वेदही स्वल्प म्हटलेला असोन, नेहमी स्मार्ताग्नि सिद्ध असल्या कारणानें याज्ञिकाची माहीत चांगली व सप्त संस्था दोन चारदा हातून जाहलेल्या होत्या. बराबर गृह्याग्निसागर वगैरे पुस्तके होती. त्याचे कुटुंब वयानी चाळीस वर्षाचे असावे. बापूसाहेब पंचेचाळिसांत असावे. ती स्त्री पतिव्रता साध्वी पतिसेवापरायणी होती. अशा गृहस्ताची भेट होऊन त्याणीही विचार केला, असे ब्राह्मण विद्वान् समर्थ मिळावयाचे नाहीत. त्यापेक्षा आज रात्री चार घटका मंत्र जागरण करावे. असे बापूसाहेबांनी मनांत आणोन दोन प्रहरून मजला व दुसरे

दोन विद्वान् बरोबर घेऊन श्रीमंत रावराजे बहादूर मालेगांवकर याजकडे त्यांची ओळख वगैरे असल्यामुळे आम्हास तेथे नेलें. तेथें पानसुपारी वगैरे सतकार जाहल्यावर रात्रौ जागरण करण्याबो ठरावून ऐकिण्यास त्यास आमंत्रण करून खेरीज मालेगावीं जे विद्वान असतील त्यांस बोलावण्याचे राजे बहादूर यांस काम सोपऊन धर्मशाळेत आलो. रात्रौ आम्हा बराबरचे पाच असामी विद्वान् व मालेगांवचे चार एकूण नऊ असामी जागरणास होतो. दूध वगैरे आणिले होते. रात्री बराबर दोन वाजता तेथपर्यंत जागरण जाहाले. दर ब्राह्मणास एकेक रुपया दक्षणा देऊन निद्रिस्त जाहालो.

## यजुर्वेदी ब्राह्मणास सर्पदंश

बापूसाहेब यांचेबराबर सोबतीने एक ब्राह्मण यजुर्वेदी वय सुमार पंचवीस पासून तिसीचे आत असा आला होता. तो ब्राह्मण मंत्रजागर होई तेथपर्यंत मंडळीत जागत होता. सर्वांबरोबर निद्रित जाहाला. पुढे पहाटेस त्या ब्राह्मणास सर्पदंश होऊन जागृत जाहाला. सर्वांस उठवून सर्पदंश जाहाला खरा. त्याजवरचे उपाय मंत्रमणी औषधी उपाय सुरू केले. पहाटेस राजेबहादर यांचे वाड्यात जाहाला मजकूर कळविला. त्याणी तेव्हाच जलर्द. करून गांवातून मंत्री, मुळ्या वगैरे घेऊन येऊन उपाय केले. त्या ब्राह्मणास विचारता त्याने असे सांगितले की, माझे घरची मनुष्य तीर्थरूप, मातोश्री व बंधु दोन व भगिनी तीन व बायको आहे. तिजला रजोदर्शन होऊन तीन महिने जाहाले आहेत. माझे घर नगर जिल्ह्यात आहे. असे सांगून पुढे त्यास शुद्ध नाहिसी जाहाली. सूर्योदयाबरोबर ब्राह्मण कैलासवासी जाहाला. त्याचे सर्व कर्म बापूसाहेब यानी केले. मंत्राग्नी दिल्ही.

## रम्य सातपुडा

तेथे तीन दिवस मुक्काम करून अस्थिसंचयन करून पुढे मजल दरमजल जाता धुळ्यावरून सातपुड्यास करवंदबारीवर मुक्काम केला. दुसरे दिवशी सातपुड्यात चालू लागलो. तो पहाटेची चार घटका रात्र होती. वायु मंदमंद सीतल वहात होता. त्या योगानी सुवास फार सुटला. तेव्हा चौकशीकरिता गाडीवान् यानी असे सांगितले की, बेल फुटून फुलला आहे. बेलाचे पुष्पाचा सुवास फार मधुर येत आहे. पहाटेस उजाडता सडकेपासून नजीक बेलाचे वृक्ष होते. ते पाहून आनंद जाहाला. मंडळीने बेल व बेलाची पुष्पे बहुत बराबर घेतली. सातपुड्याची हवा

फार उष्ण नाही व फार थंड नाही. हवा फार चांगली आहे. सरकारने अफूचे व्यापाराकरिता साहासाहा कोशावर कैलारू बंगले पाण्याच्या सोया पाहून बांधिले आहेत. सातपुडा म्हणजे जसा इकडे सह्याद्री पर्वत तसा तो विंध्याचल पर्वत फार मोठा आहे. एकंदर त्या पर्वताची रुंदी पंचावन्न कोशापासून पाऊणसे कोश रुंदी आहे. त्या पर्वतास शृंगे म्हणजे मोठमोठे पर्वत आहेत. एकदम चढावही नाही. काही चढाव लागला म्हणजे उतारही लागतो. एकंदर चढाव खरा. सातपुडा म्हणण्याचे कारण असे दिसून येते की, सरबसर साता दिवसाखेरीज पलीकडे जाणे होत नाही. सडकेने जाताना नजीकचे पर्वतावर भिल लोकांची गढी म्हणजे किला चिरेबंदी तट वगैरे कामी लाखो रुपये खर्चाची रमणीय दिसतात, व कोठेकोठे पाण्याचे जाग्यावर चिरेबंदी चौथरे बांधीव आहेत. भिल लोकांची कामे फार दृष्टीस पडतात व त्यांची वस्तीहि जागोजाग फार आहे. काहीकाही ठिकाणी रक्तचंदनाचे वृक्ष व धुपाचे वृक्ष, सीस व साग वगैरे जंगली झाडे फार मोठीमोठी डोंगराचे मध्यभागी म्हणजे कंबरग्यास अतिशय आहेत. छायाहि तेथे फार आहे. आम्ही तेथे गेलो तेव्हा वसंत ऋतु होता. सर्व वन पुष्पित-फलित जहाले होते. काही वृक्षास नवीन कोमल लाल पल्लव फुटले होते. कोसिंबाचे वृक्ष अति लाल बोख्यांनी शोभित जाहाले होते. ती वनसरणी पहात पहात मुक्काम दर मुक्काम जात असता, पुढे महूची छावणी नजीक तीन मजलावर राहिली. तो बंगल्यात उतरून भोजने वगैरे जाहाली, तो रात्र चारपाच घटका सुमार जाहली होती.

## क्रांतीची चाहूल

ते दिवशी त्या बंगल्यात उतारू कोणी नव्हते. परंतु दोन असामी पलटणी शिपाई लोक उतरले होते. ते मुंबईस जाऊन आपले देशी जाणारे पाहून, त्याजपाशी पानसुपारी खाण्याचे इराद्याने आम्ही दोनचार असामी जाऊन बसलो. देशान्तरी वगैरे चोहीकडील गोष्टी सांगत होतो. तेणेकरून त्या शिपायांचा स्नेह विशेष जाहाला. आणि ते गोमान्तक देशातील राहाणारे असल्याकारणाने विशेष स्नेह जाहाला. नंतर त्या शिपायांनी आम्हास असे सांगितले की, आजपासून तिसरे दिवशी पृथ्वीवर राजक्रांति होणार. मारामारी लुटालुटी होईल, यात संशय नाही. त्यापेक्षा आम्हास असे वाटत आहे की, तुम्ही सर्व लोक आपले देशी परत जावे. असे आम्ही ऐकितांच, तुम्ही सांगितले हे सर्व खरे आहे तर आपण मेहेरबानीने आपल्यास ज्या खऱ्या बातम्या लागल्या असतील त्या आम्हास

कळवाव्या. ते समयी ते सिपाई बोलूं लागले. एक सिपायाचे वय ५० सीचा सुमार होता व एक ३५ चा सुमार होता. दोहोंपैकी वृद्ध सिपाई याणे बोलण्यास आरंभ केला. इंग्रज सरकार आजदिनपर्यंत राज्य चांगल्या रीतीने करीत आले. परंतु थोडे दिवसावर सरकारची बुध्धी नष्ट जाहाली आहे. कारण गुदस्त साली म्हणजे पाचचार महिन्यावर सुमारे विलायतेकडून काही चमत्कारिक बंदुका म्हणजे कडामिनी, तुबुक अशा तऱ्हेच्या हिंदुस्थानात पाठविल्या. त्या बंदुकास गोळी सुमारे जांभळा एवढी लागते. त्याही गोळ्या विलायतेहून इकडे आल्या, त्या बंदुका व गोळ्या पाहून सिपाई लोकांस आनंद जाहला. कारण पहिल्या बंदुकापेक्षा दोनसे कदम गोळी जास्त जात्ये. याकरिता सर्व हिंदुस्थानात बंदुका वाटल्या गेल्या व त्या बंदुकाकरिता काडतुसे तयार विलायतेस करून इकडे सर्व छावण्यांतून पाठविली. ती काडतुसे दातांनी तोडून कार्य करावे लागते. हिंदुस्थानात कलकत्त्यापासून चार कोसावर दमदम म्हणून जे छावणीचे मोठे ठिकाण आहे, तेथे काडतुसे करण्याचा कारखाना सुरू केला आहे. तेथे येक गोष्ट अशी घडली की, कोणी एक ब्राह्मण सिपाई येके दिवशी येका तळ्यावर पाणी भरीत होता, तेथे एक चांभार येऊन त्याजपासी त्याचा ल्होटा पाणी प्यावयास मागू लागला. तेव्हा ब्राह्मण सिपाई याणे त्याला सांगितले की, मी जर आपला लोटा तुजपासी दिला तर तो विटाळेल, म्हणोन तो माझ्याने देववत नाही. ते ऐकून तो चांभार त्यास म्हणाला अहो, तुम्ही जात जात म्हणोन फार उड्या मारू नका. आता जी नवी काडतुसे करीत असतात, त्यास गाईची व डुकराची चरबी लावितात. आणि ती चरबी स्वता आपले हातानी काढून देतो. आणखी ती काडतुसे तुम्हाला दातांनी तोडावी लागणार, मग तुमचे सोंवळे ते कोठे राहिले. उगाच रिकामा डौल कशास पाहिजे. असे होता होता दोघे हातपिटीस आले. त्यांची मारामार चालली तेव्हा आसपासचे लोक बहुत जमले. त्यानी झालेला वृत्तांत ऐकिला. त्यासमयी पलटणी सिपाईही बहुत जमले होते. ही काडतुसे धर्माला नष्ट करणारी आहेत, असी खबर थोड्याच अवकाशात सर्व लोकांस कळली. ते समयी हिंदूंनी असा विचार मनांत अणिला कीं, आपल्यास परमदैवत गाई आहे. तिची चरबी काडतुसाबरोबर आपले तोंडात जाणार आणि आपले हातून महत्पाप घडणार. असे हिंदूंस वाटून कोपायमान जाहाले. ह्याच्या उलट कारण मुसलमानाकडे होते. म्हणजे ते डुकरास इतके नीच व अपवित्र समजतात कीं ते त्याचे नुसते नांव देखील घेत नाहीत. त्या डुकराची चरबी

काडतुसाबरोबर आपले दातांस लागणार असे जेव्हा त्यास कळले तेव्हा ते अतिशय तप्त जाहाले. याप्रकारे करून सरकारच्या पलटणीमध्ये गवगवा जाहाला. सरकार आपणास युक्तिप्रयुक्तीने किंवा सक्तीने ख्रिस्ती करणार असे त्यांच्या मनांत बिंबून स्वधर्म-संरक्षणाचा विचार करू लागले. काडतुसाबाो सर्व हिंदुस्थानात पलटणी लोकांस समजले. जेथे छावणी होती तेथे तेथे मुख्याधिकारी यास काडतुसे आम्ही घेत नाही म्हणोन सर्वांनी सांगितले. सर्व छावणीचे मुख्य अधिकारी याणी कलकत्त्यास लिहून पाठविले. कलकत्त्याचा गवरनेर साहेब म्हणजे लाट साहेब त्यास म्हणतात, त्याणी विलायतेस लिहिले. विलायतेस पारलिमेंट सभेत ते प्रकर्ण गेले. तेथेही असे समजण्यात आले की, हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान कोणीच काडतुसे घेत नाहीत व त्यांची समजूत काय आहे हें समजत नाही. अशी बोलणी होत होतीं तो मोठा येक साहेब असे बोलला की, मी लढाईची कामे पुरवी बहुत केलेली आहेत. सभेनी मजला रवाना करावे म्हणजे काडतुसें त्यांचे हातून घेववीन यात संशय नाही. असे भाषण प्रतिज्ञापूर्वक बोलून स्वस्थ राहिला. नंतर सभेत सर्वांचे विचारे त्या साहेबास पाठविण्याचे ठरले. त्या साहेबास हुकूम होताच काडतुसाची ओझी बराबर घेऊन विलायतेहून हिंदुस्थानात येण्यास निघाला. इकडे हिंदुस्थानात काडतुसाबाो वर्तमान तोंडातोंडीच पण इतके जलदीने इतर छावण्यांत पोहोचले की, त्याची कल्पना सुद्धा करवत नाही. काळ्या शिपायांमध्ये जिकडे तिकडे काडतुसाच्या गोष्टी चालल्या आणि सिपाई लोकांची अंतःकरणे संशयानी भरून गेली. आपणास इंग्रज सरकार जबरदस्तीने ख्रिस्ती करणार असे मनांत येऊन त्यांस अतिशयित वाईट वाटू लागले, आणि या विघ्नाचे निवारण कसे करावे या गोष्टीने त्यांची चित्ते वेधिली.

## काडतूस प्रकरण

कित्येक इंग्लिश अमलदारांसही त्याची कुणकुण लागलीच समजली. परंतु ती त्यास भयंकर वाटली नाही. विलायतेहून काडतुसे घेऊन निघालेला साहेब कलकत्त्यास पोचला. तेथे येऊन गवरनेर लाट साहेब यास आपले कर्तव्य कर्म निवेदन करून दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणी जाण्याबाोची आज्ञा मागू लागला. ते समयी गवरनेर लाट व सकटतारी वगैरे मोठे मोठे अमलदार याणी असे सांगितले की, आम्ही आजपासून वीस दिवसावर सर्व मांडलीक राजरजवाडे व मोठे मोठे

सरदार सर्व लोक कलकत्त्यास बलावून सभा करितो. मग आपल्यास कर्तव्य ते करावे. नंतर शिंदे, होळकर, गायकवाड धुलपुकर व बिलसीयाचा राजा व दतियेवाले व ओडसीवाले वगैरे सर्व बडे लोकांस बलावणी केली. त्यात नानासाहेब पेशवे व लखनूची बेगम व झाशीची राणी व दिल्लीचा पिरोशशहा यांस मात्र बलावणे जाहले नाही. बाकी दरोबस्त बडे लोक राजे व मांडलीक यांस बलावणी सरकारने कलकत्त्यास यावे म्हणून केली. त्याप्रौ सर्व लोक कलकत्त्यास निघोन गेले. कलकत्ता हे शहर फार मोठे आहे. इंग्रज सरकारची प्रथम राज्यधानी हिंदुस्थानात आहे. अशा शहरात मोठी जागा पाहून सभेचा बेत केला आणि सर्व सरकार राजे बडे लोक वगैरे आलेले सभेस त्यांचा सत्कार करून गवरनेर लाट याणी अधिकारानुरूप मान देऊन सर्वांस आप आपोपल्या स्थानी बसविले. नंतर लाट साहेब याणी चौऱ्यासी कलमांची याद सभेपुढे वाचिली, आणि सर्वांस असे सांगितले की, ही सर्व कलमे तुम्हास कबूल करावी लागतील. विलायतेचा हुकूम जारीचा आहे, अमान्य होऊ नये. चौऱ्यांशी कलमांत हसिल की, हिंदुमुसलमान वगैरे सर्व लोकांनी बाटावे असे नवीन कायद्याचे मत आहे. उदाहरणार्थ लिहून कळवितो, चौघे बंधु आहेत ते विभक्त जर आहेत तर वडीलार्जित घर येकच आहे. येका भावाचा वाटा मध्येच आला तर तो हिंदु धर्मातून जाऊन मुसलमानी धर्मास लागला पका बाटला तरी त्याणे बापाचे जिंदगीपो हिस्सा घ्यावा व त्या घरास मध्येच वाटणीप्रो राहावे व ब्राह्मण जातीत पुनर्विवाह करून संतती जाहाली तर त्या संततीविसी निर्बंध वगैरे असी चौऱ्यांसी कलमें वाचिली. ती ऐकून सर्वांस आश्चर्य वाटले. ते समयी ईश्वराचाच धावा मनोमन सर्व हिंदु करावयास लागले की, आजच सर्व एकंकार होणार. अद्याप कलीची वर्षे बहुत जाणे आहेत. असो विलायतेहून आलेला साहेब याणी असे उत्तर केले की, मी आणलेली काडतुसे सर्व लोकांनी घेतली पाहिजेत. जबरदस्तीने आम्ही देऊ, सुखानी घ्यावी ही चांगली. नाहीपेक्षा या लोकांची बदली कराचेस किंवा काबूल वगैरे ठिकाणी करू. सरकारचा हुकूम तोडल्याबो सिक्षा करू. असे सांगताच बाणपूरचा राजा सभेस बसला होता त्याणी उत्तर दिल्हे की, हे हिंदुस्थान भरतखंड जंबुद्विप आहे. ह्या भूमीस कर्म भूमी असे म्हणतात. ह्या द्वीपाला लागून सिंहल द्वीपादि आहेत, परंतु हिंदूचे मुख्य हेच आहे. तर हिंदूचे देवास आमचा कंटाळा आला असल्यास साहेबाचे म्हणण्याप्रो कबूल होईल. नाहीपेक्षा जे होणे ते होवो. सार्वभौम राजा प्रजेस अधर्माची गोष्टी करण्याविसी जरी उपदेश करील

तथापि प्रजा ऐकणार नाहीत, जर करिता चौऱ्यांशी कलमे अमलात आणावयाची आहेत तर बखेडा धर्मसंमधे होईल. असे बोलून राजा उगाच राहिला. त्याजवर एक बड्या लोकांपैकी लहानसा नबाब मुसलमान होता, तोही उत्तम भाषणे करीत होता. हे कर्माचे क्षेत्र हिंदुस्थान आहे. यात मुसलमान व हिंदु रहात आहेत. ह्या उभयतांचे धर्मास हानी करणारा राजा जाहाला तर तो राजा मुळीच राहावयाचा नाही. त्याचे राज्य जाते याविषयी आम्हाला अनुभव आहे. दिल्लीचे तक्तावरचा बादशाह हिंदु बुडवून मुसलमानी सर्व करावी असे त्याचे मनांत येताच सार्वभौमत्व मुळीच गेले. याजवरून ही याद कलमबंदीची या हिंदुस्थानांत काढू सुद्धा नाही. त्याजवर काडतुसे घेण्याबाो बहुत प्रकारे, आलेला साहेब बोलणी बोलला. परंतु ते समयी साहेब यास असे कळविले की, नवीन काडतुसे जरी शुद्ध आहेत तरी सरकारानी या समयी लोकांस आग्रह करून देऊ नये. कारण सर्व सिपाई लोकांचे मन बिघडून गेले आहे, याजमुळे काय होईल ते आम्हास सांगवत नाही. ते समयी विलायतेहून आलेला साहेब असे बोलिला की, चौऱ्यांशी कलमी याद तूर्त आम्ही ठेवितो, परंतु काडतुसे शिपाई लोकांनी घेतली पाहिजेत. असे बोलून येक हुकूम लिहिला.

### ती जूनची दहा तारीख

त्यांत मजकूर जूनचे दाहावे तारिखेस दाहा वाजतां कपतान साहेब याणी सर्व सिपाई लोक जमा करून काडतुसे त्यास द्यावीत. जे घेणार नाहीत त्या त्या छावण्याबाो मागाहून विचार करिता येईल. परंतु ठरलेले तारखेस सर्व छावण्यातील मुख्य अधिकार करणारांनी दाहा वाजता काडतुसे जबरीने दिल्ही पाहिजेत. या हुकुमास अमान्य किती छावण्या करितात ते पाहू. असा ठराव तारखेचा करून सभा विसर्जन जाहाले. ते समयी तेथेच लोक बोलू लागले की, आता ज्याचा त्याणे विचार पाहावा. पृथ्वीवर मनुष्यांचा संहार होणार. हिंदु व मुसलमान एकत्र विचारे वागू लागले. धर्माविसी मरून जाऊ परंतु बेधर्मी होणार नाही, असा सर्वांचा एक विचार जाहाला. नंतर सर्व लोक आपआपले स्थानी गेले. ती नेमलेली तारीख आजपासून तिसरे दिवसी आली आहे. मेरटचे छावणीचे मुख्य काळे लोकांनी सभेत ठरलेली तारीख जूनचे दहावे तारखेस काडतुसे देणार तर त्या तारखेस काडतुसबाो अधिकारी यास धर्माकरिता सांगोन तीन वार पाहावे, नाहीपेक्षा लागलीच त्या त्या छावणीत गोरे असतील ते कापून काढून दारूगोळा,

मेखजीन व खजिना गुदाम सु ।। आपले ताब्यांत घेऊन छावणीस आग लावावी, असी गुप्त पत्रे रवाना जाहली. दर पत्रीं असे ली ।। होते की, हे पत्र वाचून पाहून पुढील छावणीकडे रवाना करावे, असा म ।। र हिंदुस्थानचा आहे. सबब आम्ही रजा घेतल्यास सुमार महिना जाहाला आहे. आम्ही घरी मुलामाणसांत जाणार, तुम्ही दक्षिणी ब्राह्मण पुढे जाण्याचा विचार करीत असल्यास फार दुःखात पडाल यात संशय नाही. तुम्ही परत जावे हे फार चांगले असे आम्हास वाटते. नंतर आम्ही तेथून निघून आपले मंडळीत येऊन विचार केला. त्यांत असे ठरले की, आपण लढाऊ नाही. गरीब भिक्षूक ब्राह्मण आहो. धर्माकरिता सर्व काळे एकत्र होऊन लढतात तर आपल्यास भय नाही. असा विचार ठरून नित्याप्रमाणे पहाटेस उठोन गाड्या भरून चालते जहालो.

## महूची छावणी पेटविली

वाटेनें पांचचार लोक सिपाई भेटले. त्याणी असे सांगितले तुम्ही यात्री लोक कसे जाल हे खरे. जूनचे दहावी तारखेपर्यंत इंदूर शहरात तरी जाणे होईल तर बरे. कारण पुसता त्याणीही थोड्यांत इंग्रज सरकारासी बिगड जाहाल्याचे कारण सांगितले. सायंकाळी वस्तीस बंगल्यात गेलो. तेथे रात्रौ पूर्व दिवसाप्रो सर्व हकीकत समजली. उज्याडती तारीख १० वी पोचली. नित्याप्रो गाड्या भरून रस्त्यानी जात असता आम्ही पुरुष लोक सर्व पायी चालू लागलो. कारण आजचे तारखेस दंगा फार आहे व आपल्यास मुहूचे छावणीवरून जाणे आहे. तो दाहा वाजाचा सुमार जाहाला. छावणी अधकोश राहिली, तों येकायेकी तोफांचे आवाज व बंदुकांचे आवाज शतावधी सुरू जाहाले आणि त्या दिशेकडे धूम्र फार जाहाला. इतके कृत्य होताच आमची मंडळी फार भिऊन गेली. तसेच छावणी नजिक गेलो तो ती छावणी फार मोठी. दक्षण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थान यांच्या मध्यभागी असल्या कारणाने एकंदर छावणीचा व्यास तीन कोशांचा आहे. तेवढी छावणी पेटवून दिल्हेली होती. ते समई सकाळचे आकरा वाजाचा सुमार जाहाला होता. वायु बहुत सुटला होता. अग्नीच्या ज्वाला वाऱ्याचे योगाने बहुत मोठ्यामोठ्या चालल्या होत्या. धूरही बहुत जाहाला होता. सर्व काळे लोक बेदिल होऊन येकमेकास हाका मारीत होते. आरोळ्या वगैरे गोंगाट फार जाहाला होता. त्या छावणीत गोरे लोक सुमार दीडसेपर्यंत होते. ते सर्व मारून दारूगोला, मेखजीन, खजिना आपले ताब्यांत घेऊन छावणीस आग लावून बाहेर रस्त्यावर

आलेले होते. आम्ही पुढे जाताच दोनतीनसे लोक आम्हाभोवती येऊन गराडा घालून कोंडिले. नंतर गाड्या उभ्या करून त्याजपाशीं आम्ही बोलू लागलो. आम्ही ब्राह्मण वाणी व पुणे नासीक कोकण या ठिकाणचे आहो. बायजाबाई सिंदी मथुरेस सर्वतोमुख यज्ञ करणार. यास्तव सिंदेसरकारचे आश्रित मंडळींची पत्रे आल्या कारणानी यज्ञास जात आहो. आम्हापासी पुस्तके आहेत, ती तुम्ही पाहावी. असे सांगोन पोथ्या सोडून त्यांस दाखविल्या आणि त्यांस असे कळविले की, तुम्ही हिंदुधर्माकरिता जर सरकारासी भांडता तर आम्ही ब्राह्मण भिक्षुक वेदशास्त्र पढलेले आहो. आम्हा गरिबांस लूटमार करणे हे काम तुम्हास योग्य आहे काय ? तुम्ही आमचे ह्या दंग्यात संरक्षण करून एखादे शहरांत आमची तजवीज लावून तुम्हास जाणे असेल तिकडे जावे. या गोष्टीने तुम्हास जय होईल व दुःख पडणार नाही. या तारखेस दंगा होणार हे आम्हास तीन दिवस कळले आहे. परंतु आम्ही निर्भय आहो, कारण काळे लोक धर्माबताो भांडणार. आम्हीतर वेदशास्त्रसंपन्न आहो. आम्हास भय मुळीच नाही. इत्यादी बोलणी ऐकून घेऊन आमच्या पोथ्यापुस्तकें पाहून त्याणी एकदम आम्हास असे सांगितले की, आता यज्ञ तर राहिला, परंतु तुम्ही निर्भयपणे आम्हा बराबर असावे. खर्चवेचाची काहीयेक काळजी करू नये. तो इतक्यांत घोड्याचे गाडीचे टपाल डाकेचे आले. सिपाई लोकांनी रस्त्यावर त्या मनुष्यास ठार मारून डाकेचे कागद माळावर टाकून दिल्हे. लोकांच्या बंग्या होत्या, त्या सर्व आपल्या ताबीत घेतल्या. बाकी कागद दोनतीन ओझीं डाकेचे सर्व टाकून दिल्हे. नंतर तारांचे खांब लोटून पाडून टाकिले. तारा तोडून हाती धरण्याकरिता काठ्या केल्या. आम्हास गाड्यासु ॥ उतरण्यास पाण्याचे नजीक लिंबांचे झाडाखाली जागा दिल्ही. आम्ही तेथे उतरून स्नान संध्या भोजनादि कृत्ये केली. दोनतीन वाजता छावणी जलत होती, त्यात मौज पाहण्यासाठी गेलो. तेथे गोर लोक मरण पावलेले पाहिले व काळेही काही मेलेले दृष्टीस पडले. सुमार पंचवीस पर्यंत काळे असावे. सायंकाळी पुन्हा नेमले जाग्यावर येऊन संध्यादि करून राहिलो. असे त्या मुक्कामी तीन दिवस राहून नंतर ते काळे लोक सर्व फौजेसुद्धा रिसालावगैरे सर्व सामान तोफा वगैरे घेऊन कुच करून इंदुराकडे चालते जाहाले. त्याजबराबर आम्हीही निघालो. ते मजल दर मजल करीत श्रीक्षेत्र अवंतिका म्हणजे उज्ज्ञनी येथे पोहोचलो.

## उज्जनी तर गांठली

उज्जनीपासून दोन कोशावर पाणी झाडी चांगली पाहून तेथे सर्व फौज उतरली. आम्हासह त्या फौजेतच जागा नेमून दिल्ही. पुढे आम्ही विचार करिता या बिघडलेल्या लोकाबरोबर राहून आपल्यास सुख व्हावयाचे नाही, कारण ते सर्व आपल्या जिवावर उदार होऊन हरवक्त मारू मारू या गोष्टीशिवाय त्यास काहीयेक सुचत नाही आणि आपल्यास स्वतंत्र वागण्याची संवय. याजबराबर स्वतंत्रपणा चालत नाही. घटका दिवस सायंकाळचा राहिला म्हणजे लष्करांत बिकीट लागते म्हणजे पहारेबंदी होते. दोन घटका रात्र जाहल्यावर शौचास जाणे जाहल्यास रसदी परवानगी लागून ते पहारेकरी बराबर येऊन पोचवतील तेव्हा जाणे आहे इत्यादी फार त्रास होतो. यास्तव त्रासाचे कारण त्यांस न कळविता काहीयेक कारण योग्य त्यास दाखवून येथून सुटावे असे माझे मनांत येऊन, सोबती मंडळीस विचारून त्यास ही गोष्ट सांगताच ते सर्व सोबती आनंदीत होऊन असे बोलिले की, आम्ही या संकटातून सुटू तो दिवस सुदिन आहे. असे त्यांचे मत पाहून मग पलटणी सुभेदार दोन तीन असामी चांगले स्नेही जाहाले होते त्याजपासी मी स्वता जाऊन त्यास म || र कळविला तो- सुभेदार आम्ही तुम्हाबराबर आज आठ दहा रोज राहिलो. आम्हास सुख फार जाहाले. कोणतीच आम्हास काळजी राहिली नाही. इंदूरचे मुकामी आमचे गाडीवान् पुण्याचे ठरावाप्रो सोडून गेले. तरी आपण आम्हास गाड्या देऊन आपल्याबराबर येथपर्यंत आणिले, हे उपकार या दिवसांत आहेत. आता आमचा अभिप्राय असा आहे की, आम्ही घरून द्रव्य मिळेल ते मिळवावे व यात्राही घडतील त्या कराव्या या हेतूने निघालो. पैकी हाली ही उज्जनी आहे इजला अवंतिका क्षेत्र म्हणतात. येथे ज्योतिर्लिंग श्री महाकाळेश्वर आहे व क्षिप्रानामक गंगा आहे. हे क्षेत्र श्री काशी क्षेत्राबराबर आहे. या क्षेत्रांत देवता व तीर्थे फार आहेत. यास्तव या क्षेत्रांत जाऊन क्षेत्रोपोषण करून क्षौर वगैरे प्रायश्चित करून श्राद्ध देव ब्राह्मण वगैरे कृत्ये धर्माप्रो केले पाहिजे. यास्तव आपण सर्वांनी कृपाकरून गाड्या वगैरे देऊन आम्हास क्षेत्रांत पोचवून दिल्हे पाहिजे. दोन कोश क्षेत्र जरी आहे, तथापि आराजिक जाहाल्यामुळे आम्हास जाणे कठीण आहे. यास्तव मेहरबानीने इतके आमुचे केले, त्यापेक्षा बराबर बंदोबस्ताकरिता काही लोक देऊन रवानगी क्षेत्री केली असता यात्रा कृत्ये सर्वांची होतील, इत्यादी बोलून स्वस्थ रहिलो.

## विष्णुपंत जोशी यांचे बिऱ्हाडी

नंतर सुभेदार यांणी आमचे म्हणण्याप्रो कबूल करून उदयीक प्रातःकाली तुमची रवानगी करितो, असे सांगोन ते लोक उठोन गेले. नंतर पहाटेस उज्जाडता गाड्या व वीस पंचवीसपर्यंत सिपाई देऊन पलटणीपो अप्सर सुभेदार लोक येऊन आमचे पायावर मस्तक ठेऊन आम्हास दर ब्राह्मणास दोन दोन रुपये दक्षणा देऊन आम्हास बोळवीत शेपन्नास कदम आले. तेथून नमस्कार करून परतले. ते पलटणी सर्व सिंदे सरकारचे आश्रयावर निघोन त्याच दिवसी जाणार असा त्यांचा अभिप्राय आम्हास समजला होता. आम्ही सर्वांसह क्षेत्रीं पोहचलो. तेथे चवाट्यावर गाड्या रिकाम्या करून दिल्ह्या. सिपाई लोक गाड्या घेऊन आम्हास रामराम करून परत गेले. पुढे बराबरची मंडळी होती, त्याणी आपापले बिराडाचे पत्ते लावून तिकडे तिकडे गेले. आम्ही उभयतां चुलते पुतणे मात्र तेथे राहिलो. वैशंपायन दानाध्यक्ष यांचे आप्त राजमान्य राजश्री विष्णुपंत जोशी हे उज्जनीत राहतात. त्यांचा पत्ता द्वारकाधिशाचे मंदिरात शोध केला म्हणजे लागेल अशी कल्पना करून कर्वे याजला बराबर घेऊन जाऊन द्वारकाधिशाचे मंदिरात शोध करिताच शोध लागून त्यांची भेट जाहाली. त्या गृहस्थास आम्ही भेटल्याबो आनंद जाहाला. त्याणी असे कळविले की, ग्वाल्हेरीहून पत्र वैशंपायन याजकडून आल्यास पांच चार रोज जाहाले आहेत. त्यात म ।। र की, कोंकणातून आमचे जावई मुलीसमेत गोडसे सु ।। इकडे येण्यास निघोन पुण्याहून पत्र आले आहे. तर ते उज्जनीपर्यंत आपणास येऊन भेटले म्हणजे त्यास कलवावे की, तूर्त इकडे येऊ नये. कारण वाटेने दंगा फार आहे. दंगा कमी जाहाल्यावर आमचे पत्र आल्यावर त्याणी इकडे यावे. असे समजल्यावर ती ।। काका वगैरे सर्व मनुष्यें गाडी करून ओझीसमेत रा. श्री. विष्णुपंत जोशी यांजकडे बिराड ठेविले. क्षेत्रसंमधे कृत्ये करणे होती ती केली. मग चोहीकडे बंडाच्या खबरा ऐकत होतो. स्नानसंध्यादि करून क्षेत्रीच फार दिवस राहिलो. उज्जनी हे क्षेत्र फार प्राचीन असोन, या क्षेत्री राजे लोक फार राहात आले. विक्रमानी व त्याचे बंधु भर्तृहरी याणी तर राज्यधानी करून राज्य तेथे केले. हाली तेथे मोठी मोठी भिंताडे दोन दोन ताड उंचीची, पंधरा वीस हात रुंदीची चुनेगची केलेली दगडी असी बरीच आहेत व तेथे विटा नव्या करून भाजीत नाही. जुन्या विटा भुईमध्ये सांपडतात. लोकांचे

असे म्हणणे आहे की, ही उज्जनी उलटी घातली आहे. खणावयास लागले म्हणजे एकादे भिंताड लागते. ते खणून काढिले म्हणजे मोठ्या इमारतीचे काम होते. भर्तृहरी पूरवी राज्य करीत होता. तेव्हा त्यास विषयाचे कामांत अति पश्चात्ताप जाहाल्यामुळे सर्व राज्य सोडून विदेही होऊन तपश्चर्येस जाऊन बैसला. ती हाली भर्तृहरीची गुंफा म्हणतात. भैरवगडानजीक आहे. उज्जनीची हवा थंड आहे. झाडी बरीच आहे. क्षेत्राचे रस्ते फार बारीक आहेत. वस्ती दाट फार आहे. तेथे पाच चार रोज राहिलो, तो उज्जयनीचे ब्राह्मण लोक पवार याचे धारेस जाण्याबाो विचार करू लागले.

## धारानगरचे राजे पवार

कारण धारानगर हे उज्जनीपासून तीसपसतीस कोशावर आहे. तेथे पवार या कुळातील राजे यांची राज्यधानी आहे. पवार हे मराठे राव लोक बहुत प्राचीन आहेत. पूरवी तें नगर विक्रमाचे होते. पुढे भोज राजाची राज्यधानी तीच होती. हाली पवार हा राजा फार चांगला, शूर व धैर्यवान्, विचारी, अनेक विद्याभ्यासी, हस्तमुख व धर्मावर अतिशय प्रीती असा असोन, वृद्धापकाळ प्राप्त झाला तथापि पुत्र नाही आणि खजिन्यांत द्रव्य फार जमले आहे, त्यापेक्षा सर्व द्रव्य दानधर्म तीर्थयात्रादी करून सार्थकी लावावे. हे मनांत आणोन कुटुंबासु।। सार्वभौम इंग्रज याची आज्ञा घेऊन श्रीक्षेत्र नासीक व त्र्यंबक व वाई व पंढरपूर व शहर पुणे या ठिकाणी जाऊन विद्वान मंडळीच्या सभा करून शालजोड्या व पितांबर व रेसीम कांठी धोत्रजोडे व दक्षणा देऊन सर्व ब्राह्मण सुखी केले आणि सालमजकुरी फाल्गुनमासी राजा धारेस परत आला. आणि सराईस म्हणजे कार्तिक-मागसीर्ष मासी श्रीक्षेत्र कासी येथे जाण्याबाो चा विचार ठरावून तयारी कर्ण्याबाो दिवाणजीस हुकूम दिल्हा होता. दिवाण याणी शालजोड्यांची दिंडे तयार ठेविली व पीतांबर व आठ लक्ष रुपये रोख असी तयारी सर्व लागून राहिली होती. तो राजा यास कोणी दुष्टानी चांडालांनी त्या दानशूर राजास येकायेकी मुठीचा वापर करून ठार मारिला. मरण काळी राजास शुद्धी चांगली असता येक आपले समंधाचा मुलगा वयानीं बारा वर्षांचा दत्तक घेऊन कैलासवासी राजा जाहाला. त्याचे राज्यांत जे लोक त्याचे पदरचे दिवाण इत्यादि त्याचे व राजपत्नीचे विचारे असे ठरले आहे की, राजाने जे द्रव्य कासीयात्रेकरिता खर्च कर्ण्याकरिता काढिले आहे, ते सर्व द्रव्य राजाचे उत्तरकार्यास खर्च करावे. येकंदर सात आठ लक्ष रुपये

दानधर्म होणार. त्यापेक्षा आपल्यासही काही प्राप्त होईल हे मनांत आणोन उज्जनीचे ब्राह्मण शतावधी निघाले. तेव्हा आम्ही असा विचार मनांत आणिला की, मृताबाो आपल्यास दान घेणे नाही. सर्व दाने हातावर ब्राह्मणाचे देतील. परंतु आपण मेहनत करून दानखंड व दानचंद्रिका व दान मयूखादि ग्रंथ आवलोकन केलेले आहेत. कितीक दानास दानाङ्ग होम आहे. कोणत्या दानास ब्राह्मणास किती पाऊले पोचवावा वगैरे सर्व खटपटी समक्ष प्रयोग व मौज पाहाण्यास सापडेल व आजपर्यंतही असा दानधर्म लाखो रुपयांचा जाहला नसेल व पुढेही होणार कठीण. यास्तव येथे बसून तरी राहाणे आहे. तो आठ दहा रोजात सर्व कृत्य पाहून येऊ. असा निश्चय काका व मी केला आणि दुसरे दिवसी कर्वे वरसईकर यास सर्व म ॥ र निवेदन करून उज्जनीचे ब्राह्मणांबराबर निघालो. ते मजल दर मजल करीत चर्मन्वती गंगा वाटेत लागली, तेथे स्नान संध्यादि कर्मे करण्यास जो उतरलो, तो तेथे गंगातीरी सुमार २०० दोनसेपर्यंत ब्राह्मण होते व इंदुराहून आणखीही चारयेकसे ब्राह्मण आले. तेथील सर्व कृत्य आटपून निघोन धारानगरास पोहोचलो.

## राजेसाहेबांचे उत्तरक्रियेचे वेळचा दानधर्म

हे शहर सर्व ब्राह्मणांनी भरून राहिले होते. तेथे ब्राह्मण उज्जनीक्षेत्र व इंदूर देवासे राज्यधानी व धार मिलोन ब्राह्मण दक्षणी आठनऊ हजार जमले होते. शहरांत ब्राह्मणाकडे तर जागा उतरण्यास राहिली नाहीच, पण शूद्राकडे देखील मिळण्याची कठीण. शहरांत शिरल्यापासून येक प्रहर बिराड ठेवण्यास जागा भाड्याने मिळण्यास कठीण. आम्हास जागा मिळेना तेव्हा बाजारात दक्षणी सोनार पाहून त्याचे बाहेरचे ओट्यावर ओझे ठेवून उभयता बसलो. सोनार याणी जागा मिळण्याची नाही म्हणोन सांगितले. तथापि आम्ही तसेच तेथे बसून पानसुपारी काढून त्यास दिल्ही व आम्हीही घेतली, आणि त्यास असे सांगितले की, आम्ही मुशफर आहो. यास्तव तू मागील दारी आंगण्यात फक्त जेवण कर्ण्याकरिता जागा देसील तर रात्रौ या ओट्यावर निजत जाऊ, आणि चीजवस्तु सर्व पडशीत घालून तुमचे दुकानात ठेवू, आमची तोसीस तुम्हास लागणार नाही. असे सांगताच सोनार यांणी कबूल करून जागा दिल्ही. तेथे आम्ही राहिलो. रात्रौ फराळ वगैरे करून वस्ती केली.

दुसरे दिवशी उठोन शहरात फिरताना हजारो ब्राह्मण फिरतात हेही पाहिले.

उदईक दाने होणार त्या जाग्याचा शोध करिता धारानगरचे उत्तरेस दानशाळा आहे तेथे होणार असे समजल्यावरून तेथे जाऊन पाहिले तो दानशाळेचा मोठा दरवाजा हत्ती जाण्यासारखा पाहिला. आतही जागा चोहीबाजूनी बांधलेली मोठी दृष्टीस पडली दाने सर्व आत होणार. ज्याचे नांव निघेल त्याने दान घेण्याकरिता आंत जावे, नाहीपेक्षा दरवाज्याबाहेर पिंपळाचे पार दोन तीन असल्यानी छाया चांगली आहे तेथें सर्व जमलेले ब्राह्मणानी राहावे. याजवरून असा विचार केला की, आपण ज्या हेतूने आलो तो व्यर्थ जाणार. बाहेर राहिलो तर दानविधी दृष्टीस पडणार नाही. अशाबाो विचार केला पाहिजे. हे मनांत आणोन बिराडी येऊन स्नानसंध्यादि करून बाजारातून सिधा सरंजाम आणून भोजन केले. नंतर दानाध्यक्ष येथील असेल त्यास भेटून आर्ज केल्याशिवाय अपल्यास मौज पाहाण्यास सापडणार नाही हे मनात आणोन आर्ज लिहिला. त्यात म ॥ र की, आम्ही देशान्तरी ब्राह्मण यात्रेस जात आहो. वाटेने उज्जनीस येथील सर्व हकीकत समजली. त्यात आम्हास मृताबाो दान घेणे नाही. आम्ही आपले पदरचे खाऊन फक्त दानसमारंभ पाहाण्यास आलो आहो. अलीकडे खर्च येवढा कोणी केला नाही व पुढेही विचार आहे. त्यापेक्षा स्वविधि दानप्रयोग पाहाण्याचे इराद्याने येथे आलो आहे. यास्तव दानशाळेत दरवाज्यावर पहारेकरी आहेत, त्यास दाखविण्याकरिता चिट्ट्या दोघापासी पाहिजेत. हे कबूल नसल्यास आम्ही आताच परत जाण्याची तजवीज करितो. असा आर्ज लिहून दानाध्यक्षास देताच लागलीच चिट्ट्या मिळाल्या. त्या घेऊन दुसरे दिवसी आठ वाजता भोजन करून दानशाळेवर चिट्ट्या दाखवून आंत जाऊन बसलो. आंत यादीचे मोठमोठे ब्राह्मण सुमारे २०० दोनसे होते. एकंदर दाने जाहाली, त्यात मोठमोठी दाने लिहितो. हात्ती चार दिल्हे. येक अंबारी अैन्याची ठेऊन सालंकार आठ हजार रुपये दान दक्षणा दिल्ही. बाकी तीन पो हावद्याचे दोन व येक खुला मिलोन चार, तीन हत्तीवर दक्षिणा पाच पाच हजार रुपये दिल्हे व घोडे चार व उंट तीन, बैल १०, म्हसी नऊ व दासी तेरा व शयादान, सिकारखान वगैरे सर्व वस्तुमात्रांची दाने जाहाली. महादानाचे ब्राह्मणास पायजामा, धोत्रजोडा, अंगरखा, सिपाईगिरी पागोटे, ढालतलवार व पुष्पाचा हार घालून पूजा करून गुलाल उडवून ज्या दानास जितके पाऊले यज्यमानानी पोचवण्यास गेले पाहिजे, तेथपर्यंत यज्यमान पोचवीत असे. दरवाज्याबाहेर ब्राह्मण गेला म्हणजे तेलंग वगैरे ब्राह्मण बाहेर उभे राहिलेले सात आठ हजार याणी दान घेतलेले ब्राह्मणाचे अंगावर शेण व माती

टाकून मोठ्या मोठ्यानी हसून ओरडावे. याप्रौ सर्व महादानांची मौज पाहिली व दासीदान जाहले म्हणजे त्या दासीचा पदर व ब्राह्मणाचे धोतर धरून गाठ द्यावी लागे. तो ब्राह्मण बिचारा पायी जाणारा याजमुळे दरवाज्याबाहेर आल्यावर ब्राह्मणानी त्याची दुर्दशा करावी. ती दासी त्या ब्राह्मणाबराबर झराझर चालेनासी म्हणजे ब्राह्मण अगदी गयावया होई. याप्रमाणे तीन दिवस दाने होत होती. प्रती दिवसी सकाळी आठ वाजता सुरू व्हावी ती सायंकाळी बराबर चार वाजले म्हणजे बंद होत असत. प्रो तीन दिवस जाहले. बहुदा दान देण्याची वस्तु राहिली नाही. मग भूयसीचा संकल्प केला आणि सिष्ट ब्राह्मण आंत अनुष्ठान पाहाण्यास बसले होते त्यांची याद केली. दुसरे दिवसी रमणा करून दर ब्राह्मणास रुो पाच पाच प्रो दिल्हे व यादीचे ब्राह्मणास रेसिमकाठी धोत्रजोडा येक व रुो दहा दहाप्रो दिल्हे. त्याप्रो आम्हास धोत्रजोडा येक व रुौ मिळाले ते घेऊन राजधानी पाहण्याकरिता राहिलो. सर्व राजधान्यापेक्षा येथे विशेष इतकेच की, सर्व शहरात व शहराबाहेर अडीच हातापासून तीन साडेतीन हात भूमी खणली म्हणजे पाणी महामूर मोटेचे लागते. याजमुळे सर्व शहर पाण्यावर आहे. शहरास कोट दगडी चुन्याचा आहे. दरवाजे बरेच आहेत. कोटाबाहेर सभोवते तलाव फार आहेत व बागाही बहुत आहेत. केतकी फार आहे. बागाईत पदार्थ बहुत असल्यामुळे स्वस्त आहेत. भाजीपाला, केळीची पाने, पुष्पे फले या राजधानीसारखी दुसरे ठिकाणी नाहीत. तेथे धारानगरचे पश्चमेस तीन चार मैलांवर लहानसा पर्वत आहे. तेथे श्री कालिका देवीचे देवालय पाषाणी, पर्वतावर आहे. तिचा पूजेचा समारंभ फार आहे. चौघडा वगैरे नेमणूक चांगली आहे. समया व पूजेची सर्व भांडी रुप्याची आहेत. ही देवी भोज राजाचे आमलात कालिदास पंडितास प्रसन्न होती. तेव्हापासून ह्या देवीचे संस्थान स्थापीत आहे. तिचेही दर्शन घडून बिराडी येऊन वस्ती करून सकाळी निघोन उज्जनीस पोचलो. तो वैशंपायन दानाध्यक्ष यांजकडून पत्र आलेले कर्वे याणी दाखविले. त्यात म ॥ र दंगा लवकर मोडेल असे नाही, त्यापेक्षा सिंदेसरकारचे लोक सिपाई लष्करांत सुमारे पंचवीस तीस येणार आहेत. त्यांची सौबत पाहून सर्वांसह निघोन यावे. असा अभिप्राय समजताच सिपाई लोकांचा शोध करून भाड्याची गाडी करून सर्वांसह ग्वाल्हेरीस जाण्यास निघालो. वाटेने सारंगपूर शहर लागले. फार चांगले शहर आहे. या शहरची वस्ती चांगली वसविली आहे. बाजारपेठ उदास. भरमजल्याच्या हवेल्या आहेत. शहराचे दोन बाजूनी नदी अगदी वाहात आहे व बागाईत बरेच

आहे. देवळे चांगली पाहाण्याजोगी आहेत. तेथे येक मक्काम करून जाताना साज्यापुरास गेलो. तेही शहर बरे आहे, परंतु पाण्याविसी मात्र कमताई आहे. गांवाबाहेर तलाव मोठे मोठे आहेत. तेथून सिप्रीस जाऊन सिंदे सरकारच्या राजधानीस म्हणजे ग्वाल्हेरीस पोहोचलो. वैशंपायन् याजकडे राहिलो.

## ग्वाल्हेरीस बयजाबाई शिंदे यांची भेट

दानाध्यक्ष यांणी बायजाबाईसाहेब यांची भेट केली. आनेक दंगे उठल्याकारणाने यज्ञ बंद जाहला. तरी बायजाबाई दक्षिणेतून आलेल्या ब्राह्मणांचा सत्कार करून दरमहा सुमारे दाहा दाहा भोजनखर्चाकरिता पोचवीत असे. मग आम्ही आठा दिवसी मुजुमदार यांचे वाड्यात स्वतंत्र बिराड करून काका व मी रहिलो. शहरात रोज लढाईच्या बातम्या लागत होत्या. सर्व हिंदुस्थान खवळले होते. असो.

ग्वाल्हेरी गांव किल्यानजीक लहानसा आहे. त्यापासून अलीकडे महादजी बाबा सिंदे पेशवे यांचे सरदार पूरवी बादशाहावर स्वारी करित बरोबर बहुत फौज व तोफखाना घेऊन जाताना ग्वाल्हेरनजीक दोन कोशावर लष्करसु ।। उतरले, तेथून स्वाऱ्या करून शत्रूपासून खंडण्या घेऊन जय जाहला म्हणोन तेथेच वाडा बांधून राहिले. लष्करी लोक जेथे जेथे उतरले होते तेथे तेथे त्याणीही घरे बांधिली आहेत. एकंदर लष्कर सुमार वसाहातीचे तीन साडेतीन कोश शहरच जाहले आहे. शहराभोवती भुंडे डोंगराचे कडेंच आहे. झाडी मुळीच नाही. शहरांत कोठे कोठे तळी उकरलेली आहेत. गांवात विहिरी दर घरी आहेत. पाणी चालीस हातावर पन्नास हाताचे आंत महामूर आहे. या राजधानीचे रस्ते काही प्रसिद्ध जे आहेत ते फरसबंदी असून मोठे मोठे आहेत. राजवाडा चार चौकी आहे. या शहर नजीक एक फुलबाग म्हणोन बहुत दिवसी असून वृक्ष त्यांत फार तऱ्हेतऱ्हेचे देशोदेशचे चमत्कारिक आहेत,व पुष्पांचेही वृक्ष लाविले आहेत. त्या बागांत बंगला हवा खाण्याकरिता बांधला आहे. ते काम पाहण्यासारखे आहे. त्या बागापासून चार मैलावर नदी आहे. तेथे सिंदे सरकारची छावणी पलटणी लोक सिपाई राहण्याची जागा आहे. चोहीकडे सिपाई लोक बिघडले, परंतु या छावणीतील लोक अद्याप बिघडले नव्हते. असो. ग्वाल्हेरी शहरात नामांकित गृहस्ताचे मुलाची मौंजी आषाढ मासी जाहली. त्याजबो सभा श्री विठ्ठल मंदिरात जाहली ते समयी रामाचार्य वगैरे पंडीत बहुत आले होते. परंतु

वेदशास्त्रादि संपन्न तातु दीक्षित भडकमकर ही पंडीत माहान् असोन ऋग्वेद घनांत पाठ. अशा पंडिताचे मतावरून मौंजी लाविली होती. दिक्षीत यांणी सभेत स्मृतिवाक्यानि व सूत्रप्रमाणानि व मैत्रायणीय परिसिष्टावरून आषाढमासी ब्राह्मणाचे उपनयन यावत् विष्णुशयन होईतोपर्यंत करावे असे सिद्ध केले व वहिवाट पाहाता पंचगौडात आषाढमासी मौंजी करितात ही साक्ष सभेसमोर मथुरेच्या ब्राह्मणांनी पंचगौडांनी दिल्ही. दीक्षीत याणी आषाढात मुंज करविली, ती शास्त्रोक्तकाळी जाहाली असे ठरावून सभा विर्सजन जाहाले.

कार्तिक शुद्धात दक्षणेतून आलेले ब्राह्मणांची बिदागी करण्याचे विचारे सभा केली. कितिक ब्राह्मणास शालजोड्याही दिल्ह्या. आम्हास पितांबर व दीडसे रुपये रोख देऊन बिदागी केली. नंतर झासीस जाण्याचा विचार आम्ही करू लागलो. आता झासीस गेल्यावर ते प्रर्कण त्या भागात लिहावे तर हा भाग फार मोठा होईल, तर हा भाग इथेच संपवितो. दुसरा भाग समाप्त :

भाग तिसरा

# झासीवालीचे बालपण

ती।। रामभट काका हे चुलते प्रथम भागात ब्रह्मावर्त क्षेत्री श्रीमंत महाराज याजकडे होमशाळेत ऋत्विज्य होते. तेथे वर्षे १५ काढिली होती. त्याजवरून झासीवाली इचा पूर्ववृत्तान्त त्यास माहीत होता. त्याजवरून ते काका सांगू लागलो तो मजकूर- राजश्री मोरोपंत तांबे हे कुटुंबासु।। श्रीमंत बाजीराव साहेब यांचे पदरी होते. त्याजकडे काम होमशाळेत आमचे हाताखाली सिष्यपणानी वागण्याचे होते. काही दिवसानी मोरोपंत तांबे यांचे कुटुंब कैलासवासी जाहाले. ते समयी झासीवाली राणी ही मुलगी वयानी पाच चार वर्षांचा सुमार असावा. पुढे तांबे याणी ती मुलगी वाढीवली. दुसरे घरात माणूस नव्हते. नेहमी होमशाळेत बापाबराबर येऊन तेथेच खाणेपिणे सर्व बापाबराबरच श्रीमंताकडे होत असे. मुलसी बालबंद व मोडी लिहिण्याचा अभ्यास चांगला ठेविला होता व ती मुलगी लहानपणी फार अचपळ असे. बापाची लाडकी असे. कारण तांबे यांस या मुलीसिवाय दुसरे अपत्य कन्या किंवा पुत्र नव्हते, आणि तिची आई कैलासवासी जाहालेली. ही कन्या पोरकी सबब वाड्यातील सर्व मंडळी त्या मुलीचे लाडच करीत असत, आणि मुलगीही फार हुषार व निर्मळ, शाहाणी गौर वर्णाची, अंगानी कृष व उफाट्याची उंचीची उभारणी चांगली असे. नाक सरळ, कपाळ उंच व डोळे कमलपत्राप्रो वाटोळे असून मोठमोठे व कान मुखाला शोभा देणारे असे असून मध्यभाग कंबर शरीराचे झोकाप्रो बारीक होती. असी मुलगी पित्याचे घरी दिवसेदिवस वाढत असता वरवर्णिनी जाहाली. दाहा अकरा वर्षांची जाहाली. विवाह करावा तर स्थळाची योजना होईना. कराडे ब्राह्मण ब्रह्मावर्ती थोडे होते सबब तेथे योजना होईना. जालवण संस्थानात येक दोन स्थळे कराडे मंडळीत होती, तीही पाहिली. टिपणास जमेना. पुढे गुलसराई संस्थानचाही

वराबो शोध केला, परंतु कोठे जमेना. तेव्हा तिचे बापास फार काळजी लागली होती की, ही मुलगी ब्राह्मणाचे हाती देऊन आपण निश्चिंत कधी होऊ. अशा विचारात मोरोपंत तांबे होते. स्थळाविशी शोध व चौकशा तमाम सुरू होत्या. झाशी संस्थान हे कराडे ब्राह्मणाचे पूर्वापार आहे. पूर्वी हिंदुस्थानात श्रीमंत पेशवे सरकारांनी स्वारी करून सर्व शत्रुगण जिंकून मांडलीक राजे करद केले व दिल्लीचे बादशहाकडून वजीरीची वस्त्रें मिळविली आणि महादजी बाबा सिंदे हे ग्वालेरीस स्थापिले. मथुरेस व कानपुरावर छावणी सिंदे मार्फत ठेविली आणि सर्व हिंदुस्थानचे कारभार सिंदे सरकार याणी घेऊन पुणे मुक्कामी प्रतिवर्षी रवाना करावे. त्यात बुंदेलखंडापो झासी प्रांत म्हणजे बारा पंधरा लक्ष रुो जमाबंदीचा. हा सुभा पेशवे याणी पुण्याकडे खासगीत ठेविला, कारण सर्व हिंदुस्थानात सिंदे आहेत तर आपणास स्वतंत्र येक सुभा खालिशाखाली ठेविला पाहिजे. त्यात झासी हे शहर पूर्वापार चांगले बांधीव आहे आणि किलाही बहुत चांगला आहे. हा विचार करून पेशवे याणी कराडे रा. रा. श्री सिवरावभाऊ पारोळकर हे सुभेदार नेमून शहर पुण्याहून पाठविले. त्याणी व त्यांचे पुत्रपौत्रादिकानी आजपर्यंत तेथील काम चालविले. त्यांत पेशवे सरकारास प्रतिवर्षी सुभ्याचा खर्च होऊन काही पैसा पाठवीत असत. पुढे पेशवाई बुडण्याचे संधीस झासी सुभा होता तो बुडून संस्थान जाहाले. तेव्हापासून संस्थान कराडे ब्राह्मण याजकडे चालू आहे.

## गंगाधर बाबा

या संस्थानचा राजा गंगाधर बाबा म्हणोन शेवटचा राजा जाहाला होता. त्यांचे कुटुंब बहुत आजारी पडून कैलासवासी जाहाले. पुढे गंगाधर बाबा ऊर्फ बाबासाहेब यास विवाह पुन्हा करावा असी इच्छा जाहाली. तेही मोठी मुलगी सुरूप कुलीनाची मिळाल्यास गरिबाचीही आम्ही करू असा आपला अभिप्राय मंडळीस कळवून मंडळी मुलीचा शोध करण्यास लागली.

गरीब गरिबाच्या मुली सुरूप चांगल्या गोत्रासी पडणाऱ्या अशा बहुत पाहिल्या, परंतु कोठे जमेना. याचे कारण गंगाधर बाबा राजा हा लौकिकात आठ प्रकारचे षंढ आहेत, त्या प्रो हा राजा षंढ आहे. गंगाधर बाबाचे आचरण असे होते की, आपले वाड्यात माडीवर दोहोचोहो रोजी पुरुष वेष टाकून स्त्रीचा वेष घ्यावा. पैठणी नेसून जरीकाठी चोळी अंगात घालीत असे. मस्तकावर शेंडी फारच मोठी राखिली होती व काही कृत्रिमी केश लावून सुगंधी तेले लावून वेणी घालीत

असे. कधी सर्व वेणीतील नग घालून पाठीवर सोडलेली असे. कधी खोपाही वेणीस असे. मूद वगैरे अलंकार सर्व घालीत असे. गळ्यात मोत्याचे पेंडे व गुजराथी ठुसी वगैरे गळसऱ्याहि घालून सरी व मोहराची माळ कंठा व मोत्यांच्या माळा घालून हातात गोट पाटल्या व बांगड्या व नाकांत नथ व पायांत तोडेजोडवी वगैरे सर्व स्त्रियांचे अलंकार जडावाचेसु।। घालून स्त्रियाबराबर बोलणे वगैरे करीत असे. अशा कारणावरून गरीब लोक असा वर पाहून देणे त्यापेक्षा मुलीस पाण्यात लोटणे हे चांगले असे बोलत. काही लोक असे म्हणत की, आठ प्रकार षंढात आहेत त्यापो हा असावा. शास्त्रांत आठ प्रकारच्या लखणापूर्वक व्याख्या आहेत त्यापो सचेतन पुरुषाचे सिस्न हातात धरून खेळ केला म्हणजे षंढास चेतना व्हावी एक प्रकार त्यातच आहे. हा प्रकार या राजास असावा. आणि हेच खरे, कारण प्रथम स्त्रीला येक पुत्र जाहाला होता. ती स्त्री व्यभिचारिणी नव्हती, पतिव्रता साध्वी होती असे सर्व सांगतात. याजवरून राजा पुरुष आहे, असे गरीब लोक म्हणणारे त्याचे गोत्रासी व टिपणासी पडूं नये. हा राजा बहुत करून महिन्याचे महिन्यास स्त्रियासारखा एकीकडे बसून अस्पर्श दशा तीन दिवस भोगून चवथे दिवसे नाहाणाचा समारंभ मोठा करीत असे. नाहाणे जाहाले म्हणजे पलंगावर निजून पलंगाखाली अग्नी ठेवून केश वाळवीत असे. असे वेडे वेडे चाळे जरी करीत होता, तरी राज्य संमधे नोकरीचे मनुष्यास व रयतेस जरब फार ठेविली होती. न्यायानी विचारपूर्वक नीतीने राज्य चालविले होते. साहेब लोकात सतेजपणे महत्त्वीने आपला मोठेपणा सांभाळून राहात असे.

कोणे येके दिवसी रसीदंड साहेब याणी बाबासाहेब यास स्नेहसमंधाने असे विचारले की, महाराज आम्ही बहुत दिवस येक गोष्ट ऐकिली आहे ती गोष्ट आपल्यास विचारावी असे माझे मनात बहुत दिवस आले आहे. परंतु माफी मागून आपली आज्ञा होईल तर काही गोष्ट विचारणार आहे. राग मात्र येऊ नये. असे साहेबाचे बोलणे ऐकून बाबासाहेब किंचित् हास्य करून म्हणतात, आपल्यास जे विचारणे असेल ते विचारावे. मजला सुचेल ते उत्तर देईन. असे ऐकून रसीदंड साहेब बोलतात, महाराज आपण संस्थानी बडे लोक आहा. तशात ब्राह्मण धर्म आपला आहे आणि असे ऐकिण्यात आले आहे बहुत करून हरवक्त स्त्रीचा वेष धारण करिता. महिन्याचे महिन्यास विटाळ धरून बसता आणि बांगड्या हातात भरता या गोष्टी सर्व आपल्यास योग्य आहेत काय ? तेव्हा बाबासाहेब याणी असे उत्तर दिल्हे की मी तर फार लहानसा मांडलीक आहे, परंतु इंग्रज बहादुरापुढे

पूर्वपश्चम दक्षिणोत्तर देशात जितके राजे रजवाडे आहेत तितक्यानी तुम्हापुढे बांगड्या भरल्याच आहेत. कोणी शूर तुम्हापुढे नाही. बांगड्या भरल्या नाहीत असा पुरुष पृथ्वीवर नाही. पहा तुम्ही द्वीपांतरीचे असता आपल्या पराक्रमाने आमचे द्वीपांत येऊन आम्हास करद केले. याजवरून आपली अद्याप समजूत जाहाली नाही असी बोलणी जाहाली. बाबासाहेब याची पदरचे मंडळीस फार जरब होती. ज्या ज्या कामाच्या वेळा नेमल्या होत्या त्या त्या वेळी ती कामे जाहाली पाहिजेत. विलंब जाहाल्यास स्वता आपण माशाची शिपटी घेऊन त्या मनुष्यास मार देत असे. याप्रो त्याचे वृत्त होते.

## छबेलीचें लग्न

बाबासाहेब यांचे कारकुनास असी खबर लागली की, ब्राह्मावर्त क्षेत्री श्रीमंत महाराजांचे पदरी मोरोपंत तांब्ये म्हणोन कराडा ब्राह्मण आहे. त्याची कन्या सुरूप गौर वर्णाची अकराबारा वर्षाची मृतमातृक आहे. जिला कोठेतरी स्थळ योज्यनेचा विचार चालला आहे. असी बातमी लागताच बाबासाहेब यांचे कानावर मजकूर घालून त्यांची आज्ञा घेऊन चार मनुष्य बराबर घेऊन ब्रह्मावर्तास येऊन पोचला. नंतर प्रथम गोत्राचा विचार पाहाता गोत्र जमले व टिपण जमले. ही मोरोपंत तांबे झासीवाला बाबासाहेब यास मुलगी देण्यास कबूल जाहाले. मुलीचे नांव ब्रह्मावर्त मुक्कामी छबेली असे ठेविले होते. ब्रह्मावर्त पो मध्यस्थ जोसीबाबा याणी असा ठराव केला की मुलीबो आम्हास पैसा घेणे नाही. परंतु तांबे यास पुत्र नाही, सबब त्यास विवाह कर्णे आहे तो खर्च आपण करून विवाह करावा आणि तेथेच राहण्यास जागा द्यावी. असे बोलणे ऐकून झासीहून आलेला कारकून याणी झासीस सर्व म ।। र लिहून पाठविला. बाबासाहेब याणी लिा प्रो कबूल करून पत्रोत्तर ब्रह्मावर्तास पो नंतर ब्रह्मावर्ताहून भाड्याची गाडी करून मोरोपंत तांबे मुलीसु ।। झासीस नेऊन स्वतंत्र शहरात वाडा राहण्यास दिल्हा. आचारी, पाणके, ब्राह्मण, कारकून वगैरे सर्व मनुष्ये ठेऊन दिल्ही. विवाहाचा मुहूर्त पाहून लग्न समारंभ जाहाला. मुलीचे नांव लक्ष्मुबाई ठेविले. पुढे मोरोपंत तांबे यांचे लग्नही ठरावाप्रो करून दिल्हे. तांबे यांचे कुटुंबास रजोदर्शन होऊन हाली मुलगा व येक मुलगी जाहाल्याचे वर्तमान कळते.

# झाशीस प्रयाण

त्यापेक्षा आपण उभयता झासीस जाऊ आणि तेथे चार साहा महिने राहून पुढे महायात्रेस जाऊ असा माझा विचार आहे. आता वाटेने जाण्यास फार अडचणीही राहिल्या नाहीत. कारण दंग्याबाो विचार पाहता दिल्लीवर बहुत लढाया जाहाल्या. सेवटी इंग्रज सरकार व बंडवाले यांणी असे ठरविले की हाली दिल्ली भोवताली लढाईमुळे मनुष्ये व जनावरे मरण पावल्यामुळे गंधी बहुत सुटली आहे व येथे धान्याची महर्गता फार जाहाली आहे व पाण्याचाही तोटा पडला आहे. सबब तुमचे आमचे विचारे सर्वांनी कानपूर शहर येथे जाऊन लढाई करावी. यााो ठरावून दिल्हीकडील बखेडा मोडून सर्व लोक कानपुरावर आले आहेत. तेथे हाली जंग चालू आहे असे म्हणतात. येथून झासीस जाण्यास काही येक दंगा बखेडा नाही. असी सर्व बोलणी होऊन झासीस जाण्याच्या विचार ठरला. सोबती विसी विचार करू लागलो तो ग्वालेरीहून मराठा सरदार आपले भावाकडे जाण्यास निघाला. त्याजबराबर मनुष्ये हतेरबंद सुमार २५ व खेरीज मनुष्ये १० पर्यंत असोन ब्राह्मण मंडळी पाो पांच चार असामी परवा म्हणजे कार्तिक शु ।। ५ रोजी निघणार, असी बातमी आम्हास लागताच त्या॰ सोबती मंडळीचा शोध करून विचार ठरावून भाड्याची गाडी करून त्या मंडळीबराबर मजल दरमजल झासीस जाण्याचे इराद्याने निघोन चालते जाहालो. वाटेने लोक बहुत भेटले. त्याणी जिकडील तिकडील लढाईच्या गोष्टी सांगितल्या त्या सर्व ऐकत होतो. सर्व हिंदुस्थान बिघडून गेले आहे. त्यांत अंतरविदित म्हणजे कानपुरावर सर्व पलटणी लोक जमा जाहाल्याचे कळले. तेथे मोठी लढाई जाहली. त्या लढाईत सिंदे सरकाराकडील मुरारीचे पलटणी लोकांपासी जे तोफेचे गोळे विषाचे होते ते सर्व उपयोगी पडले. तेणेकरून ते समई नानासाहेब पेशवे यास जय आला.

# तात्या टोपी

ब्रह्मावर्ताकडून दोन आसामी सभ्यचालीचे निःपक्षपाती असे आम्हास भेटून त्याणी असे सांगितले की, गेल्या भाद्रपदमासी रा. स. श्री. तात्या टोपी हा पंचवीस स्वार बराबर घेऊन मुरारीचे पलटणांत येऊन उतरले आणि तेथून चार पलटणा आपल्यास अनुकूल करून सिंदे सरकारास असे कळविले की, आम्ही इतके दिवस येथे राहिलो. सबब तुमचे शहरास किंवा मुलुखास काही येक धका न लागता आम्ही येथून जातो. परंतु आम्हास ओझाकरिता गाड्या, उंट, घोडी वगैरे

सर्व तयारी तुम्ही करून द्यावी. असा त्याचा अभिप्राय समजल्यावरून जयाजीमहाराज सिंदे व दिनकरराव राजीवाडे दिवाण हे उभयता मुरारीचे छावणीत तात्या टोपी यास भेटण्याचे इराद्याने निघोन गेले. शहरापासून तीन कोशावर नदीचे काठी ही छावणी होती. तेथे जाऊन सर्वांस भेटून जो जाण्यास सरंजाम लागेल तो आम्ही देतो आणि आमचे राज्यांत दंगा न करिता तुम्ही सर्वांस घेऊन जावे असा ठराव करून तात्या टोपी यास पानसुपारीकरिता बराबर घेऊन शहरात आले, ते समयी आम्ही ग्वाल्हेरीत होतो. तात्यास समक्ष आम्ही सराफ्यात म्हणजे मोठे बाजारात पाहिला. येक प्रहरपर्यंत शहरात तात्या होता. सायंकाळी वस्तीस छावणीत गेल्यावर दुसरे दिवसी सिंदे सरकारानी शेकडो गाड्या व उंट व हात्ती व बैल, खेचरे व गाढवे व मनुष्य जो सरंजाम जाण्याबाो लागला तो देऊन रवाना केले. मुरारीचे पलटणात विषाचे गोळे येकंदर ११ आकरा होते. येकायेका गोळ्यास खर्च दोन हजारावर अडीच हजारपर्यंत जाहलेला होता. असे गोळे हिंदुस्थानात दुसरे ठिकाणी नव्हते. गोळा फुटताच धूम्र अति होत असावा आणि तो धूर मनुष्याचे डोळयास लागला म्हणजे डोळे तर तात्काल आवाज होऊन फुटावे आणि मनुष्यही मरण पावावे, ही शक्ति त्या गोळ्यात होती. म्हणोन जे जे साहेब आपला जीव रक्षणार्थ सिंदे याजकडे आले त्याणी सिंदे सरकारास असे कळविले की, जे हे पलटणी म्हणतील ते त्यास द्यावे. परंतु या लोकांस बिघडू देऊ नये. बिघडल्यावर हे लोक फार लढवाई आहेत, आणि याजपासी गोळे विषधूम्राचे आहेत. तात्या टोपी सर्व पलटणी लोकासमेत गुलसराई संस्थानचे हादीत गेल्यावर पलटणीपाो अप्सर लोक व सुभेदार लोक सर्व येकत्र करून त्याजपासी असे सांगितले की, मी येतेसमयी गुलसराई संस्थानात उतरून राजमान्य केशवराव गुलसराईवाले यांस नानासाहेब पेशवे यांचा आशीर्वाद सांगोन असे सांगितले की, आम्ही सर्व लोक हिंदु धर्माकरिता लढत आहो. यास्तव आपण तीन लक्ष रु ।। खंडणी म्हणा किंवा हे संस्थान दोन लक्षांचे पेशवे याणी दिल्याबद्दल यजमान म्हणून द्या, परंतु आम्हास खर्चाची गरज लागली सबब आम्ही तुम्हापासी मागत आहो. याजवर केशवराव याणी उत्तर केले की, असे सिपाई मिळऊन मुलुख काबीज जाहला असता तर कितीक लोक करते. शुद्ध तुम्ही बंडावले आहात. आम्ही काही एक देणार नाही. आपण आला तसे जावे नाहीपेक्षा कैद करून ठेऊ, असे त्याणी सांगितले आहे. ते समयी आम्हाबराबर हे पंचवीस स्वार मात्र होते. हाली या गोष्टीचा विचार कसा करावा

त्याजवरून सुभेदार याणी उत्तर केले की, आता पाहता काय सर्व संस्थान लुटून केशवराव यास धरून आणितो. हुकूम मात्र द्यावा. असे ऐकून तात्या याणी स्वार पाच केशवराव याजकडे निरोप सांगून पाो ते स्वार शहरात जाऊन सरकार वाड्यापुढे उभे राहिले. नंतर तेथील लोकांनी चौकसी करिता काही मजकूर बोलणे आहे, यास्तव केशवरावजीची भेट जाहाली पाहिजे.

## गुलसराईचे केशवराव यांच्याशी युद्ध व अटक

असे समजताच गुलसराईवाला केशवराव हे समक्ष येऊन स्वारांस भेटून काय कारणानी आला बाो विचारिता स्वार याणी असे सांगितले की, आम्ही श्रीमंत महाराज पेशवे यांचे नोकर आहो. पेशवे यांचे सरदार तात्या टोपी हे आपले संस्थानी आले आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, तुम्ही आम्हास तीन लक्ष रुाो खर्चाकरिता द्यावे आणि रुपये देत नसाल तर शहाराबाहेर लढाईस सिद्धता ठेवावी. असे स्वार यांचे बोलणे ऐकून गुलसराईवाले आपले सरदारांकडे पाहू लागले. ते समई त्याणी असे सांगितले की, अशा धमकीने आम्ही रुा देणार नाही. तुम्ही शुद्ध बखेडखोर आहां जे करणे ते करावे. असे ऐकून स्वार लागलीच आपले गोटात येऊन जाहाला मार तात्या टोपी यांस कळवून युद्धाबाो निश्चय करून डंका वाजविला. सर्व लष्कर तयार जाहाले. रिसाला व पायदळ शहरावर हला करण्याच्या विचारे चालते जाहाले. अनेक वाद्ये वाजू लागली बिगुल वगैरे. सर्व येकदम हला जाहाला. बंदुकांचे आवाज शतावधी होऊ लागले. शहराचे बाहेर तीन तोफांचे मोर्चे बांधून तोफांचा भडमार होऊ लागला व वीररस बहुत माजला. वीर आरोळ्या येकमेकांस देऊन हलकल्लोळ केला. इकडे केशवराव याजपासी फौज सुमार दोन हजार हातेरबंद, पायदळ व स्वार दोन अडीचसे होते. परंतु सर्व फौज हिंदुस्थानी होती. सरकारी पलटणीपाो कोणी नव्हते. शहराबाहेर येकदम हला करीत व वाद्ये वाजवीत, आरोळ्या देत ते रणशूर आल्यावर लढाई सुरू जाहाली. मराठी लोकांजवळ जुन्या चालीच्या लांबलांब बंदुका सुताचे तोडे पेटविलेले बंदुकेत दारू घालून खचून नंतर काण्यावर दारू घालून तोडा पेटलेला घेऊन बत्ती देऊन नंतर आवाज होणे, अशा तऱ्हेचे सर्व लोक लढवाईक पाहून तात्या टोपी याच्या लोकांनी येकदम हल्ला करीत पुढे गेले आणि दोन दोन आवाज गोळ्या घालून कडामिनीचे काढिले. तेणेकरून संस्थानाचे लोक बहुत मरण पावले. हे पाहून गुलसराईवाल्याचे सिपाई अगदी घाबरून गेले आणि पळ काढू

लागले. ते समई तात्याचे लोक अडवे होऊन येक फिरड मारिली. तेणे करुन बहुत मरण पावले. बाकी राहिले त्याणी बंदुका हातातील टाकून भूमीवर नमस्कारासारखे पडले. ते समई पलटणीचे सुभेदारानी त्या सर्व लोकांस असे सांगितले की, तुम्ही गरीब आहा तर आम्ही तुम्हाला मारीत नाही. परंतु केशवराव तुमचा यजमान गुलसराईवाला हा तुम्ही जिवंत धरून आम्हास द्यावा. न हे कबूल कराल तर तुम्हास आम्ही ठार मारणार यात संशय नाही. तेव्हा गुलसराईवाले सिपाई याणी आपला यजमान केशवराव यास त्या रणभूमीत शोधून आणोन अप्सर सुभेदार यांचे स्वाधीन केला. नंतर सुभेदार याणी केशवराव याच्या काच्यानी मुसक्या बांधून भोवताली नागवे तलवारीचे लोक संरक्षणाकरिता ठेवून तात्या टोपी याजसमोर आणिला. तात्यानी त्याच्या मुसक्या सोडून खुला केला आणि त्यास विचारले की, आता खंडणी बाो पेशवे यास आपण रुाो किती द्याल ? केशवराव याणी खाली मान घालून असे सांगितले की, तुम्हास जितके रुाो वगैरे जे सामान लागेल ते घ्यावे. आम्हास जिवंत सोडून द्यावे. ते समई टोपी याणी उत्तर दिल्हे सर्व आम्ही करितो ते यजमानाचें हुकुमानी करीत आलो. त्यापेक्षा आपल्यास कैद करून श्रीमंत पेशवे सरकार जेथे आहेत. तेथपर्यंत आम्ही घेऊन जाऊ. ते यजमान सोडोत किंवा मारोत. असे सांगोन केशवराव यास पके पहाऱ्यात ठेऊन दुसरे दिवसी कुच करून मजल दरमजल करीत कानपुरावर पलटणी लोक सर्व पोहोचले.

## तात्यांनी कानपूर सर केले

कानपुरावर गंगातटात धूस बांधून म्हणजे वाळूच्या गोण्या पोती भरून कोटासारख्या शास्त्राप्रमाणे रचून व्यूह बांधून आंत गोरे लोकांची पलटणे होती. त्याणी त्या धुसाचा आश्रय करून लढाई माजवीत असत. बाहेरून काळे लोक लढत असत. परंतु त्याचा धूस तोफांनी तुटेना. बहुत दिवस लढाई सुरूच होती. तों हे सिंदे सरकारचे मुरारीवरचे छावणीचे लोक गेले हेही बहुत लढले, तथापि कानपूर हाती येईना. इकडे श्रीमंत नानासाहेब यांचेमार्फत व्यूह कोणत्या आंगानी फोडावा याजबाो नेपाळी ब्राह्मण अनुकूल करून. त्यास पाच साहाशे रुाो देऊन कानपुरास आणून त्यास सर्व तेथील धूस दाखविला. त्याणी सांगतल्या प्राो तोफांचे मोर्चे बांधून तोफांचा भडमार चालता जाहाला. आतूनही तोफा व कडामिनीचे बार होऊ लागले. बिगूलादि वाद्यें वाजूं लागली. रणधुमाळी सुरू

जाहाली. वीर येकमेकांस मोठाल्या आरोळ्या देऊ लागले. ते समई विषसंमधी गोळे धुसात टाकीत चालले. तेणेकरून आतील सर्व लोक त्रस्त होऊन डोळे फुटून मनुष्य तडफडून स्वर्गाचा रस्ता धरू लागली. काळे लोक नाकसबी. सबब हे सर्व विषाचे गोळे तेथेच खर्च जाहाले आणि गोरे लोक बहुधा मरण पावले व काही गंगेकडील बाजूनी बाहेर पडले, हे काळे लोकांनी धरून कैद केले. या युद्धांत बाळासाहेब पेशवे स्वता मोरच्यावर जाऊन तोफेस बत्ती देत होते. ईश्वराने जय दिल्हा. कानपूर हस्तगत जाहाले व गोरे लोकांचे सर्व सामान दारूगोळा, खजिना, तंबू वगैरे सर्व श्रीमंतांनी आपले ताबीत घेऊन कानपूर शहरांत आपलेनांवाची दवंडी पिटून बाजार उघडवून सर्व व्यवहार सुरू करविले. मोठा आनंद उत्साह जाहाला. श्रीमंत याणी जोसी बाबास ब्रह्मावर्ती जाण्याबाो मुहूर्त विचारिला. त्याणी चंद्रानुकूल्य पाहून मुहूर्त सांगितल्याबेताने स्वारी तयार जाहाली. नंतर मोठ्या थाटाने घोडेस्वार व उंटावरचे स्वार हजारो बरोबर होते. व रोहिले व आरब सिद्दी व पायदळ वगैरे सर्व लोक होते. वाद्यें बहुत वाजत होती. चौघडा व वाजंत्री तासे, नगारे, कर्णे, सिंगे वगैरे अनेक वाद्ये वाजूं लागली. मोठ्या थाटानी हळूहळू मौजेने मिरवत मिरवत भालदार वारंवार पुकारत आहेत. अशा बेताने स्वारी येता येता ब्रह्मावर्तास रात्र जाहाली. वाटेने सेकडो चंद्रजोती लाविल्या होत्या. ब्रह्मावर्त क्षेत्र सर्व शोभिवंत केले होते. प्रत्येक वाड्याचे दरवाजात तोरणे उभविली होती. नागरिक लोकांनी पुष्पे दूर्वा वगैरे स्वारीवर टाकीत होते. नानासाहेब पालखीत बसले होते व बाळासाहेब व रावसाहेब हत्तीचे हावद्यांत बसले होते. अशी स्वारी ब्रह्मावर्ती येऊन वाड्यांत पोचली. नंतर जोसीबाबा वगैरे विद्वान् व शास्त्री मंडळीस शालजोड्या धोत्रजोडे व दक्षणा देऊन संतोष केला. नंतर ब्रह्मावर्ती सर्व लोकास आनंद होऊन रोज ब्राह्मण भोजने, नाच, तमासे वगैरे आनंद दिवसेदिवस जास्त करू लागले व काही अनुष्ठाने राज्जप्राप्तीबाो ची सुरू केली. अशा दिवसात पंधरा दिवस जाहाले. ब्रह्मावर्त क्षेत्राचा पलटणी लोकांनी बंदोबस्त चांगला ठेविला होता. गंगेचे बाजूनी ध्रुव घाटापासून मोरचे बांधून तोफा तयार ठेविल्या होत्या.

**आगबोट प्रकरण**

येक दिवसी असे घडले की, ब्रह्मावर्त क्षेत्राचे खालील बाजूनी इलाबाद म्हणजे प्रयागास जाण्याकरिता येक मोठी नाव म्हणजे गलबत गोरे लोकांनी भरून येत

होते. त्यात बहुधा गोरे लोकांच्या बायका म्हणजे मडमा सुमारे ६० पासून पाऊणसेपर्यंत होत्या व मुले सुमार १५ पासून वीसपर्यंत होती व उमेदवार पंधरा सोळा वर्षाचे वयाचे दाहा बारा होते. असी सर्व मनुष्ये व दारूगोळा व काही खजिना असा सरंजामसु ॥ ती नाव जात असतां दुरून दुर्बिणीने ध्रुवघाटावरचे गोलंदाजानी नाव गोरे लोकांची येत आहे असे पाहून तो गोलंदाज घाईने निघोन श्रीमंतास येऊन भेटला आणि त्यास असे कळविले की, प्रयागास जाण्याकरिता गोरे लोकांची नाव भरून जात आहे. हुकूम होईल तर ध्रुवघाटाखाली नाव आली म्हणजे तोफेचा गोळा टाकून त्यांचा नाश करू. असे श्रीमंत नानासाहेब याणी ऐकिल्यावर त्या गोलंदाजास असे सांगितलें की, त्या नावेत बायकामुले जर असतील तर आपल्यास ठार मारण्याचे कारण नाही. ते लोक लढाऊ असते तर ठीकच होते. गरीब बायकामुले आहेत त्यास आपण मारू नये. ते जिकडे त्यास जाणे असेल तिकडे सुखे करून जावोत. असे ऐकून गोलंदाज परत ध्रुवघाटावर गेला. ती नाव तसीच येऊन ध्रुवघाटावरून ब्रह्मेश्वराखालून जात असता भूतेश्वरानजीक येकायेकी गोरे लोकांचे दैवदशेने श्री गंगाभागीर्थी इणे येकायेकी वाळूचा ढीग मधेच उत्पन्न केला. तेणेकरून ती गोरे लोकांची नाव तेथेच अडकून राहिली आणि गोरे लोकांची मनुष्ये अतिशयीत घाबरून गेली. गोरे लोक बहुतकरून शुद्ध गंगाभागीर्थीत नाव आगबोट समंधाची घालीत नाहीत. गंगेत धूमालास म्हणजे आगबोटीसारखी नाव यंत्रे अग्नीसु ॥ लहानसी आगबोट असत्ये. परंतु गंगाबाईचा हरवक्त वाळूबदलचा खेळ नेहमी असतो. या कारणास्तव ते आगबोट चालवीत नाहीत. परंतु त्या लोकावर हा प्रसंग आला सबब जीव वाचवण्याकरिता बायकामुले आंत भरून जात आहेत. आगबोट जात असता वाळूवर लागली हे कृत्य सर्व तेथील मोर्च्यावरच्या गोलंदाजांनी पाहून जलदीने श्रीमंत नानासाहेब यास आगबोट अडकली तिचा म ॥ र सांगून असे कळविले की, ध्रुवघाटावर नाव आली तेव्हा आपण हुकूम दिल्हा नाही. परंतु आता दिल्हा पाहिजे. श्री गंगेने त्याजवर अवकृपा केली म्हणोन शत्रुक्षेत्रात नाव अडकली, त्यापेक्षा तोफेचा गोला आम्ही टाकणार आणि सर्व मनुष्यें मारणार असे आमचे मनात आले आहे. असे सांगून परत तोफेवर येऊन तोफेस बत्ती दिल्ही. तिकडे नावेवरचे लोक काही खाली पाण्यात उतरून नाव लोटीत होते, तो येकायेकी गोळा नावेत पडला. गोळा नावेत पडताच नावेत दारू होती ती सर्व पेटून यकदम भडका जाहाला आणि सर्व बायकामुले जळून गेली. त्यापो बायका

पाच सहा व मुले तीनचार व पुरुष चार असामी मात्र वाचले. नंतर दुसरी नाव आत घालून आगबोटीवर जाऊन पाहाता सर्व आगबोट जळाली, परंतु काही खजिना निघाला. एकंदर रु ।। दाहा हाजारपर्यंत सापडले ते घेऊन वाचलेली मनुष्ये कैद करून ब्रह्मावर्त क्षेत्री येऊन जाहाला म ।। र श्रीमंतास कळविला. ब्रह्मावर्त मुकामी गोरे लोकांच्या बायका सुमार ४० चालीस पासून पन्नासपर्यंत व मुले दहापासून पंधरापर्यंत कैद करून ठेवली होती. त्याजवर पलटणी लोकांचा पाहारा पंचवीस लोकांचा नेमला होता व तरुंगातही मजबुदीचा होता. प्रतिदिवसी सकाळी झाडा करण्याकरिता सर्व कैदी लोक पहारेकरी यांणी गंगेचे वाळूवर नेऊन सर्व कृत्य तेथील होऊन पुन्हा तुरुंगात कैद करून ठेवीत असत. असे रोजचेरोज चालत असता गोरे लोकांचे बायकात येक बायको राजकारणी हुशार होती. तिणे येक भंगीण फितूर करून तिजला दोन मोहरा देऊ करून इलाबाद म्हणजे प्रयागास पत्र नेऊन देण्याचे कबूल करून येका कागदावर इंग्रजी पत्र लिहून जेथे झाड्यास ती बायको बसली होती तेथेच संकेताप्रो पत्र ठेऊन ती बायको उठोन गेली. पलीकडे ती भंगीण ते पत्र उचलून घेत्ये समई पहारेकरी सिपाई याणी पाहिले. लागलीच ते पत्र व ती भंगीण कैद करून श्रीमंत नानासाहेब यांचेसमोर आणिली. त्या भंगिणीस फटके मोजून पंचवीस देताच फितुराब।।ची कबूल होऊन सर्व म।।र खरा सांगितला. तेव्हा येकदम पलटणी लोकांनी दंगा करून असे बोलू लागले की, शत्रूच्या स्त्रिया इतक्या हुशार की अशा अडचणीतही फितूर करून इलाबादेस लिहून पाठवण्याबोचा विचार करितात. तेव्हा यांचे धैर्य किती आहे हे लक्षात येतच आहे. आता पत्री म।।र काय आहे तो पाहू म्हणोन इंग्रजी वाचणारास बलावून आणून म।।र पाहता कानपुरावर शत्रूचा जय जाहाला आणि आनंदानी ब्रह्मावर्तास येऊन नाच बैठकी, तमाशे सुरू करून त्यातच वेळ घालवीत आहेत. फौजेचा बंदोबस्त बराबर राहिला नाही वगैरे मजकूर ली।। होता. आणि शत्रू बेसावध आहे तो लवकर इकडे येण्याब।। विचार करावा, असे पत्री लिहिलेले ऐकून पलटणी लोकांनी फार आग्रह केला की, आम्हास या गोरे लोकांस ठार मारण्याबदल हुकूम द्यावा. तेव्हा नानासाहेब असे बोलले की, स्त्रिया व बाळे यास मारण्याब।। आम्ही हुकूम देणार नाही. कारण कोणत्याही काळात व राज्यात स्त्रियांचा वध करावा असी रीत नाही. असे भाषण ऐकून पलटणी फार तप्त होऊन आवेशाने तेथून निघोन कैदखान्यात येऊन तरवारीने व बंदुकांचे गोळ्यांनी दरोबस्त मुले व बायका त्या

निर्दय चांडालांनी ठार मारली. आणि जागोजाग दंग्यात बायकामुले गोरे लोकांची कैद करून ठेविली होती त्यास मारण्याब।। पत्रे लिहिली. त्या पत्री म।।र बायकानी कपट करून फितूर भंगीण करून पत्र इलाबादेस पो हा मजकूर लिहून त्यास असे कळविले की, या शत्रूच्या बायका इतक्या हुशार राजकरणाविसी आहेत. त्यास पत्र पाहताच स्वर्गास रवाना कराव्या. अशा पत्रावरून झासी व दिल्ली, आग्रा वगैरे ठिकठिकाणी गोरे लोकांच्या बायका व मुले मारिली. ते समई मोठेमोठे शहाणे व वृद्ध असे बोलू लागले की या प्रसंगी आम्हास असे वाटत होते की, काळे लोकास जय मिळून गोरे विलायतेस जातील आणि पुन्हा हिंदुमुसलमानी होईल. परंतु ती आशा आता राहिली नाही. कारण स्त्रियांचा वध वेदांत व शास्त्रात मुळीच नाही. स्त्रियांनी जरी मोठा अपराध केला तरी देहान्त सिक्षा देऊ नये असे असून हे दुष्ट कर्म याजपासून घडले त्यापेक्षा आता जय काळे लोकास मिळावयाचा नाही. यांचा राज्ये सोडविण्याचा भर जाहाला आहे असे किती लोक बोलू लागले.

## कानपूरची लढाई

त्यावर पंधरा दिवसानी सुमारे चोहीकडून इंग्रज लोकांच्या गोऱ्या पलटणी बहुत जमून कानपुरावर येकायेकी आल्या आणि मोर्चे बांधून लढावयास सिद्ध जाहाल्या. प्रयागाहून व कलकत्त्याकडून व मद्राजी काल्या पलटणी रिसाल्यासभेत कानपुरावर येऊन पोचल्या. ही सर्व खबर श्रीमंतास समजताच ब्रह्मवर्ताहून पेशवे यांचे सरदार तात्या टोपी व लालपुरी बाबा गोसावी व जलकाराम भाऊ यास फौजेसु।। रवाना केले. त्याणी कानपुरास जाऊन मोरचे बांधून युद्धास तयार जाहाले. मागाहून मुहूर्त पाहून श्रीमंत नानासाहेब व बाळासाहेब व रावसाहेब हे घरून देवास नमस्कार करून बाहेर पडतात तो येकायेकी अपशकून होऊ लागले. मांजर आडवे त्याच घाईत गेले. दरवाज्याबाहेर पडतात तो येक तेलंग ब्राह्मण टोपलीत भस्म घेऊन पुढे आला. पुढे जातात तो लाकडे विकण्याकरिता पुढेच आली. नानासाहेब यांचा घोडा येकायेकी वाटेने आडला आणि येक घटका खोळंबा जाहाला आणि रावसाहेब व बाळासाहेब यांचे घोड्याचे नेत्रास पाण्याची धार लागली होती इत्यादीक बहुत अपशकून जाहाले. तथापि ते त्याणी न गणून शूरत्वाचे आवेशाने तसेच कानपूर मुकामी गेले. तेथे लढाई सुरू जाहाली. ती लढाई मोठी चालली. इंग्रज लोकांच्या व काळे लोकांच्या लढाऊ तोफा

बराबरीच्या होत्या. उभयतांच्या तोफांचा भडमार सुरू जाहाला व बंदुका कडामिनीचे आवाज बहुत सुरू जाहाले. याखेरीज बिगूल व इंग्रजी बाज्या, सिंगे वगैरे सर्व वाद्ये वाजू लागली. वीररस बहुत माजला. या युद्धात स्वता नानासाहेब मोरच्यावर जाऊन तोफेस बत्ती आपण देऊ लागले. उंटावरचे स्वार हस्तनळीच्या बंदुका घेऊन परस्परे करून लढाई देत होते. वीररस बहुत माजला होता. युद्ध होता होता श्रीसूर्यास्त जाहाला. नंतर इंग्रज लोकानी व काळे लोकानी चंद्रजोती व मशाली बहुत लाविल्या आणि सर्व रणभूमीस उजेड केला. महायुद्धास प्रवृत्त जाहालेले वीर स्वास देखील सोडण्यास त्यास फुरसूद राहिली नाही. ते समई रणात उभय पक्षातील मोठेमोठे अप्पसर, सुभेदार, कपतान लोक बहुत स्वर्गवासी जाहाले व सिपाई लोकांची गणीत नाही. येकसारखी लढाई सुरू जाहाल्यापासून मधे स्नान भोजन निद्रा सु॥ नाही, तसेच लढत होते. लढाईचा नंबर आला म्हणजे लढून मागे येऊन हातावरचे हातावर साखरपुऱ्या घाईने खाऊन भिस्ती याजपासून पाणी घेऊन हातानी पिऊन पुन्हा युद्धास प्रवृत्त व्हावे. याप्रो युद्ध चालत होते. असे युद्ध एकंदर दहा बारा दिवस रात्रंदिवस चालून शेवट पुरुषयत्न निर्फळ दैवबळ प्राधान्य होऊन येकायेकी वारा फिरला, आणि काळे लोकात भीती उत्पन्न होऊन रण फुटू लागले. गोरे लोकांनी मोरच्यातून तोफा बाहेर ओढून पुढे चाल करू लागले. काळे हतवीर्य होऊन मृत्युभयानी दशदिशा रण फुटून पलायन करू लागले. तेव्हा बाळासाहेब याणी त्या काळात सर्वास मोठ्यानी हाका मारून आवेशाने ज्या तोफेवरचा गोलंदाज गोरे लोकांनी मारला होता त्या तोफेवर जाऊन स्वता तोफ चालू केली होती. पाच साहा आवाज जाहाले तो दुसरे तोफांवरचे गोलंदाज मरण पावले. त्याही तोफा रिकाम्या पडल्या व स्वार सर्व पळून गेले व पायदळ युद्धभूमीवर राहिले नाही. हे कृत्य पाहून बाळासाहेबही भीतीप्रद पावले. तो रावसाहेब व नानासाहेब हे घोड्यावर असता बाळासाहेबास भेटून त्यास असे कळविले की, आता युद्धाची सिकस्त जाहाली आहे. तर विनाकारण आपण रांडमरणानी या समयी मरावे त्यापेक्षा येथून पळून जाऊन पुन्हा उद्योग करून सैन्यसागर जमा करून लढाई देऊन जय मिळवून किंवा माहारणात पडून स्वर्ग जिंकू. यास्तव आता घोडे ब्रह्मावर्ताचे रस्त्याकडे काढावे हे बरे वाटते. हे भाषण सर्वांनी ऐकून कबूल करून ब्रह्मावर्त क्षेत्राकडे घोडे चालू केले. ते समई इंग्रज बहादर याणी जय जाहाल्याब॥चा बिगूल वाजवून काळे लोकावर चाल करीत काळे लोकांचे तंबू ठोकून रहाण्याची जागा होती तेथपर्यंत

येऊन त्याच जाग्यावर राहिले. आणि तेथील दारूगोळा, मेखजीन, गुदामसु।। तोफा, बंदुका, कडामिनी, तरवारी वगैरे खजिना सर्व आपल्या ताब्यात घेऊन मोठ्या आनंदाने तेथेच राहिले. कानपुरावरचे लढाईत पलटणी लोक बहुत मरण पावले व गोरेही बहुत मेले. बाकी रण सोडून अन्तरवेदीतच फत्तेपुराकडे बहुत लोक गेले. काही पलटणी पायदळ व रिसालवाले लोक कानपूर सोडून श्रीमंताबराबर बिटूर म्हणजे ब्रह्मावर्त क्षेत्री गेले. श्रीमंत ब्रह्मावर्ती आले तेव्हा श्रीसूर्यास्ताची संधी होती. कानपुरावर लढाईचा मोड जाहाल्याचे वर्तमान ब्रह्मावर्तास कळले नव्हते. सबब क्षेत्रातून मंडळी बातमी काय आहे ही काढण्याकरिता भूतेश्वरजवळ सुमारे ५० लोक जमून जाताना दरम्यान रस्त्यावर श्रीमंतांची भेट जाहाली. ते समई मंडळींनी तिघांचे तोंड मोहऱ्यावरून लढाईत जय मिळाला नाही असे समजून सर्वांनी नमस्कार करून किंचित स्वस्थ राहिले. तो नानासाहेब याणी मोठ्यानी श्वास सोडून हरहर शब्दाचा उच्चार करून असे भाषण केले की, सर्व हिंदुंकरिता यत्न आम्ही आजपर्यंत केला. तो सर्व व्यर्थ जाऊन आमुचे जीविताचीही आशा आम्ही सोडिली आहे, असा आज प्रसंग गंगाबाईने आणिला आहे. असे बोलून तेथून ब्रह्मावर्त क्षेत्री आपले वाड्यात तिघेही सिरले. ते समई त्या क्षेत्रात वस्तीचे लोकांची जी गलबल होऊन गेली तिची वर्णना करवत नाही. आता श्रीमंत कोठेतरी फौजसु ।। निघोन जातील आणि गोरे लोक येऊन आमची मुलेमाणसे मारतील आणि आमची जिंदगी सर्व लुटून नेतील आणि घरेही अग्नीनी दहन करतील. आता आम्ही गरिबांनी या समई जावे तरी कोठे इत्यादि बोलणी बोलून सर्व लोक घाबरून गेले. आणि घरातील भांडी काही लोकानी भूमीत पुरून ठेवण्याच्या उद्योगास लागले व काही मंडळीने विहिरी कुवे वगैरे ठिकाणी ठेवावयास लागले. सर्व क्षेत्रनिवासी लोक रस्त्यावर बाहेर पडून बायका व मुले यांची काही येक तजवीज न लाविता आपले जिवाची काळजी करून आकांत करू लागले. ते समई ते क्षेत्र दुःखरूप दिसू लागले.

### श्रीमंतांचे लखनौकडे प्रयाण

श्रीमंत घरी येऊन स्त्रियांस थोड्यांत जाहाला म ।। र सांगोन त्यांस असे कळविले की, आता शत्रू येतील. त्यापेक्षा येथून निघून लखनौचे मुलुखांत म्हणजे श्रीगंगा उतरून जाऊ आणि बेगम लखनौची राणी इजला मिळून जे करणे ते

करू. परंतु आता लवकर बाहेर पडून गंगेवर जाऊन नावेत बसावे. असे बायकांस सांगोन माजघरांत येक धोत्र हातरून जे जे अपूर्व अगणित किंमतीचे पदार्थ होते ते सर्वत्र बांधून घेऊ लागले. पूरवी पेशवे सरकारानी राज्य मिळवून राज्याचा अनुभव घेता घेता ज्या वस्तु दुर्मिळ त्या मिळवलेल्या सिवाजी महाराज सातारकर याणी श्री रामदास स्वामी गुरू करून त्याचे असीरवादांनी बादशापासून राज्य मिळविले, त्या रामदासांनी सिवाजीस प्रसादार्थ आपल्या छाट्या म्हणजे भगवी वस्त्रे दिल्ही होती ती वस्त्रे पेटीत बहुत बंदोबस्तानी ठेऊन ती पेटी देवघरांत पूजेस ठेवली होती. पुढे शाहू छत्रपती यांणी पेशवाई प्रधानकीची वस्त्रे श्रीमंतास दिल्ही आणि काही दिवसानी सर्व राज्याचा कारभार मुकत्यारी देऊन सर्व राजैश्वर्य दिल्हे, त्यांत श्री रामदास स्वामींचे वस्त्राची पेटीही श्रीमंतांस दिल्ही होती. ती पेटी आजपर्यंत देवघरांत ठेविली होती. ती काढून उघडून आतील छाट्या मात्र घेतल्या व दक्षणावर्त शंखही घेतला व गौरीशंकर नांवाचा येक बाण पूरवापार अति उत्तम होता तोही घेतला, आणि थोरले माधवराव साहेब पेशवे यांस अमोलिक रत्नासारखे वडाचे पुष्प मिळाले होते ते रुप्याचे करंड्यात ठेविलेले, तेही बराबर घेतले. असी सर्व राजरत्नें बांधून घेऊन घाईने देवांस नमस्कार करून सर्व वाडा भरलेला टाकून बायका बराबर घेऊन त्यावेळी म्हणजे सूर्यास्त जाहाल्यावर दिवे लावण्याच्या आत वाड्यातून बाहेर पडण्याचा प्रसंग प्राप्त झाला. ते समई मनुष्ये बराबर होती ती खुद्द नानासाहेब व बाळासाहेब व रावसाहेब व तिघांच्या बायका. श्रीमंत बाजीराव साहेब कैलासवासी यांचे कुटुंब व महाराजांचीच औरस कन्या याप्रो आठ मनुष्ये बराबर घेऊन सर्व जिंदगी भरलेला वाडा टाकून देऊन अतिशय भयातुर होऊन घराबाहेर सर्व मनुष्ये पडून रस्त्यांनी गंगेवर जाऊ लागली. ते समई क्षेत्रवासी लोक बायकामुलें सु।। रस्त्यात होती त्याणी श्रीमंतांची मनुष्ये पाहून येकदम सर्व लोकांस गयवर येऊन हरहर शब्दाचा उच्चार करून रडण्याचा कोलहल जाहाला. पहा त्या बायका सर्व येकका वस्त्रानिशी बाहेर पडून रडत रस्त्याने दीनासारख्या हळूहळू जात होत्या. ते समई कोलहल सर्व लोकांचा जाहाला, त्यास उपमा देण्यास आम्हास असे वाटते की, श्री रामलक्षुमण श्री सीता अयोध्येहून वनवासास जाते समई पुरवासी लोकांचा जो प्रसंग तोच येथे प्राप्त जाहाला आहे. श्रीमंत गंगातीरी येऊन श्री गंगेची पूजा करून गंगेस तांबडी पैठणी व हिरवी जरीकाठी चोळी दिल्ही आणि प्रार्थना केली की, हे गंगे भागीरथी मातोश्री आजदिनपर्यंत तूं आमचा सांभाळ सर्व प्रकारे

केलास आणि आता तुझेच मर्जीने तू वियोग देणार असे दिसून येते. असो. तुजला उक्त वाटेल ते कर. आम्ही दीनांनी तुझी प्रार्थना काय करावी. असे बोलून नानासाहेब गंगातीरात आलेल्या लोकांस साष्टांग नमस्कार घालून नावेवर चढले. मागाहून बाळासाहेब सर्वांस विनंतीपूर्वक नमस्कार करून असे सांगू लागले की, कानपुरावर मोड आमचा जाहाला. त्या प्रसंगात आमचे सरदार तात्या टोपी व रामभाऊ जलके व कलपुरी बाबा गोसावी वगैरे सरदार कोठे गेले त्यांचा तूर्त आम्हाला पत्ता नाही हेही बरेच आहे, आपण सर्वांनी कृपा करून आमचे जाहालेले अपराध क्षमा करावे असे त्यांचे बोलणे ऐकून पदरची मंडळीपाो वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री व जोसीबाबा याणी उत्तर दिल्हे की, बहुत काळपर्यंत हे देहे आपल्या अन्नानी पोषण केलेले आपले आश्रयानी आजपर्यंत संसार केले आणि आपल्यास विपत्ति प्राप्त जाहाली म्हणोन सोडून देऊन सुखाची इच्छा आम्ही करावी तर इहलोकी निंदेस प्राप्त होऊ. परलोकी तर नर्कवास यावत्कल्पक्षय होई तावत्पर्यंत भोगावा लागेल. यास्तव माहाराजानी आम्हास बराबर न्यावे आपल्याबराबर काही प्रसंग येवो. असे भाषण श्रवण करून नावेवरून नानासाहेब उभे राहून सर्व लोकांची प्रार्थना करून असे कळविले की, आपला आम्हाबराबर येण्याचा निश्चय आहे हे ठीकच आहे, परंतु हा समय नव्हे. समय येईल ते समई तुम्हास मी विसरणार नाही. तुम्हा लोकांचा वियोग मजला दु:सह आहे. तुम्ही सर्व वृद्ध माझे वडिलाप्राो लालनपालण केले व बराबरीचे लोकांनी बंधुत्वाप्राो मित्र भावाने आनंदाने आजपर्यंत काळक्षेप केला. परंतु हा समय फार वाईट आला यास्तव प्रार्थनापूर्वक माझी विनंती आहे की, आपण सर्व लोक स्वस्वस्थानी जावे. पुढे थोडे दिवसांनी भेटी होतील. या पलीकडे आग्रह कराल तर सर्वांसह आजच प्राणघात होणार. नाहीपेक्षा योजित कार्ये सर्व होणारी आहेत. पुन्हा तुमचा आमचा समागमही लवकर होईल. आता नमस्कार. या उपर कोणी बराबर येण्याची गोष्ट बोलू नये. बोलेल त्यास श्री गंगाबाईची शपथ आहे. असे उत्तर श्रीमंताचे ऐकून सर्व लोक खाली माना घालून अति दु:खित होऊन स्वस्थ राहिले. ते समयी राघोबा नांवाचा सिष्य होता तो पुढे येऊन हात जोडून विनंती केली की, महाराज माझी मातोश्री मी वर्षाचा होतो तेव्हा मरण पावली असे सर्व लोक सांगतात व बाप मौजीबंध जाहाल्यावर माझे वय नऊ वर्षांचे होते तेव्हा कैलासवासी जाहाला. चुलता वगैरे मजला कोणी नाही. माझे घर ऐकिण्यांत राजापूर प्रांती कोकणांत आहे. माझा बाप बहुत वर्षे महाराजांचे अन्नाच्छादनानी

होता. माझा पिंडच मुळी आपले अन्नाचा आहे आणि आजपर्यंत पोषणही आपण करीत आला. आता मी जीव वाचवून भिक्षा मागून रहावें हें मजला ठीक वाटत नाही आणि आपल्या बराबर कोणीच नाही. त्यापेक्षा हा मी नावेवर चढतो. जे होणे ते होवो. महाराज मजला नेणार नाही तर श्री गंगेत हे शरीर घालून स्वर्गास जाईन, असे बोलून येकदम नावेवर चढला. तेव्हा ती श्रीमंतांची मनुष्ये आठ व राघोबा सिष्य येक मिळोन नऊ मनुष्ये नावेवर बसली. ते समई नानासाहेब याणी कोळी यास असे सांगितले की, राघोबा व आम्ही मिलोन नाव पलीकडे नेऊ तुम्ही सर्व उतरून जावे. असे सांगताच कोळी लोक उतरून गेले. फक्त नऊ मनुष्ये मात्र नावेत होती. रावसाहेब याणी सहासात सुमारे मेणबत्त्या नावेवर लाविल्या होत्या बाळासाहेब व राघोबा हे दोन आसामी दोन्ही बाजूस नावेच्या वल्ही घालून नाव चालू केली. ते समई क्षेत्रवासी ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र वगैरे अठरा पगडा जाती लोक व त्यांच्या बायका येकदम हलकोलहाल करून मुक्तकंठ करून गंगेचे काठीच उभे होते. नाव पाण्यात सुमार मैलभर मोठ्या धारेत गेल्यावर येकदम मेणबत्ती मालविल्या आणि अंधार केला. मग दक्षणावर्त शंख स्वामींच्या छाट्या वगैरे जी राजरत्ने बरोबर घेतली होती ती सर्व काढून नानासाहेबांनी आपले हातून गंगाबाईस अर्पण केली. इकडे पुरवासी लोक याणी दिव्यासह नाव जात असता येकयेकी दिवे दिसत नाहीसे जाहाले यावरून श्रीमंतांनी सर्वांसह नाव गंगेत बुडविली यात संशय नाही. अशी पकी खात्री मानून अति शोक सर्वांनी करण्यास आरंभ केला. तो प्रकार किती लिहिणाऱ्यांनी लिहून ठेवावा. त्या काळी सर्वांस जो शोक जाहाला त्यास उपमा देण्यास राहिली नाही. गंगातीरी शोकसमुद्रांत सर्व प्रजा अवसीची प्रहर रात्र होईतोपर्यंत राहून मग सर्व लोक क्षेत्रांत आपआपले ठिकाणी जाऊन राहिले.

### श्रीमंतांचे व स्त्रियांचे हाल

इकडे गंगा उतरून नावेतून गंगातीरी सर्व मनुष्ये उतरली आणि चालू लागली. गांपारी मुलुख लखनौचा अमल खरा. परंतु ती नाव घाटावर लागली नाही आणि भलते ठिकाणी नाव कडेस लागली. सबब त्या बाजूवर सुमार येक मैलपर्यंत अतिशय चिखल होता. कोठे ढोपरपर्यंत लागे कोठे पायाचे पोटरीपर्यंत लागावा, याप्रो तो चिखल अति चिकट असता श्रीमंताचे सर्व मनुष्यांस

चालण्याबोचे श्रम फार जाहाले. त्या बिचाऱ्या बायकांस चालत घरून गंगेवर जाण्याचाही प्रसंग ठाऊक नाही. नेहमी मेण्यांत, गाडीत जाण्याचा सराव. या योगाने हे दु:ख प्राप्त जाहाले. ते समई पुरुष मंडळीने त्या स्त्रियांस हाती धरून हळूहळू चिखलातून पाय बाहेर काढवून दुसरा पाय देत देत अशा संकटातून नेत्रवाटे पाणी टाकीत टाकीत ती सर्व मनुष्ये कोरडे भूमीवर प्राप्त होऊन श्री गंगेस नमस्कार करून तडक गांवाकडे चालती जाहाली. तो गांव लखनौचे मुलुखात होता. त्या गांवास गढी म्हणजे भुइकोट किल्ला होता. तेथे मामलेदार राहात होता. त्या मामलेदारास लखनौचे बेगमचे पत्र होते की, श्रीमंत नानासाहेब हे कानपूरचे लढाईत हरले आहेत. ते आपले मुलखात आल्यास बंदोबस्त ठेवावा. याजवरून तो मामलेदार शोधात होता. श्रीमंत सर्व मनुष्यनिसी त्याच गांवाबाहेर पश्चम बाजूस श्रीहणमंताचे देवालयात सिरले. तेथे देवालयात जागा पाहता तीन हातही जागा सपाट नव्हती. सर्व जाग्यास मधून मधून खाचा खलग्या फार होत्या. तेथेच सर्व मनुष्ये दमलेली राहिली. नंतर बायकांस अति ताहान लागली. ते समई देवळाजवळ पाण्याची विहीर होती, परंतु याजपासी रसी लोटा नव्हता. पाणी पिण्यास पात्र नाही, अशा संकष्टात पडले. तो राघोबा सिष्य याणे आपले धोत्र व श्रीमंतांचा उपरणा असी दोन वस्त्रांस गाठ देऊन विहिरीत सोडली परंतु पुरेना. मग बाळासाहेब याणी आपला रुमाल दिल्हा. तो पाण्यात भिजून वर काढून त्या स्त्रियानी आपली ओंजळ करून राघोबांनी ते वस्त्र ओंजळीत पिळून तृषाहरण केले. नंतर मारुतीचे देवालयांत जाऊन निद्रा केली. तो रात्र सुमार बारा चवदा घटका जाहाली होती. तेथे हातरूण पांघरूण मुळीच नाही. भूमी हीच शया, आकाश हे पांघरूण केले होते. ती रात्र अति दु:खात गेली. पहाट होताच श्री ईश्वराचे स्मरण करून तेथेच मनुष्ये राहिली. प्रात:काळी उजडताच सर्व मनुष्ये गंगेवर जाऊन झाडा वगैरे मुखप्रक्षालनादि कृत्य करून पुन्हा श्री मारुतीचे देवालयात आली. पूर्व दिवसी जेवणाची सर्व धांदल जाहाली होती आणि रात्रौ तर पाणी मिळण्याबो व्यवस्था लिहिली आहेच. मग सर्वांस क्षुधा फार लागली. ते समई नानासाहेब, बाळासाहेब व रावसाहेब हे येकमेकांचे मुखाकडे पाहू लागले. बायका तर रडूच लागल्या. कोणापाशी पैसा नाही व पाणी पिण्यास पात्र नाही. पुरुषापासी नेसू वस्त्र व येक उपरणा अंगावर बायकांपाशी नेसू मात्र वस्त्र, आंगात चोळी या खेरीज वस्त्र नाही. अशा संकट दशेत असता राघोबा सिष्य याणी असे सांगितले की, माझे बन्यानांत येक रुपया

आहे. मी सर्व सरंजाम भोजनाचा आणोन तयारी करितो, आपण काळजी करू नये. नंतर राघोबा बाजारांत जाऊन कणीक, तूप, लाकडे, मीठ, तिखट वगैरे सरंजाम घेऊन वरण सिजविण्यास मडके व येक मोठे मडके पाण्याकरिता व लाहान लाहान मडकी पाणी पिण्याकरिता, असा सर्व सरंजाम घेऊन मारुतीचे देवळांत येऊन चौका करून स्नान करून सैपाक करण्यास सुरू केला. कणकीचे गाकर भाजून वरण तयार करून ठेवले. नंतर पुरुष सर्व ते मडके घेऊन विहीरीचे पाण्यानी उपरणे भिजवून स्नान केले. परंतु बायकांस फार पंचाईत पडली. ते समई त्या बायकांचे हाल दुःख व पाहून तेथे नागरिक दोन पंचे होते. ते व येक उपरणा व येक धोतर भिजवून त्यास दिल्हे आणि त्याणी स्नाने केली. नंतर मारुतीची पूजा करून गाकराचा नैवेद्य दाखवून भोजनास सर्व मनुष्ये बसली. राघोबा सिष्य वाढीत होता. तो इतक्यात तेथील मामलेदार यास असी बातमी लागली की, मारुतीचे देवालयात कोणी दक्षणी यात्रेकरू उतरली आहेत. परंतु त्याजपाशी वस्त्र प्रावर्ण काही येक नाही. भांडेकुंडेही नाही. परंतु बायका बराबर आहेत. त्यांचे नाकांत नथी मात्र मोठ्या किंमतीच्या आहेत. हिरेही नथीत आहेत. यावरून हे लोक कोणी मोठे आहेत. असी खबर समजताच स्वता मामलेदार देवालयात आला. तो सर्वांची भोजने जाहाली. क्षुधेचे योगाने जे अन्न गेले तेवढे संपले, बाकी सर्व अन्न राहिले होते. कारण त्या मनुष्यास असे अन्न खाण्याची सवय मुळीच नव्हती. असो मामलेदार याणी चौकसी करिता हे श्रीमंत नानासाहेब आहेत असी पकी खात्री जाहल्यावर मामलेदार गढीत येऊन, बायकांस बसण्याकरिता मेणे व पुरुषांस बसण्याकरिता घोडी व शिवबंदीचे लोक व कारकून असा सरंजाम पाठवून दिल्हा, नंतर श्रीमंत मारुतीस नमस्कार करून घोड्यावर बसून व बायका मेण्यात बसून गढीत गेले. तेथे पोचताच वस्त्र प्रावर्ण भांडी वगैरे सर्व तयारी लागली. आचारी पाणके व सिष्ये कारकून वगैरे सर्व तजवीज लागली आणि लखनौचे बेगमेस जाहाल्यामा।।रचे पत्र देऊन स्वार रवाना जाहाला. पुढे नानासाहेब याणी राज्यकीचे काम सुरू केले. इकडे ब्रह्मावर्ताकडे श्रीमंतानी सर्वांसह गंगेत बुडवून घेतल्या बाो लौकिक जाहाला. इंग्रज लोकांनी तर मुंबई, कलकत्ता, मद्राज वगैरे ठिकठिकाणी पेशवे शत्रु पाण्यात बुडून गेले म्हणोन बातमी दिल्ही. असो-इंग्रज सरकारानी कानपूर घेतल्यावर दुसरे दिवशी कानपुरात दवंडी पिटून रयत लोक निःकाळजी केले आणि आपला आमल बसविला. कानपुरांत जे जे लोक पेशवे

याचे मसलतीत होते त्या त्या लोकांचे ठिकाण लावून काही फासी व काही तोफेचे तोंडी देऊन निकाल केले. नंतर गोर लोकांचे पलटण येक व काळे लोकांची पलटणे दोन असी घेऊन कानपुराहून बिटूर म्हणजे ब्रह्मावर्तास येऊन पोचले.

## ब्रह्मावर्ती कत्तल व लूटमार

श्रीमंत गंगापार गेल्यावर तिसरे दिवशी सकाळी चार घटका दिवसास ब्रह्मावर्ती हाला सुरू जाहाला. क्षेत्रामध्ये गोर लोक येताच सडकबिज्यन सुरू केले म्हणजे क्षेत्राचे रस्त्यावर जो पुरुष सापडेल त्यास मारावा. याप्रमाणे बहुत लोक मारले गेले व गोरे घरांत सिरून रुपे व सोने सापडेल तेवढे लुटून नेले व जेथे जेथे त्यांस संशय आला तेथे तेथे भूमी व भिंती खणून अर्थ काढून घेतला. याखेरीज त्या प्रसंगात काही लोकांनी घरांतील अर्थ काढून आपले कंबरेस बांधून रस्त्यानी ध्रुवघाटाकडे जाऊ लागले. तो गोरे किंवा काळे लोकांची भेट जाहाली म्हणजे त्याणी तो अर्थ घ्यावा. गोरेकाळे कोणी ज्यास भेटले नाहीत त्यांचा अर्थ गावलुटारू, गंगापुत्र वगैरे दांडगे लोकांनी अर्थ लुटावा. याप्रो क्षेत्रात दंगा माजून राहिला. मग तेथील प्रजेचे दुःखास पारावार नाहीसी जाहाली. ब्रह्मावर्ती त्या दिवसी बारा वाजत तेथपर्यंत गोरे लोकांची सोने रुप्याचीच लूट जाहाली. नंतर क्षेत्रांतून गोरे श्रीमंताचे वाड्यात गेले. इकडे क्षेत्रांत मंद्राजी काळे लोकांनी भांडेकुंडे चीजवस्तु, चिरगुट कपडे वगैरे तमाम सर्व जिनसांची लूट सुरू केली. तो दिवस सायंकाळपर्यंत लुटीचा होऊन दुसरे दिवशी सायंकाळपर्यंत क्षेत्रात लूट सुरू होती. धान्य, वस्त्र, पात्रें वगैरे काही एक लोकांजवळ राहिले नाही. तिसरे दिवशी क्षेत्रांत सरकारने दवंडी पिटून रयतेस निर्भय केले. मग बंडाचे कर्मास जे लोक सामील जाहाले होते ते सापडल्यास फासी देण्याचे काम सुरू ठेविले. आणि श्रीमंतांचे वाडे सर्व लुटून फस्त केले आणि वाड्यास अग्नी लाविला. बाहेरचे तट बहुतेक पाडिले व दरवाजे सर्व जाळून टाकिले. गंगेवर जाताना श्रीराममंदीर फार किंमतीचे होते ते सर्व जाळून भिंताडे पाडून तेथे श्रीरामाच्या मूर्तीसु।। ठेविल्या नाहीत. व श्रीमंतांच्या बागा ब्रह्मावर्ती जितक्या होत्या तितक्या सर्व मोकळ्या करून ठेविल्या. म्हणजे दरवाजे पाडून बागांचे तटही पाडिले. क्षेत्रांत ज्या ज्या ठिकाणी श्रीमंतांनी इमारती कामे बांधिली होती. तितकी मोडून जाळून फस्त केली. श्रीमंत बाजीराव याणी सरस्वतेश्वर सांबाचे देवालय लाख रुपये खर्च करून

आहे. मी सर्व सरंजाम भोजनाचा आणोन तयारी करितो, आपण काळजी करू नये. नंतर राघोबा बाजारांत जाऊन कणीक, तूप, लाकडे, मीठ, तिखट वगैरे सरंजाम घेऊन वरण सिजविण्यास मडके व येक मोठे मडके पाण्याकरिता व लाहान लाहान मडकी पाणी पिण्याकरिता, असा सर्व सरंजाम घेऊन मारुतीचे देवळांत येऊन चौका करून स्नान करून सैपाक करण्यास सुरू केला. कणकीचे गाकर भाजून वरण तयार करून ठेवले. नंतर पुरुष सर्व ते मडके घेऊन विहीरीचे पाण्यानी उपरणे भिजवून स्नान केले. परंतु बायकांस फार पंचाईत पडली. ते समई त्या बायकांचे हाल दुःख व पाहून तेथे नागरिक दोन पंचे होते. ते व येक उपरणा व येक धोतर भिजवून त्यास दिल्हे आणि त्याणी स्नाने केली. नंतर मारुतीची पूजा करून गाकराचा नैवेद्य दाखवून भोजनास सर्व मनुष्ये बसली. राघोबा सिष्य वाढीत होता. तो इतक्यात तेथील मामलेदार यास असी बातमी लागली की, मारुतीचे देवालयात कोणी दक्षणी यात्रेकरू उतरली आहेत. परंतु त्याजपाशी वस्त्र प्रावर्ण काही येक नाही. भांडेकुंडेही नाही. परंतु बायका बराबर आहेत. त्यांचे नाकांत नथी मात्र मोठ्या किंमतीच्या आहेत. हिरेही नथीत आहेत. यावरून हे लोक कोणी मोठे आहेत. असी खबर समजताच स्वता मामलेदार देवालयात आला. तो सर्वांची भोजने जाहाली. क्षुधेचे योगाने जे अन्न गेले तेवढे संपले, बाकी सर्व अन्न राहिले होते. कारण त्या मनुष्यास असे अन्न खाण्याची सवय मुळीच नव्हती. असो मामलेदार याणी चौकसी करिता हे श्रीमंत नानासाहेब आहेत असी पकी खात्री जाहल्यावर मामलेदार गढीत येऊन, बायकांस बसण्याकरिता मेणे व पुरुषांस बसण्याकरिता घोडी व शिवबंदीचे लोक व कारकून असा सरंजाम पाठवून दिल्हा, नंतर श्रीमंत मारुतीस नमस्कार करून घोड्यावर बसून व बायका मेण्यात बसून गढीत गेले. तेथे पोचताच वस्त्र प्रावर्ण भांडी वगैरे सर्व तयारी लागली. आचारी पाणके व सिष्ये कारकून वगैरे सर्व तजवीज लागली आणि लखनौचे बेगमेस जाहाल्यामा।।रचे पत्र देऊन स्वार रवाना जाहाला. पुढे नानासाहेब याणी राज्यकीचे काम सुरू केले. इकडे ब्रह्मावर्ताकडे श्रीमंतानी सर्वांसह गंगेत बुडवून घेतल्या बो लौकिक जाहाला. इंग्रज लोकांनी तर मुंबई, कलकत्ता, मद्राज वगैरे ठिकठिकाणी पेशवे शत्रु पाण्यात बुडून गेले म्हणोन बातमी दिल्ही. असो-इंग्रज सरकारानी कानपूर घेतल्यावर दुसरे दिवशी कानपुरात दवंडी पिटून रयत लोक निःकाळजी केले आणि आपला आमल बसविला. कानपुरांत जे जे लोक पेशवे

याचे मसलतीत होते त्या त्या लोकांचे ठिकाण लावून काही फासी व काही तोफेचे तोंडी देऊन निकाल केले. नंतर गोर लोकांचे पलटण येक व काळे लोकांची पलटणे दोन असी घेऊन कानपुराहून बिटूर म्हणजे ब्रह्मावर्तास येऊन पोचले.

## ब्रह्मावर्ती कत्तल व लूटमार

श्रीमंत गंगापार गेल्यावर तिसरे दिवशी सकाळी चार घटका दिवसास ब्रह्मावर्ती हाला सुरू जाहाला. क्षेत्रामध्ये गोर लोक येताच सडकबिज्यन सुरू केले म्हणजे क्षेत्राचे रस्त्यावर जो पुरुष सापडेल त्यास मारावा. याप्रमाणे बहुत लोक मारले गेले व गोरे घरांत सिरून रुपे व सोने सापडेल तेवढे लुटून नेले व जेथे जेथे त्यांस संशय आला तेथे तेथे भूमी व भिंती खणून अर्थ काढून घेतला. याखेरीज त्या प्रसंगात काही लोकांनी घरांतील अर्थ काढून आपले कंबरेस बांधून रस्त्यानी ध्रुवघाटाकडे जाऊ लागले. तो गोरे किंवा काळे लोकांची भेट जाहाली म्हणजे त्याणी तो अर्थ घ्यावा. गोरेकाळे कोणी ज्यास भेटले नाहीत त्यांचा अर्थ गावलुटारू, गंगापुत्र वगैरे दांडगे लोकांनी अर्थ लुटावा. याप्रो क्षेत्रात दंगा माजून राहिला. मग तेथील प्रजेचे दुःखास पारावार नाहीसी जाहाली. ब्रह्मावर्ती त्या दिवसी बारा वाजत तेथपर्यंत गोरे लोकांची सोने रुप्याचीच लूट जाहाली. नंतर क्षेत्रांतून गोरे श्रीमंताचे वाड्यात गेले. इकडे क्षेत्रांत मंद्राजी काळे लोकांनी भांडेकुंडे चीजवस्तु, चिरगुट कपडे वगैरे तमाम सर्व जिनसांची लूट सुरू केली. तो दिवस सायंकाळपर्यंत लुटीचा होऊन दुसरे दिवशी सायंकाळपर्यंत क्षेत्रात लूट सुरू होती. धान्य, वस्त्र, पात्रें वगैरे काही एक लोकांजवळ राहिले नाही. तिसरे दिवशी क्षेत्रांत सरकारने दवंडी पिटून रयतेस निर्भय केले. मग बंडाचे कर्मास जे लोक सामील जाहाले होते ते सापडल्यास फासी देण्याचे काम सुरू ठेविले. आणि श्रीमंतांचे वाडे सर्व लुटून फस्त केले आणि वाड्यास अग्नी लाविला. बाहेरचे तट बहुतेक पाडिले व दरवाजे सर्व जाळून टाकिले. गंगेवर जाताना श्रीराममंदीर फार किंमतीचे होते ते सर्व जाळून भिंताडे पाडून तेथे श्रीरामाच्या मूर्तीसु।। ठेविल्या नाहीत. व श्रीमंतांच्या बागा ब्रह्मावर्ती जितक्या होत्या तितक्या सर्व मोकळ्या करून ठेविल्या. म्हणजे दरवाजे पाडून बागांचे तटही पाडिले. क्षेत्रांत ज्या ज्या ठिकाणी श्रीमंतांनी इमारती कामे बांधिली होती. तितकी मोडून जाळून फस्त केली. श्रीमंत बाजीराव याणी सरस्वतेश्वर सांबाचे देवालय लाख रुपये खर्च करून

संगमर्वी दगडी काम फार करून बांधिले होते. त्याचें कारण बाजीराव साहेब यांची अतिप्रिय पत्नी सरस्वती नांवाची होती. ती रूपानी व गुणानी लोकोत्तर होती. तिचे गुंण मोठेपणा मिळविण्याबाो फार होते व स्वता दानशूर असून हस्तमुख होती. तिचे समक्ष वाड्यात स्त्री किंवा पुरुष गहीरसिस्त चालीचे मनुष्य अढळल्यास लागलीच सिक्षा देऊन त्या मनुष्यास वाड्याबाहेर काढून देत असे. श्रीमंत बाजीरावही त्या बायकोस भीत असत. कारण ती स्त्री तेजस्वी व न्याई होती. तिची स्वारी महाराजापर्यंत जात असे तेव्हा महाराजापाशी कोणी मनुष्ये असल्यास दूर करावी लागत व तिणे येखादी गोष्ट महाराजांस सांगितल्यास ते तिचे काम ताबडतोब करीत असत. असे असता तिजला नवज्वर होऊन सरस्वतीबाई कैलासवासी जाहाली.

## सरस्वतीबाईचे स्मारक उध्वस्त केले

तिचे मरणकाळी बाजीराव साहेबानी पंचवीस हजार रुा दानधर्म केला. नंतर मरण पावल्यावर काही वेळ तिजवाोचा शोक स्वता करून गंगातीरी चांगली जागा पाहून चंदनकाष्टे व कापूर याणी तिचा देह दग्ध करून दोन लक्ष रुपये तिजबाा दानधर्म केला आणि जाग्यावर दहन केले, त्या जाग्यावर पाषाणी मोठे देवालय बांधिले. आंत गर्भागार व बाहेर सभामंडप पांढरे संगमर्वी दगडी बहुत मौल्यवान् काम केले होते. श्री सांबाची तेथे प्रतिष्ठा करून सरस्वतेश्वर म्हणोन लिंगाचे नांव ठेविले होते. ते देऊळ पाडून सिवलिंग काढून संगमर्वी दगड खणून नेले. तेथे भिंताड देखील ठेविले नाही. अशी सर्व क्षेत्राची दुर्दशा केली. नंतर श्रेत्रांत दवंडी इंग्रज सरकारनी पिटून जरनेली झेंडा उतरून कलेक्टरचा अमल सुरू केला. क्षेत्रवासी लोकांस निर्भय केले. लखनौ शहर पूरवीच थोडे दिवसावर तेथील बादशहा मरण पावताच युक्तीने रेसीदंड सांहेबांनी येकही आवाज न काढता सर्व राजधानी हस्तगत केली होती. बेगम वाड्यातच होती. तिणे खर्च कमी न करिता सर्व राज्य चालविण्याचा क्रम सुरूच ठेविला होता. लखनौ हे शहर फार प्राचीन आहे. दिल्लीचे शहराखाली हा येक सुभा म्हणोन बादशहाने स्थापिला होता. या शहरावर कधी लढाई होऊन शहर लुटले गेले नाही. येकंदर हजार वर्षांतही राजधानीची अव्यवस्था जाहाली नाही. जो सार्वभौम राजा होत गेला त्यास खंडणी मात्र द्यावी लागे. परंतु कोणासी तंटा बखेडा जाहाला नाही. लखनौ हे शहर फार मोठे आहे. येकंदर शहर अठरा कोश वस्तीचे आहे. शहरांत गोमती

गंगा जागोजाग फिरली आहे. रस्त्यावर पूल बहुत आहेत. गांवात बगीचे लहान लहान बरेच आहेत. झाडी शहरात फार आहे. नबाबसाहेबांचा केसरीया नांवाचा बाग हवा खाण्याचा दोन कोशाचा आहे. आत झाडे देशोदेशची आहेत व त्या बागात बसण्याकरिता मोठेमोठे चिरेबंदी चौथरे आहेत. चौथऱ्याचे समोर कारंजी सुमार पन्नास पन्नास पकी बांधीव आहेत. खजिन्यात पाणी पाटाचे येत आहे. तेथे गुलाब, जाई जुई, मोगरा, चमेली वगैरे फुलझाडे फुलून राहिली आहेत. त्या बागात रुप्याचे पनळ पाणी जाण्यास बरेच होते असे कळते. या नबाबाचे संपत्तीसारखी संपत्ती दुसरे कोणाची नाही. असो. जिकडे तिकडे लढाया सुरू जाहाल्यावर काही पलटणी बेगम इजला अनुकूल होऊन सरकार संमधे कारभार बेगम करण्यास लागली. तेथेही गोरे लोकांची मारामारी होऊन बखेडा जाहाला. पुढे इंग्रज लोकांनी बरीच फौज धरून लखनौवर हल्ला केला. तो इतक्यात जंग बहादूर म्हणोन नेपालवाल्याचा सरदार दाहा हजार फौजेनिसी बेगमला अनुकूल होऊन इंग्रजाबराबर मोठी लढाई दिल्ही आणि इंग्रजास तेथून पिटालून दिल्हा. आणि लखनौचे राज्य बेगम करू लागली. इकडे इंग्रजांनी जंग बहादूर याजकडे फितुराबाो चे बोलणे सरू केले. त्यात काही बक्षिसी कबूल करून इंग्रजास जंग बहादूर मिळोन लढाईस आरंभ केला. ती लढाई जबरदस्त पांच साहा रोज चालली होती. शेवट इंग्रज बहादूर याणी शहर हस्तगत केले. बेगम फौजसु॥. बराबर द्रव्याचे हात्ती, उंट भरून घेऊन शहर सोडून वायव्य कोणाकडे निघोन चालती जाहाली. तिजबराबर मोठेमोठे सावकारही निघोन गेले. इंग्रज सरकारने राजवाडे हस्तगत करून घेऊन द्रव्याबाो जेथे जेथे संशय आला तेथे तेथे खणून द्रव्य अपार काढिले व त्या शहरांत येक प्रहरपर्यंत सडक बिज्यन केले. त्यांत मनुष्य बहुत मरण पावले. शहर मोठे याजमुळे कितिक पुऱ्यांत मोठेमोठे सरदार आपले वाड्यावर तोफा देऊन लढतच काही दिवस होते. काही शहर लुटले गेले. इकडे नानासाहेब व दिलीचा पिरोषशाहा बादशाहा मिळोन फौजासु॥ लखनौचे बेगमेस मिलोन येक विचारे राहिले.

## तात्या टोपीने कालपी सर केली

त्या प्रसंगी तात्या टोपी हा अंतरवेदी मुलखांत सिरोन फौज बरीच धरोन यमुना उतरून कालपीचे मुलखांत दंगा करून राहिला होता. कितिक गांव जाळून टाकिले, कितिक गांव लुटून फस्त केले. याप्रो कारखाना सुरू करून

कालपीनजीक येऊन मोठा दंगा केला. तो बिघडलेले पलटणी काही जास्त टोपी यास मिलाल्यामुळे कालपीचे किल्यावर हल्ला केला. तेथे गोरे फार कमी होते. ते लागलीच थोडीसी लढाई देऊन पळून जाऊ लागले. तो बंडवाले लोकांनी त्यांस अडऊन मारिले, आणि कालपीचा किल्ला सर करून भगवा झेंडा लावून श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे नांवाची दवंडी पिटून कालपी शहरचा बंदोबस्त ठेविला. तात्या टोपी याणी किल्यांत वस्ती धरून डंघाईचे मुलखांत लूटमार सुरू ठेविली. कालपी हे शहर यमुनेकांठी आहे. तेथे किल्ला यमुनाकाठी चांगला आहे. कालपी शहराचे पश्चमेस चौऱ्यांसी घुमट चिरेबंदी बांधीव आहेत. मधूनमधून विहिरीही बांधीव आहेत. घुमट बांधण्याचे कारणाचा शोध करिता पूरवी बादशाईत कालपीवर मोठी लढाई जाहाली. त्यांत मोठमोठे शूर नामांकित मरण पावले. त्यांस तेथे तेथेच ठेविले आणि वर कबरी बांधिल्या आहेत, असी खबर लागली. ते समई इंग्रज त्या मुलखांत नाहीसा जाहाला. मग तात्या टोपी याणी कालपीखाली मुलुख येकंदर चौपन लक्षांचा आहे. त्या मुलखाची वसूल बाकी करण्याकरितां व बंदोबस्ताकरितां मामलेदार यांच्या नेमणुका करून रवाना केले आणि हुजूर ठाणे कालपी केली. चौपन लक्षांची तहसिली सुरू करून राहिले. पुढे पलटणी लोकांचे असे म्हणणे पडले की, आम्हास इकडे यजमान नाही. त्यापेक्षा रावसाहेब किंवा बाळासाहेब यांतून कोणीतरी या बाजूवर यावे. म्हणजे आम्हास हिंमत येईल. असा अभिप्राय पलटणीचा टोपी यास समजताच पन्नास स्वार व लहानसा येक सरदार असा यमुना व भागीरथी गंगा उतरून नानासाहेबाकडे पाठविले. त्याणी तेथे विचार करून तात्या टोपी याजपासी कालपीस जाण्याबा रावसाहेबास हुकूम देऊन रवाना केले. ते समई रावसाहेब बराबर फौज सुमार आठ हजार होती. तेवढी फौज घेऊन गंगा उतरून अतंरवेदींतून समोर फत्तेपुरावरून यमुनेवर आले. तो तेथे नावा तयार नाही हे पाहून तेथे आठ दिवस मुकाम करून होते. परंतु इंग्रज सरकारने त्याजपासी लढाई केली नाही. पुढे टोपी याणी नावाची तजवीज करून कालपी किल्यात रावसाहेब नेले. त्या दिवसी सलामीच्या तोफा पंचवीस मारिल्या. मोठा आनंदोत्सव केला. नंतर रावसाहेब किल्यांत राहिले आणि तात्या टोपी फौज थोडी बराबर घेऊन मुलखात फिरू लागला. लालपुरी बाबा गोसावी थोडी फौज घेऊन अंतरवेदींतून कालपीस येऊन रावसाहेबास भेटून यमुनेचे घाटावर कालपीपासून उत्तरेस बारा कोशावर घाट नाकें धरून राहिला व लक्ष्मुमण सिंदा सरदार हा कालपीचे पश्चम बाजूवर पंधरा

कोशांवर बंदोबस्त ठेऊन राहिला. जलकाराम भाऊ सरदार आठ हजार फौज घेऊन कालपीचे दक्षण बाजूवर डंघाईचे मुलखाचे तोंडावर बंदोबस्त ठेऊन राहिला. जिकडे तिकडे कालपीचे मुलखात भगवे झेंडे लावून पेशवाई केली. सर्व कामे सुरू ठेविली होती. नवे पळटणी करण्याकरिता लोक ठेऊन शिकवणीचे काम सुरू ठेविले होते व नव्या तोफाही करण्याचे काम सुरू ठेविले होते. ते समई हिंदुस्थानात गोरे लोक नाहीसे जाहाले होते. इकडे गंगापार नानासाहेब व बेगम व पिरोषशहा हे सर्व फौजेसुाा नैमिषारण्यातून घागरानदापर्यंत गेले. तिकडे इंग्रज सरकाराबराबर आठ दाहा रोजी लढाई होत असे. कालपीचे मुलखांत बरे आहे असे लोकास समजताच कालपीस फौजदारी वगैरे सर्व कारकुनीची कामे पतकरून मुलखात नोकरीस लोक राहिले. याप्राो चोहीकडील हवाल आहे असे ब्रह्मावर्तक्षेत्राकडून चांगले दोन गृहस्त आले त्याणी हा म ।। र सर्व सांगितला. आम्हीही मजल दर मजल करीत झासी शहरापर्यंत गेलो.

## झासीस मांडवगणे यांचे बिऱ्हाडी

झासीचे बाहेर बागात त्या दिवसी सोबत्यासह भोजन करून आत जाण्याचा विचार करू लागलो. शहरात येकायेकी जाऊन उतरावे कोठे ? आपल्यास जागा कसी मिळेल ? रा. श्री. मोरोपंत तांबे यांची आजच भेट होत नाही. त्यापेक्षा कोठेतरी चांगले जाग्यावर उतरून सर्वांच्या भेटी घ्याव्या अशा विचारात आहो तों शहरातून सहज हवा खाण्याकरिता कोणी चांगली ब्राह्मण मंडळीं शहराबाहेर आली होती यांस भेटून विचार विचारता त्यांणी असे सांगितले की, तुम्ही विद्वान् आहा, त्यापेक्षा प्रथम तुम्हास उतरावयास जागा वाो राजमान्य राजश्री केशव भटजी दादा मांडवगणे ऋग्वेदी प्रतिष्ठित आहेत. वेदजटा म्हणण्याचे सामर्थ्य त्या ब्राह्मणाचे आहे. पुन्हा सरकार आश्रय नाही आणि स्वतंत्र घर मोठे आहे. सभ्यचालीचा फार गरीब वृत्तीने व द्रव्यानेही आहे. त्याची स्त्री पविव्रता फार चांगली साध्वी आहे, तेथे आपण जावे. असा त्या मंडळीने विचार सांगितला नंतर आम्ही शहरात गेलो. सोबती सर्व आपआपोपले स्थानी गेले. आम्ही उभयता चुलते पुतणे मांडवगणे यांचे घराचा शोध करीत चाललो, तो वाडा सापडला. तेथे गेलो तो ती स्त्रीपुरुषें सहज बाहेर ओटीवर बसली होती. त्यास नमस्कार करून राहाण्याबाो विचारिताच त्यांणी संतोषानी राहण्यास सांगितले. त्या दिवसी सायंकाळी आम्हास क्षुधा नव्हती तथापि त्या बाईने आम्हास आग्रह करून

फराळास दिल्हे. आणि रात्रौ सर्व हकीगती राज्यसंमधे सांगत होती. दुसरे दिवशी आम्ही स्वतंत्र बिराड करून वो. रा. रा. श्रीकेशवभटजीचे आश्रयानी त्याच वाड्यात राहिलो. गांवची हवाल कसी आहे व लोक कसे आहेत वगैरे माहिती पकी समजेतों तांबे यास भेटू नये असा विचार ठरून बाजारातोन सिधा सरंजाम आणोन दाहा वाजता भोजन करून तेथेच राहिलो. असों. हा तिसरा भाग इथेच समाप्त करतो. कारण झासीचे वृत्त फार मोठे आहे. ते या भागात लिहीत नाही. स्वतंत्रच लिहू।। तिसरा भाग समाप्तः

विष्णुभट गोडसे वरसईकर

भाग तिसरा समाप्तः

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ८४३
२६८७६

भाग चवथा

# झासी वर्णन

* पाच आहेत बाकी आमल लहान आहेत. किल्यापासून पूर्वेस मैदान जागा बरीच टाकून शहराचे रस्ते पूर्वेस गेलेले बहुत आहेत. या शहरची वस्ती फार दाट आहे. रस्ते सपाट, सडका बांधीवही काही काही आहेत. हलवाईपुरा व व कोष्टीपुरा चांगला आहे. या शहरात लोक सर्व प्रकारचे कसबी हुशार असून सावकारी वगैरे व्यवहारास सचोटीने पतीने वागण्याची रीत आहे. दक्षणेत पुणे व उत्तरेस झासी असा म्हणण्याचा पाठ आहे. या शहराची रीतभात फार चांगली आहे. सर्व हिंदुस्थानात गालिचे वगैरे वस्त्रे व पितळी उपकर्णी वगैरे भांडी इथे जसी घडली जातात असी कोठेही होत नाहीत. तसीच कागदावर वगैरे चित्रे जी काढितात तसी चित्रे जयपुराकडे मात्र निघतात, बाकी कोठे असी चित्रे निघत नाहीत. सर्व प्रकारे या शहरात लोक कारागीर कसबी आहेत. शहरात कोठेकोठे जागा विस्तीर्ण आहेत. त्यात फुलेझाडे लाऊन लहान लहान बागाही आहेत. भिडे यांचा बाग शहरात मध्यभागी असून भोवताली तट चांगला आहे. आत विहिरी पाच चार आहेत. शहरात चार चौकी वाड्याचे काम सरकारी आहे, तोही वाडा जुनाच आहे. सरकारी वाड्यापुढे मैदान बहुत असून जागा सपाट आहे. याखेरीज सरकारी बाराद्वारी म्हणजे फौजदारी कामे होण्याकरिता जागा बांधिली आहे. ती जागा फार चांगली आहे. तशाच चौक्याही बांधीव बऱ्याच आहेत. बाजार सराफा बांधीव व्यवस्थित वसविला आहे. दक्षणी ब्राह्मणांची घरे सुमार २०० दोनसेपर्यंत होतील. या शहरास बहुधा धाबे नाही, कारण विंध्याचळ पर्वत जवळ असल्याकारणाने पर्ज्यन्य बराच आहे. सबब सर्व वस्तीस खपरेल म्हणजे कौलारू घरे वाडे आहेत. काही काही गच्याही आहेत. बहुत करून मजल्याशिवाय घरे वाडे नाहीत. या शहरात पाणी फार आहे. जेथे खणावे तेथे साहा हातापासून आठ हात खणले म्हणजे पाणी महामूर लागते. सर्वांचे घरोघर विहिरी आहेत. शहराचे दक्षणेस दरवाज्याबाहेर मोठा तलाव आहे. त्या तलावातही दक्षण बाजूवर

*टीप - येथे काही मजकूर गेला आहे असे दिसते.

महालक्ष्मी देवीचे देवालय आहे. ही देवी झासीवाले यांची कुळस्वामीण असल्यामुळे पूजेचा वगैरे बंदोबस्त चांगला ठेविला आहे. नंदादीप चौघडाही तेथे आहे. देवालय बहुत खर्च करून बांधिले आहे. देवळाजवळ धर्मशाळा वगैरे इमारतीही काही बांधिल्या आहेत. आषाढापासून चैत्रपर्यंत देवीचे दर्शनार्थ जाणे जाहाल्यास नावेत बसून जावे लागते. चैत्रापुढे पायरस्ता थोडा होतो. शहराचे पूर्व बाजूवर मोठे मैदान आहे. शहरात दक्षण बाजूकडे किल्याचे आंगास नैऋत्य कोपऱ्यावर पाण्याचा चोपडा म्हणजे हौद आहे. पाणी महामूर आहे. या शहराबाहेर चारी आंगास मैदाने मोठी मोठी आहेत. शहरात गणपती, विष्णु, सिव, देवी, हनुमंत वगैरे देवांची देवालये बरीच आहेत. सर्व देवास नंदादीप नैवेद्याबाो सरकारी नेमणुका आहेत. या शहराची रीत काही पुण्यासारखी आहे. बहुधा सर्व लोक सकाळी स्नाने करून मग सर्व व्यवहार पाहाण्याची रीत आहे. शहराभोवती बागा विशेष नसता बाजारात भाजीपाला स्वस्त आहे.

## मोरोपंत तांबे यांची भेट

याप्रो शहर दोन तीन दिवस पाहून रा. श्री. मोरोपंत तांबे याजकडे जाऊन भेटण्यास मुहूर्त मांडवगणे यांचे विचारे पाहून सकाळीच स्नानसंध्यादि करून आम्ही उभयतां वाड्याबाहेर पडलो. तो समोर गाई व दोन ब्राह्मण आले, हे पाहून संतोष जाहाला. पुढे तांबे यांचे वाड्यात जाऊन पाहाऱ्यावर कोणी ब्रह्मवर्ताकडील ब्राह्मण भेटीला आले आहेत असे सांगताच आंत जाण्याची पर्वांगी जाहाली. मग आम्ही आत गेलो, तो तांबे हे माडीवर कचेरीत आहेत असे समजताच जिन्यानी माडीवर गेलो. तांबे याणी ती ।। काकांस पाहताच लोडापासून उठोन पुढे चार पाऊले येऊन काकांचा हात धरून लोडापासी बसविले. मीही तेथेच बसलो. तांबे हे काकांचे समोर बसले आणि भेटीस दिवस बरेच जाहाले वगैरे बोलणी होऊन कुशलवृत्त आपले कळविले. नंतर ती ।। काकांनीही आपले कुशलवृत्त तांबे यास कळवून, मांडवगणे यांचे घरी बिराड करून राहिलो आहो. तांबे याणी असे विचारले की, हे दुसरे बराबर आहेत हे कोण आहेत. त्याजवरून काकानी असे सांगितले की, हा पुतण्या ज्येष्ठ बंधूंचा ज्येष्ठ पुत्र आहे. सर्व कुटुंब येकत्रच आहे. कार्य प्रयोज्यनामुळे लोकांचे रीण फार जाहल्या कारणानी आपले भेटीचा हेतु धरून येथे आलो आहो. ग्वाल्हेरीस वैशंपायन याचे आश्रयानी बरेच दिवस तेथे गेले. आपले येथे काही दिवस राहून

श्री कासीक्षेत्री जाण्याबाोचा विचार आहे, इत्यादि बोलणी बहुत जाहाली. तांबे याणी सरकारचे उपाध्ये ढेकरे यास भेटण्याबाो सांगितले व आम्हास असेही सांगितले की, आता आपण काळजी कोणती न करिता स्वस्थ मनाने येथे राहावे. तुमचे बिराड आताच आपले घरी आणले असते, परंतु उपयोग नाही. कारण बाईसाहेबांकडे नेमणूक जाहाली म्हणजे सरकारी नेमणूक आहे. याजकरिता मीही बाईसाहेबास आपण आल्याबाो सांगेन, वगैरे बोलणी होऊन रजा घेतली. नंतर दोन प्रहरून ढेकरे उपाध्ये याजकडे जाऊन त्यांसही भेटलो. त्यास खबर पहिलीच कळली होती की, ब्रह्मावर्ताकडील कोणी विद्वान् दोन असामी येऊन तांबे यास र भेटून राहिले आहेत. तेथेही बोलणी वगैरे होऊन वस्तीस बिराडी आलो. तेथे रात्रौ राज्यप्रकर्णी वगैरे बंडाबाोची सर्व हकीकत समजली.

## दत्तक प्रकरण

पूरवी गंगाधर बाबा ऊर्फ बाबासाहेब कैलासवासी जाहाल्यानंतर गारदन साहेब रसीदंड होता. त्याणे राज्य तर घेतले, परंतु वाडा व जिंदगीकडे पाहिले नाही व सरकारी खजिन्याकडेही पाहिले नाही. फक्त राज्यासंमधे बंदोबस्त ठेऊन काम चालविले होते. लक्ष्मुबाई राणी इजला केशवपन करण्याकरिता श्रीक्षेत्र प्रयाग येथे जाण्याबाो साहेब यास विचारीता विलायतेचे हुकुमासिवाय जाणे नाही. आम्ही विलायतेस लिहून पाठविले आहे व आपल्यास पेणसन काय असावे हेही विलायतेस लिहिले आहे, असे साहेबानी सांगितले. नंतर लक्ष्मुबाईने हा नियम ठेविला होता की भर्ता मरण पावल्यावर केशवपन जाहले नाही तर प्रतिदिवसी तीन कृच्छ्रे प्रायश्चित्त आहे. याजवरून स्नान होताच भस्म धारण करून आचमन करून तीन कृच्छ्रांचा संकल्प करून तीन ब्रह्मणास तीन रुपये प्रतिदिवसी देण्याचा क्रम सुरू ठेविला होता. लक्ष्मुबाई साहेबांनी आपले वाडे आणि जिंदगी स्वाधीन होताच आपले दायादापाो सुबुद्धिमान् येक मुलगा पाहून दत्तविधान करून अकरा-बारा वर्षाचा वयाचा पुत्र घेतला. तों थोड्याच अवकाशात सरकारी पलटणी लोकांनी बखेडा करून बंड माजविले. ते समई तेथील छावणीत गोरे काही लोक होते व त्यांच्या बायकाही होत्या. ठरलेले तारखेच्या पूरवी सर्व तेथील गोरे लोक घाबरून येकदोन दिवस पुरवी वाड्यांत येऊन बाईसाहेबांची भेट घेऊन गारदन साहेबानी असे कळविले की आम्हावर वाईट प्रसंग येणार त्यापेक्षा आपण आपले राज्याचा बंदोबस्त आज तारिखेपासून

ठेवावा व दुसराही झासी खाली मुलुख आहे त्याचाही आपण बंदोबस्त ठेवावा. येकंदर मुलुख पंचवीस लक्ष रुो जमाबंदीचा आहे. हा मुलुख आपण आपले ताब्यांत घ्यावा असे म्हणोन दप्तर स्वाधीन केले आणि असे विचारिले, उदईक तारीख येणार त्यापेक्षा आम्हास जीवरक्षणार्थ कोठेच जाण्यास रस्ता जागा नाही, यास्तव आमचे संरक्षण आपण करावे. आपले घरांत किंवा किल्यांत आम्हास ठेवावे. असे बाईसाहेबांनी ऐकून त्यास उत्तर दिल्हे की, कलकत्त्यास सभा जाहाली त्या सभेस मजला बलावणे सरकारनी केले नाही व माझे यजमान म्हणजे बाबासाहेब दुखणेकरी असता त्याजला असे वाटले की, या दुखण्यांतून मी जगत नाही तेव्हा आपल्यास बलावून आणून असे कळविले की, माझा तर आता वाचण्याबाो भरवसा नाही आणि येथे तर दत्तपुत्र घेण्यास दायादपैकी कोणी नाही. त्यास पारोळे गांवी आमचे दायाद बहुत राहात आहेत. त्यापाो लहानसा मुलगा माझे मांडीवर माझी बायको घेईल, तर आपण हे दत्तविधान करून माझे नांव पुढे चालू करावे. आणि हे संस्थान दत्तकाकडे चालावे हा माझा हेतु तुम्ही सिद्धीस न्यावा. ते समई तुम्ही उत्तर दिल्हे की, दत्तक घेऊन हे संस्थान दत्तकाकडे चालेल असे माझ्याने सांगवत नाही. आलीकडे रूळ असी जाहाली आहे की, संस्थानी लोकांनी दत्तपुत्र घेऊ नये. घेतल्यास खाजगी जिंदगीचा मालक ठरेल, राज्य मिळणार नाही. असे ऐकून बाबासाहेब स्वस्थ राहिले. नंतर क्षौर करण्यास प्रयागास जाण्याकरिता हुकूम मागू लागले तोही मिलाला नाही. त्यापेक्षा आता आमच्यानी संरक्षण कसे होईल ? काळे पलटणी आम्हास लुटून जाळून फस्त करतील. आपला जीव कशा तरी तजविजीने तुम्ही वाचवावा. असे सांगताच पाच चार गोरे लोक बडेबडे आलेले उठोन गेले.

## गोऱ्या बायकांस आश्रय

रात्रौ गारदन साहेब येकटाच निघोन वाड्यापासी येऊन पहारेकरी यास कळविले की, लक्ष्मुंबाई साहेबांची आताच समक्ष भेट घेणे आहे तर माझी भेट करावी. त्याजवरून बाईसाहेबांस कळविले नंतर बाईसाहेब स्वता येऊन साहेबास खुर्ची बसण्यास देऊन आपणही बसल्या.

नंतर गारदन साहेबानी असे सांगितले की, आमंचे काही होवो परंतु आमच्या बायकांचे संरक्षण आपले हातून जाहाले पाहिजे. माझी बायको नाजुक फार आहे तिजसारखी या हिंदुस्थानात इरोपीन लोकांच्या बायका आहेत यांत असी सुरूप

नाजुक व चातुर्य दुसरी बायको नाही. तशात ती गरोदर सात महिन्यांची आहे, यास्तव आपण आपले घरी वाड्यात ठेवावी. आपले घरी भांडी घासील, दळणकांडणही करील. परंतु तिचा जीव रक्षण करावा. या उपर मजला सांगणे नाही. असे ऐकून बाईसाहेबांनी उत्तर दिले की, मी होता होईपर्यंत संरक्षण करीन. तुम्ही काळजी करू नये. असे सांगोन बाईसाहेब उठोन गेल्या. साहेबही उठोन आपले गोटात गेला. दुसरे दिवसी सकाळी सात वाजता गोरे लोकांच्या बायका तेथे होत्या तितक्या निघोन बाईसाहेबांचे वाड्याजवळ आल्या. ही खबर बाईसाहेबांस लागताच येक जागा रिकामी पाहून तेथे कैद करून सर्व मुले बायका पाहऱ्यात ठेविल्या.

नंतर दाहा वाजता काळे लोक बेदील होऊन काडमिनीचे बार काढून तोफही सुरू करून दंगा करावयास लागले. ती छावणी लहान. गोरे लोक थोडे होते, ते सर्व त्या पलटणी लोकांनी ठार मारून दारूगोळा, मेखजीन, खजिना, तंबू वगैरे सर्व सामान आपले ताबीत घेऊन छावणीस आग लावून बेदिल होऊन सर्व काळे पलटणी निघोन बाईसाहेबांचे वाड्यापुढे येऊन बाईसाहेबांस हाका मारू लागले. तेव्हा बाईसाहेब बाहेर येऊन अप्सर सुभेदार यास भेटून अभय वचन दिल्हे. त्याणीही असे सांगितले की, तुम्ही आमचे यजमान, तुमचा हुकूम आम्ही ऐकू आणि तुम्हापासून दर महिन्याचा मुशारा घेत जाऊ. हाली खजिन्यात द्रव्य सुम्मार पंचवीस हजार रुो आहेत व सरंजाम युद्धाचा सर्व सिद्ध आहे. आपण आता कर्तव्य ते करावे. नंतर बाईसाहेबांनी शहरात आपले नांवाची दौंडी पिटून सर्व कामे सुरू केली. किल्यात साहेब लोक शिरले सबब तेथील सर्व भुया करण्याबाो हुकूम केला व नवीन बंदुका व तोफा करण्याच्या सुरू केल्या. दारू वगैरे नवीन करण्याबद्दल कारखाना सुरू केला. मग सुमूहुर्त पाहून किल्यात बाईसाहेब राहाण्यास पूर्ववत् गेली. सर्व कामे संस्थानची चालू जाहली. पूरवी काही महिने राज्य नव्हते तरी मनुष्ये काही दर्माहा कमी करून सर्व ठेविली होती. आम्ही दोन तीन दिवसी मोरोपंत तांबे याजकडे भेटीस जात होतो व ढेकरे याजकडेही ~~भेटीस~~ जात होतो. शत्रुक्षय व्हावा, राज्य चांगल्या रीतीने चालावे सबब नवीन अनुष्ठानेही चालू केली होती. श्रीमहालक्ष्मीस रोज नवचंडी सुरू होती. ग्रहाबाो जप व दाने जेव्हाचे तेव्हा देत होते. श्री गणपतीचे देवालयात रोज सहस्र आवर्तनेही सुरू होती.

सरकारात काम्य ग्रहयज्ञ गृह्यपरिशिष्टोक्त करण्याबाो ठराव जाहाला. तो सहस्रपक्ष ठरला, त्याजबाो कुंडमंडप करण्याबाो ही ठराव जाहाला. पुढे जागा शोध करून कुंडे व वेदी वगैरे सर्व तयारी जाहाली. रोज ब्राह्मण होमाकडे शंभर नेमिले होते. अशा ग्रहयज्ञाचे समारंभात ब्राह्मणही मोठे मोठे कासीकर वगैरे बाहेर गांवचे ऋत्विज्य काही नेमिले होते. कुंडमंडप तयार केला होता, त्याचे पश्चमेस छायामंडप विस्तीर्ण घातला होता. मुहूर्ताचा दिवस येताच बोलावण्याचे ब्राह्मण व पदरची मंडळीसुद्धा सर्व लोक जमले असता भैय्या उपासनी पंडित याणी लक्ष्मुंबाईने बाबासाहेबांचे मागे घेतलेला दत्तपुत्र वयानी सुमार अकरा वर्षांचा होता त्याजकडून देवास विडासुपारी ठेऊन पुण्याहवाचनाकरिता ब्राह्मण समाजात पीठावर आणोन बसविला. लक्ष्मुंबाई साहेब समक्ष बसली होती व ते दिवसी मोरोपंत तांबेही तेथे आले होते. मग कर्मास आरंभ जाहाला. प्रथम संकल्प सर्वानुमते लक्ष्मुंबाई नांवानी केला. नंतर नांदीश्राध्धाकाळी मुलाचे पितृगणाचा उच्चार करून करावयास लागले तेव्हा मजला असा विचार पडला की, येथे मोठेमोठे याज्ञिक व पंडित शास्त्री विद्वान् असता मुख्य संकल्प बाईचे नांवाचा. नांदीश्राध्ध भलत्याचे होते. बोलावे तरी कठीण न बोलावे तर आपली समजूत कसी होईल. इत्यादी विचार थोडक्यात केला. तों पहिली आवृत्ति नांदीश्राध्धाची जाहाली आणि त्या सभेत बोलण्यास आरंभ केला. पहा काही विचार केला पाहिजे. तूर्त अनुष्ठान बंद करावे. कारण ब्राह्मण स्त्री वेदाधिकारी नसल्यामुळे पुण्याहवाचनादि कर्मात उपाध्यायादि प्रतिनिधी असतो. म्हणोन त्याचे पितरांचे नांदीश्राध्ध होईल काय ? मुख्य संकल्पी रावसाहेब याणी आपाले नांवाचा उच्चार करून केला असता तर ठीकच होते. परंतु बाईसाहेबांचे नांवाचा संकल्प आहे यास्तव शास्त्रमते त्यांचे नांवाचा नांदीश्राध्धी विचार केला पाहिजे असे आम्हास वाटते. असे भाषण ऐकून भैय्या उपासनी वगैरे विद्वान् मंडळीस ठीक वाटले. परंतु विनायक भटजी बाबा वगैरे याज्ञिकांनी उगाच बोलून तंटा उत्पन्न केला. तेव्हा आम्हास अशाबाो शास्त्राधार विचारता मयूख व हेमाद्रि वगैरे दोन चार पुस्तकांची नांवे घेतली तेव्हा उपासनी याणी लागलीच पुस्तके आणोन सभेत पाहिले. तो नांदीश्राध्ध बाईंचे पितरांचे करावे असे सर्वानुमते ठंरल्यावरून मी दूर बसलो होतो तो मजला जवळ उपासनी बाबांनी बलावून पुढे नांदीश्राध्धास बाईंचा उंह कसा आणावा असे विचारिता ग्रहयज्ञ विधाइन्याः मातृपिता इत्यादि करावा असे आम्हास वाटते. असे सांगताच त्याणीही कबूल करून कर्म सुरू केले. पुढे वर्ण देते

समई सादस्याचा वर्ण मजला दिल्हा आणि पुस्तक आंगावर टाकिले. तुम्ही हे पुस्तक घेऊन चालवावे. असे जाहाल्यावर लागलीच चालवावयास लागलो. ते अनुष्ठान तीन दिवस होऊन, चवथे दिवसी पूर्णाहुती करून समाप्त केले. रोज अनुष्ठान संमधे ब्राह्मणभोजन शंभरपासून सवाशेपर्यंत होत होते. सेवटचे दिवसी मुक्तद्वार करून श्रीखंड, पुऱ्या व लाडू असी पक्वान्ने करून ब्राह्मण भोजनही केले. मजला येक धोत्र जोडा बारा रुो किंमतीचा व पागोटे दाहा रुपयेपासून पंधरापर्यंत असे बक्षीस दिल्हे. बाईसाहेबांची व काकांची ओळख पटून बरीच बोलणी जाहाली. त्यात बाईंनी असेही बोलून दाखविले की, तुमचा मुलगा चांगला विद्वान आहे. त्यास या संस्थानात नेहमी आश्रयानी राहातील तर बरेच होईल. त्याजवर काकानी उत्तर दिल्हे, की त्याकरीताच आम्ही त्याजला घेऊन सरकारचे भेटीस आलो आहे. याप्रो बोलणी होऊन अनुष्ठान समाप्त करून बिराडी मांडवगणे याजकडे आलो. राज्यमंडळाचे लोक जमा होऊन असे ठरले की, चांगले ब्राह्मण नेमून श्री देवीप्रीत्यर्थ सप्तशती सपल्लव लावून शतचंडीचे अनुष्ठान ब्राह्मणद्वारा सुरू करावे. असे जाहाल्यावर शास्त्रीबाबा वगैरे मोठी मोठी मंडळी जमा झाली. त्यात मजलाही बलावणे जाहाले होते. मीही तेथे गेलो होतो. पल्लव कोणते मंत्राचा लावावा वगैरे अनुष्ठान तयार जाहाले व ब्राह्मणांचीही योजना जाहाली व मुहूर्तही नेमिला.

नेमले दिवशी सकाळी सर्व मंडळी मोठी मोठी जमा होऊन किल्यात मोठी जागा पाहून घटस्थापना करून चवदा ब्राह्मण बसविले होते. 'त्यातच काही ब्राह्मण मूळमंत्र जपाकडे नेमिले होते. दर ब्राह्मणास तूप घालून समई लाविलेली व येक अगरबत्ती व सुवासिक पुष्पे याप्रो तजवीज ठेऊन अनुष्ठान सुरू केले. अनुष्ठानचे ब्राह्मणांस निराळा बेत करून क्षिप्रा भोजन रोज नेम ठेविला होता. सायंकाळी फराळाबाो बेत चांगला ठेविला होता. लालूभाऊ ढेकरे उपाध्ये याणी सर्व अनुष्ठानावर नजर ठेवावी व रोजचे रोज सकाळी स्वता जाऊन बंदोबस्त आहे किंवा कसे हे पाहात होते. पुढे मार्गशीर्ष शु ।। ५ रोजी रा. रा. श्री मोरोपंत तांबे व बाईसाहेब किल्यात असता आम्हास बलावणे जाहाले. आम्हीही उभयता किल्यात गेलो. तेथे बाईसाहेबांनी समक्ष असे सांगितले की तुम्ही उभयता शहराचे वाड्यात आपले बिराड घेऊन आज सायंकाळी यावे म्हणजे तेथे कारकून तुम्हास चीजवस्तु ठेवण्याबाो बंदोबस्ताची जागा पाहून देईल. आणि आपण उभयता सरकारचे आश्रित होऊन राहावे. तूर्त आपल्यास तीस रुपये महिना

मिळेल आणि आपण स्वस्थ येथेच असावे. असा हुकूम होताच आम्ही निरोप घेऊन मांडवगणे यांस म||र जाहलेला कळवून त्याच दिवसी सायंकाळी बिराड सरकारवाड्यात घेऊन गेलो. तेथे जाताच सर्व प्रकारचा बंदोबस्त कारकून याणी लावून देऊन सर्व माहिती करून दिल्ही. मग आम्ही आश्रित ठरल्यावर सर्वांसी स्नेह विशेष होऊन चांगल्ये योग्यतेस आलो आणि आनंदानी तेथेच राहिलो.

## दानशूर लक्ष्मीबाई

पुढे थोडेच दिवसांनी हवा बिघडून पर्जन्यही बराच पडला. त्यायोगाने थंडी बहुत पडू लागली. तेव्हा शहरचे भिकार लोक जमा होऊन थंडीकरता वस्त्रे बाईसाहेबाजवळ मागावी असा विचार केला. तो येके दिवसी सायंकाळी श्री महालक्ष्मीस स्वारी गेली होती इतक्या संधीत हजार बारासे भिकारी जमा होऊन शहरचे दक्षण दरवाज्यापासून उभे राहिले होते तो स्वारी परत आली तेव्हा भिकारी लोकांनी येकदम गलका केला. तेव्हा बाईसाहेबांनी असे विचारिले की या जाग्यावर हे लोक कशाकरिता जमले आहेत? ते समई राजमान्य लक्ष्मणराव दिवाणजी याणी असे विदित केले की, महाराज हे लोक गरिब भिकारी आहेत आणि थंडी फार पडत आहे यास्तव यांस काही पांघरुण,।बाो चा विचार व्हावा असे या लोकांचे म्हणणे आहे. त्याजवर बाईसाहेबांनी असा हुकूम दिल्हा की, आपले शहरांत गरिबगुरीब भिकारी असतील त्यांस प्रत्येक मनुष्यास रूदार टोपी येक व अंगात घालण्याकरिता बंडी येक व येकेक काळी किंवा पांढरी घोंगडी द्यावी, आणि आजपासून चवथे दिवसी भिकारी लोकांचा रमणा करून वाटावी. असा हुकूम देऊन स्वारी किल्यात गेली. नंतर दुसरे दिवसी शहरचे दरजी म्हणजे सिंपी बलावून टोप्या व बंड्या सिवण्यास आरंभ केला. नंतर नेमले दिवसी दवंडी पिटून नेमले जाग्यावर भिकारी लोक जमा होऊन येकेकास अंगात घालण्याकरिता बंडी रुईदार व टोपी येक व घोंगडी याप्राो भिकारी लोकांस त्यातच बायका पोरे वगैरे होती त्यासमेत सर्वांस वाटून वस्त्रे दिल्ही. त्यांत सामान्य गरीब लोकही शिरले होते. येकंदर चार सवाचार हजार लोक जमले होते.

## बाईसाहेबांची दिनचर्या

बाईसाहेबांस खर्चाबाो मनास क्षित मुळीच नव्हती. दोन गुध वर्णनीय होते.

शूर आणि औदार्य या गुणास मोल नाही. किल्यांत व खालचे वाड्यात जेवणाचा वगैरे बेत चांगला ठेविला होता. बाईसाहेबांस असे वाटत होते की आपले पदरची मंडळी सुखी असावी. वस्त्रे प्रावर्णे चांगली असावी. बाईसाहेबांस लिहिता चांगले येत होते. स्वता मजकूर जुळून हुकूम लिहीत असत. बहुधा पुरुषाचा पोशाग करून असत. पायांत पायजमा, अंगात जांभळे रंगाचा आंबव्याचा बन्यान किंवा बंडी असे. डोकीस टोपी घालून पागोट्यासारखी बत्ती बांधलेली असे. कंबरेस काच्या किंवा दुपेटा असून तरवार नेहमी जवळ असे. नवरा स्वर्गवासी जाहल्या दिवसापासून नथ वगैरे अलंकार घालीत नसे. फक्त हातांत सोन्याच्या बांगड्या दोनदोन व येकेक गोट असे. गळ्यांत मोत्यांचे पेंडे मात्र असे, हातांत हिरकणी लावलेली अंगठी घातली असे. वेणी न घालता बुचडा नेहमीच बांधलेला असे. याखेरीज काही येक दागदागिना आम्ही कधीच आंगावर पाहिलेला नाही. सकाळी प्राप्तःकाळी स्नान झाले म्हणजे चंदेरी पांढरे पातळ नेसून, पांढरी चोळी घालून माडीवर देवपूजेचे जाग्यावर येऊन आसनारूढ होऊन भस्म धारण करून तेथेच रुप्याचे वृंदावनांत तुळस असे आणि पुष्पे वगैरे पूजेबाो सर्व तयारी लागून असे. प्रथम आचमन करून तीन कृच्छ्रे म्हणजे तीन रुपये ब्राह्मणांस देऊन तुळसीची पूजा करून श्री पार्थिव लिंग पूजेस आरंभ होत असे. गवई गात असता पुराणही त्यातच सुरू असे व सरदार व आश्रित वगैरे लोकांचे मुजरेही चालत असत. येकंदर दीडसे लोकांचे मुजरे घेणे असत. परंतु येखादा कोणी काही कामामुळे न आल्यास दुसरे दिवसी लागलीच त्या गृहस्तास असे विचारीत की, काल आपण का आला नव्हता ? असे धोरण होते. याप्राो प्रतिदिवसी चालून दोन प्रहरून कचेरीचे जाग्यावर येऊन बसावे. ती जागा मोठा दिवाणखाना असून त्यास येक खोली सारखी पडत पोशीची जागा होती. त्या दरवाज्यास बाहेरून मेहरब होती. दरवाज्यास आतले बाजूस मोठी गादी घालून सरपोस घातलेल्या जाग्यावर लोडासी बाईसाहेबांनी बसावे. कधी पुरुष वेष असवा, कधी स्त्रीवेष असे. दिवाणखान्यांत बाहेरचे बाजूस दरवाज्यानजीक भालदार रुप्याचे काठीचा असे. समोर रा. श्री. लक्ष्मुमणराव दिवाणजी कंबर बांधून कागदांचें पुडकें हातात घेऊन उभा असे. बाकी कारकून हुजुरात पाच सात असत. अशा थाटाने सर्व कामे फौजदारी दिवाणी मुलखी चालत असत: बाईसाहेबांस शरीराचा शोक फार होता. पहाटेस उठोन मलखांबासी जाऊन दोन घटका कसरत करून, नंतर घोडा मंडळावर धरून लागलीच हत्तीवर बसून हत्तीस फेरफटका करून चार घटका

दिवसास खुराकाचे खाणे व दूध पिणे करून मग स्नान होत असे. स्नानशाळेत स्नानास पाणी सात आठ हंडे लागत होते. स्वतंत्रता जरी होती तरी बाईने गहिर शिस्त आचरण केले नाही. शरीराचे शोकामुळे गहिरवाजवी वागणूस नसे हे खरे आहे. तिसरे प्रहरी कोणाकडील भेटी वगैरे आलेल्या असतील त्यांची वानगी घेऊन मग दरबारास बसत असत. शुक्रवार-मंगळवारी स्वारी सर्व तयार करून सर्व आश्रित सुा़ो श्री महालक्ष्मीस जात असत.

येथे लढाई होणार सबब लढाईची संमधे सर्व तयारी लागली होती. दारू नवीन कर्ण्याकडे लालू बक्षी यास नेमिले होते व पलटणी लोक जमतील तितके चाकरीस ठेवीत होते. कालपी वगैरे ठिकाणच्या बातम्या नेहमी लागत होत्या. झासी हे शहर बुंदेलखंडात आहे. बुंदेलखंडाचे पाणी पुरुषास चांगले नाही. तेथे षंढ निपजतात. सेकडा पंचवीस षंढ समजले पाहिजे. असे लोक आढळले की, येखादा पुरुष स्त्रीचे मनात भोगावा असे आल्यास तिणे आपले नवऱ्यास सांगोन त्या पुरुषापासी त्याणे स्नेह करून त्या पुरुषास आपले घरी नेऊन पानसुपारी देऊन त्याजपासी स्नेह वृद्धिंगत करून मग येके दिवसी आपण काही कामाकरिता येकटेच जावे आणि त्याचे स्त्रीने त्या परुषाबराबर क्रीड॰ वगैरे करावी असा प्रकारही जागोजाग आढळला. झासीत कुंटणी बायकांच्या जागोजाग जागा आहेत. तेथे संध्याकाळी सूर्यास्ताचे संधीत कितिक लोकांच्या स्त्रिया कुंटिणीकडे जाऊन परपरषाचा उपभोग रोज घेणाऱ्या बहुत आढळल्या. याजवरून या शहरांत सिंदळकीचा फारसा विधिनिशेध नाही. येके दिवसी भैया उपासनी पंडित व वैद्य बाबा व अनंत भटजी वगैरे वृद्ध चांगले प्रामाणिक मंडळी बसली असता येथे भैया उपासनी पंडित याणी जुनी गोष्ट झासीत घडली ती सांगितली. ती गोष्ट मी आपले स्मरणबुकात लिहून ठेवली होती ती या इतिहासात सामील करितो.

## नारायण शास्त्रीबाबांची गोष्ट

पूरवी थोरले माधवराव साहेब पेशवे यांचे कारकीर्दीत झासीस पारोळकर सुभेदार असता त्याचे पदरी कोणी नारायण शास्त्रीबाबा हे धर्मशास्त्र वगैरे सांगण्याकरिता शंभर रुपये दरमहा देऊन पदरी ठेविले असता, कोणी येक दिवसी शौचकूपांतून बाहेर शास्त्रीबाबा येतात तो तेथे आपले मातोश्री बराबर भंगिणीची मुलगी वयानी तेरा चवदा वर्षाची होती. तिजला पाहून या शास्त्रीबाबांचे मनांत असे आले की, ही बहुधा पद्मीण जातीची कन्या असावी. शास्त्रीबाबा शृंगार

शास्त्रात पुरे होते. ते समई त्या मुलीची लक्षणा पाहण्याकरिता येकीकडे बलावून आणोन पाहिली व सर्व अंगास कमलाप्रो सुवास आहे हेंही लक्षण मनांत आणोन तिजला प्रथम दिवसी चार आणे पर्यंत खर्च करून खाऊ दिल्हा आणि तिजला असे सांगितले की, तूं रोज या वेळेस येथे येत असावे. बहुत चांगले आहे असे म्हणोन ती मातोश्रीबराबर निघोन गेली. याप्रो रोज तिजबराबर शास्त्रीबाबांनी स्नेह ठेवून तिजला खाऊ व अपूर्व फले वगैरे देतादेता तिचे मातोश्रीस येक दिवसी असे सांगितले की, या तुझे कन्येचा बाप तर मरण पावला आहे. आता या मुलीचे लग्न तूं करणार परंतु आम्ही तुजला असे सांगतो की, या कन्येचे लग्न तूं करू नको. कारण मी इजला आपले बायकोप्रो बाळगीन. खाणेपिणे वस्त्र-प्रावर्ण व द्रव्य यास कधीही तोटा पडणार नाही व तुजलाही अन्नवस्त्र चांगल्या रीतीने देईल. परंतु तूर्त ही गोष्ट कोणापाशी सांगू नये असा प्रकार बोलण्याबोचा करुन त्या मुलीस येक साडी दिल्ही व येक चोलीही दिल्ही व तिचे आईपासी तूर्त खर्चाकरता रुो काही दिल्हे. याजवरून ती भंगिणीची कन्या रोज बारा घटका रात्री चोर वाटेने वाड्यात येऊन सोप्याचे माडीवर खोलीत शास्त्रीबाबा जेथे असत तेथे तिणे यावे. येथे दुसरे कोणी मनुष्य मुळीच नाही मग त्या पद्मिनीने पैठणी नेसून जरीकाठी चोली घालून दागदागिने चढवून शास्त्रीबाबाबराबर क्रीडामैथुनादि कृत्ये करून पहाटची चार घटका रात्र राहिली म्हणजे पुन्हा आपली वस्त्रे नेसून दागिने उतरून घरी जावे याप्रो प्रतिदिवसी होऊ लागले. शास्त्रीबाबाचे बायकोस शास्त्रीबाबाबो फार संशय प्राप्त जाहाला. कारण साहा महिने जाहाले मजबराबर मैथुनादि कृत्ये करीत नाही असी यांची रीत नव्हती. फारतर आठ दिवस जात असत. तेव्हाही बाहेरचा नाद थोडा थोडा होता. परंतु हाली याणी कोणीतरी नेहमीची रांड ठेविली आहे. तिचा नाद फार लागला आहे. हे मनांत आणोन येक दिवस जागरण करीत माडीखाली चोरून बायको बसली, तों ही पद्मीण रात्रौ तेथे आली. तिजला बायकोनी पाहिली. तरी काही न बोलता तसीच माडीवर जाऊ दिल्ही. नंतर थोड्या आवकाशे ती बायको माडीवर जाऊन खोलीपासी उभी राहून आतील हास्यविनोद वगैरे काही काही गोष्टी ऐकू आल्या त्या ऐकून तिजला फार राग येऊन दरवाज्यावर हात मारून दरवाजा उघडा म्हणोन हाका मारू लागली. ये समई शास्त्रीबाबानी तिजला रागे भरून सांगितले की, तूं या नादात पडू नये. आम्ही दार उघडीत नाही. तेव्हा बायकोनी असे भाषण केले की, तुम्ही आजपर्यंत बहुत ठिकाणी हे कर्म केले. परंतु हाली पहा

साहा महिने भेटीस जाहाले. फक्त आम्ही अन्नवस्त्र घेऊन प्रापंच्यांत राहावे की काय ? मी तरणी नाही काय ? हे ऐकून शास्त्रीबाबांनी उत्तर केले की, तुजला येक मुलगा दोन वर्षांचा आहे. मी तुझे रिणांतून मुक्त आहे. या उप्पर तुजसी मी येकांत करण्यास खुसी नाही. तूं स्वस्थ निजावे, नाही पेक्षा आताच मारझोड करून घालवून देईन. असे सांगोन फार रागा भरले. त्याजवरून तिचा निर्उपाय जाहाला. परत येऊन जिन्याखाली बसली. पुढे नित्यक्रमाप्रो तेथील कृत्य होऊन ती पद्मीण पहाटेस उठोन गेली. त्या बायकोने विचार केला की आज दोन महिन्यावर भंगिणीची पोर उमेदवार इजबराबर पाचचारदा आनंदाच्या गोष्टी सांगताना हे आढळले होते व तिजला सिमग्याबाो गाठीही दिल्ही असे सेजारचे मुलांनी मजला सांगितले होते, इत्यादी विचार करता बायकोचे मनानी भंगिणीची मुलगी ही असावी असा विचार आला. पुढे त्या बायकोने ओळखण्याकरिता नेहमी नजर ठेविली होती. तों येके दिवशी दोन प्रहरी घरांतील मनुष्ये सर्व प्रयोजनाकडे जेवणास गेली होती त्याच दिवसी दोन प्रहरी ती भंगिणीची मुलगी माडीवर दिवाणखान्यांत येऊन शास्त्रीबाबाबराबर क्रीडा करून घरी जाण्याचे विचारे जिना उतरत आहे तों शास्त्रीबाबाची बायको सहज घरी आली होती तिचे दृष्टीस पडली. तिजला पाहून आपले कपालास हात लावून सिव सिव सिव असे म्हणोन फार दुःखित जाहाली आणि आपले मैत्रिणीजवळ तिजला शपथ घालून सर्व म ।। र निवेदन करून प्रारब्धावर भरवसा ठेऊन ती बायको उगाच राहिली. परंतु थोडी थोडी ही बातमी शहरात पसार जाहाली. नंतर काही उमेदवार लोक त्या पद्मिणीचे नादास लागले. तेव्हा त्या पद्मिणीने शास्त्रीबाबास विचारले की, या गावचे ब्राह्मण पाचचार माझे नादी आहेत त्यास काय सांगावे. त्याजवरून शास्त्रीबाबांनी तिजला असे सांगितले की, तुजला तर द्रव्याची इच्छा नाही. त्यापेक्षा त्यांस असे कळवावे की, मजला द्रव्य किंवा कोणतीही वस्तूची गरज नाही, परंतु तुम्ही आपले गळ्यांतील येक यज्ञोपवीत मजला येक वेळचे द्यावे म्हणजे मी येक वार तुम्हाबराबर येकांती येईन. असे शास्त्रीबाबांनी सांगताच फार उत्तम आहे, ती यज्ञोपवीते येके मडक्यांत घालून ठेवीत जाईन, याप्रो ठरलेला मजकूर नादी ब्राह्मणांस त्या पद्मिणीने कळविला. ब्राह्मणांनी विचार केला की, ही गोष्ट बरीच आहे. द्रव्य खर्च न होता येक यज्ञोपवीतावर खुसी आहे हे मनात आणोन यज्ञोपवीते देऊन ब्राह्मण चोरून पद्मिणीजवळ जाण्यास लागले. तिचा मात्र नियम होता त्याप्रो प्रथम यज्ञोपवीत

घेऊन मग आलेल्या ब्राह्मणास पानसुपारी द्यावी व त्याजबराबर क्रीडाही करावी. याप्रो दोन वर्ष हे कृत्य शहरात चालू होते. पुढे ही बातमी बायकांकडून सरकारात कळले की, आपले आश्रित नारायणशास्त्री भंगिणीची मुलगी पद्मीण असल्यामुळे रांड ठेविली आहे व तिचे नादानी हजारो रुपये खराबा करीत आहेत. शास्त्रीबाबांनी आपले बायकोची गरज ठेविली नाही, सबब ती नेहमी हका मारीत असत्ये असी बारीक बातमी लागली. तेव्हा सरकाराने बारकाईने शोधास आरंभ केला तों, मोठी मोठी मंडळीस ही बातमी लागली होती त्यांणीही सरकारास असेच कळविले. शहरांत बायकापुरुषांस हा मजकूर समजलेला आहे. पुढें या गोष्टीर्चा विचार कसा करावा ? मग शहरचा फौजदार म्हणजे कोतवाल याणी जाऊन रात्रौ घराचा बंदोबस्त करून लोकानी आत जाऊन उभयतांस धरून कैद करावी असे ठरल्यावर दुसरे दिवसी कोतवालास हे काम सांगितले. त्याणे मध्यरात्री बहुत लोक बराबर घेऊन जाऊन घराचे दरवाजे धरले आणि द्वारे उघडऊन माडीवर जिन्यानी कारकून सिपाई जाऊन दिवाणखान्याचे खोलीचे दरवाज्यावर धकी मारून शास्त्रीबाबास हाका मारू लागले. शास्त्रीबाबा जागृत होऊन विचार न करता दरवाजा उघडला, तों ती पद्मीण शयेवर आहे हे सर्वांनी पाहून लागलीच शास्त्रीबाबांस कोतवालाने कैद केले व त्या भंगिणीसही कैद केले, आणि उभयतांस बाजारनाक्यावरचे चौकीवर नेऊन ठेविली. प्रातःकाळी प्रहर दिवसास सरकारवाड्यात कचेरी भरली आणि तेथे शास्त्री आणिले व तिजलाही आणिली. शास्त्रीबाबास लोक वाईट बोलू लागले, ते समई ती पद्मीण असे बोलिली की, शास्त्रीबाबाकडेच दोष आहे असे नाही. या शहरचे ब्राह्मण मजपासी बहुत आलेले आहेत. राजमंडळपो ही मजकडे लोक आले. मी कोणापासून द्रव्य घेतले नाही. फक्त यज्ञोपवीते मात्र गळ्यांतील घेतली आहेत. सरकारानी माझे घरी बाजेखाली मडके ठेविले आहे ते आणिले म्हणजे सर्व समजण्यांत येईल. असे ती भंगीण बोलताच कोतवाल तिचे घरी जाऊन बाजेखालील मडके सभेसमोर आणिले आणि यज्ञोपवीते मोजून पाहिली तों पावणे दोनशे भरली. सर्वांस आश्चर्य वाटले. ते समई शास्त्रीबाबांनी असे सांगितले की, माझा संसार जाहाला. मजला पुत्र आहे, मी या पद्मिणीस घेऊन देशांतरी आताच जाणार. मजला कृपा करून जाण्याबाो आज्ञा व्हावी. हे सरकारने ऐकून उभयतां जाण्यास हुकूम दिल्हा. नंतर ती व तो उभयतां सर्वांस नमस्कार करून त्याच वेळेस शहराबाहेर गेली. त्या प्रसंगात सर्व शहर प्रायश्चित्ती जाहाले. सरकारास

विचार पडला ही बातमी पुण्यास श्रीमंतास कळली असता काय होईल हे कळत नाही. त्यापेक्षा परग्रामस्त ब्राह्मण आणोन शहर शुद्ध केले पाहिजे. इतका ठराव करून सभाविसर्जन जाहाले. नंतर कारकून व मनुश्ये जालवणास पाठवून तेथून गाड्या वगैरे ब्राह्मणांस बसण्याकरिता करून दाहा ब्राह्मण विद्वान् शास्त्री असे झासीस आणोन शहराबाहेर बागात बंगल्यांत उतरवून परभारे गोठणीवर ते ब्राह्मण जाऊन गोमूत्र गोमय घेऊन पंचगव्य करून सर्व झासीतील दक्षणी ब्राह्मण सर्व बाहेर आणोन प्रत्येकापासून प्रायश्चित संकल्प करून पंचगव्य प्राशनपूर्वक यज्ञोपवीते मंत्रून घातली. लोक सर्व सरकारा सुद्धा शुद्ध जाहाल्यावर पंचगव्याचा हांडा घेऊन शहरात ते दाहा ब्राह्मण येऊन प्रत्येक घर पंचगव्य निक्षेप केला व बायकांमुलांस गोमूत्र गंगा देऊन सर्व शुद्ध केले. नंतर सरकारानी शहरात ग्रहयज्ञ करून ब्राह्मण भोजन मुक्तदार केले. आलेले ब्राह्मणांस सरकारातून बिदागी करून पुन्हा गाड्याघोडी देऊन जालवणास पोचते केले. याप्रो येकवार झासीत घडले आहे.

## झासीवालीची अश्वपरीक्षा

झासीवाली लक्ष्मुंबाई साहेबांस देशोदेशीचे सवदागर चाबुकस्वार घोड्याचे परीक्षेबाो व बसण्याचे गुणाबाो फार वर्णन करीत असत. ते समई हिंदुस्थानात दक्षणी लोकापाो श्रीमंत नानासाहेब पेशवे व जयाजी महाराज सिंदे व झासीवाली लक्ष्मुंबाई या तीन मनुष्यासिवाय घोड्याचे परीक्षेबाो व घोड्यावर बसण्याबाो चवथा मनुष्य नाही, असे सर्व हिंदुस्थानचे लोक म्हणत होते. कोणी येक समई कोणी देशांतरी सवदागीर दोन घोडे घेऊन विकण्याकरिता व परीक्षा पाहाण्याकरिता श्री क्षेत्र उज्जनी येथे रा. रा. श्री. बाबासाहेब आपटे यांजकडे आले. तेही घोड्याचे कामात अतिहुषार, सदरी लिहिलेली तीन मनुष्यांबरोबरीचे बहुतकरून असल्यामुळे सवदा आले. परंतु परीक्षा होऊन घोड्यांची परीक्षा जाहाली नाही. नंतर ते सवदागीर सिंदे सरकाराकडे ग्वाल्हेरीस गेले. तेथेही जयाजी महाराजानी घोड्यावर बसून पाहिले, परंतु परीक्षा जाहाली नाही. सबब ते सवदागीर घोडे घेऊन झासीस आले. तेथें संस्थानात चाबुकस्वार वगैरे होते त्यासही परीक्षा झाली नाही. बाईसाहेबांनी ते घोड्यासाो सवदागीर किल्यात बलावून आपण स्वता घोड्यावर बसली आणि घोडा मंडळावर धरला. अर्धी घटकेने सुमार घोडा दमला व परीक्षाही जाहाली. बाईसाहेबांनी बारासे रुपये देऊं

म्हणोन त्यास सांगितले आणि दुसरे घोड्यावर बसून फेरफटका थोडा वेळ केला त्यात परीक्षा करून किंमत रुो पन्नास सांगितले आणि असे सांगितले कीं घोडा छातीत दुखावला आहे. हे सांगताच सवदागीर यास आनंद जाहाला की, आम्ही या घोड्यास मसाला व खाणेपिणे चांगले ठेऊन तयार राखल्यामुळे छातीतील दरद कोणास समजले नाही आणि या घोड्याची किंमत त्या घोड्याप्रोच लोक करीत होते. आता मात्र परीक्षा बराबर जाहाली. मग बाईसाहेबांनी दोन्ही घोडे किंमती देऊन घेतले व त्या सवदागिरास बक्षीसही दिल्हे.

पुढे फाल्गुन मास आला त्याजबद्दल शहरात बराच खेळ होत असतो व रंगपंचमीचे दिवसी किल्यांत रंग फार करून सर्व दरबारची मंडळी बलावून रगांचा खेळ बहुत जाहाला. नंतर दत्तपुत्र रावसाहेब यांची स्वारी शहरात निघाली. त्या स्वारीबराबर आम्हीही गेलो होतो. जागोजाग मुछदी व दिवाणजी वगैरे मोठेमोठे लोकांकडे पानसुपारीस व रंग खेळून स्वारी सायंकाळी परत किल्यांत आली. बलवसागर म्हणोन लहानसे शहर झासीचे अमलात आहे. तेथे चोरांचा उपद्रव प्रज्येस फार होऊ लागला सबब स्वता बाईसाहेब स्वारी तयार करून चोरांचा बंदोबस्त करण्यास बलवेसागरास गेली. त्या मुलखात पंधरा दिवस होती सर्व चोरांचे ठिकाण लावून काही गुनेगार फासी दिल्हे व काही कैद करून ठेविले आणि स्वारी झासीस परत आली.

## दानशूर बाईसाहेबांचा स्नानविधी

बाईसाहेबांचे नाहाण्याचा समारंभ आठा दाहा रोजी होत असतो. आंगास लावण्याचे सुवासिक पदार्थ बहुत असोन बदाम खसखस वगैरे असोन स्नानशालेत उन्होन पाणी घेण्यास बाई बसल्या म्हणजे नळानी पाणी बाहेर कुंडीत जाते. ते पाणी उष्ण अंगावर घेण्यासारखे असते, सबब गरिबगुरीब लोकांच्या बायका ते सुवासिक पाणी नेऊन आपण नाहात असतात. पाणी नाहाण्यास पंधरा हंड्यापासून वीस हांडेपर्यंत लागते. बाईसाहेबांची दानशूरपणाची तर सिकस्त होती. कोणी कासीकर ब्राह्मण विद्वान वेदशास्त्रसंपन्न भिक्षुकीकरिता झासीस आला. तो वयानी सत्तावीसपासून तीस वर्षांचा होता. तो ब्राह्मण उपाध्येमार्फत किल्यात नित्यदानास गेला. तेथे लालूभाऊ ढेकरे याणी बाईसाहेबांचे समक्ष त्या ब्राह्मणांची स्तुति विद्येविसी व स्वभावविसी बहुत केली आणि घरचे व्यवस्थेत ब्राह्मणाची स्त्री मरण पावली आहे म्हणोन पुन्हा विवाह करावा असे भटजीचे

मनात आहे. परंतु हाली काळ रहिला नाही असे ढेकरे याणी सांगितले व आम्हास संतति नाही सबब घरदार विकून लग्न करावे असे ब्राह्मण बोलताच बाईसाहेबांनी त्यास विचारले की मुलगी रुपये घेऊन देणार कोणी आहे काय ? तेव्हा भटजी बोलिले, महाराज आमचे जातीचा देशस्त ब्राह्मण आहे. त्याची मुलगी वयानी सुमार आकरा बारा वर्षाची सुरूप गोर वर्णाची आहे. रास घटित वगैरे सर्व जमले आहे, परंतु द्रव्य नाही. तेव्हा बाईने विचारले की, कन्येचा बाप रुपये किती घेणार? त्याजवरून ब्राह्मणांनी सांगितले की, रुो चारसे घेणार व आम्हास खर्चास रुो शंभर लागणार मिलोन पांचशे रुो पाहिजेत. असे त्या ब्राह्मणाचे बोलणे ऐकून बाईसाहेबांनी लागलीच हुकूम करून रुो पांचशे तांब्याचे ताम्हनात आणोन ब्राह्मणास विवाहाकरिता त्याचे पदरात टाकिले आणि भटजीस असे सांगितले की, आता परत कासीस जाऊन लग्न करून इकडे आमचे उपाध्यास लग्न जाहाल्याचे कळवावें. ब्राह्मणानी बहुत उत्तम आहे असे सांगोन झासीहून कासीस जाऊन लग्न करून झासीस उपाध्ये याजकडे पत्रही पाठविले. असी बाई दानशूर व रणशूर दुसरी आढळांत येत नाही.

## झासीस नाटक मंडळी

सिंद्याचे लष्करात कोकणची मंडळी नाटकी सुमार येऊन नाटके सुरू जाहाली. ग्वाल्हेरीस नाटके बहुतच जाहाली. शेवटी दोन दोन आण्याचेही तिकीट नाटक पाहण्यास लाविले होते. नाटके फार चांगली करितात म्हणोन लौकिक झासीस गेला, तेव्हा शहरचे मंडळीस आणि सरकार पदरचे मंडळीस असे वाटले की हे नाटक येथे आणावे. परंतु सरकारास विचारून करणे ते करावें. नंतर ढेकरे उपाध्ये याणी बाईसाहेबांचे कानावर मजकूर नाटकाविसी दोन तीनदा गोष्ट काढून घातला. तेव्हा बाईसाहेब असे बोलल्या की, आम्ही त्यांस सूचना न करिता पैसा मिळवण्याचे हेतूने येथे आल्यास नाटक एखादे करू. असे जाहाल्यावर ग्रामस्थपो कोणी पत्र मुख्य नाटकाचा मालक सदोबा म्हणोन होता त्यास लिहिलें आणि नाटकी झासीस येताच सरकारांत वर्दी दिल्ही. नंतर सरकाराकडून सीधा सुरू जाहाल्यावर चवथे दिवसी नाटक शहरचे वाड्याचे चौकांत जाहाले. बाईसाहेब त्या नाटकास येक कलाख येऊन मध्येच स्वारी उठोन गेली आणि ते नाटक जमले नाही. कारण नाटक दक्षणी भाषेत असल्यामुळे रांगडे लोकास समजले नाही. त्याजमुळे लोक फार बोलत होते व नाटक हरिश्चंद्र राजाचे होते. नाटकी याणी सरकारास असे कळवले होते की, या नाटकात येक मडके म्हणजे मातीची घागर

फोडावी लागते. ती आम्ही फोडिली असता सरकारास राग तर येणार नाही ना ? त्याजवरून चौकसी होऊन त्यास मडके फोडण्याबद्दल हुकूम जाहाला होता. पुढे नाटकात हरिश्चंद्र डोंबाचे घरी राहिल्यावर ती घागर बैठकीवर फोडिली. ते समई तेथेच लोक अपशकुन आहे असे कितीक म्हणू लागले. दुसरे नाटक फक्त दक्षणी मात्र आत घेऊन उखा चित्ररेखेचे नाटक सुरू केले. त्या नाटकास बाईसाहेब तीन कलाख बसल्या होत्या. नंतर किल्यात नाटक जाहाले. त्या नाटकापासून बाईसाहेब बसत होत्या. रास क्रीडा वगैरे बाणासूर ही अख्याने लाऊन फक्त पाहाण्यास दरबारची मंडळी मात्र येत असे. असीही काही नाटके जाहाली. नंतर बाईसाहेबांनी दरबारचे मंडळींच्या बायका बोलावून त्यांत पाहाण्यास पुरुष कोणी नाही. किल्यातील मंडळीसुद्धा पाहण्यास येऊ नये असा हुकूम करून पिछाडीचे तिसरे मजल्याचे चौकात बेत करून आपण स्वता समोर बसून नाटक जाहाले. याप्रमाणे येकंदर पंधरा नाटके झासीत जाहाली. सेवटी नाटकवाले लोकांस किल्यात मेजवानी करून सदोबास शालजोडी व काही मंडळीस पागोटी व काही मंडळीस रेसिमकाठी धोत्रजोडे दिल्हे व रोखरुपये चार हजार दिल्हे आणि बिदागी केली.

आम्ही उभयता सरकार हुकुमानी शहरचे वाड्यांत येक महिना राहिलो. नंतर बाईसाहेबांनी मजला हुजूर आश्रित मंडळीत किल्यात नेले. तेव्हापासून आनंदानी किल्यात राहिलो होतो. स्वारी खाली जाऊ लागली म्हणजे शालजोडी अंगावर घेऊन सर्व आश्रित जात असत, त्याप्रमाणे आम्हीही जात होतो. येके दिवसी मजला शालेखेरीज बाईने पाहाताच किल्यांत आल्यावर जरीकाठी हिरवी शाल मजला दिल्ही, माहलक्ष्मीस वाकनीस नेमून चार चार आणे दक्षणेचा ठराव करून सहस्र भोजन सुरू केले होते. पक्वान्न मोतीचूर ठरला होता, प्रतीदिवसी दोनसे ब्राह्मण जेवीत असत. असी सहस्रभोजने चार जाहाली, प्रतीदिवसी सकाळी आकरा वाजता किल्यांतून कोणीतरी पाळीप्रमाणे महालक्ष्मीस जाऊन नंतर उपाध्ये याणी उदक सोडावे. किल्यांतून आलेला आश्रित याणी ठरल्याप्रमाणे भाज्या कोशिंबिरी वगैरे पदार्थांची चौकशी करून मग ओवळे होऊन परत किल्यांत जाऊन येऊन येकट्यानी भोजन करावे. तेथपर्यंत आचारी उपासी राहात असे. असे सहस्र भोजनात जेवण्याबाबत हुकूम नाही. मग कारभारी वाकनीस याणी काही फराळाचे पदार्थ घ्यावे. तेथेच खाऊन किल्यांत यावें

यकंदर बखेडा उत्पन्न जाहल्यापासून दाहा आकरा महिने गोरे लोक हिंदुस्थानात नव्हते. तेव्हा कालपी मुलुख छपन्न लक्षांचा हस्तगत करून तहशील

म्हणजे मामलेदार वगैरे नेमून कामे तमाम चालत होती. नंतर इंग्रज लोकानी विलायतेकडून गोरी पलटणे चहुत मुंबईस आणली व मद्राजी लोक काळ्यापाो पलटणेही बहुत आणिल्या होत्या. या खेरीज पृथ्वीवरचे राजेरजवाडे याजकडून मदत मागविली होती. हायद्राबादच्या निजामाकडून स्वार पाच हजार व काही पायदळ,तसेच सिंदे, होळकर, गायकवाड, घोरपडे वगैरे सरदार लोकांच्या मदती घेतल्या होत्या. मुंबईहून कपतान साहेब गोरेलोकांच्या पलटणी बहुत बराबर घेऊन जनरेली झेंडा लाऊन बंदोबस्त मुलखाचा करीत खानदेशांतून सातपुड्यांत भिल लोकांचा बंदोबस्त करून मोहूचे छावणीत काही दिवस राहून होळकर याचे राज्यात कोठकोठे बखेडा बदमासी लोकांनी केला होता तो मोडून इंदुरास साहेब येऊन पोचला. तेथे काही लोक बिघडले होते, त्यांस धरून फासी दिल्हे व काही कैद करून तुरुंगात ठेविले. झासीपासून पश्चमेस वेत्रवती नदीनजीक बाणपूर म्हणून लहानसी राजधानी आहे. तेथेल राजा बिघडून पळटणी लोकांस आश्रय देऊन दारूगोळा वगैरे नवीन कामे सुरू करून बंड करून राहिला होता. त्याणे असा विचार केला की, येथे शहरावर इंग्रजाची व आपली लढाई होणार त्यापेक्षा शहरचे लोकास येथून दुसरे ठिकाणी जाण्यास हुकूम द्यावा व घरची मुले माणसे काही अर्थ बराबर देऊन झासीस रवाना करावी. असे मनांत येताच रयतेस बोलावून आणोन त्यांस असे कळविले की,येथे जंग होणार, त्यापेक्षा तुम्ही सर्वांनी कोठेतरी ग्रामांतरी जावे येथे राहू नये, आणि आपली मुले व राणी वगैरे बायका मनुष्ये व काही चीचवस्तु व अर्थ बराबर घेऊन झासीस आठ मजलानी निघोन येऊन झासीवाली बाईस भेटून शहरांत स्वतंत्र वाडा घेऊन त्यात सर्व मनुष्ये येऊन कारकून वगैरे बंदोबस्त करून राजा परत बाणपुरास गेला. झासीवाली बाईने बाणपूरचा राजा भाऊ सखा मानिले होते व राजानेही बाईस बहेण पाठीची म्हणविली होती. झासीचे पुढे पश्चमेस राजाचे राज्य आहे. ते राज्य इंग्रज घेईल तेव्हा झासीवर येईल असा विचार होता.

इंदूरचा बंदोबस्त चांगला करून उज्जनी मुलखात कोठेकोठे थोडी थोडी बंडे मोडून पुढे बाणपुरावर इंग्रजी फौज जमा जाहाली. तेथे राजाबराबर युद्ध अहोरात्र सात दिवस होऊन अखेर ते शहर इंग्रज बहादुरानी आपले हस्तगत करून घेतले. शहरांत इंग्रज सरकारचे नांवाची दवंडी पिटून अमल आपला बसविला. प्रथम शहर हस्तगत होताच येक दिवस विज्यन केले. त्यात बहुत पुरुष मरण पावले. राजा काही फौज घेऊन वेत्रवती नदीचे काठी बेहडे म्हणजे मोठ्यामोठ्या खाचा

पडलेल्या असतात त्यात हजारो फौज राही असी जागा अस्त्ये त्यात राजा राहिला होता. इंग्रज सरकारने बाणपूर संस्थानचा बंदोबस्त करून बुंदेलखंडावर स्वारी केली. इकडे झासीस बाणपूरचे संस्थान इंग्रजानी घेतले व राजा जिवंत असता कोठेतरी पळून जाऊन राहिला आहे वगैरे सर्व बातम्या लागल्या व लढाई कोणत्या प्रकारे जाहाली हीही खबर समजली. झासीत अनुष्ठाने वगैरे सर्व जारीने चालली होती व युद्धाचे सरंजाम करीत होते. शहरावर लढाई सुरू जाहाल्या दिवसापासून गरिबगुरिब लोकाकरिता चणेफुटाणे खंडोगणती भाजून ठेविले व श्रीगणपतीचे देवालयात भोजनाचे मुक्तद्वार ठेवण्याबाो विचार ठरताच मनुष्ये तयारीस लागली व सरकारानी आपली सिलक पाहिली तों या खर्चास पुरेल वाटेना. सबब घरांत रुप्याची मोठमोठी पातली व गंगालये व घागरी व तपेली व हांडे व मोठेमोठे डबे चांदीचे होते ते आटून टाकसाळेत नेऊन रुपये पाडवण्याचे काम सुरू केले. तूप व साखर व गहू दळून कणिक तयार ठेवली. इंग्रज सरकारने बुंदेलखंडात लोक काही बिघडले होते त्यांचा बंदोबस्त करून दतियेवाले व ओडसीवाले राजे इंग्रजास मिळालेच होते तेथे तेथे त्यांच्यासी सला करून सर्व लस्कर घेऊन कपतान साहेबाची स्वारी झासीस जाण्याबदलचा नियम करून निघाली.

## बाणपूरचे राजास फितुरीचा सुगावा

बाणपुरचा राजा वेत्रवती नदी काठी असता सहज रस्त्यावर दाहा पाच स्वार बराबर घेऊन जंगलात फिरत असता अकस्मात झासीहून सिंदेसरकारच्या ग्वालेरीस डाक जाणारी आढळली. ती डाक धरून डाकवाले तसेच जिवंत सोडून डाक फोडून प्रत्येक कागद पाहून ते कागद जाळून टाकण्यास आरंभ केला. तो झासीहून बिन नांवाचे पत्र लिहिलेले त्यात मा।र सर्व फितुरी करून झासीचे राज्य घेण्याबाो होता. लखोट्यावर नांव येक सरदाराचे होते. त्याजवरून राजाने विचार असा मनांत आणिला की, झासीस फितूर आहेत याजमुळे हा किल्ला जरी शत्रूस असाध्य आहे तरी घेतील. त्यापेक्षा आपण तेथे जाऊन हा कागद बाईस दाखवून सर्व तयारी युद्धाची केलेली आहे ही घेऊन कालपीस रावसाहेब पेशवे व तात्या टोपी आहे तेथे जाण्याचा विचार करू. असा नियम मनांत आणोन चार स्वार बराबर घेऊन झासीस जाण्याच्या इराद्याने निघाले. तेव्हा सायंकाळचे पांच वाजले होते. तसेच घोडे पिटाळीत अवसीचे बारा घटका रात्रीस झासीचे उत्तर

दरवाज्यासी आले. झासीस जंग होणार सबब शहरचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. दरवाजावरचे पहारेकरी यास हाका मारिल्या आणि मी बाणपूरचा राजा आलो आहे मजला दरवाजा उघडावा त्याजवरून पहारेकरी याणी असे सांगितले की, हुजूर हुकूमा सिवाय कोणी कसाही आला तरी दरवाजा उघडणार नाही, आपण तेथेच असावे. किल्यांतून परवानगी आणितो असे सांगोन पहारेकरी किल्यांत आला. तो आम्ही बैठकीचे जाग्यावर मंडळी बसलो होतो तेथे येऊन कळविताच आम्ही बाईसाहेबांचा शोध करिता स्वारी शंकर किल्यात बंगल्यात आहे असे समजले. मग येक दासीस पाठवून हुकूम आणविला आणि पहारेकरी यास राजास आत घ्यावा असी पर्वांनगी दिल्ही. नंतर पहारेकरी शहरचे दरवाजावर जाऊन राजास आत घेतला. नंतर राजा शहरात वाड्यात बायकामुले होती तेथे जाऊन मुलामनुष्यांस भेटून चार मशाली लावून किल्यात आला, तो बाईसाहेब कचेरीचे दिवाणखान्यांत येऊन बाई बसली होती. तेथे राजा येऊन भेट बाईची जाहाली. राजाने मोठा स्वास सोडून असे सांगितले की, माझा यत्न होता तेवढा केला. परंतु ईश्वरें यश दिल्हे नाही. हाली काही फौज घेऊन वेत्रवती नदीचा आश्रय करून राहिलो आहे. नंतर बाईसाहेबांनी असे कळविले की, हेही राज्य आपलेच आहे. येथेही थोडेच दिवसात लढाई होणार. त्यास आपण येथे राहून येथील काम पाहावे. हा किल्ला हिंदुस्थानात लढाईचे कामात वर्णनीय आहे. आग्रा, झासी, प्रयाग हे किले हाती येण्यास फार कठीण आहेत. ईश्वर तुम्हांस येथेच यश देवो. असे भाषण ऐकताच राजाने फितुराबोचे पत्र पुढे ठेविले. वाचून असे सांगितले की, या पत्राबो कोणास बातमी न सांगता पाचचार दिवसात सर्वसरंजाम व फौज घेऊन काल्पीस श्रीमंत आहेत तेथे जावे हे मजला बरे वाटते. कारण हे पत्र ग्रामस्तपो रयतेने लिहिलेले नव्हे, आपले सरदारपो लिहिलेले असावे. याचा शोध लागावयाचा नाही बभ्रा मात्र होईल. शेवटी फसण्याचा प्रसंग प्राप्त होईल. तेव्हां बाईसाहेब असे बोलली की आजपर्यंत येथे लढाई होणार हा विचार होता. सबब श्रीमंताकडे विशेष व्यवहार ठेविला नाही आणि मी मुलगी कोणाची व सून कोणाची हा विचार न करिता काल्पीस ते सर्व पुरुष मंडळी तेथे मी त्यांस जीव भीतीने शरण गेल्याप्रो जावे हो मजला बरे वाटत नाही. त्यापेक्षा मी आताच सर्व लोकांस व सरदार मंडळीस बलावणे पाठवून येथे सभा करून या पत्राचा विचार करून सर्वांची याजबाो शपथ घेऊन जे कर्णे ते करू. राजाने उत्तर दिल्हे की, या बखेड्यात आपण पडू नये. कारण जो मनुष्य फितुरीबद्दल विचार

करतो तो मनुष्य कबूल होणार नाही. आपण भरवसा ठेऊन राहाणे हे मजला योग्य वाटत नाही. आणि या कामात विश्वास ठेऊन परिणामी माझे भाषणाचे स्मरण होईल. असो. भावी होणार ब्रह्मदेवासही टळत नाही. आम्ही आपली मुलेमाणसे येथून काढून आज नेणार, असे सांगताच बाईसाहेबानी याजवर, उत्तर दिल्हे की, मुलेमाणसे तुम्ही न्यावी. परंतु मी आताच सर्व लोक सरदार मंडळीस बलावणे पाठवून विचार कर्त्ये तेथपर्यंत येथे असावे. मग लागलीच लक्ष्मणराव दिवाणजीस बलावणेप्रो व सर्व नवेजुने सरदार व पलटणीप्रो अप्सर सुभेदार यास बलावण्याविसी आज्ञा जाहाली. आज्ञेप्रो सर्वांस बलावणी होताच सर्व लोक मशाली पेटवून किल्यात येऊ लागले. तेव्हा आम्हीही पूर्वेचे बुरुजावर जाऊन मौज पाहात बसलो होतो. तो तेव्हढे रात्रीस सर्व लोक सरदार किल्यात आपआपोपले इतमामाप्रो येत होते. शहराचे रस्त्यापासून किल्याचे मोठे दरवाजपर्यंत तमाम मशाली पेटल्या होत्या. दिवाणखान्यात सर्व लोक आपआपोपले स्थानी अदमी प्रमाणे बसल्यावर बाईसाहेब आपले जागी येऊन बसल्या. दरवाज्याबाहेर नजीक बाणपूरचा राजा बाईचे समोर बसला होता. दिवाणजी कंबर बांधून बाईसाहेबांसमोर उभे राहिले होते. बाईसाहेबानी येके रुप्याचे ताटात बाण व बेलभंडार असा आणोन ब्राह्मणाकडून मध्येच आणोन ठेविला होता. नंतर राजाने पत्र काढून सभेत वाचून दाखविले. ते समई बाईसाहेबानी असे भाषण केले की, या पत्रावरून आपले राज्यमंडळांत फितूर आहेत. तेव्हा काही मंडळीचे मनात असे आले आहे की, हा सर्व सरंजाम फौज वगैरे घेऊन काल्पीत पेशवे यास मदत जावे. तेथे जे होणे ते होवो, परंतु येथे राहू नये, नंतर लालू बक्षी व दुलाजी सिंग सरदार वगैरे लोक याजवर उत्तर देतात की, झासी हे संस्थान पूर्वापार आहे व हा किलाही बाका लढण्यास आहे. हा टाकून घाईचे वेळेस पेशवे यास शरण जाणे हे आम्हास ठीक वाटत नाही. आता या सर्व लोकात आम्ही जे बोलणे बोलतो याजवर सर्वांनी लक्ष देऊन कर्णे ते करावे. जरी येखादे सरदाराचे मनात कपट येऊन फितुरीबो विचार केला असेल तर त्यास अभय आहे. या समयी त्याणे कबूल होऊन सर्वांची मने निःसंशय करून या घटकेपासून माझे चित्त फितुराकडे नाही, याजबो शपथ घ्यावी. म्हणजे या गोष्टीबो सर्वांचे मनात संशय राहणार नाही. ते समई दिवाणजीनी असे भाषण केले की, या समुदायास कबूल होणे फार कठीण आहे. परंतु जर करिता हे काम कोणी केले असल्यास त्याणे या समई विचार करावा की, आपले हित होत

आहे, त्यात सर्वांचे नुकसान होऊन जीवघात होतात तर तो मार्ग सोडून शपथ दिव्य करावे, म्हणजे सर्वांची मने निष्कपट होतील. आता हे पत्र शहरचे रयतेस लिहिण्याचे कारण नाही. सरदारापाो खचित आहे. ते सर्व सरदार या सभेस आहेत, असा माझा अभिप्राय आहे, असे बोलून सर्व लोक स्वस्थ राहिले. ते समई बाईही भाषण करती जाहाली की, मी बायको मनुष्य, तशात विधवा पूर्व वयस्कर आणि मी सून कोणाची हाही विचार मनात आणिला पाहिजे. या समई आपण येथून निघोन काल्पीस त्या पुरुष मंडळीत शरणासारखे जाणे त्यापेक्षा येथे काही होवो. आता पेशवे आमचे यजमान आहेत तर त्याजकडे मनुष्य पाठवून लढण्याचे कामात त्याणी येऊन मदत करून इंग्रजाचा मोड करावा असे त्यास कळविण्याचे आहे. येथे जंग सुरू जाहल्यावर त्याणी युद्धास स्वतंत्रपणे यावे असे मात्र केले पाहिजे ही तजवीज दिवाणजीनी ठेवावी. तूर्त या प्रसंगी जरी कोणाचे मनात कपट असेल तरी त्याणी ते दूर करून निष्कपट होऊन या सिवबाणावर हात ठेवून बेलभंडारास स्पर्श करावा. असे बाईसाहेबांचे बोलणे ऐकून तमाम नवे व जुने सरदार उठोन पूरवी सभेत ठेविलेले ताटास हात लावून शपथ घेऊन आपआपोपले जागी परत गेले. ते समई तुलाजी सिंगही येऊन बाईचे समोर हातात ताट घेऊन शपथ करून जाग्यावर जाऊन बसला. मग सर्वांची मने शुद्ध होऊन आनंदानी पानसुपारी वाटून गुलाबपाणी अत्तर देऊन सभा विसर्जन जाहाले. बाणापूरचे राजाने त्याच रात्री आपली मुले माणसे व खजिना घेऊन बाईसाहेबांस नमस्कार करून वेत्रवती नदी नजीक आपले गोटात निघोन गेला.

## झासीवर चाल

साहेबानी बुंदेल खंडाचा बंदोबस्त करून थोडी फौज बराबर घेऊन झासीपाशी शहराचे पश्चमेस दीड कोशावर येऊन डेरे दिल्हे आणि स्वारा बराबर पत्र बाईसाहेबास दिल्हे. ते पत्र घेऊन स्वार झासीत येऊन पत्र दिवाणजीस दिल्हे. दिवाणजीनी पत्र पाहून त्यास निरोप देऊन पत्र किल्यात आणिले. नंतर पाच चार मोठमोठे मुछदी व बाईसाहेब येकत्र होऊन पत्राबाो विचार करू लागले. पत्री म ।। र की खुद्द बाईसाहेबांनी मजला येऊन भेटावे. बराबर लक्ष्मणराव दिवाणजी व लालूबक्षी व मोरोपंत बाबा तांबे वगैरे आठ आसामी लिहिले होते. या खेरीज शिवबंदीचे लोक किंवा कोणी बराबर आणू नये. बंदुक किंवा कोणतेही हतेर बराबर नसावे. या भेटीस मुदत दोन तारखांची होती. मुदती पलीकडे येऊ नये,

लढाईची तयारी मात्र ठेवावी. असा सर्व अभिप्राय लक्षात आणोन साहेबास पत्रोत्तर दिल्हे. त्यात म ।। र संस्थानचे चालीप्राो हतेरबंद लोक स्वारी बराबर यावयाचे ते येतील व मी बायको मनुष्य सबब माझे येणे होणार नाही. दिवाणजी वगैरे भेटीस येतील. हे संस्थान व काही दुसरा मुलुख मेहरबान गारदन साहेब याणी आमचे ताबीत दिल्हा. त्या संमधे दप्तरही स्वाधीन केले. सबब मुलखाचे बंदोबस्ताकरिता थोडीबहुत फौज ठेवावी लागली व नवीन दारूगोळाही करावा लागला. काही पाच चार तोफाही नव्या केल्या. सरकाराबराबर आम्ही लढाई करणार हे आमचे संस्थान लोकांचे मनात सुद्धा नाही. आपल्यास कोणी काय समजाविले असेल ते असो. इत्यादी म ।। र लिहून बाईसाहेबांची सई होऊन तो लकोटा स्वाराजवळ देऊन पाच स्वार लागलीच साहेबांचे गोटात पाठविले. ते जाऊन पत्र देऊन परत आले. नंतर इंग्रजांनी ते पत्र वाचून लागलीच कुच करून परत दतियाचे राज्यांत गेला व चोहीकडे झासीचा मजकूर कळवून अमुक तारखेस सर्वांनी झासीवर लढाईस यावे असी पत्रे रवाना केली. दंगाईचे मुलुखाकडे म्हणजे कालपीचे दक्षिणेस सुमार पंचवीस कोशावर येक दोन सरदार बराबर देऊन साहेबानी कपतन साहेबाची रवानगी तिकडे केली. कारण कालपीस पेशवे तात्या टोपी आहेत, त्याजबराबर युद्ध सुरू ठेवावे म्हणजे ते झासीवाली बाईस मदत येणार नाही, तेथेच गुंतून राहातील. इकडे बाईसाहेबांनी चांगला मनुष्य त्याजबराबर पाच स्वार बराबर देऊन कालपीस रावसाहेबांकडे रवाना केले. ते लोक कालपीस जाऊन श्रीमंतांस भेटून झासीतील सर्व म ।। र कळवून त्यांस असे कळविले की, आपले भरवशावर लढाई करणार त्यास आपण बाहेरून येऊन इंग्रजाबराबर लढावे, आम्हीही लढत आहो म्हणजे आपल्यास जय येईल. नंतर रावसाहेबांनी सर्व कबूल केले. दोन दिवस तेथे राहून ते लोक झासीस परत आले. इंग्रज सरकारने झासीचे भोवतालची सर्व गांवोगांव जाहीरनामे लावून लोकास असे कळविले की, झासीस जंग होणार ते शहर लढणार, त्यापेक्षा इंग्रजबहादुरानी झासी शहर घेताच येथे तीन दिवस बिज्यन होईल. त्याचा नियम असा ठरला आहे की, पाच वर्षांनंतर ऐसी वर्षांचे आत पुरुष शोधून ठार मारणार, यास्तव तेथे कोणी जंगाचे दिवसात जाऊ नये वगैरे मजकूर लिहून सर्वांस कळविले. या नंतर चैत्रमास आला. तेव्हा बाईसाहेबानी हलद कुकुम कर्ण्याबाो विचार केला. त्याबाो सुमारे हरभरे वीस मणाचे खंडीप्राो चार खंडी हरभरे लहानसा हौद भरून त्यात पाणी घालून भरून ठेविला आणि शुक्रवारी सकाळी

तमाम सर्व लोकांकडे सुवासिणी स्त्रियांस बलावणे केले. ब्राह्मण आदि करून मराठे सरदार वगैरे यांच्याही स्त्रियांस बलावणे करून हलद कुकुम व फळे खिरापत व दाणे पानसुपारी गुलाब अत्तर देऊन मोठा समारंभ केला होता. इंग्रज सरकाराबराबर वाकडे पडले, तेव्हा आता थोडेच दिवसात फार लढाई होईल, हे मनांत झासीतील मारवाडी वगैरे सावकारानी काही रयतेनेही मनांत आणोन बायकामुले व अर्थ ग्वाल्हरीस पोचविला. आपण घराचे बंदोबस्ताकरिता सडे राहिले. तो वैशाख मास प्राप्त जाहाला. इंग्रज सरकारने झासीवर जंग करण्याकरिता पत्रे पाठविली होती. त्याप्राो सर्व लोक लढाऊ झासीस हजर जाहाले. प्रथम झासीशहरचे दक्षणेस चार पलटणा घेऊन साहेब आला आणि झासीचे किल्यापासून बराच दूर मैदान पाहून तंबू मारून राहिला. त्या दिवशी सायंकाळी आम्ही किल्याचे बुरजावरून पाहू लागलो, तो हजारो तंबू लहानमोठे टाकिले आहेत, आणि जागोजाग अग्नि पेटविला आहे. परंतु तंबू व अग्नि पेटविल्याप्राो मनुष्य भरणा कमी आहे असे समजले. दुसरे दिवसी बातमीदारांनीही असेच कळविले की, सरंजामापेक्षा मनुष्ये कमी आहेत. तो शहराचे उत्तरेस व पूर्वेस व पश्चमेस चोहीकडे किल्यावरून पांढर दिसू लागली. मनुष्यही फार जमले. येकंदर इंग्रज सरकारचे लढवाईक लोक सुमार साठ हजार व्हावे व बाजारबुणगे तीस पसतीस हजार असावे. झासीचे भोवताली सर्व लोकानी वेढा घातला. नंतर दुसरे दिवसी मोरच्ये बांधावे या हेतूने स्वार इंग्रजांचे दाहा पंधरापर्यंत दवडत दवडत जवळ येऊ लागले. तेव्हा बाईसाहेबांनी सर्व तयारी युद्धाची करून मोरच्यावर तोफा ठेवून गोलंदाज उभे राहिले. सर्व किल्यातील बुरुजावर तोफा रोखून ठेविल्या व शहरचेही तटावर जंग्याजंग्यातून कडामिनी घेऊन सिपाई लोक उभे होते व बुरुजावर तोफा मोरच्यावर ठेवून गोलंदाज उभे राहिले होते. तो इंग्रजाकडील स्वार किल्याचे पश्चमेस येऊन नजीक पोहोचले, असे पाहून बाईसाहेबांचा हुकुम घेऊन गोलंदाजानी बत्ती तोफेस दिल्ही. त्या योगानी सरकारचे स्वार पाच चार मरण पावले. याप्राो चारी बाजूनी तोफा सुरू करून इंग्रज सरकारचे फौजेचा नाश फार होऊ लागला. इंग्रजास मोरचे बांधून गोला लागू होईनासा जाहाला. प्रथम तोफेस बत्ती बाईने दिल्ही तेव्हा सायंकाळचा प्रहर दिवस होता. तेव्हापासून इंग्रज मोरच्या बांधण्याकरिता चारी बाजूनी झटत होता, परंतु मोरचा लागू होईना. याप्राो दोन दिवस जाहाले. शहरांत जुने म्हातारे लोक होते त्यांस या शहरात व किल्यात मोरचा कोठे बांधून लागू होतो हा प्रकार

माहीत होता. इंग्रज सरकारास कसी बातमी लागली असेल ती असो.

## तिसरे दिवशीं

तिसरे दिवशी अवसीस चार घटका रात्रीस किल्याचे पश्चम बाजूस दक्षिणेकडील अंगास मोरच्या बांधून गरनाळ तोफ सुरू केली व किल्याचे वायव्य कोपऱ्यावर गरनाळ तोफ सुरू केली व शहरावरही दोन तीन तोफा सुरू केल्या-बाईसाहेबांकडील सर्व तोफा सुरू ठेविल्या होत्या व कडामिनीचे बंदुकांचे आवाज अगणित सुरू जाहाले. लढाई सुरू जाहाली. शहरावर तोफांचे गोळे फार पडू लागले. तेणेकरून रयत लोकांस त्रास फार जाहाला तो किती ल्याहावा, व रस्त्यात गोळा पडला म्हणजे लोक मरत, कितीयक लोक जखमी होत असत. याखेरीज घरांवर गोळे तोफेचे पडून घरे कितीक पडली व जळू लागली म्हणजे बंबानी ती घरे विझवीत असत, असा शहरावर कहर जाहाला. तसाच किल्यातही फार गोळे पडू लागले. बाईसाहेबांकडील बहुत ज्यारीने काम चालले होते. तेणेकरून इंग्रज सरकारची फौज ज्यरज्यर जाहाली. रात्रंदिवस युद्ध सुरू होते. किल्यात वाड्यावर गच्चीवर गोला पडला म्हणजे तेथे तो गोला फुटून मोठा आवाज होऊन त्या गोल्याचे कपचे चारपाच फुटून जवळची मनुष्ये मरण पावावी. जखमी व्हावी. पुन्हा तोच गोळा गच्ची फोडून खालचे मजल्यावर पुन्हा आवाज होऊन पुन्हा पाचचार कपचे निघोन तेथे कोणी मनुष्ये असल्यास जाया होऊन, तिसरे खालील मजल्यावर पडून मोठा आवाज होऊन गोला फुटून आतील खिळे वगैरे लाल जाहलेले छरे उडून फार मनुष्ये मरावी. याप्रो किले तोडण्याचे गोळे इंग्रज सरकारने बहुत खराब केले. यकक गोळ्यास खर्च पाचसे रुपयेपर्यंत असावा असा सुमार लोक करीत असत. यक दोन गोळे न फुटता तसेच पडले. ते वजन करून पाहाता साठपासष्ट शेर पके वजन भरले. याप्रो लढाईची धूम चालली होती. शहरात दक्षिणी मनुष्याकरिता श्रीगणपती मंदिरात अन्नछत्र ठेविले होते. व इतर लोकांकरिता सदांवर्त ठेविले होते. याखेरीज चणे-फुटाणे डाळे चुरमुरे देत असत. तिसरे दिवसी दोन प्रहरचे सुमारास किल्यावरील दक्षण बुरुजावरची तोफ इंग्रजाकडील गोलंदाजानी बंद केली. तेथे मनुष्य ठरत नाहीसे जाहाले. तेव्हा लोक फार हवालदिल जाहाले. इतक्यात पश्चमचे बुरुजावरील गोलंदाजांनी मोरच्यातून तोफ काढून दक्षणेकडे मोरच्या करून दुरबीण चांगली लावून तोफ सुरू केली. तिसरे आवाजाबरोबर इंग्रज सरकारचा उत्तम गोलंदाज गोरा लोक

होता तो ठार मारिला. बाईसाहेबांनी लागलीच त्या गोलंदाजास रुप्याचा ऐसी तोळ्याचा चांदीचा तोडा बक्षीस दिल्हा. रात्रौ शहरावर तोफेचे गोळे येत ते पाहण्याकरिता आम्ही मंडळी बाहेर बुरुजावर बसून पाहात बसलो होतो. पंचावन शेरापासून पासष्ट शेरापर्यंत जरी वजनाचा गोळा होता तरी रात्रौ गरनाळीचे तोफेतून उडाल्यावर आम्हास चेंडूसारखा लहान आणि लाल केवळ अग्नीप्रो दिसे. दिवसा सूर्याचे तेजामुळे गोळे दिसत नसत. यामुळे लोक फार खराब होत असत. रात्रौ स्पष्ट चेंडूफळीचे खेळाप्रो ते लाल दिसत. मनुष्यास असे वाटावे की, आताच हा गोला मजवर पडेल, परंतु तो गोला सात आठशे कदमावर पडावा. या प्रो रात्रंदिवस युद्ध होऊ लागले प्रहर दीड प्रहरपर्यंत बाईसाहेबांचा जय व्हावा. इंग्रजाचा नाश फार होऊन तोफाही काही काही बंद होत असत. पुन्हा प्रहरा दीड प्रहरांनी इंग्रजाचा जय व्हावा. बाईसाहेबाचा मोड झाल्यासारखे व्हावे. पलटणी लोक सर्व हवालदील होऊन काही तोफाही बंद होत असत. याप्रो काही जय काही पराजय होत होता. इंग्रजाचा मोरच्या सुरू झाल्यापासून युद्धाचे पंचम दिवसी किल्याचे पश्चम बाजूची तोफ सूर्यास्तापासून बंद इंग्रजानी केली होती. तेथे मनुष्य ठरत नाही असे जाहाले व मोरच्याही पाडिला. नंतर रात्रौ सुमार प्रहर रात्रीस गवंडी लोक आणून तो गवंडी फार हुशार असल्याव.रणाने युक्तीने घोंगडी पांघरून हळुहळू बुरुजावर चढून निजून निजून मोरच्या बांधू लागला. त्यास विटा वगैरे सामान मनुष्याची माळ खालपासून लावून बुरुजावरचे मनुष्य निजूनच हाताहातानी गवंडी यास सामान पुरवू लागले. गवंडी याणी मोरच्या बांधून तोफ वर चढवून गोलंदाजानी तोफ सुरू केली. त्या गोलंदाजानी मग येक प्रहरपर्यंत इंग्रज सरकारच्या तोफा दोन बंद केल्या होत्या. याप्रो लढाई चालत होती. युद्धाचे सातवे दिवसी पहाटेपासून किल्यात तोफेचे गोळ्यानी पराकाष्ठा केली होती. उजाडता उजाडता शंकर किल्यावर तोफेचा मार सुरू जाहाला. इंग्रज सरकारापासी किल्ले दुर्ग वगैरेचे लढाईत फार उपयोगी पडणाऱ्या अशा दुर्भिणी असतात. त्या दुर्भिणी लाविल्या असता सर्व किला दिसून येतो. मनुष्ये कोठेकोठे काम करितात ती दिसून येतात. त्या दुर्भिणीस किंमत रुपये दोन हजार पासून अडीच पावणेतीन हजार रुपये लागतात. अशा तऱ्हेच्या दुर्भिणी लावून किल्यात पाण्याची जागा एकच आहे हे जाणोन पाण्यावर तोफेच्या गोळ्यांचा भडमार चालला. त्यात प्रथम रांगडे ब्राह्मण कावडी घेऊन साहा असामी पाण्यास गेले त्याप्रो दोन परत कावडी टाकून आले, बाकी चार असामी मरण पावले. किल्यात

वाड्याबाहेर चिंचेचे मैदानात पेटाची दारू कर्ण्याचा कारखाना सुरू होता. दोन मण सुमार दारू जाहाली म्हणजे बुरुजाखाली तळघर होते तेथे नेऊन कोठीत दारू ठेवीत असत. कारखान्यांत सिलाक दारू नसे. असे असता येक तोफेचा गोळा कारखान्यांत पडला. पडताच सर्व तेथील दारू पेटून त्या मैदानात धूळ होती तीही पेटली. तो दुसरा, तिसरा, चवथा याप्रो गोळे पडले. मग येकदम धुराची व आगीची एकच धूम जाहाली. आम्ही वाड्यात खालचे मजल्यात बसलो होतो. तेथे वाड्यात धूर अतिशय कोंडला. तेणे करून जवळचे मनुष्यही दिसेनासे जाहाले. दोन घटकेनी धूर गेल्यावर चौकशी करून पाहता दारूचे कारखान्यात तीस बत्तीस आसामी पुरुष व सात आठ बायका मरण पावल्या व भाजून जखमी बायका व पुरुष चालीस पंचेचालीस जाहाली. वाड्यात ते दिवसी स्नानास वगैरे पाणी नाही. मोठे संकष्ट पडले. तो गोलंदाजानी बुरुजावरून मोरच्या फिरवून इंग्रज सरकारचे गरनाळीं तोफेवर मनुष्य ठरू देत नाहीसे केले. येणे करून तोफा दोन बंद जाहाल्या. मग पाणी आणोन सर्व भोजनाची व्यवस्था लागली. याप्रो प्रतिदिवसी काही वेळ जय काही वेळ पराजय होत होता.

## आठवे दिवशीं

अष्टम दिवसी युध्ध शहरावर फार तुंबळ जाहाले. वीर मोठ्या मोठ्यानी आरोळ्या देऊ लागले व बंदुका कडामिनीचे आवाज अगणीत होत होते. रणसिंगे, कर्णे, बिगुलादि वाद्येही फार वाजू लागली. रात्री तर अतीच धूम जाहाली. आकाशांतून ते तोफेचे गोळे अग्नीने लाल जाहालेले चेंडूसारखे उडून शहरावर वृष्टि होत होती. सर्व लोक घराबाहेर जाऊन आपआपोपले जीव वाचवीत होते. युद्धाचे नववे दिवसी सकाळी बाईसाहेबांस फार विचार पडला. तेव्हा उपाध्ये ढेकरे यांचे व भय्या उपासनी पंडित यांचे विचारे लवकर रावसाहेब पेशवे याजकडील मदत बाहेरून घेऊन पोहोचावी म्हणोन शंभर ब्राह्मण अनुष्ठानास बसविले होते. लवकर युद्धास मदत पेशवे याणी येऊन करावी. हे अनुष्ठान श्रीगणपती मंदिरांत होते. त्या रात्री बाईसाहेबांस किंचित् झोप लागली तेवढ्यांत स्वप्न पडले ते असे की- कोण येक सुवासिणी मध्यम वयाची गौर वर्णाची सरल नाक कपाल मोठे असी स्वरूपवान् स्त्री आंगावर सर्व दागिने मोत्यांचे घातलेली तांबडे लुगडे नेसून, पांढरी रेसिम काठी चोली घालून ओचे पदर बांधून किल्याचे बुरुजावर उभी राहून तोफेचे गोळे झेलीत आहे. आणि गोळे झेलता झेलता हात काळे जाहालेले बाईसाहेबांस दाखवून असे भाषण केले की,

मीच म्हणोन हे गोळे झेलीत आहे. असे बोलणे जाहाले, तो बाईसाहेब जागृत जाली. नंतर हे स्वप्न सर्वांस सांगितले. लोकानी आश्चर्य मानिले. इकडे कालपीहून तात्या टोपी, पेशवे यांचे सरदार पंधरा हजार फौज घेऊन मजल दर मजल डबल कूच करून झासीचे आग्नेय कोपऱ्यास येऊन रातोरात मोरचे बांधून तोफेस बत्ती दिल्ही. इकडून इंग्रज सरकारची फौज घेऊन कपतान साहेब गेले. त्याणीही मोरचे बांधून लढाई सुरू जाहाली. तो दिवस दाहावा होता. झासीवर लढाईचा कहर चाललाच होता. तात्या टोपी रणात लढण्याबाो पराकाष्ठा करीत होता. त्या योगाने इंग्रज सरकारची फौज जरजर जाहाली. रणांगणांत कोणास भान राहिले नाही. मैदानात समोरासमोर लढाईचा प्रसंग. तेथे रणवाद्ये वगैरे नादाने तो प्रदेश भरून झासीतही किल्यावरून दुरभिणी लावून पाहात होते. स्वार हस्तनळीच्या तोफानी भडमार परस्परावर करीत होते. पायदळ पायदळाबराबर लढत होते. तात्या टोपी याचे लोक सरस लढाईत जाहाले. लौकर जय यावा तो प्रारब्ध दशेनी अकस्मात् वारा फिरला आणि धूर पेशवे याजकडे उलटा जाहाला असे इंग्रज सरकारचे फौजेने पाहाताच मोरच्यांतून तोफा काढून पुढे चाल करीत चालले. तेव्हा रिसाल्याचे लोक म्हणजे स्वार जीवभीति सोडून फार पुढे मार करीत चालले. तेणेकरून पेशवे यांचे लोक भयातुर होऊन रण सोडून पलावयास लागले. चोविस पन्ही छत्तीस पन्ही तोफा टाकून तात्या टोपी सुध्धा सर्व लोक पळून गेले. असे इंग्रजाने पाहून त्याच्या तोफा वगैरे सामान घेऊन लढाई बंद करून झासीपासी आपले गोटात सकाळी दाहा वाजता पोचले. इंग्रज सरकारचा जय जाहाला. त्या योगाने सर्वांस हिंमत जास्त आली.

## अकराव्या दिवशीं

नंतर इंग्रज सरकारने सिकस्त लढाई बदलची केली, त्या रात्री सर्व शहरचे लोक व किल्यातील लोक जागरण करीत होते. उजडल्यावर अकरावा दिवस युद्धास प्राप्त जाहाला. बातमीदार याणी असे कळविले की, इंग्रजापासी दारूगोळे नाहीसे जाहाले आहेत. असे करिता आजचा दिवस पुरतील. नंतर त्या दिवसी बाईसाहेबांनी स्वता तरवार बांधून बुरुजावर तोफा बंद जाहाल्या होत्या त्या गोलंदाजास बक्षिसे वगैरे देऊन आपण स्वता तोफेस बत्ती देण्यास उभ्या राहिल्या होत्या. धुरंधर युद्ध चालत असता इंग्रज सरकारने गरनाळी तोफा सर्व किल्यातील वाड्यावर सुरू केल्या. तेव्हा वाड्यात दुसरे मजल्यावर श्री गणपतीचे

मखर भाद्रपद मासी व नवरात्र उत्साह वगैरे कथा कीर्तन कर्ण्याकरिता पूर्वापार केलेले होते. तेथे सर्व ऐनेमहालच होता. सर्व जाग्यास अर्से लखनौचे लाविले होते व छत्तासही अर्से होते व कांचेची झाडे व हांड्या-गलासे वलछते लाऊन जागा भरली होती. त्या जाग्यावर तीन मजले होते. तेथे गरनाळी तोफेचा गोळा पडून आवाज फार मोठा जाहाला आणि तोच गोळा खालील मजल्यावर पडला. पडताच मोठा आवाज होऊन त्यांतील खिले, छरे वगैरे उडाले. तेणेकरून तेथे माणसे चार मरण पावली व नऊ मनुष्ये जखमी जाहाली. आणि आवाजाबराबर खालील काचांचा खलखल चूर होऊन रासी पडल्या, हांडी गलास किंवा ऐना राहिला नाही. शेकडो तोफेचे गोळे वाड्यावर पडत होते तथापि वाड्यास इजा किमपि जाहाली नाही. गोळा गच्चीवर हापटून तो गोळा तीन छेतें तोडून खाली येऊन पडून शांत होत असे. परंतु जुना बादशाही चुना कमाविलेला सबब गोळ्यापुरते मात्र भोक पडून गोळा खालील मजल्यावर पडे. परंतु भोकापेक्षा जास्त काम तडावले नाही व फुटलेही नाही. मजल्यांची गोळ्यामुळे चालणीस जसी भोके असतात असी भोके दरोबस्त ठिकाणी पडली. असा वाडा मजबूद आणि चुना कमाविलेला होता. त्या वाड्यास पैसा किती लागला असेल तो असो. त्या दिवसी वाड्याचे दरयेक दालनास गोळे अति पडू लागले. तेव्हा सर्व मनुष्ये घाबरून मनुष्ये मध्येच यक खोली होती त्या खोलीत निर्भय मानून त्या खोलीत शिरली. कारण त्या खोलीवर पाच मजले होते. त्या खोलीत-मनुष्ये जमताजमता चौसष्ट माणसे जमली. आणि खोलीत गर्दी जाहाली. त्यात आम्हीही शिरलो होतो. दासी बायकाही त्यातच होत्या. सर्व माणसे उभीच होती. दिवस उन्हाळीचे गर्दीमुळे व जीवभीतीने अंगास घाम फार सुटला होता. श्वास देखील सोडण्यास जागा नाही. आम्ही अगदी घाबरून गेलो होतो. त्या खोलीत येकंदर चार घटका होतो. मृत्युभयाहून दुसरे भय नाही. जीव कासावीस सर्वांचे जाहाले तो इतकीयात बाईसाहेबांकडील गोलंदाजानी गर्दी उडऊन इंग्रजाच्या तोफांवर गोलंदाज वगैरे मनुष्यें ठरूं दिल्ही नाहीत. तेणेकरून वाड्यावर गोळे पडत नाहीसे जाहाले. मग त्या खोलीतून सर्व लोक बाहेर निघाले. याप्रो नेहमी प्रहर दोन प्रहर जय होऊन पुन्हा संकष्ट प्राप्त होत होते. त्या रात्री आम्ही आपले जीवास भिऊन श्री वैजेनाथ देव आमचे गांवचा त्याची प्रार्थना धावा करीत करीत किंचित् निद्रा लागल्यासारखे होऊन दृष्टांत स्वप्न पाहिले ते असे की, कोठेतरी दोन चारशे मनुष्यांचा समुदाय जमून जात असता वाटेत येक मोठी नदी

लागली. त्यात सर्व मनुष्ये उतरून जाण्यास शिरली. आम्हीही दोघे त्या नदीतच होत्तो. तों मध्यावर जाताच यकायकी पाणी नदीस चढू लागले आणि सर्व मनुष्ये वाहून जाणार, सबब आकांत माणसे करू लागली. तों पाणी कंबरेपर्यंत आले पुढे उरापर्यंत येऊन गळ्यापर्यंत जाहाले. कितीयेक लोक वाहू सुध्धा लागले. इतक्यात आम्ही कडेस लागण्याकरिता झटून जवळजवळ गेलो तो तेथे कोणी पूर्ववयाचा गौरवर्णाचा पैलवानासारखा हम्माल पाण्यात उभा राहून आपले दोन्ही हात पुढे करून आम्हास असे म्हणू लागला की तुम्ही भिऊ नये. मी तुम्हास या जीवभीतीतून काढण्यास येथे आलो आहे. घाबरू नका, पुढे या म्हणजे हात देऊन काठीं लावितो. तों तोफेचा आवाज जाहाला आणि मी जागा झालो आणि ती ।। काकास स्वप्न सांगितले. मग काकांनी ऐकून आपल्यास भय जीवाचे नाही, असे मानून राहिलो.

## फितुरीमुळें शौर्याचा निरुपाय

त्या रात्री बाईसाहेब स्वता शहरावरचे लढाईत व किल्यावरचे लढाईत स्वता फिरून बंदोबस्त ठेविला होता. तो बातमीदारानी येऊन असे कळविले की, इंग्रज सरकारने झासीवर दोन अडीच लक्ष रुपयांचे गोळे व दारू खर्च करून परिणामी जय होईल असे वाटत नाही आणि दारूगोळाही संपला आहे. उदईक प्रहर दिवस सकाळी होईपर्यंत लढाई होईल. पुढे लस्कर उठून जाईल तों इतक्यांत दरवाज्यावर मदोन्मत्त हात्ती बांधला होता. त्या पीलखान्यावर दोनचार गोळे तोफेचे पडले. त्या पो येक गोळा हत्तीचे पाठीवर पडून पाठ फार भाजली, तसेच गोळे घोड्यावरही पडून घोडे उत्तम उत्तम फार मरण पावले. बाईसाहेबांचा सिकारखाना होता. तेथे पोपट देशोदेशीचे व साळुंख्या, मैना, मोर वगैरे अनेक पक्षी व हरण, सांबरे वगैरे पशु सिकारखान्यांत होते. तेथे तोफेचे गोळे पडताच ओरडून ओरडून सर्व प्राण्यांनी प्राण येकदम सोडिले. त्या अनर्थास पार नाही. असी लढाई येकंदर आहोरात्र अकरा दिवस अष्टौसी प्रहर लढाई जाहाली. उजडताच बारावा दिवस सुरू होणार, तों पहाटेस उजाडता दीड घटका रात्रीस शहराचे दक्षणेस दुलाजीसिंग परदेशी सरदार चार हजार फौजेचा मालक लढत होता. त्याचे ताबीत तोफा होत्या त्या दोन्ही तोफास बाजरीच्या थैल्या गोल्याचे ऐवजी फितूरपणाचे योगाने दिल्या. ते आवाज ऐकताच सर्व लोकांचे धीर तुटून गर्दी जाहाली, सर्व लढावाईक लोक घाबरून जातात; तों आणखी आवाज

पाचचार वायबार जाहाले. तो उजाडले, तेव्हा आम्ही व काही सरकारी लोक साहावे मजल्यावर होते ते तिसरे मजल्यावर येऊन पाहू लागलो तो, इंग्रज सरकारने मजूर वगैरे मनष्यांचे डोक्यावर गवताचे भारे पाण्यानी भिजवून देऊन ती मनुष्ये येकंदर तीन हजारापासून चार हजार असावी. गवताचे भारेवाले लोक पुढे घालून त्याजमागे बाजूनी वगैरे गोरे लोक कडामिनी तुबुका घेऊन येकदम हाला करीत करीत शहराचे तटापर्यंत पोचले. गवताचे भारे सर्व तटानजीक एकक्षावर येकक ठेऊन वरपर्यंत जिन्यासारख्या वाटा करून हजारो गोरे लोक शहरचे तटावर दिसू लागले. तेव्हा त्या बाजूवरचे सिपाई लोक सर्व भयातूर होऊन हातेरे टाकून गांवात सिरले. तेथे कोणी राहिले नाही. असे किल्यातून बाईसाहेबानी पाहून विलायती लोक म्हणजे-मुसलमान अरबांसारखे नोकर बहुत दिवसांचे होते ते सुमार दीड हजार तरवारबंद बराबर घेऊन स्वारी किल्यातून खाली उतरली. पंधरासे विलायती लोक घेऊन खालच्या मोठा दरवाजातून बाहेर मैदानात जाऊन दक्षणेकडे वळतात तों तिकडून हजारो गोरे लोक आले. त्यांच्याही तरवारी मेणातून काढून नागव्याच होत्या वं विलायती लोकांच्याही तरवारी नागव्या हातून होत्या. बाईसाहेबानी तरवार नागवी हातात घेऊन शूरत्वाचे सर्वांमागे चालत असता सर्वांचे मध्यभागी स्फुरण येऊन गेल्या.

ते समई शुध्ध भारतीय युद्धाचीच उपमा देण्यास उपयोग आहे. तरवारीचा चकचकाट येक क्षणभर पडला. गोरे लोक व विलायती लोक येकत्र होताच पन्नास अंक योजण्याही उशीर लागेल इतके अवकाशांत तरवार उभयतांची चालली. तों गोरे लोक भयातुर होऊन शहरांत पूर्वेस रस्ते गेलेले त्यात आपला जीव बचाविण्याकरिता शिरले, आणि तेथून कडामिनीच्या गोल्या घालू लागले. तेव्हा विलायती लोकांचा उपाय नाहीसा जाहाला. तो बाईसाहेबांचे पदरी जुना सरदार पाऊणसे वर्षाचे वयाचा होता तो येऊन बाईसाहेबांचा हात धरून असे कळविले की, महाराज आज या समई आपण पुढे जाऊन बंदुकेच्या गोळीने मरणे आणि रांड मरणे सारखे आहे. यात लौकिक नाही. ते गोरे सर्व इमारतीचे आड गेले. तेथून बंदुकीने आपल्यास मारतील. त्यापेक्षा किल्यात जाऊन दरवाजे बंद करून पुढे ईश्वर युक्ती सुचवील तसे करता येईल. परंतु ही वेळ परत जाण्याची आहे. असे सांगून बाईस धरून परतविली व आरोळी देऊन विलायती लोकही परतले. किल्यात येऊन दरवाज्यास अडसर ठोकून स्वस्थ लोक राहिले. इकडे शहरात गोरे लोक शिरून पुरुष मात्र जितका आढळत चालिला तितका

कडामिनी बंदुकीच्या गोळ्या घालून मारू लागले आणि शहरास आग लाविली. ती प्रथम हलवाई पुरा पेटवून दिल्हा आणि बिज्यन करण्याचे काम सुरू केले. पांच वर्षाचे वया पलीकडे ऐशी वर्षाचे आत पुरुषामात्र शोधून मारण्यास आरंभ केला. ते समई शहरावर जे लोक बाईसाहेबांकडील लढवाईक होते ते सर्व पळून शहरात आले आणि घरोघर जाऊन जीव भीतीने कोणी नाहावी पाहून मिशा, दाढी, मोठमोठे कले वस्ताऱ्याने काढून टाकून गोपीचंदनाचे टिळे लावून गळ्यांत तुलसीचे काष्टांची व रुद्राक्षांच्या माळा घालून बसले. ज्यांस नाहावी सापडला नाही त्याणी कातर घेऊन केश दाढीचे वगैरे मिशा कातरून साधू होऊन कैयेक लोक बसले. शहराचे चारी बाजूनी हजारो गोरे लोक शिरून बिज्यन करीत चालिले तेव्हा त्या शहरात कहर किती जाहाला असेल त्याचा अजमास करवत नाही. शहरात हलकल्लोळ जाहाला त्यास पार नाही. ते समई शहरात मध्यभागी लहानसा बाग भिडे यांचा होता. त्या बागात चोहीकडून मनुष्ये शिरली. बायका व पुरुष व मुले येकंदर संख्या सुमार वीस हजारपर्यंत होती. तेथे गोरे बिज्यन करण्याकरिता आले. तेव्हा सर्व लोक घाबरून भूमीवर नमस्कारासारखे पडून गोरे लोकांस असे कळविले की, साहेब आम्ही सर्व रयत आहो, त्यात कोणी लढवाईक नाही, आम्हास जीवदान द्यावे. ते समई गोरे लोकांस त्या सर्व लोकांची दया येऊन बागेचे दरवाजे सर्व बंद करून सर्वांस अभय देऊन आपला पहारा दरवाज्यावर ठेऊन त्या लोकांचा बंदोबस्त करून घरोघर गोरे लोक शिरण्यास गेले. जेथे जेथे पुरुष दृष्ट जाहाले तेथे तेथे मारिले. गोरे घरात शिरल्याबराबर पुरुष सापडला म्हणजे त्यास धरून रुपये, सोने, मोत्ये वगैरे अर्थ असेल तितका निघे तेथपर्यंत त्या पुरुषाचे हालहाल करीत असत. कोठेकोठे द्रव्य सापडले ते पुरुष त्या वेळेस सोडून दिल्हे. कीतीक लोकांचे गळ्यास फास पंच्याचा घालून रस्त्यावर नेऊन मारझोड करून अर्थाविसी आणोन, पुन्हा त्यास घरांत आणोन भूमीत किंवा कोठे ठेविला असेल तो अर्थ घेऊन त्यावेळेस त्या पुरुषास न मारिता सोडून देऊन गेले. पुन्हा दुसरे गोरे लोक येऊन त्यांस तोच पुरुष सापडल्यास ठार मारूनही टाकीत असत. परंतु स्त्रियांस गोरे लोकांनी ठार मारिले नाही. परंतु काही स्त्रिया उमेदवार कुलिनाच्या होत्या त्यानी असा विचार केला की, आता गोरे लोक आपल्यास बाटवतील म्हणोन पुढील दरवाज्यासी गोरे आले असे पाहून मागील दारी जाऊन विहिरीत जीव दिल्हे. कोठे असेही जाहाले आहे. घरात गोरे येऊन नवऱ्यास बंदुकीची गोळी घालितात तो त्याच्या स्त्रीने पुरुषास येऊन

आपले देहाने वेष्टित करावे किंवा त्याचे अंगावर पडावे. तों गोळी बंदुकेतून सुटून बायकोस गोळी लागावी आणि ती मरण पावावी. गोळी चुकली असे पाहून गोरे लोकानी पुन्हा गोळी घालून पुरुष मारावा. परंतु बुध्धीपूर्वक गोरे लोकानी स्त्रियांस मॉरिले नाही. आता जेथे ज्या घरी पुरुष सापडले नाही त्या घरी बायका पाहून त्याजपासून दूर उभे राहून आंगावरील वस्तवानी सर्व त्याजपासून उतरून घेऊन घर सर्व शोधून गेले. शहरात घोडे, उंट, हत्ती, कुत्री वगैरे जनावरे पाण्याकरिता रस्तोरस्ती ओरडत फिरत होते. शहर सर्व दीन होऊन हलकल्लोळ चालला होता. जिकडे तिकडे रडारड चालली होती. गोरे लोक घरात शिरले म्हणजे काठीने भिंत ठोकीत ठोकीत पाहाता मध्येच भिंत फोडून अर्थाचे भांडे काढीत असत. असेच भूमीतूनही द्रव्य ठेविलेले काढीत.

## दुलाजीसिंग परदेशी

याप्रो व्यवस्था सुरू जाहाल्यावर मोठा कपतान साहेब शहरात लागलीच येऊन दुलाजीसिंग परदेशी याचा शोध करू लागला. दुलाजीसिंगास असे कळले की, माझा शोध साहेब करीत आहेत. असे समजताच मी दुलाजीसिंग आहे असा शब्दघोष करीत करीत मुख्य साहेब कोतवाल चौकिसी होता तेथे येऊन साहेबास सलाम करून आपले नांव सांगून उभा राहिला. नंतर साहेबानी असा प्रश्न केला की, तूं या संस्थानचा नोकर किती दिवसांचा आहेस? ये समई परदेशी याणी उत्तर दिल्हे की, साहेब आम्ही नोकर बहुत दिवसांचे आहो. मी चवथा पुरुष आहे. चार पिढ्या माझ्या येथे जाहाल्या आहेत. झासीवाल्याचे आम्ही नोकर आहो. नंतर साहेबानी विचारिले की, तुम्हास पगार काय मिळत आहे ? त्याजवरून परदेशी म्हणतो दरमहा साठ रुपये आम्हास राज्य होते तेथपर्यंत साहनला मिळत आला. पुढे राज्य गेल्यावर सर्व नोकर लोकांचा पगार बाईसाहेबांनी निमे केला. याजवरून माझा पगार तीस रुो ठरला, त्याप्रो घेत होतो. पुढे हा गलबा जाहाल्यापासून पुन्हा साठ रुपये दरमहा पगार मिळत होता, असे समजताच त्यास असे सांगितले की, तुझे भाऊ व मुलगे सर्व पुरुष काय असतील तेव्हडे या घटकेस आम्हास येथे आणोन भेटावे. बहुत उत्तम आहे, असे परदेशी बोलून मोठ्या आनंदाने घाईने घरी जाऊन दोघे बंधु, लहान लहान मुलगे पांच वर्षापासून वीस वर्षापर्यंत असे चार असामीसो घेऊन पुन्हा चौकीवर येऊन साहेबास सलाम करून मोठ्या हौसेनी सर्वांसह उभा राहिला. नंतर साहेब बोलू लागला. पहा तूं मनुष्य फार

बदमाष आहेस. तूं या संस्थानचा चार पुरुषपर्यंत नोकर असून त्यांचे अन्न खाऊन त्यांचेवर उठलास. सवर राषद बुडविलीस आणि अनर्थ केलास. त्यापेक्षा तुजला व तुझे भावास व मुलग्यास जिवंत ठेविल्यास सरकारचे राज्यास भय आहे. असा मनुष्य पृथ्वीवर ठेवावयाचा नाही. असे बोलून पांचचार गोरे लोकानी बंदुकेने गोळ्यांचा ताशेरा उडवून तीं सर्व मनुष्ये मारून तरवारीने दुलाजी सिंग यांचे सीर उडविले. असी शहरात हकीगत जाहाली. ती तेथील लोकानी बहुत मंडळीने आम्हांस सांगितली ती लिहीत आहे. आता तो परदेशी फितूर करण्याचे कामांत कोण मुख्य होता. त्याचे वृत्त लोकानी सांगितले तेही लिहीत आहे. मद्राज खात्यांतून मंद्राजी लोकांची पलटणे व गोरे लोकांची पलटणे घेऊन निघणारा तो द्रवीड रामेश्वराकडील येक ब्राह्मण दुभाषी महाराष्ट्र भाषेत निपुण तो आपल्यास शाक्त म्हणवीत असे. कपाळी पिंजरेचा पट्टा नेहमी लावीत असे. तो ब्राह्मण फितुरीचे काम करण्याकरिता आपले देशांतून सरकारचे अनुमतीने झासीस येऊन पोचला. तो चार महिने झासीस बिराड करून राहिला होता. प्रतिदिवशी सकाळी स्नान संध्या करून पिंजर कपाळी लावून बाहेर पडे आणि मुत्सद्दी व सरदार लोकांकडे पाळीपाळीने जाण्यायेण्याचा पाठ ठेऊन सर्वास असे कळवी की, मी फार गरीब आहे आणि मजला काशीयात्रा करणे आहे. त्यास दोनसे रुो निदान पाहिजेत. सबब उद्योग संस्थानात करीत आहे. असे सर्वांस सांगत असे. परंतु बाईसाहेबांकडील अनुष्ठाने बहुत सुरू होती, परंतु त्याणे केली नाहीत. पुढे सर्व राषदीत फितूर करण्यास योग्य दुलाजीसिंग त्यास आंढळला. त्याजला फितूर करून संस्थान बुडविले. तो ब्राह्मण झासी इंग्रजाचे हस्तगत होताच मोठ्या आनंदाने निर्भय चित्ताने इंग्रज सरकारचे खूण गळ्यात बांधून फिरत असे. याप्रमाणे प्रथम दिवसी कृत्य जाहाले. इकडे बाईसाहेब किल्याचा दरवाजा बंद करून आत आल्यावर असा विचार मनांत आणिला की, सर्व वाड्यात दारूगोळा बिछाऊन पेटवून देऊन मरून जावे. असा अभिप्राय मंडळींस कळविला. नंतर ज्या सरदाराने बाईस परत किल्यात आणिली, त्या वृद्ध सरदाराने असे सांगितले की, महाराज बाईसाहेब आपण विचार कर्ता हा बराबर नाही. तर आता स्नाने वगैरे करून भोजने करावी आणि स्वस्थ राहावे. रात्रौ सर्व स्वारी तयार करून शहराबाहेर निघोन जावे. बाहेर घेर शत्रूचा आहे. ते मारामारी करतील. त्याजबराबर आपणही युध्ध करीत करीत बाहेर पडून जावे. समई मृत्यु जरी आला तरी युध्धांत मरण पावल्यास स्वर्ग आहे, चिंता नाही. असे माझे बुध्धीने

वाटते. सरकारास कर्णे ते करावे. मग सर्वांनी त्या वृद्धाचे बोलण्यास मान देऊन सर्व लोक स्वस्थ राहिले. मग स्नानसंध्यादी भोजने केली.

## दीन झासी

किल्याचे बुरुजावरून शहर पाहिले म्हणजे ते शहर दीन जाहालेले दिसू लागले. हलवाई पुऱ्यापासून आग लागली होती. घोडे, हात्ती, बैल, गाई, म्हशी, गाढवे, खेचरे, कुत्री पाण्याकरिता व वैरणीकरिता ओरडत आणि रस्तोरस्ती फिरत होती व रस्त्यांत शेकडो प्रेते पडलेली असे शहर भयंकर दिसत होते. गोरे लोकांनी सूर्यास्तपर्यंत बिज्यन करून सर्व गोरे शहराबाहेर आपले गोटात निघोन गेले. दिवे लागण्याचे संधीत किल्याचा मोठा दरवाजा उघडऊन बाईसाहेबांनी सर्व मनुष्यांस शहरात जाऊन ज्याचा त्याणी जीव वाचवावा व येथे राहू नये असी परवानगी दिल्ही. नंतर दासदासी ब्राह्मण वगैरे सर्व तमाम लोक किल्यातून शहरात निघोन गेले. त्यात आम्हीही निघोन मांडवगणे यांजकडे गेलो. इकडे बाईसाहेब अवसीचे बारा घटका रात्रीचे सुमारे किल्यांतून स्वारी बाहेर जाण्याकरिता निघाली. ते समई तिचा बाप मोरोपंत तांब्या वगैरे जे आप्त व निकट राहाणारे लोक होते त्याजपासी कंबरेसी बांधण्यास मोहोरा पुतळ्या दिल्या. तेही घोड्यावर स्वार जाहाले आणि संस्थानात जो अर्थ व खजिना होता तो व रुप्याची भांडी वगैरे व मोत्ये, हिरे, पाचसुो सर्व काढोन हत्तीवर सलीद्यांत भरून तो हत्ती मध्यभागी घेतला. लढवाईपाो पूरवी शहरात सकाळी गोरे लोक येताच पंधराशे विलायती लोक घेऊन बाईसाहेब किल्याखाली उतरल्या. ते समई पाच पंचवीस अंक होत तोपर्यंत गोरे व विलायती लोकांची तरवार जाहाली. त्यात पाचशे विलायती लोक मेला गेला व गोरेही सात आठशे मारले गेले. बाकी विलायती लोक हजार अकराशे राहिले, ते बराबर घेतले व स्वार दोनशे बराबर होते.

## इंग्रजांची फळी फोडून कालपीस प्रयाण

बाईसाहेब स्वता पांढरे घोड्यावर स्वार जाहाली. घोडा तो सुमार अडीच हजार रुाो किमतीचा खंदा होता. त्याजवर आपण बसून आंगावर पायजमा वगैरे सर्व पोषाग होताच. टाकीण बूट घातले होते व सर्वांगास तारांचे कवच घातले होते. बराबर अर्थ येक पैसासुाो घेतला नव्हता. फक्त रुप्याचा जाब म्हणजे पेला पदरी बांधून ठेविला होता. कंबरेस ज्यंबा वगैरे हतेरे होती. खाकेत तरवार

लाविली होती आणि रेसिमकाठी धोतरानी पाठीसी बारा वर्षाचा मुलगा दत्तक घेतलेला बांधून जय शंकर असा शब्द करून किल्याखाली स्वारी उतरली आणि सर्वांसह भर शहरांतून उत्तर दरवाज्यानी बाहेर गेली. तो इंग्रज सरकारचे लोक लढण्याकरिता हला करीत उठले. याणीही हला करून मारीत मारीत पुढे पळ काढून चालले. बाई कडामिनी बंदुकेने बहुत लढत लढत भरधाव घोडे काढून इंग्रजांचे फौजेची फळी फोडून बाहेर निघोन चालिली. बराबरची मंडळी बहुत करून सर्व मरण पावली. काही काही घोडेस्वार जिकडे त्यांस वाट फुटली तिकडे निघोन गेले बाईसाहेबांबराबर येक दासी घोड्यावर बसणारी पुरी होती ती व येक बारगीर मिलोन दोन मनुष्ये व येक बाई सरकारचे लस्करातून निघोन थेट कालपीचा रस्ता धरून चालली होती. इंग्रज सरकारचे स्वार पाठीस लागत लागत येक कोशपर्यंत गेले. तो बाईसाहेबांचे घोडे दिसत नाहीसे जाहाले. रात्रीचा विषय आता आपल्यास खचित सापडत नाही, असे स्वारानी मनात आणोन पुन्हा परत आपले गोटात आले. रात्रीमुळे कोणास कोठे बाई व सरदार बाईचे कोठे गेले किंवा आपलेच लस्करांत गर्क जाहाले हे समजण्यात आले नाही. इंग्रज सरकारने तोफा सुरू ठेविल्या होत्या व बंदुकांचे आवाजही सुरू होते. तों स्वार पाठीस लागलेले परत आले. त्याणी असे सांगितले की, मोठ्या घोड्यांवर बसून पाच चार घोडे बहुत दूर गेले आम्हास सापडत नाही असे पाहून परत आलो. असे सांगताच तोफा वगैरे बंद केल्या. इकडे बाईसाहेब उजाडता झासीखालील मुलखात येका गांवी गेली. तेथे महालकारी होता तेथे जाऊन दत्तपुत्रास पाठीचा सोडून त्यास तेथे फराळ करऊन, महालकरी यास जाहाला म ।। सांगोन पुन्हा मुलास पाठीसी बांधोन तशीच बाई कालपीस निघोन चालती जाहाली. महालकरी वगैरे तेथील नोकर सर्व पळून गेले. कालपीस किल्यात रावसाहेब व तात्या टोपी फौजे सुद्धां असता गुदामात रात्रीचे बारा घटका रात्री येऊन बाई पोहोचली. रात्र फार जाहाल्यामुळे श्रीमंतास कळविले नाही. उज्याडताच झासीवाली बाईसाहेब गुदामांत रात्री आली असी खबर समजली. बाईसाहेब पाहाटेस उठोन शौचविधी उरकून मुखमार्जन वगैरे आटपून विचारात आहेत तों स्त्री धर्माप्रो अस्पर्शता प्राप्त जाहाली. ते समई बाईस जो प्रसंग वाटला तेणेकरून अन्तःकर्णास फार दुःख जाहाले ते माझ्यानी वर्णन करवत सुद्धा नाही. पहा तीन दिवसास भोजन नाही. असो येक लहानसे पातळ नेसू होते. व अंगात येक पांढरी चोळी मात्र होती. याखेरीस स्त्रियांचे कपडे मुळीच नाही. पायजमा बन्यान वगैरे

सर्व पुरुषवेशाचे कपडे होते. जवळ येक पैसासुाो नाही. हातातली येक आंगठी हिरकणीची मात्र होती. बाकी जवळ काही नाही. तशात राज्यस्वला दशा प्राप्त जाहाली. बराबर येक दासी घोड्यावर बसणारी आली, तिजपासीही कपडा किंवा काही अर्थ नाही. रुप्याचे जाबखेरीज भांडे नाही, असा विपरीत प्रसंग प्राप्त जाहाला. ते समई बाईसाहेबांचे नेत्रांस पाणी येत होते हे आश्चर्य नव्हे. बाईस पाहाणारे लोक खळखळा रडू लागले. इकडे रावसाहेबांस सर्व हकीगत समजून बाई अस्पर्श जाहाल्याचेही कळले. नंतर रावसाहेबांनी बाईचे बंदोबस्ताकरिता तात्या टोपी यास आज्ञा केली. नंतर टोपी याणी दाहा दाहा रुपये किंमतीची लुगडी चार व मुगटा वगैरे वस्त्रे व दाहा पंधरा पात्राची भांडी व रुप्याची भांडी पाणी पिण्यास खेरीज जाजमे, बिछाने, तंबू, कनाथी, पाले व शिवबंदीचे लोक व पलटण बंदोबस्ताकरिता, कारकून, आचारी, पाणके, शागरीत वगैरे मनुष्ये सर्व पाठवून देऊन मागून आपण स्वता तात्या टोपी व रावसाहेब येऊन भेटी जाहाल्या. परस्परे करून सर्व हकीगती समजल्या. बाई रावसाहेबांचे आश्रयानी तेथे राहिल्या. नंतर झासीपाो लढवाईक लोक कालपीस आले.

आम्ही मांडवगणे याजकडे अवसीचे दोन घटका रात्री येऊन पोचल्यावर सर्व हकीगत शहराची समजण्यांत आली. मांडवगणे यास असे विचारले की, जीव बचावण्याबाो काय विचार केला आहे. त्याजवरून मांडवगणे याणी असे कळविले की, आपले समोर वाडा आहे, याचे मागे मोठी बखळ आहे चौसोपी वाड्याची ओसाडी आहे, वाडा मोडलेला असता भिंताडे सर्व पडली आहेत. सर्व जाग्यावर आघाडे वगैरे पर्जन्य काळचे गवत सुद्धा आहे. तेथे गुरे मनुष्ये जाण्यास वाट नाही. चारी बाजूनी मोठे मोठे वाडे आहेत. हा मोडलेला वाडा यास पूरवी वाट बोळांनी होती. वाडा मोडून गेल्यावर दाहा पंधरा वर्षांनी राजमार्गानजीक बोळात रंगारी याणी इजमाली घर थोड्या खर्चानी बांधिले आहे. याजमुळे ती जागा कोणास सापडावयाची नाही व जाण्यास रस्ताही नाही. या बुंदेलखंडात पूरवी पासून चोरांचे भय फार, सबब घराचे भिंतीत जागा फार धरून रुंदीच्या भिंती घालितात. पुढे फडताळ किंवा कोनाडा असतो, त्यात जाऊन बसून सर्व भांडीकुंडी, कापडाचे गठ्ठे वगैरे सर्व सामान राहील असे लावून रात्रौ घर मोकळे ठेवण्याची वहिवाट होती. त्याजवरून मोडलेले भिंतीत मनुष्ये लपून राहण्यास जागा आहे. परंतु तेथे काळोख फार आणि वारा मुळीच नाही. त्या जाग्यास या देशात बंडे असे म्हणतात. जीव बाहेर राहिल्यास जाईल म्हणोन तेथे राहाणे आहे.

असे ऐकून फार संकष्ट मनांत आणोन संध्यादि करून त्या दिवशी भोजने रात्रौ केली आणि रात्रौ माडीवर जाऊन गच्चीवर चढून शहर पाहू लागलो. ते समई तो अनर्थ पाहून माझे सर्वांगास कंप सुटला. भीती उत्पन्न जाहाली. ते सर्व शहर प्रेतभूमि जाहाली होती. जनावरे पाण्याकरिता व वैरणीकरिता दीन स्वरानी ओरडत असत व काही गरीब भिकारी लोक अन्नाकरिता रडण्याचे स्वर काढून रडत असत. हलवाई पुन्यापासून शहर जळत होते. मोठ्यामोठ्या अग्नीच्या ज्वाला वाऱ्याने निघोन दुसरे घरावर जात, त्या योगाने दुसरी घरे पेटत असत. असा भयंकर प्रसंग कधीही कोणावर आलेला नाही. तो प्रसंग झासीवर आला. ते दुःख पाहून पोटात आग फार भडकून गेली; तिजला उपमा नाही. ती रात्र तेथे जागून व निजून घालविली तों पाहाट जाहाली. पहाटची दोन घटका रात्र राहाताच उठोन शौच मुखमार्जन वगैरे करून स्नानसंध्यादि करून ओसाड जाग्यावर नेमिलेले बंड्यात जाऊन बसण्यास केशवभट त्याचे चिरंजीव दामोदर भट व आम्ही चुलतेपुतणे असे चौघेही सिद्ध जाहालो, तों घरासीच बंदुकेचा आवाज जाहाला. तेणेकरून जीवच जाण्याचा प्रसंग प्राप्त जाहाला असे समजून मुखापासून सर्व शरीर शुष्क होऊन कंबरपासून खाली पाय आहेत किंवा नाहींत असे वाटून सर्व शरिरास कंप, घाम सुटला. तो मांडवगणे घरात जाऊन काळोखात लपून बसले. आम्ही दोघेही पुढे जाहालो. तों गोरे दोन असामी धावून पुढे बंदुक करून आले. इतके पाहाताच आम्ही पृथ्वीवर नमस्कारासारखे पडून हिंदुस्थानी बोलीने बोलण्यास लागलो. साहेब आम्ही मुंबई ताब्यात ठाणे जिल्ह्यांत राहातो. इकडे यात्रेकरिता आलो. पितापुत्र आहो आणि भिकारी भिक्षुक असल्यानी आमची आणि या घरचे यजमानाची ओळख वाटेत पडली. सबब याणी आम्हास येथे काही रुो मिळवून द्यावे म्हणोन आणिले आहे. आम्हास येथे येऊन पंधरा दिवस जाहाले आहेत. असे आम्ही बोलताना त्याणी आमची भाषेवरून परीक्षा केली. हे या देशांतले नव्हेत. मग ते आम्हापासी रुपये मागू लागले आणि चोहीकडे पाहून हातानी सोधू लागले. तो आम्ही किल्यांतून बिराडी येताच बिछान्यात उशागती रुपयांची पुरचुंडी ठेविली होती त्यात रोख रुो २५० अडीचशे होते. सकाळी तसीच बिछान्याची वळकुटी करून ठेविली होती, तीच वळकुटी गोरे लोकांनी खाली पाडिली, तसी रुो याची पुरचुंडी वाजली. मग ते रुो गोरे घेऊन तसेच दुसरे घरी आमचे प्रारब्धानी गेले.

## बंड्यातील भीषण दुपार

नंतर बंड्यात बसण्याकरिता आम्ही त्या ओसाडीत गेलो. तेथे चोहीबाजूचे पुरुष व तरुण स्त्रियांनी सर्व जागा भरून गेली. दर जाग्यांत तीन तीन मनुष्ये बसण्यासारखी जागा असता प्रत्येक बंड्यात चारचार बसली होती. शहरांत आकांत चालू जाहाला. बंदुकांचे आवाज शतावधी होऊ लागले. ज्या जाग्यात आम्ही बसलो होतो तेथे वारा अगदी नाही. दिवस वैशाखाचे. बारा वाजता सुमार अति मजला ताहान लागली. त्या तान्हेस उपमा नाही. प्राण जाईल असा मजला प्रसंग प्राप्त जाहाला. मंडळीने असा विचार केला होता की, अति ताहान लागल्यास आपले महल्यांत कडमिन वाजत नाही असा सुमार पाहून बाहेर येऊन विहिरीवर येक्या मडक्यास दोरी लावून मडके ठेविले होते तेथे जाऊन पाणी प्यावे, परंतु मजला भरवसा येईना. आणि बंदुक त्याच आळीत वाजत होती. सबब जीव फार पाण्याकरिता घाबरून गेला. नंतर काही वेळानी बंदुक वाजत नाही असे मनांत आणोन, लवकर निघोन विहिरीवर येऊन पाण्याचे मडके भरून पाणी पिऊ लागलो. तों पाणी पिण्याचे काम संपता संपता जवळचे वाड्यात आवाज जाहाला. तसेच मडके टाकून घाबरत घाबरत धाऊन जीवभीतीने भलतेच बंड्यापासी जाऊन कोनाडा मोठा होता त्यांत डोके घालून शिरण्यास लागलो. त्यांत दोन बायका तरुण होत्या. त्याणीही जागा लौकर करून देऊन, आत लौकर या असे मजला सांगितले. मग मी आत शिरलो. तो बंडा लाहान फार होता. आतील बायकोचे तोंड पश्चमेस होते, माझे तोंड पूर्वेकडे होते. जागा लहान सबब उरासी उर गच्च लागून गेला होता. दरम्यान आंगातील चोळी मात्र होती. ती घामानी सर्व भीज जाहाली होती. असी मिठी मारून चार सहा घटका बसलो होतो. ते समई माझे वय तीसपासून तेहतीसपर्यंत असावे व त्या स्त्रीचे वय आठरा वर्षापासून विसाचे आत होते. परंतु उभयतांस कामेच्छा जाहाली नाही, इतके जिवाचे भय आहे., तेथून पाच सहा घटकेने पुन्हा बाहेर पडून आपले जागी बसण्यास गेलो.

## सर्वत्र लूटमार आणि कत्तल

गोरे सोजीर लोक दांडगे फार असून बायकांस बाटवतील आणि काही तरी अनर्थ करतील सबब दर येक गोऱ्या लोकाबराबर दोन किंवा येक काळे मद्राजी बराबर सरकारने बंदोबस्ताकरीता दिल्हे होते. त्या काळ्या लोकांस असा हुकूम

होता की, स्त्रियांस स्पर्श केल्यास किंवा गोळीने मारल्यास त्या सोजिरास तेथेच गोळी घालून ठार मारावा. म्हणोन फार दंगा बायकांबराबर जाहाला नाही. त्या दिवसी सूर्यास्त जाहाल्यावर आम्ही सर्व लोक आपआपोपले बिराडी आलो. तो करकरे या नांवाचा कराडा ब्राह्मण साठपासष्ठ वर्ष वयाचा व त्याचा मुलगा पंचवीस वर्ष वयाचा सकाळी घरातून बाहेर जाण्यास विलंब लागल्याकारणाने सोजीर तेथे येऊन माजघरात दोघाजणांस गोळ्या बंदुकेच्या घालून ठार मारून गेले होते. तेव्हापासून त्या दोघी सासू व सून आपआपोपल्या नवऱ्यांचे प्रेताजवळ बसल्या होत्या. सायंकाळ होताच त्या दोघीस भय वाटू लागले. याजमुळे आमचे बिराडी येऊन सर्व हकीगत सांगू लागल्या. नंतर शेजारी पाजारी सात आठ पुरुष आम्ही जमा होऊन त्याजकडे जाऊन ती पितापुत्रांची प्रेते मागील दारी तुळसी अंगणात चिता रचून पेटवून दिल्ही. लाकडे भरतीची नव्हती सबब घरातील फळ्या, पाळणा, पलंग, बाज व पाट हे भरतीस घालून त्या प्रेतांचा दाहा केला आणि त्या बायकांस आम्ही आपले बिराडी आणिल्या. त्या झासीचे प्रसंगात कोणाचे कोणास अशौच नाही. दुसरे दिवसी फार पुरुष मरण पावले. गोरे लोकांनी दुरून पाहिले म्हणजे जीव बचाविण्याकरिता किती लोक गवताचे गंजीत जाऊन लपले. तेथे गोरे येऊन गवताची गंजी पेटवून दिल्ही, त्या अग्नीत जळून गेले. कितीकांनी गोरा आला असे पाहून विहिरीत उड्या घातल्या. परंतु गोरे लोक विहिरीवर बसून पाण्यावर डोके दिसू लागताच गोळ्यांचा भडमार करून तेथेही मारिले. कितीक लोक शेतखान्यात लपून होते त्यासही शोधून ठार मारिले. गोरे लोक अग्निहोत्री बाबांकडे गेले. तेथे जातात तो सूर्योदयाचा सुमार होता. अग्निहोत्री याणी होम देऊन बाहेर येतात, तो घरात दोन गोरे. गोरे लोकांचे बंदोबस्ताकरिता चार काळे शिपाई शिरले. गोरे जे गेले ते होमशाळेत समोर गेले. तेथे अग्नीचे कुंडावर टोपल्या पाट्या उपड्या घातलेल्या होत्या. याजमुळे गोरे लोकास असे वाटले की, यात अर्थ आहे. म्हणोन लाथेने पाट्या उडऊन पाहतात तो राखडी आहे. यांत पुरलेला अर्थ आहे हे मनांत आणोन आत हात घातला तों अग्नीचे योगाने हात भाजला. मग ते गोरे दोघेही अति क्रोधायमान होऊन अग्निहोत्री यास व त्यांचे भावास व मुलास व बायकोस बंदुकीच्या गोळ्यानी ठार मारून काही सोने, रुपे होते ते घेऊन दुसरी घरी गेले. येकंदर अग्निहोत्री बाबासुाो त्यांचे घरची मनुष्ये अकरा मारली गेली. कुटुंब घातच जाहाला. कितीयेक लोक गोरा पाहून पळण्यास लागले. त्यास रस्त्यात कडामिनीच्या

गोळ्यांनी मारीत असत. याप्रो तीन दिवस बिज्यन केले. आणि लुटीत सोनेरुपे, मोती, पोवळे, हिरा, पाच वगैरे सर्व शहरातून शोधन करून गोरे लोकानी सर्व अर्थ नेला. भिडे यांचे बागेतील सर्व मनुष्ये उपवासी दोन दिवस होती. तिसरे दिवसी पहाटेस दरवाज्यावर पहारेकरी गोरे लोक होते याणी पहाटेस बागात येऊन सर्वांस असे सांगितले की, आपआपोपले घरी जाऊन भोजनाचा सरंजाम आणोन येथे जेवणे करा. असे सांगताच सर्वांनी आपआपोपले घरी जाऊन सीधा सरंजाम आणोन भोजने केली.

तिसरे दिवसी सरकारी शहरचे वाड्यात इंग्रजांचे लोक शिरून सर्व सामान भांडीकुंडी, मालमत्ता, खजिना वगैरे सर्व गाड्यांतून भरून शहराबाहेर आपले गोटात घेऊन गेले. नंतर पुस्तकशाळेत गेले. ती पुस्तकशाळा असी होती की, झासीचा सुभा पेशव्यापासून ज्या पुरुषांनी मिळविला त्या पुरुषापासून गंगाधर बाबा ऊर्फ बाबासाहेब शेवटचा पुरुषपर्यंत पुस्तकांविसी फार उद्योगी जाहाले. चारी वेदांची भाष्ये व सर्व शाखांची सूत्रे भाष्यासमेत व परिसिष्ट भाष्येसुा व स्मृति टीकासह व पुराणे दरोबस्त व सर्व वेदांचे श्रौत व स्मार्त कर्मे याखेरीज ज्योतिष शास्त्राचे ग्रंथ दरोबस्त व वैद्यपणाचे ग्रंथ. बहुधा पुथ्वीवरचे ग्रंथ तेथे होते. झासीपासून चार पांचशे कोशावर ग्रंथ असल्याचे कळताच त्या शहरांत झासीहून लेखक पाठऊन ग्रंथ लिहून आणिले होते. कारणपरत्वे ग्रंथ लागल्यास कासी क्षेत्री झासीहून ग्रंथ पाहाण्यास नेत असत. सर्व ग्रंथास वेष्टणे फार मजबुदीची व फळ्या सिसव्याच्या, सागांच्या होत्या. त्या प्रसंगात इंग्रज सरकारानी पुस्तकांच्या फळ्या वेष्टने सोडून घेऊन पुस्तके धडाधड तिसरे मजल्यावरून रस्त्यात टाकून दिल्ही. त्या पोथ्या वाऱ्याचे योगाने रस्तोरस्ती उडून जात होत्या व वाड्यांत नाना प्रकारची लोणची, मोठाले कथलाचे तपेल्यात घातलेली सर्व वाड्याबाहेर ठेविली होती व वस्त्रे-प्रावर्णे व कापड वगैरे सर्व सामान आपले गोटात नेले. नगारखान्यावर जाऊन नौबदी, नगारे वगैरे सर्व फोडून घेऊन गेले. वाड्यांत काही येक ठेविले नाही. महालक्ष्मीचे देवळात जो सरंजाम होता तोही नेला. काही येक ठेविले नाही. फरासखान्यातील जाजमे, लोड, तक्ये, तंबू, पाले वगैरे सर्व आपले गोटात घेऊन गेले. इकडे बिज्यन तिसरे दिवशी जारीने चालले होते. कारण उद्यापासून लूटमार मात्र सुरू होईल, परंतु मारण्याचे काम बंद होईल. तिसरे दिवसी देवळे, धर्मशाळा, वगैरे सोधून मारीत होते. कोष्टीपुऱ्यांत फारच हाला जाहाला, लोक जीवभीतीने बाहेर पडताच

गोळ्या घालून तेथेच मारीत असत. सर्व रस्ते प्रेतभूमि जाहाली होती. रांगडे लोकांच्या स्त्रिया रस्त्यात गोळ्या लागून फार मृत्यु पावलेल्या पडल्या होत्या. तीन दिवसपर्यंत लोकांस रात्रौ घरात येऊन जे ज्याच्या घरी धान्य होते ते सीजऊन भोजने करीत असत. शहरची वस्ती आठा दिवसा पलीकडे धान्य संग्रह महिन्याचा केलेला असा गृहस्त थोडा होता. तिसरे दिवसी लोकानी सावधपणे खाण्याकरिता धान्य व मीठ वाड्याचे चौकाचे गटारात न दृष्टी पडे असेही ठेविले होते. कोणी भूमीत पुरून ठेविले होते. ज्याजपासी मुळी धान्य नाही ते उपोषणे करून राहात होते. आम्ही मांडवगणे याजकडे गटारात जोंधळे व बाजरी थोडी ठेविली होती.

मांडवगणे गरिब भिक्षुक असल्यामुळे तांदूळ वगैरे धान्ये जुजबी होती, ती मुळीच संपली होती. शहरांत अग्नी पेटविला होता, तेणेकरून फारच हलकल्लोळ चालला होता. जनावरे पाण्याकरिता फार ओरडून ओरडून गतप्राण जाहाली. याप्रो तीन दिवस गेले. आम्हापासी तंबाखू खाण्याची थोडी बहुत होती, ती पुरवून पुरवून तीन दिवस पुरविली. पुढे खाण्यास तंबाखू नाही असे जाहाले. चवथे दिवसी लुटारू लोक काळे मंद्राजी येऊन तांबे, पितळ, कासे, कथील, लोखंड वगैरे धातुमात्र लुटून नेण्यास आरंभ केला. कोणी लोकानी विहिरीत भांडीकुंडी टाकिली होती, त्यास त्या लोकांनी बराबर गळ मोठे मोठे आणिले होते, त्या योगाने विहिरीतून सर्व भांडीकुंडी काढून नेली. झासीत पाणी उथळ असल्याकारणाने भांडी निघण्यास हरकत आली नाही. आम्ही त्या चवथे दिवसी निर्भय जिवाबाो होऊन मौजेने बाहेर ओटीवर बसलो होतो. काळ्यांखेरीज गोरा त्या दिवसी शहरात आलाच नाही. मग आम्ही मंद्राजी लोकास गोड भाषणानी विचारू लागलो, तेव्हा त्याणी सर्व हकीगती सांगू लागले त्याणी असे सांगितले की, तीन दिवस बिज्यनाचे जाहाले. आता चार दिवस राहिले, यात कोणी कोणास मारू नये. तीन दिवसात सोने, रुपे वगैरे जे मिळाले ते गोरे लोकांस सरकारानी बक्षीस केले आहे. आता चार दिवस आम्हास वांटून दिल्हे आहेत. पृथ्वीवरचे राजेरजवाडे व सरदार याजकडील मदती घेतल्या आहेत. त्या त्या लोकांस हिशेबाप्रो वेळा वाटून दिल्ह्या आहेत. आम्हास येक आजचा रोज मात्र दिल्हा आहे. उदईक सकाळी बारा वाजेपर्यंत हैदराबादचे निजामाचे फौजेस दिल्हा आहे. याप्रो वाटणी केली आहे असे त्यांणी सांगून आम्हास तंबाखू मागताच खाण्यास देऊन घरांतील भांडीकुंडी सर्व घेऊन गेले.

आम्ही जेवण करण्यास भांडी रात्रौ बाहेर भूमीत पुरून पाच चार ठेविली होती. बाकी सर्व त्या लोकानी नेली. घटके घटकेनी दुसरे काळे मंद्राजी येत असत. सबब सकाळपर्यंत उपोषणे घडली. रात्रौ सर्व लोक शहराबाहेर गेल्यावर आम्ही स्नाने करून शाळीग्राम व बाण व नर्मदी गणपती घरात राहिले होते. बाकी उपकर्णी व धातुमूर्ती, देवांची कमळे नेली होती. त्या देवांची पूजाही केली. माझी मुळीच पार्थीव लिंगपूजा असल्याने काहीच अडचण आली नाही. बेल मात्र दारी होता. तो काढून पूजा केली. नंतर जोंधळे व काही बाजरी ठेविलेले गटारातून काढून दळून अग्नी पेटवून तवा पितळी नसल्यामुळे गाकरासारखे पानगे अग्नीवर भाजून मीठ मुळीच नव्हते तसेच भोजने केली. सायंकाळी दिवे लावण्यास दिवे समया नाही. तेव्हा दिवल्या मातीच्या लाविल्या होत्या. त्या रात्री जवळचे वाड्यातील मंडळी उमेदवार पाच सात असामी जमून आमचे बिराडी येऊन मजला बराबर घेऊन शहरांत काय आहे हे पाहाण्यास गेलो. वाटेने प्रेते फार पडली होती. जनावरे बेहुष होऊन फिरत होती व शहर जळत होते. लोक व स्त्रिया आक्रोश करून रडण्याचे स्वर ऐकून आम्हासी भीति उत्पन्न जाहाली. मग आम्ही सर्व मंडळी घरोघर येऊन निद्रा केली. पुन्हा उजाडताच दोन तीन वाड्यांचे संधीत हाती उभा करून त्याजवर मोठा सलिदा म्हणजे कंटाळीसारखा असतो तो टाकून त्यांत चिरगुटे- पांघरुणे, सतरंज्या, गाद्या, बैठकी, जाजमे वगैरे सर्व भरून नेऊ लागले. बैल आणून लोकांचे घरी जोंधळे, बाजरी, तांदूळ, डाळी वगैरे जी धान्ये सापडत ती भरून नेली. आम्ही ओटीवर बसून जे लोक येतील त्याजपाशी गोड बोलून तंबाखू खाण्यास मिळवीत असो. लोकांचे घरांत काही येक वस्तु पात्र, वस्त्र ठेविले नाही. मातीची मडकी धान्यदिकांनी भरलेली ओतून घेऊन घरातच फोडून टाकून जावे. याप्रो सर्व वस्तुमात्र लूट जाहाली दारी कोणाचे केळी होत्या. त्या व्यालेल्या असल्यास केलवंडीसुा घेऊन गेले. आमचे बिराडी धान्य जोंधळे व बाजरी थोडीबहुत होती. त्यायोगे यकवार मिठासिवाय खाऊन आयुष्याचे योगाने जगलो. लोकांचे विहिरीचे राहाटास दोर लाविलेले होते तेही लुटून नेले. सातवे दिवसी आम्हापासी येक वेळा खाण्यासही धान्य नाही असे जाहाले. दुसरे कोठे तर मिळणेच नाही. मग सायंकाळी निरशनामुळे व वैशाख मास असल्यामुळे गर्मी उन्हाळी फार जाहाली. सबब गार पाण्यानी स्नान करून

श्रीपार्थिव लिंगपूजा केली. पलीकडे काही येक खाण्यास नाही, त्यायोगाने मन फार दुःखित जाहाले. हर हर परमेश्वरा आम्ही घरून कोणत्या हेतूने निघालो, तो सर्व हेतु जाऊन येथे प्राण संकष्ट पडले. घरून निघाल्यापासून आमचे पत्र घरी नाही व घरचे पत्र आम्हास नाही. घरी मातोश्री, तीर्थरूप वृद्ध व आपले बंधु व स्त्री वगैरे सर्व मनुष्यांस माझे योगाने शोक प्राप्त जाहाला. तेव्हा पुरुषयत्न अगदी खोटा आहे, दैवबळ प्राधान्य आहे. येथे येऊन फार दुःख मात्र सर्व प्रकारचे भोगणे प्राप्त जाहाले. जुनी येक आर्या आहे ती या समई लिहून ठेवितो. या आर्येचे स्मरण बिज्यनापासून होत होते ती--

|| अबला यत्र प्रबला, बालो राजा निरक्षरी मंत्री || नहि नहि तत्र धनाशा जीवित आशापि दुर्लभा भवति ||१|| या आर्येप्रो येथे जाहाले. लक्षुंबाई जे करील ते करणे असी प्रबळ. दत्तक घेतलेला रावसाहेब मुलगा वय बारा वर्षाचे म्हणोन बाळराजा. दिवाण लक्षुमणराव. या दिवाणास कारकुनीचे काम ठाऊक नाही. लिहिणे व वाचणे मुळीच नव्हते. सर्व कागदावर कर्णे तर मोठ्या प्रसंगानी करीत असे, परंतु तोंडी जाब जबाब देण्यात व स्मरण शक्ति हे दोन गुण होते. असो. त्यास निरक्षरता खरी होती, मग येथे आपण जगलो हे ईश्वराचे उपकार समजले पाहिजेत.

सातवे दिवसी लोकांचे घरात शिरून पाहाता मातीची मडकी सुध्धा फुटलेली. मग लुटारू लोकानी मशालीस उपयोगी पडणारी फडकी, चिंध्या वगैरे सर्व घरातून काढून हतीचे सलिद्यांत भरून आपले गोटात घेऊन गेले. याप्रो तीन दिवस बिज्यन व चार दिवस लूट करून काही येक ठेविले नाही. अष्टम दिवस उजाडताच इंग्रज सरकारने असी दवंडी पिटली की, खलक खुदाका, मुलुख बादशाईका, हुकूम इंग्रज सरकारका. सर्व लोकांनी आपआपोपले मकाणात येऊन राहावे. काही येक भय नाही आणि ज्याची त्याणे प्रेते नेऊन मूठमाती वगैरे द्यावी. अशी दवंडी पिटून हजारो भंगी वगैरे मनुष्ये शहरात घालून रस्ते शुध्ध करण्यास प्रारंभ केला. प्रथम दिवसी घरास अग्नी लाविला होता त्या योगाने हलवाई पुऱ्यापासून कोष्टीपुरा वगैरे घरे जळत होती, ती विजविण्याकरिता पाण्याचे बंब सुरू करून अग्नी सर्व शहरातील विजविला. तीन चार रस्ते जेथे आले तेथे तेथे मोठी प्रेतांची खाई करून म्हणजे सर्व त्या त्या रस्त्यांची प्रेते जमा करून तेथेच अग्नी पेटविला. लोकांचे घरात शिरून लाकडे जळाऊ होती ती दरोबस्त काढून त्या प्रेतावर टाकून अग्नी बहुत चेतविला होता. घरात इमारतीस सुटून लाकूड

जितके होते तेवढे काढून गेले. खिडक्यांच्या फळ्या व दरवाज्यांच्या फळ्या लौकर निघण्यासारख्या होत्या त्या व तक्ते सुटे व झोपाळे, पाळणे, पलंग, माचे, बाजा, लाकडी सुटे कठडे वगैरे सर्व लाकडे नेऊन त्या प्रेतांवर टाकून अग्नी मोठा करून सर्व शहरात पेटविला होता.

आम्ही पाच चार मंडली दवंडी ऐकिताच बिराडातोन निघोन शहरात लागलीच फिरण्यास गेलो होता. ते समई रांगडे लोक व दक्षणी लोक हजारो रडत होते, आणि प्रेते कितिक लोक संस्कार कर्ण्याकरिता नेतही होते व सरकारांतोन लोक जमा करून रस्त्यात पेटविलेले खाईत टाकीत होते. या खेरीज, उंट, घोडे, बैल, गाई, म्हशी, टोणगे, कुत्री वगैरे मेलेली प्रेते उचलून शहराबाहेर खंदक होता त्यात हजारो टाकीत होते. याप्रो सर्व शहर प्रहर दहा घटका दिवसापर्यंत शुध्ध केले. आणि सरकारने सरकारवाड्यापुढे दुकाने मांडिली ती असी की, काही तांबोळी पानसुपारी कातचुना, तंबाखू, गांज्या, अफू वगैरे व काही भडभुंज्यांची व काही किराण्याची व काही तांदूळ, बाजरी वगैरे धान्यांची असी दुकाने मांडून तमाम लोक विक्री करू लागले. मग आम्हास पूर्व दिवसाचे उपोषण होते. सबब तेथे जाऊन तंबाखूचा सरंजाम व सडीव तांदूळ वगैरे सर्व जिन्नस विकत घेऊन बिराडी येऊन स्नानसंध्यादि करून भोजने केली. शहरात प्रेते जळत होती, त्या योगाने गंधी अतिशयित वाऱ्याचे योगाने सुटली होती. तेणे करून मनास फार कंटाळा आला होता. परंतु शहरात कारणी वस्तुमात्राची दुकाने जाहाल्यामुळे अडचण आली नाही. भिडे यांचे बागातील सर्व मनुष्ये घरोघर गेली. भीति निर्मूळ गेली. यकंदर दक्षणी लोकांच्या स्त्रिया सवाशेपासून दीडशेपर्यंत मरण पावल्या. रामेश्वराकडील ब्राह्मण- फितुरीचे काम ज्याणे केले तो ब्राह्मण- मोठ्या हर्षाने शहरात फिरून ज्या ज्या वस्तु उत्तमउत्तम आढळत त्या त्या त्या ब्राह्मणाने स्वता उपभोगास घेतल्या व झासीवाले यांचे वाड्यात उत्तमउत्तम कारागिरानी पिताळेच्या, रुप्याच्या वगैरे वस्तु केलेल्या सर्व त्या ब्राह्मणानी नेल्या. कागदावर चित्रे अति उत्तम काढलेली होती ती चित्रे ब्राह्मणांस दिली. इंग्रज सरकारनी बाईसाहेबांचे पदरचे सरदार मुत्सदी वगैरे यांचा शोध घेण्याचा उद्योग सुरू ठेविला होता. जे जे सरदार बंडात होते ते ते सापडले असता शहरात वाड्यापुढे फासी देण्याचे काम सुरू ठेविले होते. किल्यात गोरे लोक जाऊन किल्यातील भांडीकुंडी, वस्त्रे वगैरे सर्व वस्तुमात्र खाली आपले गोटात घेऊन गेले.

शंकर किल्यांतील सर्व सामान नेले. इकडे रात्रौ बाईसाहेब इंग्रज सरकारचे लस्करातून फळी फोडून गेली, ते समई तिजबराबरचे स्वार, सरदार व पायदळ विलायती लोक बहुधा मरण पावले. काही काही लोक बाहेर पडून जीव बचाऊन पळून गेलो. काही काही सापडले ते परत झासीस आणोन फासी दिल्हे. बाईचा बाप मोरोपंत तांब्या हा त्या रात्रीचे प्रसंगात पळता पळता त्यास तरवारीचा वार पायाचे मांडीस लागला होता. मांडी पायजम्यातून फार कापली गेली होती, तरी तसाच घोड्याचे रिकिबीवर भार देऊन घोडे पळवीत पळता पळता उजाडता उजाडता दत्तिया या शहरा नजीक गेले. मग पाहातात तों हे शहर शत्रूचे आहे, परंतु उपाय नाही. मग शहरचे दरवाज्याजवळ जाऊन पाहतात तो सर्व अंग रक्तानी भरले आहे. कपडे लाल जाहालेले पाहून फार घाबरले. तो यक तांबोळी तेथे दरवाज्यांत पाने विकण्याकरिता बसला होता. त्यास पाहून घोड्यावरून हळूच उतरून घोडा सोडून दिल्हा आणि त्या तांबोळ्यास शरण जाऊन मोहोरा काही त्यास देऊन त्यास वश केला. मग तांबोळी याणी राजास मोरोपंत यास हळूहळू आपले घरी नेऊन ठेविला. पुढे तांबोळी याणी राजास सर्व म ।। र सांगोन, राजाकडील लोक घेऊन येऊन त्यांचे स्वाधीन मोरोपंत यास केला. पुढे दत्तियेवाले राजानी त्यास कैदखान्यात ठेऊन इंग्रज सरकारास कळवून त्यांचे स्वाधीन केला. इंग्रज सरकारने डोलीत घालून झासीस आणोन बराबर दोन वाजता वाड्यापुढे फासी दिल्हा. याप्रो जिकडे जिकडे शोध लागला तिकडून धरून आणोन झासीस फासी देत होते. किल्याखाली काळा जरनेली झेंडा लाविला होता. शहरातही शोध करून गुनेगार पकडून लागलीच फासी देत होते. याप्रो सात दिवस पुढेही काम चालू ठेविले होते. नंतर तो झेंडा उतरून कलेक्टरी अमल सुरू केला. आम्ही तेथे बिज्यनाचे वगैरे दिवस जाऊन लुटीचे चार दिवस जाऊन पुढे पंधरा दिवस होतो. आम्हापासी पाच चार रुो रोख व खुर्दा दोन रुपयेपर्यंत होता आणि सोन्याची जोडवी हातातील अडीच अडीच तोळ्यांची दोन राहिली होती. याखेरीज काही येक वस्त्र पात्र नव्हते. शहराबाहेर इंग्रज सरकारचे गोटात झासीप्रो सर्व जनावरे वगैरे व भांडीकुंडी वगैरे जिनसाचे लेलाव सुरू ठेविले होते. रोज लेलावे होत होती. हत्ती, उंट, घोडे वगैरे सिंदे, होळकर, गायकवाड याणी घेतली. झासीवाले यांचा वडिलोपार्जित- गुणी मनुष्यानी पालणा पितळी केलेला-

सिंदे सरकारानी घेतला. याप्रो मोठीमोठी भांडी व वस्त्रे राज रजवाडे याणी लेलावात घेतली, झांसीपो काही येक वस्तु ठेविली नाही. सर्व लेलावे केली.

माझी अशी समजूत जाहाली. बुदलखंडात नपुंसक फार. या योगानेही किंवा भूमीचे योगाने स्त्रिया व्यभिचारिणी फार. तशात झासी राज्यधानी असल्यामुळे, या शहरात मागील भंगिणीचे इतिहासावर लक्ष पुरविले असता हे शहर सर्व फार पातकी जाहालेले. ईश्वराने लक्ष्मुंबाईचे निमित्ताने सर्व शहर शुद्ध जाहाले. आता पूरवापार दोष मुळीच राहिला नाही. असो मग रात्रौ आम्ही उभयता दोघेजण बसून विचार केला. त्यांत असे ठरले की, या देशांत आलो त्यापेक्षा आता श्री गंगेची स्नाने काही करून ब्रह्मावर्त क्षेत्री चार महिने राहून कासीयात्रा करून देशी जावे हे बरे. अर्थ संपादन न होता महा संकष्ट मात्र प्राप्त जाहाले, हा आपले दैवाचा योग आहे. तर काही यात्रा घडाव्या या उदेशे काही पैसाही मिळविला पाहिजे. घरी पैसा न जावे परंतु यात्रेकरिता पैसा मिळविणे प्राप्त आहे, तर आता येथून जावे. श्री क्षेत्र चित्रकूट येथे आपले यजमान वरसईकर हरीपंत तात्या भाव्ये सरकार आश्रित बहुत दिवसाचे आहेत तेथेही जाऊ, म्हणजे तेथील यात्राही होऊन काही पैसाही मिळेल. इत्यादि विचार मनांत आणोन प्रथम येथून डाक चालत्ये असे म्हणतात, तर येक पत्र घरी उदईक रवाना करावे, आणि दिवस पाहून येथून प्रयाण करावे असा विचार ठरला. नंतर दुसरे दिवसी वरसईस तीर्थरूपांचे नांवे पत्र लिहिले. त्या थोडा म ।। र झासीचा लिहून आम्ही पुढे सराईस मार्गशीर्ष पौष अखेर वरसईस येतो. हाली ब्रह्मावर्त क्षेत्री निघोन गेलो. खुशाल आहो. काळजी करू नये वगैरे म ।। र लि ।। पत्र रवाना डाकमार्गे केले. पुढे मुहूर्त पाहून निघालो. ते समई तेथील शेजारी वगैरे लोकांस फार वाईट वाटले. ब्राह्मण येथे येऊन महासंकष्टात पडून अर्थ, पात्र वस्त्रही नाही असे जाणार. मांडवगणे याजकडील मनुष्ये डोळ्यांस पाणी आणोन फार गयवर येऊन स्तब्ध राहिली. आम्ही उभयता काका व मी कंबरेस करगोटे बांधोन लागोटे नेसून लागोट्यांचे आत करगोट्यास सोन्याचे जोडवे पके बांधून ठेविले, आणि दोघा मिळून तंबाखूचा बटवा येकच राहिला होता तो बाहेरून फाटून चिंध्या लोंबत होत्या असा फाटका बटवा बराबर घेतला. त्यांत साधारण लोखंडी अडकित्या व येक डबी जस्ती होती आणि रुपये तीन व येक रुपयाचा खुर्दा इंग्रजी याप्रो बराबर अर्थ होता. कंबरेस येक उपर्णा फाटका होता, तो नेसण्यासारखा गुंडाळून घेतला. येक पंचा डोकीस बांधला होता व येक उपर्णा आंगावर होता व फाटके

बन्यान अंगात घातले होते. आंबाडीचे दोरी पाउणसे हात सुमार घेऊन त्यास तांब्याभर पाणी राहील असे मातीचे मडके लाविले होते. अशा सरंजामानी सर्वांस नमस्कार करून बाहेर पडलो. मांडवगणे हे शहरचे दरवाज्यापर्यंत पोचविण्यास आले होते. तेथे त्याणी करार करून घेतला होता की, तुम्ही यात्रा करून देशी जाल तेव्हा या वाटेने येऊन पुन्हा भेट दिल्यासिवाय जाऊ नये. असे आम्ही कबूल केले. नंतर मांडवगणे परत गेले. आम्ही दोघेही कालपीचा रस्ता धरला. आता हा भाग झासी प्रकर्णाचा पुरता करतो.

श्री वैजेनाथ सांब प्रो

भाग पांचवा

# कालपीचे मार्गावर

कालपीस जाताजाता मजल दर मजल करून कालपी शहर पाच साहा कोशावर राहिले तो येक गांव खेडा वस्तीस आलो. तेथे गांवाबाहेर पूर्वेस चिंचाची झाडी आहे, तेथे भोजनाचे करून भोजन जाहाल्यावर निद्रा केली पहाटची प्रहर रात्र राहिली तो अकस्मात् येकायेकी घोडेस्वार रस्त्यानी उधळत चालिले आहेत. त्या गलबलीने आम्ही जागे होऊन आम्हीही तीच वाट धरून जाऊ लागलो. वाटेने पायी जाणार मनुष्यांस विचारिले की, हे लस्कर कोणाचे आहे ? कोठे गेले होते, जाते कोणीकडे ? असे विचारिता त्याणी असे सांगितले की, आम्ही श्रीमंत पेशवे यांचे नोकर आहो. हाली चरखारीवर इंग्रजाबराबर लढण्याकरिता झासीवाली बाई मुख्य सरदार बराबर आहे. चरखारीवर मोठी लढाई जाहाली. परंतु परमेश्वराने जय दिल्हा नाही. मोड जाहाला आणि परत कालपीस जात आहो. मग आम्हीही चांदण्याचे हळुहळु त्याच रस्त्यानी जात होतो. लस्करही जात होते. पुढे कालपी दोन कोश राहिली. तो तेथे येक कूहा म्हणजे विहीर पाण्याची होती तेथे आम्ही पाणी काढून प्यावे आणि दमही घ्यावा या हेतूने आम्ही उभयता बसलो. तो पाचचार घोडे पिटाळीत स्वार रस्त्यानी विहिरीवरून जात होते. त्यात झासीवाली बाई पठाणाचा वेश पोषाग केलेली आली. तिजला तृषा फार लागल्या कारणानीच घोड्यावरून आम्हास विचारिले की तुम्ही कोण आहा ? तेव्हा आम्ही बाईस ओळखून लागलीच उभे राहून आम्ही ब्राह्मण आहो. आपली आज्ञा काय आहे असे विचारिताच ओळख पटली. आणि घोड्यावरून उतरून विहिरीवर येऊन बसली. नंतर थोड्यांत मजकूर सांगोन तहान लागली आहे, असे म्हणताच मी रसी मडके घेऊन पाणी काढण्यास लागलो. तेव्हा बाईसाहेबांनी उत्तर केले की, तुम्ही विद्वान् तुम्ही पाणी काढून मी पिणार नाही, मीच काढित्ये. असे बोलून माझे हातून पाणरसी घेऊन पाणी काढून आपण पाणी मडक्यास हात लाऊन पिऊन बोलू लागली.

मी अदशेर आट्याची धनीन आहे. मजला रांडभुंडेस काही येक गरज नव्हती. परंतु सर्व हिंदुबद्दलचा धर्मसंमधे अभिमान धरून कर्मास प्रवृत्त जाहाले. परंतु सर्व ईश्वरे यश दिल्हे नाही. चरखारीवर मोठी लढाई केली, तेथेही यश आले नाही. आता थोडेच दिवसात कालपीवर जंग होणार. तुम्ही गरीब भिक्षुक ब्राह्मण तशांत मोठे, घोड्यावरही बसता येत नाही. कालपीस काय हेतु धरून जात आहा ? असा प्रश्न करिताच आम्ही सांगीतले की, कालपीस मंडळी दक्षणी बरीच आहे. त्याजकडून काही भिक्षुकीबाो रुो मिळतील ते मिळवून तसीच यमुना उतरून श्री गंगास्नानार्थ ब्रह्मावर्त क्षेत्री जाणार. बरे असो. असे बोलून आम्हास गुदामात आपण यावे असे सांगोन घोड्यावर बसून बाई कालपीस गेली. आम्ही तेथून निघोन चवऱ्यौंसी घुमटावरून कालपीचे किल्ल्यानजीक जाऊन येका झाडाचा आश्रय करून बसलो. किल्यांतून कोणी ब्राह्मण येईल त्यास येथील सर्व हकीकत विचारून मग बिराड लाऊ असा विचार करीत आहो, तो ब्रह्मावर्तपाो ब्राह्मण सहज बाजारात जाण्याकरिता तेथे आला तो तीर्थस्वरूप काकांचे परिचयाचा होता. सबब काकांची त्या ब्राह्मणाची भेट होताच आम्हास यमुना काठी विस्तीर्ण मंडप दक्षणी लोकास स्नानसंध्या भोजने वगैरे करण्याकरिता घातलेला होता, तेथे आम्हास पोचवून दिल्हे. नंतर आम्ही स्नानसंध्यादि करून भोजन त्या मंडळीत केलें. तेथे रावसाहेब पेशवे व तात्या टोपी व ब्रह्मावर्ताकडील मंडळी होती. सर्व हकीगती समजण्यात आल्या व कालपीस पाच चार दिवसावर लढाई होणार हेही समजण्यात आले. नंतर आम्ही शहर पाहण्यास निघालो. हे शहर लहानसे टुमदार आहे. यमुनेचे काठी किला आहे. तीन आंगे किल्यांची बांधीव चांगली आहेत. यमुनेकडील आंग पाण्यानजीक असल्यामुळे फार शोभा व मजबुदी आहे. किला यमुनेचे पश्चमेस आहे. किल्यापासून येक मैलाचे सुमारे मैदान टाकून पश्चमेस शहर वसले आहे. दक्षणोत्तर शहरची लांबी आहे. यमुना फार खोलीची असल्यामुळे कुवे, विहिरी फार खोल आहेत. त्या शहरात साखरेचा व्यापार फार होत असतो. शहरात लोकांच्या हवेल्या मोठ्या मोठ्या आहेत. रस्ते फार मोठे व फार बारीक असे नाहीत, मध्यम आहेत. किला यमुनाकाठी पश्चमेस असून दरम्यान मैदान असता पलीकडे शहरापलीकडे मोठे लढाईसारखे मैदान आहे. तेथे ८४ चौऱ्यांशी घुमट लाहान लाहान बांधीव आहेत. ते चिरेबंदी पका चुना लाऊन बांधिले आहेत. असे तेथे घुमट समाधी सारखे बांधण्याचे कारण काय याचा शोध करिता पूरवी बादशाईत या जाग्यावर लढाई जहाली होती.

मोठी लढाईचे काम संपल्यावर मोठे मोठे सरदार लोक मरून पडले होते. तेथे तेथे त्यास पुरून त्याजवर कबरी बांधिल्या आहेत. याप्रो आम्ही ते सर्व शहर पाहून तेथेच राहिलो होतो, तेथे दक्षणी लोक बरेच होते. याजमुळे काही रुपये खर्चपुरते मिळऊन तेथून जाण्याचा विचार केला. तो सर्व लोक असे सांगू लागले की, इंग्रज सरकारचे लोक फार नजीक आल्यामुळे काळे लोकांनी शहर आत घेऊन मोरच्ये बांधून तोफा मोरच्यावर ठेऊन सर्व लढाईची तयारी करून वाट पहात बसले आहेत. केव्हा येथे जंग होईल याचा भरवसा नाही. नावेतून यमुना उतरून जाण्यास रस्ता नाही. पलीकडे इंग्रज सरकारानी फार बंदोबस्त ठेविला आहे, त्यापेक्षा आता आपण येथून जाण्याचा विचार करू नये. असे सांगताच आम्ही उभयता झासीवालीबाईस जाऊन भेटून तिणे असे सांगीतले कीं, बहुधा आजच रात्री लढाई होईल. तर तुम्ही येथून उत्तरेस चार कोसावर यमुनेचा काठी आपल्या कडील लोक घाट यमुनेचा धरून राहिले आहेत तेथे जाऊन नावेनी उतरून अंतरवेदीत जावे, आणि मोठा रस्ता टाकून बारीक रस्त्यानी ब्रह्मावर्ती जाऊन राहाने. असे सांगोन खर्चास काही रुपये दिल्हे, ते घेऊन आम्ही बिराडी आलो. त्याच दिवसी तेथे लढाई सुरू जाहाली. तोफा व हस्तनळीच्या तोफा, कडामिनी बंदुकांचे आवाज होऊ लागले. त्या रात्री सर्व लोकांस निद्रा आली नाही. असी तीन दिवस लढाई होऊन चवथे दिवसी पेशवे यांचा मोड होणार असे काळे लोकांस समजताच ते लोक त्या शहरात शिरून लूट करू लागले. व्यापारी लोकांकडे साखरेच्या गोण्या, पोती भरली होती ती सर्व ओढून रस्त्यावर टाकिली होती. रस्त्यात जिकडे तिकडे साखर पसरली होती. काहीसे शहर लुटले गेले, तो इंग्रज सरकारचा जय होऊन काळे लोक दशदिशा रण सोडून पळावयास लागले. भयातुर जाहालेले जीव भीतीने ज्यास जसा रस्ता सापडला तसेतसे सर्व पळून गेले. तात्या टोपी व रावसाहेब हेही पळून गेले. ते समई आम्हीही तेथून निघोन उत्तरेस यमुना काठी चार कोशांवर नाव होती, त्या घाटावर गेलो. तों लढाईत पराजय जाहाल्याचे तेथील लोकास कळताच तेही पळून गेले. तेथे येक सरदार होता त्याचे बहुत आर्जव करून नावाडी बलाऊन आम्ही यमुना उतरून अंतरवेदीत गेलो. मोठा रस्ता टाकून बारीक गांवाहून बारीक रस्ते पाहून जात असता, येके ठिकाणी आम्ही उन्हाळी फार सबब आराम करण्यास बसलो होतो. तेथे पाच चार असामी रांगडे येऊन आम्हास धमकी दिल्ही आणि आम्हापासी काय आहे ही चौकसी करू लागले. ते समई आम्ही त्यांस असे सांगितले की,

आम्ही गरीब यात्रेकरू ब्राह्मण आहो. परंतु तुम्ही आम्हास फत्तेपुरास नेऊन पोचविल्यास तुम्हास आम्ही पाच रुो देऊ. असे सांगताच त्याणी आम्हास धरून सर्व रुपये घेतले. आम्हाला उलटे खर्चासाठी पाच रुपये मात्र दिल्हे ते घेऊन दरमजल आम्ही मजल करीत करीत चालत होतो. ता ब्रह्मावर्तप्राो येक रांगडा ब्राह्मण कालपी कडून आला तो काकांचे परिचयाचा होता. त्याजला श्रीमंतांचा समाचार विचारिता त्याणे असे कळविले की, कालपीवर मोड जाहाला आणि सर्व लोक दिलगीर होऊन जंगलात फिरू लागले. ते समई द्रावीड शास्त्रीबाबाचा शोध क़रू लागले. कारण श्रीमंत बाजीराव साहेब याणी केरळ ज्योतिषाचा पाहाणार सिद्धान्ती द्रविड ब्राह्मण पदरी बहुत वर्षे ठेविलेला होता. त्याजवर बाजीरावाची मर्जी फार होती. नानासाहेबांची पत्रिका त्याणे केली होती. सर्व वर्तऊन ठेविले होते. तो ब्राह्मण वृद्ध फार जाहलेला. पुढे नानासाहेब त्याचे सर्व चालवीत असत. याप्रसंगी कोठे गेला असेल तो असो. द्रवीडशास्त्री जिकडे जाण्यास सांगतील तिकडे आपण जावे या हेतूने कालपीवर मोड जाहाल्यावर द्रवीड शास्त्रीबाबाचा शोध बारकाईने करिता जालवण मुकामी कोणी येक ब्राह्मणाकडे दोनचार सिस्यासमेत आहेत असा शोध लागताच श्रीमंत रावसाहेब व तात्या टोपी हे उभयता जालवणास जाऊन बारकाईने शोध लावून शास्त्रीबाबास भेटले. त्याणी पाटी घालून गणित करून असे सांगितले की, तुम्ही आता येथून पश्चम दिशेकडे जावे म्हणजे तुम्हास हाती, घोडे, उंट वगैरे व द्रव्य विपुल मिळेल. तर तिकडे सिंद्यासिवाय कोणी नाही, सिंदेसरकारवर स्वारी करावी. असा ठराव होऊन सर्व फौज जंगलात येक ठिकाणी होऊन ग्वाल्हेरीस जाण्याचा विचार ठरला आहे. ग्वाल्हेरीस खुद सिंदेसरकारचा अभिप्राय बंडवाले लोकांकडे काहीसा दिसत आहे. परंतु दिवाण दिनकरराव राजीवाडे याचे मत पूर्णत्वेकरून इंग्रज सरकारकडे असल्यामुळे विचार चालला आहे असे त्याणी आम्हास सांगोन तो तेथून लागलीच निघोन जवळच त्याचा गाव होता तेथे गेला. पुढे आम्ही हळुहळू पायीच बारीक रस्त्यानी अंतरवेदीत जाताजाता ब्रह्मावर्तापासून तीनचार कोशावर क्षीरगर्तेश्वर ऊर्फ खिरागाडेश्वर सांब सिवलिंग आहे तेथे गेलो, त्या दिवसी सकाळपासून मनास अतिहर्ष जाहाला होता. कारण आज रोजी श्रीभागीरथी गंगेचे दर्शन स्नान घडेल, म्हणोन त्या दिवसी फराळ वगैरे वाटेने न करिता सायंकाळचे चार वाजता तेथे गेलो. तसेच श्री गंगेवर गेलो. जन्मापासून त्या दिवसासारखा मनास आनंद कधीही जाहालाच नाही. ते गंगेचे पात्र दृष्टीस पडले व काठी कुशकाश, दर्भ व

पाण्याचे तुंबीस कमळांचे समुदाय पाहून परमानंद जाहाला. जन्माचे सार्थक जाहाले. आज आपण बहुत दुःखे काढिली परंतु सर्वांचे सार्थक आज जाहाले. त्या दिवसाचे आनंदास उपमा देण्यास सुचत नाही. मग स्वइच्छ स्नानपान करून परत बिराडी येऊन निद्रा केली. पहाटेस उठोन श्री क्षेत्र ब्रह्मावर्तास सकाळचे चार घटका दिवसास पोचलो. तेथे वाो रा. श्री. बाबा कर्वे याचे वाड्यात मामासाहेब फडके वाकनीस राहात होते तेथे गेलो. नंतर तीर्थविधी करून श्राद्धादि क्षेत्र संमधे कृत्य केले आणि पाच चार दिवस राहिलो. तेथील जाहालेला म||र सर्व लोकांनी सविस्तर सांगितला, तो पूर्वीचे भागांत लिहिला आहे. ध्रुव घाटापासून भूतेश्वरपर्यंत क्षेत्र सर्व पाहिले.

## चित्रकूटाचे वाटेवर

ब्रह्मावर्त क्षेत्रांतून ब्राह्मण मंडळी चित्रकूटास जाण्याकरिता दहा बारा आसामी दोनतीन दिवसी निघणार कारण तेथे श्रीमंत नारायणराव व माधवराव पेशवे आहेत त्याणी काही आनुष्ठाने सुरू केली आहेत, आपल्यासही प्राप्त होईल या हेतूने ते ब्राह्मण जात आहेत असी आम्हास बातमी लागताच आम्हीही विचार केला की, तेथे आपले यजमान रा. श्री. हरीपंत तात्या भाव्ये वरसईकर बहुत दिवस सरकारचे पदरी आहेत त्यासही भेटून काही दिवस तेथे राहू म्हणजे कासी यात्रेचे खर्चाची तजवीज लागेल हे मनांत आणोन तेथील सोबती याचा विचार पाहून त्या मंडळीबराबर चित्रकूटास जाण्यास निघालो. वाटेने पाच साहा आसामी मिलोन जेवण वगैरे करून मजल दरमजल जात असता येक मुकामावर मजला सरदगर्मी होऊन आती ज्वर आला. तेणेकरून वमन व रेचही बरेच जाहाले. पाहाटेस काहीसे बरे वाटले. ब्रह्मावर्तपाो मंडळी असल्यामुळे ती|| काकांचे परिचयामुळे दोन दिवस खोटी करून पुढे मजल दरमजल करीत चित्रकूटास जाऊन पोचलो. रा. श्री. हरीपंत हे ती|| काकांचे परिचयाचे होते. त्यांचे वय सुमार पंचैसी वर्षांचे होते. परंतु सर्व शरीर स्वाधीन होते. त्यांची स्त्री मरण पावली होती. पुत्र कन्या मुळीच जाहाली नव्हती. सबब येक दत्तकपुत्र घेतल्यावर त्याचे लग्न केले. तोही पाचचार वर्षांनी मरण पावल्यावर त्याची बायको व ते असी दोघेच होती. पुढे हरीपंत याणी वरसईस पत्र पाठऊन आपले सखे बंधूचा पुत्र कासीनाथ राव हा दत्त घेण्याकरिता चित्रकूटास आणिला होता. त्यास येऊन तीन वर्षे जाहाली होती. दत्तविधान जाहाले नव्हते. तो त्याजपासी होता. तो

वरसईहून आल्यावर मागे त्याचे तीर्थरूप मोरोपंत भाव्ये यास देव आज्ञा जाहाली, ही त्यास समजली नव्हती. कारण दिवस दंग्याचे, डाका वगैरे सुरळीत चालत नव्हत्या. आम्हास खबर सिंद्याचे लष्करात समजली होती की, आश्वीन शु।। ९ स देव आज्ञा जाहाली. पुढे सर्वांच्या भेटी होऊन आनंद त्यास व आम्हास जाहाला. पुढे परस्पर कुशल वृत्ते कळविता हेही वर्तमान आम्ही सांगितले. मग पयोष्णी गंगेवर कासीनाथ यास नेऊन क्षौरादि कृत्य करविले. आम्ही तेथे स्वस्थ राहिलो. तेथील हकीकत सर्व समजण्यात आली.

तेथे श्रीमंत नारायणराव व माधवराव हे इंग्रज सरकाराबराबर बिघडले नव्हते. परंतु त्याचा दिवाण राधाकिसन म्हणोन परदेसी होता, तो बिघडला होता. इंग्रज सरकार हा विपरीत प्रसंग प्राप्त जाहाला. ते समई तेथील कलेक्टर वगैरे जे साहेब होते त्याणी तेथील पंचवीस लक्षरुो जमाबंदीचा मुलुख दंगाईचे मुलुखासु।। श्रीमंत नारायणरावसाहेब यांचे स्वाधीन केला व कागदपत्र दप्तर स्वाधीन करून साहेबलोक जीव भयानी निघोन गेले. पुढे दिवाण याणी मुलखाचे बंदोबस्ताकरिता नवीन सिपाई व सरकारच्या बिघडलेल्या पलटणा नोकरीस ठेविल्या व दारूगोळे व नव्या तोफाही काही ओतिल्या होत्या. दिवाण परदेशी अगदी बिघडला होता. परंतु श्रीमंत नारायणरावसाहेब इंग्रज सरकारासी किमपि बिघडले नव्हते वगैरे सर्व म ।। र तेथील समजण्यात आला. येक दोन दिवसांनी आम्ही तेथून नजीक चित्रकूट पर्वतावर कामथानाथाचे यात्रेस निघोन गेलो. गयोष्णी गंगा शहराचे निकट भागी पश्चमेस वहात आहे. ती उतरून राघोप्रयागी स्नाने करून कामथानाथाचे दर्शन घेऊन पर्वतास प्रदक्षणेस गेलो तेथे भाजलेले चणे बराबर बरेच न्यावे लागतात, कारण त्या पर्वतावर वांद्रे माकडे हजारो आहेत. त्यांची हादी वाटलेल्या आहेत. हादीपर्यंत माकडे, वांद्रे यात्रेकरू लोकांबराबर येतात. त्यांस चणे फुटाणे द्यावे लागतात. व त्या पर्वतावर मनुष्य जात नाही. श्रीराम व सीता एकांतात तेथे असतात. त्याणी शाप दिल्हेला आहे तेथे पर्वतावर कोणी येऊ नये. लक्ष्मणजीही त्या पर्वतावर गेले नाहीत. जवळच येक दुसरा पर्वत आहे, त्याजवर फक्त लक्ष्मण राहातात. तेथेही आम्ही जाऊन यात्रा करून आलो. त्या पर्वतावर पारिजातकांचे वृक्ष फार आहेत. तिकडील लोक पारिजातकाच्या काट्यानी घराची ओमणे करून वर कवले लावितात. पयोष्णी गंगेत रोज स्नान केले असता अंगास कंडू उत्पन्न होत्ये. कारण पयोष्णी तीरी बचनागाचे वृक्ष फार आहेत, त्याचे मुळ्यातून पाणी येत आहे. असो यात्रा

करून परत चित्रकूट शहरात आलो.

राजश्री हरीपंत तात्यानी असे आम्हास सांगितले की, तुम्ही वाो रा. श्री. चिमणभटजी याजकडे जाऊन भेटावे म्हणजे तूर्त नित्यदाने प्रथम येतील आणि पुढें अनुष्ठानेही लावितील. आम्ही त्यास सांगितले आहे. त्याच दिवसी सायंकाळी आम्ही चिमणभटजीस जाऊन भेटून दुसरे दिवसी आम्हास अनुष्ठानाकडे येक महिन्याची योजना केली आहे तर तुम्ही उदईक सकाळी आठ वाजता यावे, असे आम्हास सांगितले.

## श्रीमंतास भेटीचे आमंत्रण व कैद

घरी आलो तो असी बातमी लागली की, श्री. पयोष्णी गंगा उतरून दोन कोशावर कपतानसाहेब आला आहे. बराबर गोरे लोकांची दोन पलटणा आहेत. त्या साहेबानी पत्र देऊन स्वार श्रीमंताकडे पाठविले आहेत. पत्री म ।। र की, आपले भेटीचे प्रयोजन आसल्यामुळे आपण उभयता बंधु व दिवाणजी बराबर घेऊन उदईक सायंकाळपर्यंत आमचे गोटात येऊन भेटावे. बराबर हातेरे किंवा सिपाई लोक कोणी आणू नयेत. श्रीमंतानीही पतर वाचून लीाो प्राो उदईक येऊन भेटू, असा त्याच पत्रावर शेरा लिहून दिल्हा आहे. पुढे संध्यादि कर्म करून रात्रौ ते दिवसी सर्वांस निद्रा आली नाही. शहरचे लोक सर्व तजावजा जाहाले होते. सर्व रात्री लोक रस्त्यात फिरत होते. जिकडे तिकडे याच गोष्टी चालत होत्या. कितीक लोकांचे मत श्रीमंतानी जाऊ नये. कारण गेल्यावर कैद करून ठेऊन सर्व लुटून नेतील. कितीक असेही बोलत की, इंग्रजांबराबर श्रीमंताचे वाकडे मुळीच नाही. दिवाण वाकडेपणाने वागत आहे, त्यास त्यांचा उपाय नाही. यास्तव खरे रीतीने जाण्यास हरकत नाही. इकडे वाड्यात अवसीचे बारा घटका रात्री परदेशी दिवाण येऊन श्रीमंतास न जाण्याबाो बहुत प्रकारे उपदेश केला. आपण त्यांचे बलावण्याप्राो गेल्यास मुठभर दारू खर्च न होता तुमची जिंदगी सर्व जाऊन तुम्हीही प्राणास मुकाल. त्यापेक्षा आपल्यापासी दारूगोळा बहुत आहे व लढेवाईक लोकही बरेच आहेत. त्यापेक्षा येथेच राहून जंग करावा. त्यास लौकिक होईल. कधी तरी मरणे आहे. असे रांडमरणानी मरू नये. या उपर सरकारची मर्जी इत्यादी बहुत बोलणी जाहाली. अखेर श्रीमंत साहेबाकडे जाणार असी दिवाणजींची खात्री जाहाली. नंतर राधाकिसन परदेशी दिवाण याणी सरकारास असे कळविले की, आम्ही तर तुम्हाबराबर येत नाही. सर्व फौज व तोफा हातेरे,

दारूगोळा घेऊन आताच वाट फुटेल तिकडे जाणार. परंतु तुम्ही आम्हास खर्चा करिता दोन लक्ष रुपये द्यावे, न द्याल तर आम्ही घेऊ. असे भाषण करिताच श्रीमंतानी विचार केला की, याजला आपण खुसीने रुो न दिल्ह्यास वाड्याबाहेर पलटणी फौज आणिली आहे. सर्व लुटून फस्त करितील, त्यापेक्षा दोन लक्ष रुपये द्यावे हे बरे असा विचार करून रुो तेव्हाच दिल्हे. ते रुपये घेऊन दिवाणसाहेब वाड्यातून बाहेर पडून सर्व फौज बराबर घेऊन मध्यरात्रीस जंगलांत निघोन गेले तेथून दाहा बारा कोशावर पाहाडी किल्ला बंदोबस्ताचा होता तेथे गेले.

इकडे श्रीमंतानी ज्योतिषी बाबास बलाऊन आणोन त्यास असे विचारिले की, उदईक सायंकाळपर्यंत आम्हास साहेबाचे भेटीस जाण्यास मुहूर्त केव्हा आहे तो सांगावा. त्याजवरून जोसीबाबानी मुहूर्त उजाडता साडेपाच वाजता लग्नशुद्धी बरी आहे. बाकी उदईक दिवस चांगला नाही. मर्जीस येईल तसे करावे. नंतर नारायणराव व माधवराव साहेबांनी साडेपाच वाजता जावे असा निश्चय केला आणि पहाटेस स्वारी तयार होऊन बाहेर पडली. बराबर शिवबंदीचे लोक मात्र होते. हातेरे सर्वांनी ठेऊन सिपाई सर्व निघाले होते. येकंदर स्वारीचे मनुष्य दोनसेपर्यंत असावे. माधवराव व नारायणराव साहेब मेण्यात बसले होते. भालदार पुकारत होते. मशाली बहुत पेटविल्या होत्या. असी स्वारी उत्तर दरवाज्यातून निघोन पश्चम रस्त्यावर येऊन पयोष्णी गंगेवर जाऊ लागली. ते. समई आम्ही भाव्ये यांचे वाड्याचे माडीवर रस्त्याकडील बाजूवर खिडकी उघडून स्वारीची मौज पाहात बसलो होतो. अशा थाटानी स्वारी गंगा उतरून पलीकडे गेली तो चांगले उजाडले. नंतर साहेबाचे तंबू सकाळी साहा घटका दिवसास सुमारे दिसू लागले. पुढे जाणार तो साहेबाकडील स्वार येऊन त्याणी असे कळविले की, सर्व लोकानी येथे राहून फक्त श्रीमंत नारायणराव व माधवराव साहेबांनी मेणा टाकून पायीच भेटीस यावे. बराबर येकही मनुष्य असूं नये. असे ऐकिताच उभयता श्रीमंत मेण्यातून उतरून चालू लागले.

श्रीमंत लोकांबराबर छत्री मस्तकावर धरणारा मनुष्य असतो. परंतु बराबर दुसरा मनुष्य न्यावयाचा नाही. सबब छत्री देखील बराबर नाही. उन्हाळीचे दिवस. उन्हाळा फार. तशा तापात साहेबाचे तंबूसमोर दोघेही गेले. तो साहेब खाणे खात बसला होता. पुढे खाणे खाऊन तंबूत साहेब असता श्रीमंताची दाद चार घटका मुळीच घेतली नाही. तेणेकरून श्रीमंतास ताप अति जाहाला. उन्हाळीने जीव फार कासावीस जाहाला. सर्वांगास घाम सुटला. तृषाक्षुधाही अति उत्पन्न

जाहाली. परंतु उपाय नाही. पुढे साहेब बाहेर येऊन त्यास असे सांगितले की, तुम्हास सरकार हुकुमावरून कैद केले आहे. असे सांगोन पंचवीस असामी गोरे लोक नागवे तरवारीचे भोवताली येऊन गराडा घालून कैद केले. नंतर गोरे लोकांचे पाहाऱ्यात ठेऊन तसेच परत श्रीमंताचे लोक जेथे होते तेथे नेऊन स्नान करवून भोजनास पाहाऱ्यातच ठेविले. पुढे गोरे लोकांचे पाहाऱ्यातच ठेऊन तो दिवस गेला. दुसरे दिवसी सकाळी चार घटका दिवसास चित्रकूट शहरात पाच साहाशे गोरे व काही काळे लोक येऊन श्रीमंतांचे वाड्यात शिरले. समोर दिल्ली दरवाज्यावर नगारखाना होता. तेथे वर चढून नौबदी, नगारे, सिंगे वगैरे सर्व बाहेर रस्त्यात धडाघड लोटून दिल्हे. वाड्यांतही जाऊन सर्व कामगार मनुष्ये बोलाऊन टीप करून कैद केली. तितक्यात नारायणराव साहेबाची बायको जवळचे बंगल्यात जाऊन माडीवर बसली. साहेब लोकानी सर्व जिंदगी गाड्यात भरून गोटात नेण्याचे काम सुरू केले. भांडीकुंडी मोठी लहान सर्व भरून घेऊन जात होते. वाड्यापासून येक कोशपर्यंत येकसारख्या गाड्या वाहात होत्या. सोने, रुपे, जडाव, हिरे, मोती, माणिक, खजिना सर्व घेऊन गेले. मोहरा, पुतळ्या वगैरे काही येक ठेविले नाही. कापडाची दिंडे व सुटे कापड व बिछाने, सत्रंज्या, जाजमे, लोड, तक्ये, फरासखाना व सर्व हातेरे तरवारी, तोफा, बंदुका वाड्यात- फार काय लिहू- परंतु सुपे, टोप, टोपल्या, रोळ्या, चिंध्या, चांगल्या लाकडी फळ्या, घोंगड्या, कांबळे वगैरे वस्तुमात्र नेली. द्रोण पत्रावळीसु।। काही येक ठेविले नाही. दही, दूध, तूप, साखर, गूळ वगैरे तांदूळ गहू वगैरे सर्व कोठी लुटून घेऊन गेले. नंतर नारायणराव यांचे बायकोजवळ जाऊन त्याजपाशी अंगावरील दागिने मागितले. तिणे लागलीच नथीखेरीज सर्व दागिने काढून दिल्हे. ते घेऊन बाईसाहेबांस असे सांगितले की, आपले या गावात कोणी आप्त असल्यास तेथे राहण्यास जावे हा मेणा तयार आहे. असे बोलून भोईसुध्धा मेणा दाखविला. नंतर बाईसाहेबांनी ईश्वरस्मरण करून मेण्यात बसून आपले माहेरचे समंधाचे आप्ताकडे बाई निघोन गेली. नंतर देवघरात जाऊन देव सर्व उपकरणीसु।। नेली व पाट, चौक्या, चौरंग सर्व जिंदगी गाड्यांत भरून तमाम गाड्या नेल्या. चित्रकूटवाल्यापाशी अर्थ बहुत असून व्यवस्थित सर्व जिनसा होत्या. येकंदर सोने, मोती, जवाहीर मिलोन चार कोटीची मुख्य दौलत, खेरीज भांडी वगैरे यापैकी काही येक ठेविले नाही. इकडे श्रीमंतास नागवे तरवारीचे पाहाऱ्यांत ठेविले होते. पुढे दोन दिवसी त्यांचे मनुष्यपो शंभर मनुष्ये बिनहातेरी, त्यातच आचारी,

पाणके, सिष्ये, हुजरे वगैरे इतर होते असी शंभर मनुष्ये ठेऊन बाकी माणसास रजा दिल्ही. वाड्यांत मनुष्ये होती त्यांचा तपास करून सर्व कागदपत्र थोड्यात हिशेब घेऊन मनुष्यास रजा दिल्ही. चित्रकोटचे वाड्यांत सुतळीचा तोडाही सरकारी राहिला नाही. यकंदर आठ दिवस तेथे साहेब राहिला होता. पुढे चित्रकूटावर काही बंदोबस्ताकरिता लोक ठेऊन, कैद केलेले श्रीमंत बराबर घेऊन पळटणासमेत साहेब धुलपूरकराचे मुलखात बांद्यास जाण्याकरिता कूच करून मुकाम दर मुकाम चालते जाहाले. आम्ही चित्रकोटात होतो तों श्रीमंताचे वाड्याभोवती पूर्व, पश्चम दक्षणोत्तर लोकांचे वाडे होते. त्या सर्व लोकास वाडे खाली करून आठा दिवसास द्यावे नाहीपेक्षा आम्ही वाडे मोडून काढू. त्याप्रमाणे सरकारी वाड्याभोवतालचे वाडे सर्व मोडून जागा मैदान केली. पुढे आम्ही जावे कोठे, कसा विचार करावा म्हणोन विचारांत राहिलो. मग असा विचार ठरला की, ब्रह्मावर्ताची मंडळी व काही चित्रकूटची मंडळी दंघाईचे मुलखांतून बांद्यावरून वाकडे वाटेने जालवणास जाणार. त्यांचे बराबर आपणही जावे. तों तेथे असे ऐकिण्यात आले की, बांदे हे संस्थान धुलपूरकर नबाब याचे होते. परंतु पलटणी लोक काही तेथे येऊन नबाबास बिघडऊन बंडासारखी तजवीज करू लागला. इंग्रजाबराबर वाकडा होऊन इंग्रज सरकारचे नुकसान बहुत केले. पुढे इंग्रजानी गोरे लोकांची फौज घेऊन येऊन बांद्यावर लढाईचा प्रसंग आला. त्या प्रसंगात नबाबाचा मोड होऊन पळून गेला. नंतर इंग्रजांनी नबाबाचा वाडा सर्व लुटून फस्त केला. ते समई सर्व रयत लोक भिऊन गेले होते, परंतु रयतेस काही येक उपद्रव जाहाला नाही. फितूर वगैरे नबाबाचे लोक जितके सापडले ते बांद्यास आणोन फासी दिल्हे. बांदे शहर इंग्रजांनी हस्तगत कर्ते समई सर्व लोकांस भीती उत्पन्न जाहाली की, आता इंग्रजी लोक येऊन शहर लुटून टाकितील. हे मनांत आणोन ज्याचा तो आपले व्यवस्थेत लागले.

## गुजराथी सावकार

तेथे हरिकर्ण रविकर्ण म्हणोन गुजराथी सावकार मोठा राहात होता. गुजराथी असून हिंदुस्थानांत राहाण्याचे कारण काय असा संशय आहे. त्यास पुरवी पेशवे दिल्लीवर स्वारी करू लागले ते समई पृथ्वीवर सर्व सावकार लोक जमा केले आणि प्रथक प्रथक सर्वांस असे श्रीमंतांनी विचारले की, तुमची हुंडी लांब कोठपर्यंत चालते ? तेव्हा सर्वांनी आपआपोपली हिमतीप्रो सांगितले. परंतु हरिकर्ण

रविकर्ण याणे असे सरकारास कळविले की, महाराज पृथ्वीवर जेथे धूर निघत तेथे माझी हुंडी चालते. असे सांगताच त्यास हुकूम जाहाला की, आमचे स्वारी बराबर हिंदुस्थानांत यावें. पुढे स्वारीबराबर सावकार होते. स्वारी करून परत येते समई बांदे येथे धुलपूरकराचे राजधानीत वाडा बांधून मुख्यत्त्वे तेथेच राहिले, जिकडेतिकडे बंड प्रकर्णी गल्बा जाहाला तेव्हा हरिकर्ण याणी बांद्याहून येक कोटीचा अर्थ मोहरा पुतळ्या चित्रकूटास नेऊन श्रीमंत नारायण रावसाहेब यांचे घरी खजिन्यात ठेवीप्रो ठेविला. कारण बांद्याचा नबाब इंग्रजाबराबर बिघडला आहे. यास्तव येथे भय आहे आणि चित्रकूटाची जागा विशेष बंदोबस्ताची आहे, सबब तेथे अर्थ नेऊन ठेविला. चित्रकूटातही सामान्य गृहस्तानी आपआपोपल्या घरांतून थोडा बहुत अर्थ होता तो श्रीमंतांचे वाड्यांत नेऊन ठेविला. चित्रकूटात गरीब विधवा बायका याणी गांवात मोलमजुरी करून पोहे वगैरे कांडून शंभर रुपयापासून तीनशे रुपयेपर्यंत दाहा बारा विधवानी निर्भय जागा पहारेबंदीची श्रीमंतांचा वाडा पाहून त्या बिचाऱ्या बायांनी अर्थ नेऊन वाड्यात ठेविला होता. परंतु सर्वांचे नसीब खोटे. तेथूनही अर्थ इंग्रेज सरकारने लुटून नेला. पुढे बांदेवाला हरिकर्ण याणी इंग्रजास असे कळविले की; आम्ही फंद फितूर वगैरे कारणात नसता आमचा अर्थ चित्रकूटास होता तो खजिन्यांत ठेविला होता याजप्रो कागदपत्रही आपल्यास सापडले व जे आमचे अर्थाचे बातेले होते त्याजवर आमचे नावाची चिठी होती तो अर्थ आमचा आम्हास द्यावा. तो अर्थ द्यावयाचा नसल्यास आम्ही सरकारास व्याजी रुो दिल्हेले आहेत ते सव्याज येक महिन्याचे आत आमचा ऐवज द्यावा. म्हणजे आम्ही व्यापार पेढी काढून गुजराथ देशात जातो. असा हरिकर्ण सावकार याणी विलायतेस अर्ज केला. त्याजवरून इंग्रज सरकारनी असा विचार मनांत आणिला की, तूर्त चित्रकूटाहून अर्थ त्याचा आपण समजून आणिला आहे, त्यास तो द्यावा. कारण आपल्याकडे ऐवज फार आहे तूर्त या प्रसंगी तो ऐवज देता येत नाही. असा विचार करून हरिकर्ण सावकारास येक कोटीचा अर्थ त्याचा त्यास दिल्हा. ही खबर चित्रकूट येथे समजताच तेथील पोहे कांडणार विधवा स्त्रियांनीही आपाआपोपले रुपयांबाो इंग्रजसरकारास अर्ज केले होते परंतु त्यांचे रुपये सरकारनी दिल्हे नाही; अशा सर्व खबरी चित्रत्रिकुटास लागल्या. चित्रकूट येथे काही रुपये आम्हास मिळाले. परंतु दिवस दंग्याचे सबब वस्त्रे पात्रे वगैरे काही येक न घेता ब्रह्मावर्ताप्रो काही ब्राह्मण व चित्रकूटप्रो काही ब्राह्मण येकंदर नऊ असामी ते व आम्ही दोघे मिळोन अकरा असामी

चित्रकूटातून निघोन सर्वांस विचारून मुक्काम दर मुक्काम रस्त्यानी चालते जाहालो.

## काकांस लूक लागली

येके दिवसी असा प्रकार जाहाला की, प्रातःकाळी उठोन सर्व मंडळी चालू लागली. चित्रकूटांतून निघताना सर्व मिलोन भाड्याची गाडी येक करून त्यात सर्वांनी आपआपोपली ओझी टाकून गाडीवर फक्त गाडीवान् मात्र होता. बाकी मंडळी सर्व पायी चालणारी होती. आम्ही मस्तकास येकक पंचा व नेसूपंचा, आंगावर उपर्णा अंगात बन्यान, तंबाखूचा बटवा व सत्तूची पिशवी व साखर मेथीचा पाला वाळलेला आणि पितळेचा कटोरा म्हणजे पातळ मोठी वाटी याप्रो आम्हापासी सरंजाम होता. बाकी थोडे बहुत चिरगुट पांघरुण व पाणी पिण्यास भांडी तूर्तातूर्त होती. ती चीजवस्तु बांधून गाठाडे करून ओझ्याचे गाडीत टाकले होते. ती गाडी पर्ह्याटेस आम्हा पूरवीच घटकाभर चालू जाहाली होती. मागाहून आम्ही मंडळी चालू लागलो. दिवस उन्हाळीचे. प्रहर दिवस येताच येके जागी बागात छायेखाली उतरून स्नानसंध्यादि कर्म करून पुन्हा चालू जाहालो. दाहा बारा घटका दिवसास फार उन्हाळा सबब येके गावी बागात छाया पाहून सर्व मंडळी उतरली. तेथे आराम बराच करून बराबर दोन वाजाचे सुमारास उठोन रस्ता चालू लागलो. मंडळी वाटेने अनेक गोष्टी बोलत चालत होते. आम्ही उभयताही बोलत बोलत चालत होतो. तो तीर्थस्वरूप काकांस येकायेकी उन्हाळीची लूक लागली, परंतु माझे समजुतीत आली नाही. काही वेळ बोलत नाहीसे जाहाले. वाटेने चालते वेळे अंगाचे झोक जाऊ लागले. ते समई मी जवळ चालून त्यास हातानी धरून चालू लागलो. मंडळीने सर्वांनी असे सांगितले की, येथून फार जवळ येक विहीर आहे तेथे हळुहळू घेऊन चला. यास लूक लागली आहे. असे सांगतात तो ती।। काकांस अगदी अवसान नाहीसे जाहाले. सर्व अंगाचा भार मी आपले अंगावर घेऊन चालत अस्ता सहज मुखाकडे पाहिले तो डोळे अति लाल जाहालेले दृष्टीस पडले. त्या योगाने अति मी घाबरून गेलो. मंडळीस असे विचारिले की, गांव येथून किती दूर आहे ? तेव्हा त्यानी असे सांगितले की, मागे गांव दोन कोशावर राहिला व पुढेही गांव पके दोन कोशावर आहे. दरम्यान वस्ती नाही. असे बोलणे होत आहे तो विहिरीवर येऊन पोहोचलो. माझे आंगावरील उपर्णा भूमीवर छायेत येका सोबत्यापासून हातरून त्याजवर

काकांस निजवून ठेऊन, रसीलोटा आम्हापासी होता. लोट्या ऐवजी पितळेची तपेली होती त्याणी पाणी काढून काकांचे डोळयास लाविले. डोळे मिटलेले होते. नंतर सत्तू कटोऱ्यांत तयार करून प्रथम बसले करून पाजिला. मेथीचा पाला पाण्यात कुसकरून ते पाणी मस्तकापासून पायापर्यंत लाविले. तरी काका शुद्धीत येईना. तेव्हा सर्व मंडळी बोलू लागली की, आमची गाडी ओझ्याची दूर गेली व आम्हास नेमले मुकामी गेले पाहिजे. येथे दोन घटका खोळंबा जाला आहे. आता आम्ही येथे बसत नाही. असे सांगोन नऊ असामी ब्राह्मण जाण्याकरिता उभे राहिले. ते समई मजला जे दुःख प्राप्त जाहाले त्या दुःखास पार नाही. तथापि धैर्य धरून मंडळीपासी बोलू लागलो. पाहा तुम्ही ब्राह्मण आहा व आम्हीही ब्राह्मण आहो. तशात मजला इकडील भाषा साफ येत नाही आणि काकांस शुद्धसु।। नाही. श्वासमात्र आहे. मागे पुढे दोन दोन कोशाशिवाय गांव नाही. येथे घोडे गाडी वगैरे रस्त्यानी चालत नाही. त्यास आपण सर्वांनी कृपा करून या संकष्टातून मजला काढून मग आपण जावे. येथून उचलून पुढील गांवी नेऊन वस्तीस ठेऊन जावे. आता गाडी पुढे गेली तर येथून चांगले चालणारे दोन असामीनी जाऊन मुकामावर उदईक खोटी करावी. परंतु मजला दीनाला अनाथाला या अरण्यांत सोडून जाऊ नका. असे सांगून नेत्रावाटे पाण्याची धार सुरूच होती. त्या निर्दय ब्राह्मणांनी प्रार्थना माझी न ऐकता चालू जाहाले. मी ते समई दीनासारखा रडत रडत शेपन्नास पावले मागे फिरण्याबाो बोलत गेलो. शेवट असेही सांगितले की, तुम्ही या देशात राहून फार निर्दय जाहाला आहा. आणि मी ब्राह्मण असून तुम्हास दया येत नाही. समई गाडी जरी गेली तरी तुमचे नुकसान ब्रह्मावर्त क्षेत्री लुटीबद्दल फार जाहलेले आहे, त्याजपेक्षा हे नुकसान फार नव्हे असे बोलणे बोलत जातच होतो. शेवटी मंडळी झराझर चालू लागली तेव्हा त्यास असे स्पष्ट सांगितले की, तुम्ही ब्राह्मवीर्याचे नव्हत असे मजला वाटते. मुसलमान किंवा अति चांडाळापासी तुमचे मातोश्रीने गमन करून तुम्हास उत्पन्न केलेले आहे, म्हणोन तुमची असी बुद्धी आहे. तथापि मागे न पाहाता मंडळी निघोन गेली. नंतर मी परत येऊन ती ।। काकांपासी बसलो. ती ।। काकांस मुळीच शुद्धी नाही. डोळे मिटून पडलेले होते. हाकाही बहुत मारिल्या. श्वास मात्र होता. मग त्या प्रसंगात अतिशय दुःख वाटले, ते माझ्याने वर्णन करवत नाही. पाहा सर्व संकष्टापेक्षा हे माहा संकष्ट ओढवले. जंगलात मनुष्य कोणी नाही. ते समई नेत्रावाटे पाण्याची धार सुरूच होती आणि घरून निघाल्या तागाईत सर्व

दुःखाचे स्मरण जाहाले. त्या त्या दुःखात काकांचा मोठेपणाबद्दल विचार मनांत आणोन असे वाटे की, हे काका मजला सोडून स्वर्गवासी होणार. यांचे तर वय जाहाले आहे. परंतु हा प्रसंग अशा जंगलात आला त्याजवरून मीच महा पातकी आहे; सबब हे दुःख प्राप्त जाहाले आहे. मग श्री कुळस्वामिणी योगेश्वरीचा धावा करीत तीर्थस्वरूप काकांचे मस्तकासी बसलो आणि निश्चय केला की, येथेच राहून रात्र काढू, जे होणे ते होवो. परंतु ईश्वरे कोठेतरी वस्तीत गेलो तर फार चांगले इत्यादि विचारांत चार घटका पडून वारंवार कुळस्वामिणीचा धावा करीत होतो. तो अकस्मात् येक गाडी रांगडा ब्राह्मण गाडीवान् असून रस्त्यानी येत आहे असे पाहून हिंमत धरून उठोन रस्त्यावर येऊन उभा राहिलो. तो गाडीवान् याजपासी ती ।। काकांची व्यवस्था सांगोन पुढील गावी वस्तीत नेऊन ठेवण्याबाो मजूरी दोन आणे देऊ. मी फार संकटात आहे. या दुःखातून आम्हास पार पाड, असे सांगताच गाडीवान् याणे कबूल केले. नंतर गाडीवान् व मी दोघांनी काकांस उचलून गाडीत टाकिले. परंतु गाडीवान् याणी असे सांगितले की, मी नेऊन गांवसेजारी नजीक ठेवीन, गांवात येणार नाही. कारण पुसता आमचे सोयरे धोयरे या गांवात बहुत आहेत मी गावात येणार नाही. असो तेही कबूल करून गाडीत काकांस घालून गाडीत मी जवळ जवळ बसून गाडी चालती जाहाली. त्या गाडीवानाने कबूल केल्याप्राो गावानजीक लिंबाचे झाडाखाली काकांस आम्ही दोघांनी उतरून ठेविले. मी काकांची नीट मान वगैरे करण्याकडे थोडा वेळ मोडिला. तो गाडीवान आपले गाडीवर चढोन मजूरीचे पैसे न मागता पुन्हा उलट आल्या रस्त्यानी गाडी उधळीत चालता जाहाला. हे मी पाहून त्याजमागे धाव ठोकिली. की हे तुझे कबूल केल्याप्राो पैसे घे. परंतु गाडी फार दूर गेली. मीही परत आलो. आणि विचार केला की, मीही संकटात होतो त्या कारणानी ईश्वरच गाडी घेऊन येऊन मजला संकटातून काढिले. पहा जर हा ईश्वर नसता तर पुढे जाणारा असून मागे आम्हास पोचऊन गेला. मग मजला पश्चाताप जाहाला. आज ईश्वरदर्शन जाहाले असून माझे प्रारब्धानी ते समई मजला ज्ञान नाहीसे जाहाले. असो सूर्यास्ताचे संधीस त्या झाडाखाली बसलो तो रांगडे ब्राह्मण दोन असामी तेथे आले. त्यास दोघास ढबू देऊ करून तेथून काकांस गांवात पिंपळाचे पारावर नेऊन ठेविले. पाराभोवताली सर्व घरे वस्तीची होती. नंतर मजला क्षुधा लागलेली फार हे मनात आणोन कुंभाराचा शोध करून तेथे जाऊन पाण्याकरिता येक घागर व खिचडी करण्यास येक मडके प्रथम आणिले. नंतर वाण्याचा शोध करून मुगाची

डाळ व तांदूळ आणिले आणि मीठ फक्त आणिले. नंतर पाण्याचा शोध करिता गोडे पाणी फार दूर आहे. पारानजीक कुवा आहे, परंतु पाणी खारे आहे. त्याजवरून प्रथम गोडे पाणी आणण्यास गेलो. तेथून पाणी आणिले तों घटकाभर रात्र जाहाली. नंतर गोवऱ्यांची थाळ रचून खिचडी सिजत ठेविली. तों येक बैरागी तेथे आला. त्याणी सर्व हकीगत समजून घेऊन असे सांगितले की, तुम्ही या खारे कुव्याचे पाणी काढून मस्तकावर सिंपीत बसा. दोन चार घागरी पाणी सिंपडले म्हणजे तो ब्राह्मण सावध होईल, असे सांगून बैरागी कोठे निघोन गेला. नंतर शेजारी सदय येक बाई होती. तिजपासी पाण्याकरिता मातीची घागर मागून घेऊन पाणी सिंपडण्याचा प्रकार सुरू केला. इकडे खिचडी सिजत होती. रात्र चांदिण्याची होती. घागर भरून आणोन काही वेळ सिंपडून अर्धी घागर जाहाली म्हणजे मस्तकावर पाण्याची धार धरीत असे. याप्रो चार घागरी पाणी घातले तेव्हा काका शुद्धीत येऊन असे भाषण केले की, अरे विष्णु मजला थंडी फार वाजत्ये, पाणी पुरे कर. असे ऐकून मजला जो आनंद जाहाला त्यास उपमा नाही. मग काकांनी प्रश्न केला की, नऊ आसामी ब्राह्मण कोठे गेले ? ते समई सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून घेऊन काकांस गयवर आला तो सावरत नाहीसा जाहाला व मजलाही आला. काका मी या देशात तुम्हासिवाय अनाथ जाहालो होतो. असो आता सर्व बोलणी होतील. मग खिजडी सिजलेली होती. परंतु सोवळे नाही. मग येक दोर कंबरेस लाऊन बटव्याचा फडका भिजवून लंगोटा नेसून खिचडी थोडी ओले पंचावर घेऊन तोंडी लावण्यास साखर घेतली आणि काकांस सुमार अदपाव गेली. तितकी खाऊ घालून त्यास कोरडे नेसऊन एका उपरण्यावर निजऊन मीही ते दिवसी स्वस्थपणे खिचडी भोजन केले. तों रात्र दाहा घटका जाहाली. आता या गावातून तुम्हांस चालत जाण्याची शक्ति येईतोपर्यंत येथेच राहणे आहे. आपले गाठोडे गाडीत गेले त्यात काही रुो गेले आता गेल्याबाो शोक न करिता तूर्त बटव्यांत दाहा-बारा आहेत आणि ईश्वरे तुम्हास वाचविले हा मोठा लाभ मानिला पाहिजे, इत्यादि गोष्टी बोलून निद्रा केली. पुन्हा पहाटेस उठोन गांवात जाऊन दूध, साखर, साजुक तूप वगैरे आणोन लौकरच भोजन केले. याप्रो तेथे आठ दिवस काढिले. तों काकांनी असे सांगितले की, आता येथून पुढील गांवी जाऊ. चार चार कोश रोज चालू. याप्रो त्याणी सांगताच तेथून निघालो.

पहाटेस उठोन सकाळी प्रहर दिवस हळुहळु चालत असूं. नंतर एखादें गांवी

उतरून तेथेच वस्ती करीत असो. असे चांर दिवस गेल्यांवर येका पुर्व्यांत म्हणजे दाहा पंधरा घरांचे खेडेगांव होते तेथे आम्ही लिंबाचे झाडाखाली ओट्यावर उतरलो. भोवताली घरे होती, त्या घरापाो येक वृद्ध येऊन आम्हापासी असे बोलू लागला की, तुम्ही दक्षणी ब्राह्मण येथे उतरला परंतु आम्हास सरकारी असी ताकीद आहे की येथून उत्तरेस वीस कोशावर जलालपूर म्हणोन शहर आहे तेथे लडाई होऊन इंग्रजांचा जय जाहाला आहे आणि बंडवाले लोक पळून गेले आहेत. तर कोणीही बैरागी मुशाफर आढळल्यास जलालपूर येथे रवाना करावा. तेथे फासी लावून ठेविली आहे, लागलीच फासी चढवितात. त्यास पुढे कसे ? असे त्याणीं सांगताच आम्ही त्यांस खरा म ॥ र सांगोन यात्री गरीब आहो. ते समई त्या वृद्धाने असे सांगितले की, आम्हापासून तुम्हास काही येक तोशीस लागणार नाही. परंतु चौकसी करिता काळे मंद्राजी लोक येथे आल्यास उपाय नाही. मग आम्ही तेथे स्नानसंध्यादि स्वस्थपणे जेवणे केली, तों अकस्मात काले पलटणी गंगापारीपाो चार असामी आले. त्याणी आम्हास पाहाताच ठीक आहे, तुम्ही दक्षणी बंडवाले, तुमचे नांव काय आहे ? तुम्हास जलालपुरास नेऊ, मग साहेब सोडो किंवा फासी देवो. आम्हास हुकूम आहे त्याप्राो आम्ही करू असे बोलून स्वस्थ राहिले. मग आम्ही यात्री पितापुत्र आहो, गरीब भिक्षुक आहो. आम्हास तुम्ही जीवदान देऊन मुक्त करावें इत्यादि बोलणी बोलून स्वस्थ राहिलो. नंतर पलटणी लोकांनी तेथे जेवणे केली. सकाळी आम्हासु ॥ जलालपुरास जाणार असा त्या लोकांचा निश्चय ठरला. मग चार घटका रात्रीस काकांस मी प्रश्न केला की; धृव नक्षत्र पाहिल्यावर साहा महिने आयुष्य आहेच तर ध्रुव नक्षत्र कोणते ते आपण पाहूं. असे विचारताच काका व मी आम्ही उठोन ध्रुव पाहिला. तों त्या सिपाई मंडळीत दोन ब्राह्मण गौड होते. लहानपणी काही शास्त्राभ्यास होता. त्या सिपायानी आम्हास विचारले की, हे नक्षत्र पाहिल्यापासून काय होते? मग आम्ही वाक्यसभेत समजून सांगितले. नंतर धर्मसंमधे गोष्टीही बहुत त्याणी विचारिल्या व आम्हीही बरेच पांडित्य केले. नंतर त्याणी असें सांगितले की, आम्ही तुम्हास गांवांचे नांवाची याद करून देतो, त्याप्राो रस्त्यानी जालवणास जावे, नाहीतर फुकट फासी जाल. मग तेथे रात्री निद्रा करून सकाळी ठरल्याप्राो गांवांची याद करून घेऊन सिपाई मंडळीस रामराम करून चालते जाहालो. मग यादीप्राो मुकाम दर मुकाम करीत जालवणास आलो. तेथे श्रीविष्णु मंदिरात उतरलो.

नंतर सायंकाळी प्रमाणिक या उपनांवाचा ब्राह्मण विद्वान् तेथे येऊन आम्हास घरी घेऊन गेला. तेथे सिंद्याचे लष्करातून येक ब्राह्मण राहणार जालवणचा आला. त्याणे लष्करात बंडवाले लोकांनी केलेला दंगा सांगितला त्याप्रा॓ थोडा म ।। र मीही लिहितो. सिंदे सरकारचे पदरी लढवाईक लोक होते, ते सर्व तात्या टोपी याणी फितुर केलेले होते. याजमुळे जंगलात सर्व पलटणी वगैरे लोक जमा करून ग्वाल्हेरीवर हाला कर्ण्याचे इराद्याने निघोन गेले. मुरारीवर छावणी सिंदे सरकारची आहे तेथे जाऊन मोरचे बांधून लढाई करण्याचे ठरले. त्या घालमेलीत सिंदे यास असे कळविले की, आम्हास खंडणी बाा रुपये चार लक्ष द्यावे म्हणजे आम्ही येथून जाऊ. नाहीपेक्षा लढाई करण्यास सिद्ध असावे. त्याजवरून रा. रा. श्री दिनकरराव राजवाडे दिवाण याणी उत्तर दिल्हे की, आम्ही लढाई करू. नंतर जयाजी महाराज सिंदे व दिनकरराव दिवाण सुध्धा सर्व मुरारीचे नदीवर जाऊन मोरचा बांधून तयारी केली. ते समई सिंदे यांचे पदरचे सरदार याणी असे सिंद्यास कळविले की, आम्ही लढाईचा बेत करून आव मात्र घालू. परंतु पेशवे सरकारबराबर आम्ही लढणार नाही. कारण ते यजमान कसेतरी आपले आहेत. त्याजवर आम्ही तोफेचा गोळा सोडणार नाही. असी बोलणी होत आहेत तो, श्रीमंतांकडील गोलंदाजानी गर्दी करून तोफेस बत्ती दिल्ही. आणि वाद्ये वाजू लागली. वीर मोठमोठ्याने आरोळ्या देऊ लागले. ते समई पलटणी लोकही गोळ्यांचा भडमार करू लागले. तेव्हा सिंदे दिनकरराव याणी गोलंदाजापासी सिकस्त तोफेस बत्ती देण्याविसी केली. त्याणी उत्तर दिल्हे की, आम्ही निमकहरामपणा करून प्रथम बत्ती देणार नाही. ते समई दिनकरराव दिवाण याणी राजास असे सांगितले की, आता विचार कर्णे उपयोगी नाही. घोड्यावरून उतरून तोफेस बत्ती स्वता दिल्ही पाहिजे. असे सांगून दिनकरराव दिवाण घोड्याखाली उतरले. राजाही खाली उतरून स्वता तोफेस बत्ती दिल्ही. परंतु गोलंदाजानी बाजरीच्या थैल्या तोफेत घातल्या होत्या. त्याजमुळे ते सर्व आवाज खोटे होऊ लागले. तेव्हा राजा व दिवाण फार घाबरून गेले. लागलीच घोड्यावर स्वार होऊन आग्रा येथे जाण्याचा विचार करून घोडे काढून पिटाळीत पिटाळीत आग्र्यास निघोन गेले. पुढे इकडे लढाई सुरू जाहाली. राजा व दिवाण निघोन गेले ही बातमी सर्वांस समजुतीत आली नाही. तों सिंदेसरकारचे लोक सुमार तीनशापासून चारसेपर्यंत मरण पावले व पेशवे याजकडील दोनशापासून

तीनसेपर्यंत मरण पावले, तों राजा व दिवाण निघोन पळून गेले असे समजताच लढाई बंद केली. सिंदे सरकारचा मोड जाहाला. ते सर्व लोक पळून गेले. मग श्रीमंतानी जय जाहाल्याबाो शहादान्या वाजवून मोठे आनंदानी ग्वाल्हेरीस येऊ लागले. सिंदे सरकारचा फुलबाग म्हणोन येक जागा अति रमणीय ऐशआराम करण्यास योग्य असा बाग महादजीबाबा सिंदे याणी स्थापित केलेला होता. आत देशोदेशची झाडे व फुले लाविली होती. बंगले फार रमणीय होते. तेथे सर्व श्रीमंताकडील लोक येऊन बागाचा दरवाजा उघडून आत बंगल्यात राहिले. येकरात्र तेथेच होते. बागाचा सर्व विध्वंस जाहाला. झाडे मोडून टाकिली व बंगल्यात असें वगैरे होते ते सर्व फोडून टाकून विध्वंस केला. तेथे नाश फार केला. आगही काही बंगल्यास लाविली. हत्ती, उंट बागात शिरल्यावर नाश किती होईल त्याचा सुमार करवत नाही. सर्व नाश केला. तेथे बैठकी, जाजमे वगैरे होती तीही जाळून टाकिली. काही यक ठेविले नाही. इकडे शहरात सराफा वगैरे ठिकाणी मनुष्य फिरत नाहीसे जाहाले. दुकाने सर्व बंद ठेविली होती. मग श्रीमंतांनी दवंडी पिटून दुकाने वगैरे उघडऊन सुरू करविले. फुलबागातून प्रथम शहरात, वाड्यात कोण सरदार प्रथम जातो असा विचार करीत श्रीमंत रावसाहेब बसले आहेत, तो झासीवाली बाई तयार होऊन श्रीमंतापासी आज्ञा प्रथम शहरात जाण्यास मागू लागली. श्रीमंतांनी तिजला असे सांगितले की, शत्रूचे शहर आहे. वाड्यात अनेक कपटे केली असतील तर बहुत बंदोबस्तानी हुषारीने जावे. असी आज्ञा श्रीमंतांची होताच झासीवाली बाई दोनसे स्वार बराबर घेऊन मोठे सावधपणे शहरात स्वारी आली. पूरवीचा ठराव बायजाबाई सिंदे इणे काही रुाो श्रीमंतास देऊन केला होता बाईस माहीत होते. मग सराफ्यांतून मोठ्या थाटानी बंदुकांचे आवाज करीत सिंद्याचे वाड्यांत बाईचा प्रवेश जाहाला. वाड्यापाो पिछाडीकडील वाड्याचे चौकाकडे मुळीच लोक गेले नाही. कारण बायजाबाई सिंदीचे कारकून तेथे होते. त्याणी इकडे बाईसाहेबांचे राहाणे आहे, सबब इकडे आपल्याकडील मनुष्य येऊ नये. असे सांगताच झासीवालीने सर्व लोकांस ताकीद दिली की, जी कुलपे बायजाबाईची समजतील तिकडे आपल्यास पाहाणे नाही. बायजाबाई त्या प्रसंगात वाडा सोडून परीटीवर गेली होती. तिकडे मुक्काम पाच चार दिवस पूरवीच होता. नंतर वाड्यात जाऊन सर्व जिंदगी पाहून आपले ताबीत घेतली. आणि रावसाहेब व तात्या टोपी यास निरोपपाो की, आपण आता यावे. वाड्यात काही येक कपट नाही. मग असा निरोप आल्यावर रावसाहेबही मोठ्या थाटाने

निघोन हळुहळु शहरात बाजारांतून वाड्यात आले. नंतर काही सिंदेसरकारचे कारभारी वगैरे कारकून लोक येऊन भेटले. ते समई रावसाहेबांनी असे विचारिले की, येथे आम्हास ब्राह्मण-भोजन कर्णे आहे. त्यास उद्यापासून मुक्तद्वार भोजनाचे असावे. बेसनाचे लाडू पक्वान्न असावे. दरपात्री येकक रुपया दक्षणा दिल्ही पाहिजे. असा ब्राह्मण भोजनाचा थाट आम्ही येथे आहो तोपर्यंत झाले पाहिजे. ते समई तेथे वाकनीस वगैरे होते त्याणी असे सांगितले की, महाराज आपण हुकुम केल्याप्राो सर्व सिध्धता आहे. उदईक बेत करतो. याप्राो ठरून दुसरे दिवसापासून मुक्तद्वार सुरू केले. दर पात्रास रुपरुपया दक्षणा देण्याबाो ठरार करून दिल्ही. नंतर येक दोन दिवस गेल्यावर सिंदे सरकारची गंगाजली म्हणोन खजिना सर्व अर्थ ठेवण्याची जागा महादजीबाबा सिंदे होते तेव्हापासून प्रतिवर्षी राजाने अखेर साली जमा खर्च करून सिलक ऐवज राहील तो गंगाजळीत टाकावा. नंतर काही दिवसानी ते रुो काढून सोने, मोत्ये, हिरे, पाच वगैरे खरेदी करून गंगाजळीत ठेवण्याचा सांप्रदाय आज मितिपर्यंत होता, ती गंगाजळी कोठे आहे ? हा सर्व तपास करून रावसाहेब पेशवे व तात्या टोपी व झासीवाली बाई वगैरे मुख्य सरदार गंगाजळीत जाऊन खजिना सर्व आपले ताबीत घेतला व सोने, रुपे, मोत्ये, हिरे, पाच वगैरे सर्व काय अर्थ आहे तो पाहून तात्या टोपी याणी प्रश्न केला की, जर महादजीबाबा सिंदे सरकारापासून अर्थ येथेच ठेवीत आले तर तसा मोठा अर्थ का नसावा ? असा प्रश्न करिताच गंगाजळीवर मुख्य कारभारी होता त्याणे उत्तर दिल्हे की, अर्थ असा गंगाजळीत ठेवीत आले, परंतु जेव्हा जेव्हा काही कारणांनी विशेष खर्चाची गरज लागली म्हणजे काढून खर्चही करीत आले व केव्हा केव्हा हालीमाजी जाहाली म्हणजे अव्यवस्थेने जातही असे. असे सांगताच समाधान जाहाले. नंतर असा विचार ठरला की, आपण येथे आल्यानी निर्भय जाहालो असे नाही. कारण मुलखाचा बंदोबस्त ठेवण्यास आपणापासी फौज नाही. इंग्रज आता येऊन येथे लढाई होईल. मग आपल्यास जंगलांत जावे लागले. यास्तव येथे अर्थ जितका मिळेल तितका संपादन केला पाहिजे. आणि येथून जंगलांत मोठे पाणी पाहून पश्चमेस फौजेसुाो तळाची जागा पाहून तेथे काही लोक ठेऊन येथून सामानसुमान जी वस्तु आपल्यास अवस्य पाहिजे ती तळाचे नेमले जाग्यावर नेऊन ठेवावी. असा निश्चय जाहाल्यावर सिंदे सरकारचे घरी उत्तम मौल्यवान् वस्तुमात्राचे लेलाव सुरू केले. बाराद्वारी वगैरे ठिकाणांतून जी जाजमे, लोडे, तक्ये, बिछाने वगैरे जे सरकारी सामान आढळले ते वाड्यापुढे

आणोन रासी ठेविल्या. फरासखाना मुख्य व इतर जागोजाग बैठकीच्या जाग्यांतून बिछायती होत्या त्याही आणोन वाड्यापुढे ठेविल्या. फार मौल्यवान् वस्त्रे शहरांत कोण घेईना. ते समई चवथे भागांत वर्णन केलेले नाटकी ब्राह्मण याणी ती राजवस्त्रे थोडे किमतीत मिळाली म्हणोन नाटकास उपयोगी पडतील या हेतूने आणि ते लोक सर्व कोकणचे तेव्हा असी वस्त्रे नाटकास मिळणे कठीण या वस्त्रांनी नाटक फार खुलते हे मनात आणोन भरजरी पैठणी किंमत रु २५ भरजरी पागोटे किंमत रु. १५ याप्रमाणे काही वस्त्रे घेतली. बाकी नाटकी लोकानी आपले गुणावर जो पैसा मिळविला होता तो सर्व पेढीवर सावकारांकडे ठेविला होता. याप्रो रावसाहेब याणी सिंदेसरकारची दौलत हस्तगत करून ती हत्ती, घोडे, उंट, बैल तोफांचे व तोफा व तेथे काही लोक बंडास अनुसरून होते ते असी संपत्ती मिळऊन मुक्तद्वार सुरू ठेऊन अठरा दिवस जाहाले. इकडे जयाजी महाराज व दिनकरराव दिवाण हे दोघेही आग्न्यास जाऊन साहेबास भेटून लस्करची सर्व हकीगत सांगोन फौज बराबर बहुत घेऊन कप्तान साहेब मजल दर मजल करीत ग्वाल्हेरीजवळ पोहोचले. मुरारीवर पलटण येक ठेविले होते. शहरचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. तो आठरावे दिवसी अकरापासून बाराचे आत येकायेकी लोक घाबरून गेले. शहरांत रयतेचा गोंगाट फार जाहाला. तिकडे आग्न्याचे फौजेने मुरारीवरील लोकाबराबर जंग सुरू केला. इकडे झासीवाली बाई, तात्याटोपी, रावसाहेब तेव्हाच घोड्यावर बसून युद्धाकरिता वाड्यापासी लोक होते ते घेऊन निघोन गेले. इकडे मुक्तद्वारांत ब्राह्मण भोजनाची धांदल उडून गेली. उदक सुटून ब्राह्मण जेवणास बसले होते. काही ठिकाणी रुपया दक्षणेप्रो ठेविली गेली. काही ठिकाणी ठेविली नाही. तोंच भयाचे योगाने बिचारे ब्राह्मण पाने टाकून उठून गेले. बंडवालेसमंधे येकही मनुष्य तेथे राहिले नाही. इकडे लढाईत झासीवाली बाईस बंदुकीची गोळी लागली तथापि मानिले नाही. तों तरवारीचा वार मांडीस घाईत लागला, तेणेकरून घोड्यावरून खाली पडताच तात्या टोपी याणी घोडा पुढे घालून बाईचे प्रेत धरले. तो आणखीही लोक जमा होऊन प्रेत घेऊन परत आले आणि बंडवाले लोक पळू लागले. इंग्रज सरकारचे लोक पुढे होऊन बंडवाले लोकांचे तळावर आपला तळ देऊन राहिले. इकडे प्रेत बाईचे पूरवी नेमलेले जाग्यावर नेऊन दहन केले. झासीवालीचा मुलगा होता, त्याविषयी तेव्हाच असे ठरले होते की नानासाहेब नेपालचे हद्दीत आहेत

तितके जेव्हा सवड साधेल तेव्हा पाठवून दिल्हे पाहिजे. इत्यादि बोलणी केली आणि बंडवाले तिकडेच राहिले. इकडे दुसरे दिवसी जयाजी महाराज राजे, दिनकरराव दिवाण व साहेब वगैरे सर्व लोक शहरांत येऊन राजवाड्यांत जाऊन पोहोचले. तेथे तर जाजमे किंवा सत्रंज्या वगैरे बैठकी नाहीत. तेव्हा सावकार लोकांकडून आणोन त्याच दिवसी सावकार याजकडून ऐवज काढून फरासखाना वगैरे भांडीकुंडी सर्व सरंजाम सर्व नवीन करण्याचे प्रथम काम सुरू केले. शहरांत दवंडी पिटून बंदोबस्त केला. राजाच्या वस्तु लोकानी किंमती देऊन घेतल्या होत्या त्या जशा जशा बारकाईने बातम्या लागल्या तशा तशा वस्तु रुपये न देता घेतल्या. त्या प्रसंगाते ते बिचारे नाटकी लोक याणी काही वस्त्रे राजाची घेतली होती ही बातमी लागल्याबराबर त्यांचे बिराड जप्त करून सर्व वस्त्रे सापडून त्यांचीही चीजवस्तु जमा करून घेऊन गेले. त्यासही कैद केले आणि त्याणी ज्या सावकाराकडे रुपये ठेविले होते ते सावकारास बलावणे पाठवून नाटकियांचे रुपये तुम्हाकडे किती आहेत ती चौकसी करून सावकारास असे सांगितले की, नाटकी सरकारचे गुनेगार आहेत. सबब त्यांचे अर्थाची जप्ती सरकारने केली आहे. त्यास अर्थ देऊ नये असी ताकीद समक्ष दिल्ही. नंतर दोहोचौहो रोजी दिनकरराव दिवाण हेही कोकणचे, सबब त्यांस सिक्षा देण्याची तजवीज न देता अर्थ सर्व घेऊन नाटकी मुक्त केले. राजा राज्य इंग्रजांचे विचारे करू लागला. बंडवाले ग्वाल्हेरीचे पश्चम भागात बंड करून राहिले आहेत. नंतर आम्ही उभयता विचार असा केला की, चित्रकूटचे श्रीमंत हाली बांद्यास कैदेत आहेत. तरी रोज शंभर सव्वाशे रुो खर्च इंग्रजांनी ठेविला आहे. आपण तेथे जाऊन काही रुो मिळऊन मग कोठे जाणे ते जाऊ. असा बेत करून जालवणाहून निघोन बांद्यास मजल दरमजल जाऊ लागलो.

## मला नारूनें पछाडलें

ज्या दिवशी सकाळी बांद्यास जाणार त्याच दिवसी रस्त्यानी चालताना सकाळी प्रहर दिवसात येकायेकी माझे सर्वांगास कंडू सुटली. डोक्यापासून पायापर्यंत आग उठून, कंडू अति सुटली, त्यास उपाय नाही. तेथून शहर येक मैल राहिले होते. मग झाडाखाली उतरून अंगावरील कपडे काढून अंग खाजऊं लागलो, तों सर्वांगावर गांधी दाट तांबड्या उठल्या. दोन घटकानी कंडू बंद जाहाली परंतु उजवे पायास पोटरीचे सुमारास मोठा येक फोड पांढरा आला. नंतर हळूहळू

शहरांत गेलो. तेथे हरिकर्ण सावकाराचे छत्रानजीक बारीकसे विठोबाचे देऊळ होते तेथे जाऊन उतरलो, तों पाय फार सुजला, तेणे करून उभेही राहावत नाही असे जाहाले. प्रवासात फार संकष्ट पडले. शौचास जाण्याचे वगैरे ते हाल कोठवर लिहू. अति दुःख जाहाले. मग तेथे स्नानसंध्यादि करून भोजने जाहाल्यावर ती ।। काकांनी ज्या बागेत श्रीमंत नारायणराव व माधवराव पेशवे कैद होते तेथे जाऊन पहारेकरी यास असे सांगितले की, आम्ही विद्वान् भिक्षुक ब्राह्मण आहो. श्रीमंतांची भेट घेणे आहे तर तुम्ही श्रीमंतास विचारून येऊन आमची भेट होईल असे करा. नंतर पहारेकरी याणी श्रीमंतांची पर्वांनगी आणून काकांची भेट जाहाली. आसीर्वाद देऊन काका स्वस्थ बसले; तेव्हा श्रीमंतांनी सर्व चौकसी करून उदईक दोघेही नित्यादानास यावें असे सांगितले. नंतर काका बिराडी आले. त्या रात्री नारवाचा पाय अति दुखत होता. सकाळी सूजही बरीच आलेली व नारूही बाहेर पडला. तो दोन विती होता. त्या योगाने उभे राहवत नव्हते. नंतर काकांनी स्नान संध्या आटपून श्रीमंत ज्या बागात होते तेथे जाऊन पहारेकरी याची ओळख पूर्व दिवसाची होती, त्यायोगाने आत जाऊन नित्य दाने दोन रुो दोघांचे पासून घेऊन माझे नारवाची हकीगत सांगोन तेथेच भोजन करून बारावर दोन वाजता बिराडी आले. नंतर आमचे भोजनही जाहाले. त्याच दिवसी चार वाजतां नारू ज्या पायास जाहाला तो पाय फार दुखत होता. परंतु फरपटत हळूहळू शौचविधी करण्यास थोडा बाहेर जाताना नारू तुटला. पुढे शौचविधी करून जाग्यावर येऊन पोहोचलो तों नारवाचे पायास ठणका फार लागला, उपाय नाही. रात्रीचा विषय. मग गोवऱ्यांचा विस्तव तयार करून चाफ्याचे पानास तेल लाऊन शेकीत होतो. सर्व रात्र झोप नाही. ईश्वराचा धावा चालला होता. दुसरा उपाय नाही. उजडले तो काका व दोन दुसरे तेथे बिराडकरू राहिलेले बाहेर शौचास गेल्यावर तेथे येक बैरागी आला. त्याणी मजला सर्व दुखण्याची हकीगत विचारली आणि या नारूचे रोगावर मजला येक दवा ठाऊक आहे तो आणोन देतो म्हणजे तो आंतून बाहेर जाईल. तो गेल्यावर येक घटकेने तुम्हास बरे वाटेल. असे त्याणी सांगताच मजला बहुत आनंद जाहाला. फार उपकार होतील असे मी म्हणताच, आपली काठी झोळी तेथे ठेऊन पलीकडे येक बाग होता तेथे जाऊन हातावर पाला हिरवा चोळीत चोळीत देवळांत आला आणि माझे नारवाचे पायास नारू जाहालेला होता त्या जाग्यावर व सुजेवर सर्व त्या औषधीचे रसाचा लेप करून औषधीचा चोथा आपले झोळीत

टाकून मजला सांगितले की, तुम्ही थोडीतरी झोप घ्या म्हणजे नारू झोपेत जाईल. जागृत जाहाल्यावर हातरुणांत सोधून पाहून टाकावा. मी सायंकाळी चार वाजता येथे येईन, आता जातो असे सांगून बैरागी निघोन गेला. नंतर काका बिराडी आले त्यास मजकूर झालेला सांगितला. त्याणीही बरे आहे तूं या यातनेतून मुक्त होसील तेव्हा खरा. पुढे मी झोप घ्यावी ह्या बुद्धीने पांघरूण घेऊन पायाचा कळ तिडका सहन करून निद्रा घेण्याचे उद्योगास लागलो, तो दोन घटकानी झोप चांगली लागली, कारण रात्रौ निद्रा मुळीच आली नवती. दोन तीन घटका झोप लागून जागा जाहालो तों पायांस ठणका नाही दुखत नाही सूजही विशेष नाही. हे मनांत आणोन उभा राहिलो तो नारूसंमधे विकार काही नाहीसा जाहाला. तेणेकरून आनंद जाहाला. मग हातरुणांत नारवाचा दोरा सांपडला, तो टाकून देऊन पुढे विहिरीवर जाऊन स्नानसंध्यादि करून काकांबराबर बागेत श्रीमंतास भेटण्यास निघोन गेलो. तेथे औषधाची हकीगत सांगितली. परंतु बैरागी कोठे राहातो ते मजला ठाऊक नाही. सायंकाळी येण्याचे कबूल करून गेला आहे वगैरे बोलणी होऊन तेथेच भोजन करून बिराडी आलो. तो बैरागी पुन्हा येऊन आज मी।। पर्यंतही भेटला नाही. तो ईश्वरच समजला पाहिजे. माझी प्रकृत दुसरे दिवसी दुरुस्त जाहाली. तेथे हरिकर्ण रविकर्ण सावकार गुजराथी राहतात. त्याणी पूर्वापार तेथे अन्नछत्र घातले आहे. तेथे दक्षिण ब्राह्मणपाो सुवासीण असो, विधवा असो, मूल बाळ, ब्राह्मण कोणी असो सकाळी आकरा वाजल्यापासून बाराचे आत नेमले छत्राचे जाग्यावर जमा लोकानी होऊन भोजने करावी. दरपात्री रोज दक्षणा पाव आणा देण्याचा ठराव आहे. येकंदर पाउणसे पात्रापासून शंभर पर्यंत रोज होत असतात. प्रतिदिवसी येकवार छत्रांत जेऊन यावे, जेवणाचा बेत दोन भाज्या, भात, वरण, तिखट, कोसिंबीर, ताकाची कढी व गव्हाच्या पोळया, तूप, पहिल्याने व दुसऱ्याने मिलोन तीन चार ढब्बू पैसे भार याप्राो छत्रांत जेऊन पाव आणा दक्षणा मिळवून असावें. तर तेथे गरीब ब्राह्मणांची कुटुंबे चालीस पंचेचाळीस आढळली. सायंकाळी क्षुधा बहुत करून नसते. समई लागल्यास पाव आणा आलाच आहे. सारांश सर्व खर्च तेथे चालतो. सबब लोक तेथे बरेच राहिले आहेत. आम्ही तेथे दाहा रोज होतो. नित्य दानाबाो रोख रुो दोन मिळत असत. पुढे तेथून पुन्हा ब्रह्मावर्तास जावे या हेतूनी निघालो. वाटेने बंडवाले लोकही काही आढळले. त्याबराबरही काही दिवस होतो. पुढे त्यांची संगत मोठ्या रस्त्यावर आल्यावर सोडून रस्त्यानी जात असता यके दिवसी दोन प्रहरी

अकस्मात् पाच चार स्वार येऊन आम्हापासी वस्त्रे पात्रे काही होती ती लुटून घेऊन रुो आम्हास दाहा खर्चास देऊन बाकी आम्हापासी ते समई रु।। होते ते ७५ पाऊणसे त्याणी घेऊन आम्हास सोडून पळून गेले. पुढे आम्ही तेथून परत सिंद्याचे लस्कराकडील बाजूवर आलो. तेथे असा विचार ठरला की, आपण कासीयात्रेकरिता रुो जमा करावे म्हणोन यत्न करतो. परंतु आधी रुो मिळत नाही. बरे मेहनत करून मिळवले तर आपल्यापासून लोक लुटून घेतात. तर आता आपण ग्वाल्हेरीच्या भोवताली असावे असा विचार करून फिरत होतो.

पर्ज्यन्य काळ नजीक आला. उन्हालाही फार होऊ लागला. नंतर आम्ही थोडेथोडे मजल पायीच करून फिरत होतो. बुंदेलखंडात येक सूर्ययंत्र म्हणोन फार प्रसिद्ध क्षेत्र आहे. तेथे महाव्याधीचे लोक काही दिवस राहिले अस्ता महाव्याधी दूर होत्ये असा लौकिक ऐकिताच आम्ही तेथे जाऊन यात्रा करावी हा निश्चय मनात आणोन उभयता मजल दर मजल जाऊन तेथे पोहोचलो. ते स्थान फार रमणीय आहे. देवालयानजीक नदी मोठी आहे. देवळापासी पूर्व पश्चिम चाळीस धनुषे उदक. त्या उदकास सूर्यावर्त म्हणोन तीर्थाचे नांव आहे. तेथे स्नान केल्यास अगांवर अष्टकुष्टे ज्या पातकानी होतात ते पातक सात जन्माचे जाते आणि शरीर स्वच्छ होते. हे माहात्म्य तीर्थाचे आहे. श्री सूर्याचे देऊळ फार मोठे आहे. देवळाचे मध्यभागी चतुरस्र एक चुने गच्ची चौथरा आहे. कंबरभर उंचीचा आहे. त्या चऊथऱ्यावर मध्यभागी कुर्दी साहाण तांबडे रंगाची दोन आडीच हाताची वाटोळी पकी सिसे ओतून बसविली आहे. त्याजवर सूर्ययंत्र काढलेले आहे. यंत्राचे मध्यभागी केसरकर्णिक जागा जी आहे, तेथे माध्यान्ही श्री सूर्यनारायण आला म्हणजे मोठ्या दिव्याचे वातीचा जसा ज्योत असतो त्याो लखलखीत तेज यंत्राचे मध्यभागी केसरकर्णिकेत पडते. तें थोडा वेळ असते. त्या संधीत तेथे दर्शनार्थ लोकांची दाटी फार होते.

परंतु देवळास भोवताली आवार नाही. सबब चोही बाजूंनी लोक येऊन त्या यंत्राचे मध्यभागचे तेजाचे दर्शन घेतात. व्याधिष्ट कुष्टी वगैरे लोक ते समई सूर्यावर्त तीर्थी स्नान करून ओलेते असता उभे वाट पाहत असतात, तों ते तेज दृष्टीस पडते. मग नमस्कार करून जातात. त्या देवळाभोवती सर्व धर्मशाळांची गर्दी आहे, कारण पृथ्वीवर धनिक लोकांस व्याधी उत्पन्न जाहाली म्हणजे सर्वसंग परित्याग करून तेथे येऊन सेवा करू लागतात. वर्ष दोन वर्षांनी व्याधी गेली म्हणजे त्यास आनंद होऊन हजारो रुो खर्च करून धर्मशाळा बांधितात. कितीक

लोकांनी सदावर्तेही बहुत ठेविली आहेत. तेथे आम्ही स्नाने तीर्थाची पाच चार दिवस करून दर्शनही प्रतिदिवसी घेत होतो. त्या देवळाची प्राची साधन चांगले जाहाले आहे. कोणत्या ऋतुंतही मध्यकर्णी केसरावर तेज येत नाही असे मुळीच नाही. असो. धर्मशाळाही दोन तीन मजल्यांच्या मजबुदीच्या आहेत. सदावर्तेही बहुत आहेत. त्याजमुळे लोकही तेथे बिराडे करून बहुत राहिले आहेत. आम्ही ती यात्रा करून परत मागे आलो, तो येक्या जंगलात अकस्मात दाहा बारा स्वार दृष्टी पडले. त्यांची चौकसी करता त्यानी असे सांगितले की, आम्ही श्रीमंत रावसाहेबांचे नोकर आहो. येथून दाहा कोशावर त्यांचा तळ आहे. तुम्ही तेथे येत असल्यास आमचे बराबर चलावे. मग आम्हीही त्याजबराबर निघोन त्या मंडळीत गेलो. तेथे त्याजपाशी फौज बरीच जमली होती. येकंदर लढवाईक लोक सुमार वीस हजार होते व बाजारबुणगे दाहा बारा हजार होते. दक्षणी ब्राह्मण आठ दाहा असामी होते. त्यांत आचारी पाणकी वगैरे सर्व होते. मग आम्हास कोणतीच काळजी नव्हती. परंतु हा देश कोणचा व गांव कोठे कोण आहे व दिशा कोणती हे भान आम्हास राहिले नाही. कारण दिवस पर्जन्य काळचे, तशात आम्ही भिक्षुक. आमचे हे लक्ष मुळीच पुरेना. असो येकंदर त्या लोकांबराबर जाता जाता जयपूर जोदपूर या सुमारावर लोक गेले. जयपूरवाल्यांपासून खंडणी घेतली. याखेरीज बारीक मोठे राजेरजवाडे जे वाटेत आले त्याणी खंडण्या दिल्या. उदेपुरावरून त्या मुलखात बरेच दिवस काढिले. तसेच पश्चमेस जाताजाता बडोद सरकारचे मुलखातही गेलो. प्रथम आम्हास असे कळले की, बडोदचा राजा आम्हास अनुकूल आहे. म्हणोन बडोद्यापासी जाऊन पोचलो. पुढे समजण्यात आले की, हे बडोदेकर आपल्यास प्रतिकूल आहेत हे घात करतील. हे समजताच सर्व लस्करी लोक मागे फिरले आणि बुंदीकोटच्या राजाकडे जाण्याचे ठरले. आणि बुंदीकोट्यापासून आठ कोशावर चांगली जागा पाहून तेथे तळ धरला. पुढे बुंदीकोटवाला राजास पत्र लिहून स्वारांजवळ दिल्हे. त्यात मा॥र की, आम्ही धर्माकरिता इंग्रजांबराबर लढत आहो. यास्तव तुम्ही आम्हास दोन लक्ष रु॥ द्यावे. न द्याल तर आम्ही लढून घेऊ. असा मा॥र ली॥ होता. ते पाच स्वार राजाकडे जाऊन पत्र दिल्हे आणि वाड्यापासी स्वार उभे होते. राजाने ते पत्र पाहून आपले सरदार सर्व लहानमोठे जमा करून सभा भरून विचार करता असे ठरले की, हे बंडखोर लोक आहेत. यास आपण विनाकारण रुो देऊ नये. नंतर स्वार याजपासी तोंड जबानीच निरोप सांगितला की, तुम्हास रुो उगाच देणार नाही. सार्वभौम

इंग्रज बहादूर आहे. त्यास खंडणी द्यावी लागत्ये. त्यांस तुम्ही मुलखातून काढून लावा. नंतर आम्ही तुम्हास खंडणी देऊ. हा निरोप होताच स्वार लस्करात परत आले आणि लागलीच कूच करून बुंदीकोट्यावर निघोन चालते जाहाले. ते समई मजला हगवणीचा उपद्रव फार जाहाला होता. सबब तेथून मागे फिरून चार कोशावर येक गांव होता तेथेच वस्ती करून राहिलो. चार दिवसी आमची प्रकृत काही बरी झाल्यावर तेथून आम्ही निघणार तो तेथील येक गृहस्थ चांगला प्रामाणिक मनुष्य बुंदीकोट्याहून आला.

## श्रीमंतांनी बुंदीकोट सर केलें

त्याणे असे सांगितले की, श्रीमंताकडील लोक शहरानजीक जाऊन मोरचा बांधून तोफेस बत्ती दिल्ही. इकडे राजाचे पदरचे लोक सरदार वगैरे जमा होऊन राजा सभेत शहराबाहेर मोठ्या थाटानी वाद्ये वाजवीत आले आणि रणभूमीवर उभे राहिले. राजापासी सर्व फौज मराठी होती. बंदुका तोड्यांनी पेटऊन लढाई करणारी होती. समोर फौज येताच दोन तोफा मोरच्यात श्रीमंताकडील होत्या त्यास बत्ती दिल्ही. पलटणी लोक लढू लागले. यकंदर तेथे येक प्रहर लढाई जाहाली. ती मोठी जाहाली. श्रीमंताकडील पलटणी पके लढवाईक असल्यामुळे राजाची फौज मराठी. मराठी फौजेचा मोड जाहाला. लोक दशदिशा पळून गेले. राजाही त्या गर्दीत कोठे पळून गेला किंवा बंदुकीची गोळी लागोन ठार मेला याचा शोध मुळीच लागला नाही. सर्व राजाकडील फौज उधळून गेली. असे श्रीमंताकडील लोकांनी पाहून हाला करीत शहरचे दरवाज्यात शिरून शहरात लोक गेले. पूरवी शहरची लूट जितकी सापडे तितकी ज्याची त्यास बक्षीस ठरली होती. सरकारसमंधे जो अर्थ सापडेल तो श्रीमंतांनी घ्यावा. याप्रो ठराव होऊन गेल्यावर पलटणी शहरात शिरून तमाम लूट करू लागले. ती राजधानी बहुत वर्षे हलीमाजी होऊन लुटली गेली नव्हती. जो राजा सार्वभौम जाहाला त्यास याणी खंडणी द्यावी याजमुळे बारासे वर्षांत ही राजधानी लुटली गेली नाही. या राजधानीत लोक सधन फार होते. लोकांचे घरातून अर्थ बहुत सापडला. तो अर्थ सिपाई लोकांनी घेतला. पुढे राजवाड्यात राजा मरण पावल्याचे पके न समजता कोठे पळून गेला आहे आणि आपला मोड जाहाला असे समजाताच राजाची मुख्य राणी व राजाची वृद्ध मातोश्री या उभयता स्त्रियांनी राजाच्या भोगांगना चौघी अशा येकंदर स्त्रिया सहा येक वाड्याचे माडीवर जाऊन दिवाणखान्यांत आतून

भरले की, ते ब्राह्मण फार समर्थ प्रामाणिक कधीही खोटे बोलणारे नाहीत. याबाो मजला मुळीच संशय नाही. असे बोलणे होऊन त्याणी बुंदीकोट्यापासून जाहाला म ॥ र सांगितला तो लिहून ठेवितो.

## श्रीमंतांवर नर्मदेची कृपा

बुंदीकोट्याहून सर्व फौज बराबर घेऊन नर्मदा उतरून सातपुड्यांत जाण्याचे इराद्याने जात असता अर्दूचे स्वार म्हणजे मोठे मोठे घोडे त्याचे असून त्याजबराबर हस्तनळीच्या तोफा बराबर असतात असे पाच स्वार लस्कराचे पुढे व मागे चालत असतात. त्यापाो मागील स्वारांनी असे कळविले की, येथून दोन अडीच मजलावर गोरे लोकांची पलटणे व काही काळे मंद्राजी लोकांचे पलटणे घेऊन इंग्रज येत आहे. असी बातमी समजताच डबल कूच करून पंधरा पंधरा कोशांची मजल सर्व लस्करी लोक करू लागले. पुढे पाच चार दिवसांनी येका मजलेवर इंग्रजांचे लोक येऊन पोहोचले. तो असा देशाचा प्रदेश आला की, येकीकडे नर्मदा नदी येकीकडे डोंगर. दरम्यान पळून सुद्धा जाण्यास जागा नाही. मागे फिरावे तर इंग्रजांची फौज. पुढे जावे तर देश चिखलाचा. पर्ज्यन्य फार तशात सुरू जाहाला. अशा संकष्ट दिवसात फार मेहनत करून नर्मदातीरी येऊन पोहोचले तो नर्मदेस नावा नाहीत. इंग्रजांनी नावांचा बंदोबस्त ठेविला होता. तेव्हा महासंकष्ट प्राप्त जाहाले. आता ईश्वर वाट देतो कसा अशा विचारांत त्या मुकामी रात्र गेली. पहाटेस तात्या टोपी मुख्य सरदार व चार असामी स्वार बराबर घेऊन सर्वांस असे सांगितले की, या नर्मदा गंगेस कोठे तरी पाय उतारा असेल त्याचे शोधास आम्ही पुढे जातो. असे सर्वांस कळऊन आपण स्वता स्वार बराबर घेऊन चालते जाहाले. नर्मदातीरचे गांवोगावी चौकसी करीत जात आहे. मुळीच असे आहे की, बंडवाले लोक जिकडे तिकडे आले असी बातमी लागताच गावातील मनुष्य आपले भांडीकुंडी चीजवस्तूची लागेल तसी व्यवस्था करून सर्व लोक पळून जंगलात किंवा ज्यास जसे वाटेल तिकडे जातात. गांवात अतिवृद्ध व बाळ मात्र राहातात. सर्व गांव ओसाड असतो. गांवोगाव तात्या टोपी जाऊन नर्मदा पायउतार कोठे आहे किंवा तसे शोध चांगला लागला पाहिजे म्हणोन चौकशी करीत करीत जात असता हुसंगाबाद जिल्हा नर्मदातीरी दक्षण तटावर आहे. त्या जिल्ह्याचे पूर्वेस ईशान्य बाजूवर साडियाचा घाट म्हणतात म्हणजे शांडिल्य ऋसीचा आश्रम आहे. त्याचे उत्तरेस उत्तर तीरात जंगलात लहानसा

बसविली. रावसाहेब वगैरे लोक पंधरा दिवस तेथे होते. त्या राज्यात विशेष मोर फार आहेत आणि मोराबाो राजानी प्रथमपासून असा विचार ठेविला आहे की रयतपाो कोणीही मोर मारिला अस्ता जो मोर मारील त्याचा वध अवस्य करावयाचा असा नियम चालविल्यास आज शंभर सवाशे वर्षे जाहाली. सबब जसे कोकणांत कावळे असी तिकडे मोर आहेत. घरावर व घरांतून मोर उपद्रव फार देतात, परंतु लोक मारावयाचे नाहीत. मोर मारण्याची पुराव्यानिशी शाबिदी जाहाल्यास फासी जावे लागेल हे मनात आणोन मोराची गोष्ट कोणीच काढीत नाही. शहरची लूट-माफी सिपाई लोकास होती. सबब सर्व सिपाई लोकांपासी अर्थ बहुत जाहाला. ज्याचे त्याचे कंबरेसी अर्थाचा कसा होता. तेणेकरून पलटणी लोक उन्मत्तही फार जाहाले आहेत. असा म ॥ र जाहलेला सर्व व्यवस्थित आम्हास कळला. पुढे सर्व फौज घेऊन तेथून कुच करून पश्चम उत्तरचा भाग धरून जात आहे. हैदराबादचा निजाम बंडवाले लोकास मिळणार आणि इंग्रजाबराबर लढणार अशी खात्रीने बातमी लागल्यावरून सर्वानुमते असे ठरले की, नरमदा उतरून सातपुड्यांतून दक्षणेत जाणे आहे. तो रस्ता आपल्यास काढणे आहे. त्या सुमारास जाणे आहे, असे सर्वांस सांगोन मजल दर मजल कुच करून जात आहेत. असी खबर आम्हास लागताच आम्ही त्या लोकांबराबर जाण्याचा विचार रहीत करून आम्हीही त्या गांवाहून निघोन ब्रह्मावर्तास जावे या हेतूने हळुहळू चालते जाहाले.

## नवें संकट

पुढे आम्हास गाडीची सोबत लागली. काही दिवस गाडीचा खुट येक करून जात होतो. पुढे गाडी सुटल्यावर पायीच जाता जाता वाटेने बोटके म्हणोन गांव मोठा शहरासारखा आला. तेथे आकरा बारा वाजाचा सुमार जाहाला. भूक ताहान लागली, सबब त्या बोटके गांवात शिरलो. प्रथम दरवाज्यांत जो शिरलो तो मनुष्य रस्त्यानी फिरत नाही. पुढे बरेच गेलो तो प्रेत पुढे आले. बाजारात पोचलो. बाजारांत चार पाच दुकानाचे आड एखादे दुकान उघडलेले दृष्टीस पडले. पुढे बाजार सोडून लोकास उतरण्याची जागा कोणीकडे आहे वगैरे चौकसी करिता असे समजण्यात आले की, येथे तुमचे जातीचे दक्षणी ब्राह्मण दोन तीन घरे आहेत. असे समजताच दक्षणी ब्राह्मणांचा शोध केला आणि त्या वाड्यांत गेलो, तो ओटीवर फार केर पडला होता. माणुस कोणी बाहेर दिसत नाही, हे

पाहून तेथेच किंचित् उभे राहिलो. तो घरचा यजमान बाहेर येऊन चौकसी आमची केली. नंतर त्याणी असे सांगितले की या गांवावर ईश्वरी क्षोभ जाहाला आहे. येथे मरगीचा उपद्रव अति सुरू आहे. बाजार वगैरे सर्व व्यवहार बंद आहेत. आमचे घरी काल येक मनुष्य मरण पावले व पहाटेस येक मनुष्यास उपद्रव जाहाला आहे. ते मनुष्य बहुधा संपत आले आहे. तशात आम्ही जातीचे शेणवी आहो. तुम्ही येथे उतरून उपयोग नाही व या गांवात गोडे पाणी नाही. सर्व विहिरी खाऱ्या आहेत तर तुम्ही सिधा सरंजाम घेऊन गांवाचे पूर्वेस पाण्याचा ओढा थोडा थोडा वहात आहे तेथे मोठे मोठे डोहारे आहेत तेथे जावे. भोजने करून वस्तीस यावे. असे सांगताच आम्ही तिन्ही असामी बाजारांत गेलो. तिसरे मनुष्याची आमची भेट होऊन तीन दिवस जाहाले होते. येके मुक्कामी तो ब्राह्मण ऋग्वेदी देशस्त राहणार दक्षणेत मिरजेपासी कोणी येक गांवचा मी आहे सांगून पुढे आम्हास असे कळविले की, मी बंडांत गेलो होतो. हाली बंड सोडून देशी जाणार परंतु मनांत असे आहे की, श्री भागीर्थी स्नान करून देशी जावे. आमचेही मनात तेच होते. सबब त्याची व आमची सोबत लागली होती. मग बाजारांतून सर्व सिदा आणिला. तिघानी सर्व आपला सरंजाम सिध्यासुध्धा घेऊन पाण्याचे ओढ्यावर गेलो. तेथे येके ठिकाणी बाभळीचे वृक्ष बरेच होते. त्या झाडाखरीज दुसरे झाड मुळीच नव्हते. तेथे लोक दहा वीस उभे होते. कारण दोन तीन प्रेते तेथे दूर जळत होती. क्रिया चालली होती. सबब छायेंत लोक उभे होते. तेथे जाऊन झाडाखाली चौका वगैरे जेवणाची तयारी केली. परंतु अग्नी नाही, तेव्हा मोठ्या संकष्टांत पडलो. तों इतक्यात प्रेत दहनाकरिता तेथे आले असे पाहून प्रेताबराबर मडक्यात अग्नी होता, त्यापाो आम्ही अग्नी मागितला. तेव्हा तो मनुष्य देईना. त्यास असे सांगितले की, हाच अग्नी स्थंडिलावर ठेऊन क्रव्याद नामानी स्थापित होईल तेव्हा देऊ नये व नेऊ नये. तूर्त लौकिकी अग्नी आहे. असे सांगताच अग्नी त्याणी दिल्हा. तो घेऊन जेवणाची तयारी करून स्नाने वगैरे अटपून भोजने केली तो बारावर तीन वाजले. नंतर गाठोडी जमा करून सेणवीयांचे वाड्यांत वस्तीस आलो. तेथे मनुष्य लागले होते ते मरण पावल्यावर त्यास नेण्याचे घालमेलीत आम्ही ओटीवर जाऊन उतरलो. ओटी मोठी पाच साहा खणांची होती. नंतर तेथे रात्र काढिली. पाहाटेस शेणवी याचे घरांत येक बायको मरगीचे उपद्रवानी लागली. तेव्हा ती सर्व मनुष्ये उठोन औषधे वगैरे देण्याचे खटपटीत होती. आम्ही तेथून गाठोडी बांधोन शहर सोडून चालते

तसाच उपटून नाहीसा करावा. त्या देशात गूळ व ऊस व रस काही येक ठेविले नाही. लस्करही बरेच होते.

सातपुड्याचे दक्षणेस येताच घोड्यास हरभरे मिळत नाहीसे जाहाले, व मनुष्यास गहू खाण्यास मिळत नाहीसे जाहाले. फौज सर्व हिंदुस्थानी. त्या लोकास बाजरी जोंधळे कधीही खाण्यांत आलेले नाहीत. अशा सर्व अडचणी पडल्या. तथापि तसेच दक्षणेत जात होते. वाटेने सेती लोकांचे नुकसान फार जाहाले. उसाच्या रसाच्या कढया कितिक ठिकाणी ओढून ओतून टाकिल्या. असो. तों हैदराबादेकडून पाठविलेले लोक आले. त्याणी रावसाहेब पेशवे, तात्या टोपी याजपासी असे सांगितले की, हैदराबादवाला निजाम अनुकूल नाही. इकडे आल्यास नाश होईल. इकडे निजामाचा भरवसा धरून येऊ नये. असा म ।। र समजताच सर्व फौजसु ।। माघारी फिरले आणि पलटणी लोकांजवळ बुंदेकोटा लुटल्यापासून अर्थ सर्वांजवळ फार जाहाला, त्यायोगानी वेळचे वेळेस हुकुम उठत नाहीसा जाहाला तथापि तसेच परत फिरले. मग सर्व लस्करसु ।। फिरता फिरता सातपुड्यांत महिना पंधरा दिवसी आले. ते झासी आणि सागर यांचे दरम्यान बहुत जंगल आहे. त्या जंगलात चांगली तळाची जागा पाहून राहिले होते. झासीहून सागरास जाण्यास नवीन सडक बांधून चोराचे बंदोबस्ताकरिता हकेहकेवर चार चार सिपाई चौकीसप्रो चौक्या ठेऊन बंदोबस्त रस्त्याचा केला अस्ता, बंडवाले लोकांनी मध्येच जंगलांत पाच चार चौक्यांतील सिपाई ठार मारून टाकून पुढे गेले. त्या जंगलात डोंगर मोठे मोठे फार आहेत. तोच विंध्याचल पर्वत डोंगरास येक गढीसारखा किल्ला होता. त्या किल्यावर येक तोफ व काही दारूगोळा व खजिना आणि गोरे लोक सुमार पन्नास असामी होते. तेव्हा त्या किल्याखाली बंडवाले लोक आले. ते पहाटेस येऊन किल्याखाली दोन चौक्या होत्या, त्यातील सापडलेले लोक मारून अगदी नजीकची चौकीतील लोक ठार मारले, तों चांगले उजाडले. वरून गोरे लोकांनी पाहून विचार केला की हे लोक फार, आपण थोडे आहो. याजकरिता न लढताना येथून सुटावे. असा विचार करून गढीचे बुरुजावरून पांढरे धोतर घेऊन ते धोतर फिरविले. तेणेकरून असा समज आहे की, आम्ही तुम्हाबराबर लढाई करीत नाही. किल्ला खाली करून देतो. असे होण्याबरोबर बंडवाले लोकापाो पलटणी दोन चारसे येकदम किल्यावर जाऊ लागले. त्या गढीस दुसरी बारीक वाट होती, त्यावाटेने गोरे लोक खाली उतरू लागले. हे पलटणी काळे लोकांनी पाहून काडमिनीच्या गोळया सुरू केल्या



१३५ पान ८ पाने पुढे

दरवाज्यास कडी लावून बसल्या होत्या. दक्षणी लोक मुख्य बराबर घेऊन झासीवाली बाई वाड्यांत जाऊन सर्व व्यवस्था पाहू लागली. मागाहून रावसाहेब व तात्या टोपीही तेथे आले.

खजिन्याच्या किल्या जामदारपासून घेऊन खजिना आपले स्वाधीन करून घेतला व कापड चोपड व रुप्याची भांडी सर्व आपले ताबीत घेऊन मुख्य राणीचा शोध करिता तिसरे मजल्यावर दरवाजे बंद करून बसल्या आहेत ही खबर समजताच तिसरे मजल्यावर जाऊन दरवाज्यापासी खुद रावसाहेब उभे राहून राणीस हाका मारून असे सांगितले की, मुख्य राजाची मातोश्रीस मी नमस्कार करितो आणि भाषणे करितो ती श्रवण करावी. पहा मी केवळ हिंदुधर्माकरिता प्राणास उदक सोडून या प्रसंगात बुद्धीपूर्वक पडलो आहे. आजच कलियुगाची समाप्ति करवत नाही. आणि तशात सरकारी फौज धर्माकरिता बिघडून आपल्यास सापडली याजमुळे जे करू ते होईल, म्हणोन या कर्मास आरंभ केला आहे. सर्व राजेरजवाडे सरदार याणी सामार्थ्यानुसार मदत पैशांची केली, त्याप्रो येथेही आम्ही दोन लक्ष रुपयाबाो मागणे केले. राजाने स्वता येऊन भेट घेऊन काही रुपये कमी करावे असे जरी सांगते तरीही जाहाले अस्ते. परंतु ते काही न करिता लढाईस सिद्ध आहो, तुम्ही यावे असा निरोप आल्यावर मजकडे दोष नाही. आता राजा मरण पावला किंवा पळून गेल्याचे ठिकाण नाही. तथापि राजाची मातोश्री वृद्ध तीच आमचीही मातोश्री आहे. राजस्त्री माझी प्रत्यक्ष पाठीची बहिण आहे. मजपासून काही येक घातकी कर्म होणे नाही. आपण दरवाजा उघडावा आणि रोजचेप्रो जेवणेखाणे केली पाहिजेत. याजकरिता मुद्दाम आम्ही येथे आलो आहो आणि आपला मुलगा आज्ञान आहे त्यास राज्यावर बसवून आम्ही येथून जाऊ. आम्हास राज्यचे कारण नाही व वस्तुमात्राचा नाशही आम्हापासून होणे नाही. असे सांगताच राजाच्या मातोश्रीने दरवाजा उघडला. नंतर रावसाहेब तेथे क्षणभर बसून सर्वांचे समाधान करून नंतर आपले गोटांत निघोन आले. राज्याचे खजिन्यांत रोख अर्थ तीन चार लक्ष रुपये होते ते मात्र घेतले. काही वस्त्रेही घेतली व गहू, तुरीची डाळ वगैरे सामानही तेथून भरून घेतले. काही घोडी व काही बैल वगैरे ओझ्याकरिता घेतली आणि राजपुत्रास आपले हाती गादीवर बसविला. राज्याभिषेक काली वाद्ये बहुत वाजविली. त्याच दिवसी भोजने जाहाल्यावर राजपुत्राची स्वारी शहरांत मिरवणूक काढिली. मोठ्या थाटानी रस्त्यानी मिरऊन रावसाहेबांनी स्वता वाड्यांत आणोन राजासनावर

गांव आहे. तेथे तात्या टोपी वगैरे स्वार जाऊन गांवात चौकसी बहुत केली. परंतु नर्मदेस उतारा आहे असे समजले नाही. तो त्या गांवी येक शूद्र अतिवृद्ध नव्वद वर्षांचा होता. त्याजपासी तात्या टोपी बसून सर्व हकीगत सांगोन असे विचारले की, नर्मदागंगेस पायउतारा आम्हास कोणी दाखवील तर त्यास बक्षिस रुो १०० देऊ आणि ही गोष्ट त्याणी व आम्ही मात्र बोलू नये. वगैरे गोष्टी सांगोन त्या वृद्धास चांगले अश्वासन देऊन तो वृद्ध कबूल जाहाला. नर्मदा गंगेस फार पूर आला होता. गंगेचे तासाबाहेर पाणी वाढले होते. मग लागलीच तो वृद्ध काठी हाती घेऊन नर्मदातीरी येऊन तीरानी वर सुमार येक मैल जाऊन तेथे उभा राहिला आणि त्या स्वारांस व तात्या टोपी यास तो गंगेचा उतारा दाखविला. येथे नर्मदा रुंदीची जागा जाहल्यामुळे व खाली सर्व वाळू असल्यामुळे येथे या दगडापासून पलीकडे खडपा दिसत आहे त्याच खडकावर सुमारानी जावे. किंतीही जरी पूर आला तरी पाणी येथे ओढत नाही. छातीवर खोली नाही. हे सर्व खरे आहे असे त्या वृद्धानी सांगताच तात्या टोपी याणी त्यास असे सांगितले की, आम्ही पलीकडे जाऊन येतो आणि तुजला रुपये देतो. तेथपर्यंत तूं येथे असावे. असे सांगोन ईश्वराचे नाम घेऊन घोडे आत घातिले. ते घोडे स्वारी वर असता पोहून सांगीतले खडकावर निघाले. नंतर पुन्हा परत आले, मग त्या वृद्धास शंभर रुो दिल्हे. आणि स्वार लष्करास बोलाऊ पाठविले. ते स्वार तीनचार कोश घोडे दवडत जाऊन सर्व लस्कर तेथे नर्मदातीरी आणोन उभे केले. ते समई सर्व लोक भिऊन गेले होते, कारण नर्मदा गंगा फार पर्ज्यन्यामुळे वाढली आहे. भयंकर नदीचे तास दिसते. हे कर्म फार कठीण आहे असे परस्परे भाषण करीत आहेत तो, श्रीमंत रावसाहेब घोड्याखाली उतरून श्री गंगेस नमस्कार सााो घालून हळद कुंकुम वाहून भरजरी शालू व जरीकाठी चोळीचा खण येक श्री गंगेस अर्पण केला, आणि प्रार्थना केली· गंगाबाई तूंच आम्हास रस्ता देसील तर आता उपाय आहे. असे म्हणोन घोड्यावर बसून घोडा प्रथम पाण्यांत घातला.

मागोमाग तात्या टोपी, लालपुरी बाबा गोसावी व जल्काराम भाऊ वगैरे सर्व लोकांनी आपले घोडे गंगेत घातले. सर्व पलीकडे निघोन गेले. मग लस्करात ओझ्याचे हत्ती बावीस होते ते नर्मदेत उभे करून लोक हत्तीवरून उतरू लागले. सर्व सामानसुमान भांडीकुंडी, धान्याच्या गोण्या वगैरे सर्व लस्करी लोक उतरले. नर्मदेचे दक्षण तीरावर येऊन परत तीरानी सांडियाचे घाटावर बहुत झाडी मोहो व वड वगैरे होती, त्या झाडीत तळ धरून उतरले. सर्वांची मने निर्भय होऊन

आनंदानी आपआपोपली जेवणे कर्ण्यास लागले. तों इंग्रज मागे लागलेला होता. तो दिवस मावळता सुमारे नदीपलीकडे येऊन तोफेस बत्ती दिल्ही. तात्या टोपी याणीही उतरलेले तळापासून येक लहानसा डोंगर नजीक होता त्याजवर तोफा ठेऊन आवाज काढू लागले. गोळे नर्मदेपलीकडे पडू लागले. ते समई इंग्रजासही असे वाटले की, या गंगेस मोठा पूर आलेला असून सर्व लस्कर पलीकडे गेले, त्यापेक्षां गंगेनेच कृपा करून वाट दिल्ही यात संशय नाही. नंतर इंग्रजानी नावा तेथे आणिण्याचा विचार ठेविला. आणि तेथेच मुकाम करून इंग्रजी लोक राहिले. श्रीमंतांकडील लोक आठ दिवस तेथे होते. इंग्रजांनी नावा आणोन लस्कर उतरू लागले ही बातमी समजताच बंडवाले लोकांची गर्दी निघण्याची जाहाली. ते समई अवसीची चार घटका रात्र जाहाली होती. बुंदीकोटा हाती येऊन अर्थ संपादित जाहालेला बराबर इथून पुढे बालगणे कठीण आहे. यास युक्ती काढिली पाहिजे. ते समई सर्वानुमते असे ठरले की, येथेच वडाचे झाडाखाली पुरून ठेऊन जावे. पुढे थोडे दिवसात येथे येऊन अर्थ घेऊन जाऊ. असे ठरताच तपेल्यात मोहारा व पुतल्या येकंदर अर्थ चालिस हजार पासून पन्नास हजारपर्यंत असावा. त्या तपेल्यावर तांब्याचे पातेले उपडे घालून वडाचे उत्तरेस वडाचा मध्यभाग धरून वडापासून दोन हातावर मोठी खाच काढून पुरून ठेविला. मुख्य ठेवणारात श्रीमंतांचा हुजऱ्या होता व तात्या टोपी असे दोन मुख्य होते. मग तेथून कुच करून सातपुड्यांत गेले. इकडे पृथ्वीवर असा लौकिक जाहाला की, श्रीमंतांस लस्करसु।। श्री नर्मदा गंगेस वाट दिल्ही. नर्मदेस पूर फार आला होता. इंग्रजी फौज जो तेथे आली तो वाट जाण्यास नाही. असा लौकिक जगात जाहाला. इकडे फौज सातपुड्याचे बाहेर दक्षणेकडे पडता पडता इंग्रज मागोमाग पाठलाग करीत आला, असे समजताच डबल कुच करून चालू लागले. वाटेने लोकांचे सेताचे नुकसान करीत चालले होते. येके दिवसी असे घडले की, पूर्वदिवसी सर्व लस्कर उपोषित होते. मुक्कामावर उतरताच पाहता रात्र प्रहर जाहाली. तशात दिवस पर्ज्यन्य काळचे. पाणी वगैरे नीट व्यवस्था नव्हती. याजमुळे लोक सर्व क्षुधित असता प्रातःकाळी मकाईचे धान्याचे सेत लागले. ते येक कोश रुंद, दोन कोश लांबी होते. त्या सेतात लस्करी लोक जाऊन येकही ताट ठेविले नाही. ती मकाई नुकती कोहोळी कणसे बाहेर पडत होती. तसीच लोकानी गोडगोड म्हणोन संपविली. पुढे कितीक ठिकाणी उसाची गुल्हारे लागलेली होती. तेथून जाऊन गूळ घेऊन सर्व नाश करून पुढे जावे. वाटेने ऊस उभा पाहिला म्हणजे

जाहालो. जाता जाता पाहाटची घटका रात्र राहिली, तो सोबती यास शौचास होऊ लागले. ते असे की, पाठीतून रेप येऊन येकदम घाई जाहाली. ती वाटेने कासोटाही सोडण्यास फुरसूद नाही. तो रेच अर्धे घागरीचा जाहाला. शक्ती मुळीच गेली. चालण्याचे अवसान नाही. असे जाहाले. मग मी त्याचे ओझे सर्व घेतले आणि काकानी त्याचा हात धरून हळुहळू चालत होतो तों उजाडले. पुन्हा येक रेच जाहाला. तोही बराच जाहाला. तेणे करून फार व्याकुळ जाहाला. तो पन्नास घरे वस्तीचा येक गांव लागला. त्या गांवात लिंबाचे झाडाखाली चौथऱ्यावर उतरलो. नंतर गांवात दुकानाचा शोध करून सुंठ, मिरे, हिंग वगैरे जी औषधे मिळाली ती आणोन त्यास पाजिली. गावचे लोकही तेथे जमा जाहाले होते. त्याणीही औषधे बहुत दिल्ही, परंतु उतार नाही. जास्त प्रकृत होऊ लागली. पायांतून पेटगे येऊ लागले. पुढे वायूही जाहाला. ते समई त्या गांवचा फौजदार बोलाऊन त्याचे चीजवस्तूची याद केली. नंतर सकाळी प्रहर दाहा घटका दिवसास तो ब्राह्मण मरण पावला. नंतर त्या गांवचे लोक बलाऊन त्याची चीजवस्तु विकून रुो केले. तेथे लाकडे मुळीच नाहीत, गोवऱ्या मिळतील म्हणोन लोकांनी सांगितले. मग गांवचे बाहेर ओढ्याचे काठी गोवऱ्या मजूर मनुष्यापासून नेवऊन ठेविल्या. पुढे आम्ही आपली गाठोडी एका मनुष्याचे घरी ठेऊन त्याचेच पासोडीत त्यास घालून आम्ही उभयतानी ओढ्याचे काठी नेऊन ठेविला. नंतर काकांनी गोवऱ्याची थाळ रचून त्याजवर ते प्रेत ठेऊन वर गोवऱ्या लाऊन अग्नी दिल्हा. तेथे चार साहा घटका मोडून पुरे दहन जाहाले असे पाहून स्वच्छ स्नाने करून पुन्हा बिराडी येऊन गाठोडी घेऊन त्या गांवातून चालतो जाहालो. तेथून दोन कोशावर जाऊन तेथे दिवस मावळला. पुढे जेवणाचे करून भोजने केली आणि तेथे वस्ती केली. दुसरे दिवसी तेथून घोडी दोघांस करून मजल दर मजल चालते जाहालो. आठा दिवसी घोडी सोडून देऊन तेथेच राहिलो. त्या गांवचे नांव स्मरणांत राहिले नाही. दिवस श्रावणाची अखेर पर्ज्यन्य फार. पुढे भाद्रपद मासी तेथून निघोन चालते जाहालो. आठ दाहा रोज जाहाल्यावर येका मुकामी धर्मशाळेत अस्ता अकस्मात् ब्रह्मावर्तापो दोन दक्षणी ब्राह्मण ती ।। काकांचे अति परिचित तेथे आले. त्याणी सर्व म ।। र बंडापैकी सांगीतला, तो त्या रात्री ऐकिला. दुसरे दिवसी त्या दोन ब्राह्मणांस ।। वाटेने सोबतीने ब्रह्मावर्तास जाण्याचे इराद्याने निघोन चालते जाहालो. तेव्हा त्या ब्राह्मणांस असे विचारिले की, तुम्ही जे सांगणे सांगाल ते खरे मात्र सांगावे. तेव्हा काका मजला फार रागा

नाहीपेक्षा आपली अब्रू जाईल. यास्तव मी प्रथम जातो आणि युक्तीने प्रयुक्तीने त्या उभयतांची समजूत करितो. असे सांगोन बागांत कुंडमंडपात गेलो. तेथे सर्वांनी असे सांगितले की, आम्हास पद्मकुंडाचा पत्रविभाग बसत नाही. सबब तुम्हास बलावणे पाठविले आहे असे सांगताच प्रथम त्यांस आम्ही कळविले की, तुम्ही उभयतांनी कुंडार्क पाहिला आहे. परंतु ते पुस्तक येथे आणोन मग टीका पाहून खडूच्या रेघा मारून कुंड तयार करावे. असे सांगताच पुस्तक आणविले आणि पद्मकुंडाची टीका आम्ही वाचून रेषा मारण्यास आरंभ केला तों, त्या उभयता ब्राह्मणांचे कंठसूत्र मुळीच चुकले होते. ते उत्पन्न होताच सर्व मंडळीस आनंद जाहाला आणि पद्मकुंड सिद्धीस गेले. गौड मंडळीत प्रतिष्ठा चांगली जाहाली आणि शास्त्रीबाबांस यश आले. नंतर नेमले दिवसी प्रातःकाळी पुण्याहवाचन करून नांदीश्राध्धी ब्राह्मण भोजन करविले. ऋत्विजांस मधुपर्क पूजा करून अनुष्ठान बंद जाहाले. दुसरे दिवसी मंडप प्रतिष्ठा वगैरे कर्म करून मंडळापर्यंत होमही केला. याप्रा॰ प्रतिदिवसी कर्म होत होते. शेवटचे दिवसी राजा व त्याची बायको व घरांतील देव, बाण, शाळीग्रामसु॰ जवळ घेऊन तूळेमध्ये बसून भारंभार रु॰ घातले. अनुष्ठान समाप्त जाहाले. मजला सादस्यवर्ण दिल्हा होता पुस्तक धरून चालविण्याचे काम मजकडे होते. सर्वांनुमते अनुष्ठान चांगले जाहाले. भोजन जाहाल्यावर त्याच दिवसी सभा करून द्रव्य बहुत वाटले व वस्त्रेही दिल्ही. शास्त्रीबाबांस दोनशे रुपये किंमतीची जालजोडी हिरवी दिल्ही. मजला पीतांबर तांबडा मिळाला होता व सर्व दक्षणी ब्राह्मणांस रेशीमकाठी धोत्रजोडे दिल्हे. शास्त्रीबाबांस रु॰ दीडशे रोख दिल्हे व दर ब्राह्मणास पन्नास रु॰ दिल्हे. खेरीज मधुपर्काबा॰ रु॰ दाहा दाहा पोचले. मजला ब्राह्मणांबराबर पोचून शास्त्रीबाबांनी राजास कळऊन खेरीज पन्नास रु॰ रोख मिळाले. मिलोन मजला शंभर रु॰ मिळाले. राजाने चार दिवस सर्व मंडळीस राहून घेऊन रोज नवे पक्वान्न करून फार सत्कार करून गाड्या मंडळीस व शास्त्रीबाबांस मेणा देऊन, बराबर कारकून स्वार देऊन ब्रह्मावर्तास रवानगी केली. आम्ही वाटेने मौजेने मजल दर मजल करीत ब्रह्मावर्तास पोहोचलो. तेथे महिनाभर राहून ब्रह्मावर्ताची मंडळी नैमिषारण्य श्री अयोध्येचे यात्रेस येकंदर तीस पसतीस मनुष्ये निघाली. तेव्हा ती॥ काका व मी आम्हीही त्याजबराबर गाडीची सोई करून निघालो. ते कानपुरावरून लखनौ शहरावर वस्ती केली. लखनौ शहर पूर्वी वर्णन केले आहे. येकंदर शहर आठरा वीस कोश वस्तीचे आहे. दोन दोन कोशावर सराई म्हणजे

ऋग्वेदी याचे आहे. राजाचे वय हाली ऐसी वर्षाचे आहे. पुढे औरस पुत्र नाही. राजपत्नी पाउणशे वयाची आहे. पूरवी या राजाने षोडश महादानास आरंभ केला आहे. आम्ही पाच चारदा तेथे गेलेलो आहो, हाली तुलापुरुष दान होणे आहे. काल रोजी तेथून मुदाम कारकून येऊन सर्व म ।। र सांगोन गेला आहे. पूरवी आम्ही गेलो तेव्हा आम्हा बराबर विद्वान् मंडळी व याज्ञीक मंडळी चांगली होती. हाली क्षेत्रात मंडळी तसी राहिली नाही. परंतु काही आहे, त्यांस आजच समजूत दिल्ह्यास ते सर्व तयारी करतील. सबब आपल्यास सूचना दिल्ही आहे. असे त्याणी सांगताच त्याजबराबर येण्याचे कबूल करून बिराडी आलो. नंतर ती।। काकांस सर्व म।।र सांगीतला. आता हा भाग पुरता करतो. भाग पाचवा समाप्तः समाप्तः

## भाग साहावा

# बिलसियास तुलापुरुष दान

नंतर दानमयूख व दानचंद्रिका व दानखंडादि ग्रंथ पाहून अनुष्ठान सर्व तयार केले. तो आठा दिवसी सुमारे बिलसियाचे राजाकडून पाच स्वार व येक कारकून ब्रह्मावर्तास ब्राह्मण नेण्यास शास्त्रीबाबाकडे येऊन पोहोचले. नंतर बारा ब्राह्मण विद्वान् येकंदर बलावण्याचे, बराबर त्यास बसण्याकरिता गाड्या व वाटेने जेवण कर्ण्यास येक आचारी ब्राह्मण व येक खटपटी ब्राह्मण व येक गडी याप्रो बेत करून रामचंद्र शास्त्रीबाबास बसण्यास मेणा राजाकडून आलेला याप्रो सर्व व्यवस्था होऊन मुहूर्त पाहून निघालो. वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र शास्त्रीबाबांचे वय ते समई पाउणशे वर्षाचे होते परंतु तो पुरुष राजरत्नच केवळ होय. थोडा वेद पढलेला असून न्याय व्याकरणांत हुषार व गाणेही चांगले. श्रीमंत बाजीराव साहेबांचे आग्रहास्तव श्रीमंतांपुढे पुराण वाचीत असत. परंतु श्रीमंतांखेरीज पुराण कोठेच वाचिले नाही. सतत श्रीमंतापाशी पंचावन वर्षे आश्रयानी घालविली. श्रीमंतांची मेहेरबानी फार असल्यामुळे, लक्षावधि रुपये मिळविले. पुराण सांगण्यात कसब असे होते की, येका सिलोकात पूर्वार्ध येका रागात आणि उत्तरार्ध येका रागात आणि पदच्छेदास गाण्याचे योगाने भंग नाही. श्रीमंतांकडे श्रौत प्रकर्णी व किरकोळ स्मार्त प्रकर्णी जे संकल्प होणे ते शास्त्रीबाबांनी सांगण्याचे काम होते. श्रीमंतांचे पदरी मोठेमोठे पंडित राघवेंद्राचार्य आपाशास्त्री मीमांसक व तातू दिक्षित भडकमकर वगैरे जरी होते तरी धर्मशास्त्र शास्त्रीबाबांनीच सांगितले पाहिजे. शास्त्रीबाबासारखा विद्वान् चतुरस्र पृथ्वीवर थोडा आहे. असो. मजल दर मजल जाता जाता बिलसियास पोहोचलो. ते दिवसी जाण्यास रात्र जाहाली. सबब राजाने पुढे मशाली व काही सिवबंदीचे लोक पाठविले होते. राजधानींत गेल्यावर येक बंगला आम्हाकरिता रिकामा करून दिल्हा होता, तेथे सर्व मंडळी उतरली. रात्र फार जाहाल्यामुळे फराळास पेढे, बर्फी व दही, आले, लिंबे, मिरच्या ओल्या व दूध पिण्यास राजाने बहुत

मार्ज्यन्य करून पुढे जावे याप्रो दररोज यात्रा करीत होतो.

येके दिवसी गोमती गंगेचे पार जाऊन तीर्थे,देव हिंडत होतो. तों उंबरांचे वृक्षांची झाली लागली. तेव्हा गंगापुत्रांनी आम्हास असे कळविले की, या उंबराचे फळात कीट मुळीच नाही. ऋसीनी वर दिला आहे. इकडील रहिवासी लोक पाचचार उंबर घेऊन पसाभर कणिक घालून गाकर किंवा रोटी करण्याचा सांप्रदाय आहे. हे उंबर उत्तम अंजिरापेक्षा गोड आहेत. मंडळीने घ्यावे, खावे. असे त्याणी सांगताच सर्व यात्री मनुष्यांनी ते थंड उंबर दोन प्रहरी पोटभर भक्षण केले आणि सात आठ यात्री विधवा होत्या त्याणी आपआपोपले ओटीत बिराडी आणण्याकरिता घेतले होते. पुढे अधकोशपर्यंत जाऊन तीर्थ करून परत येते समई गोमती गंगेत येताच गंगापुत्रांनी असे सांगीतले की, तिकडील उंबर इकडे आणू नये. आणणे असल्यास भारंभार उंबराचे सोने इकडे ठेऊन न्यावे, नाहीतर यात्रा फुकट जात्ये. असे ऐकताच त्या विधवा बायांनी भडाभडा ओट्यातून उंबर काढून गंगेत टाकिले आणि कोशभर ओझे बाळगल्या बाो गंगापुत्रांस रागा भरल्या. नंतर गोमती गंगेतटाकी सूर्यावर्त म्हणोन तीर्थ आहे त्या तीर्थानजीक गंगापुत्र जाऊन येकक मनुष्यास हाती धरून त्या तीर्था स्नाने करवीत असे. पृथ्वीवर जेथे उष्णोदकाचे तीर्थ आहे तेथे त्या तीर्थास गंधकाची गंधी येत्ये. परंतु हे तीर्थ अति उष्ण अस्ता गंधकाची गंधी नाही. तेथे स्नाने करून पांडवतीर्थावर गेलो. नंतर रामतीर्थी स्नाने करून बिराडी वस्तीस आलो. दुसरे दिवशी हत्याहरण तीर्थावर गेलो. तेथे गंगापुत्रांनी असे सांगीतले की, शतावधी जन्माचे ठिकाणी जीवहत्या केल्या असतील ती पातके सर्व दूर होतात. येथे क्षौरश्राध्द आहे. इंद्रास पूर्वी वृत्रासुराची हत्या जाहाल्याबाो येथे आणोन स्नानाची शुध्धी केली आहे. तसीच श्रीरामांनी रावण मारिल्यावर ती हत्या जाण्यास वसिष्ठांनी रामास येथे स्नानास आणिले होते, असे हे तीर्थ परमश्रेष्ठ आहे. असे ऐकून तेथे तीर्थविधी केला. आणि विधवा स्त्रियांसही असे कळविले की, आता स्नाने करून जीवहत्येपासून मुक्त जाहाल्यात. परंतु पुन्हा जीवहत्या न होई असे मात्र ठेवा. असेही कोणी त्या बायकांचे लगतीचे होते त्याणी सांगीतले. तेथे श्राध्दे करून तीर्थे हिंडण्यास गेलो. सायंकाळी वस्ती करून पुन्हा दुसरे दिवसी ललिता देवीची यात्रा करण्याकरिता गेलो. तेथे ललिता देवीचे पिधान आहे. सेंदूर लाविलेला आहे. तेथे जाऊन पूजादि करून यात्रा करून तीर्थे केली.

व त्याणीही पळतापळता बंदुकांचा भडमार केला. त्या योगाने दाहा बारा काळे लोक मेले व गोरेही पंचवीसतीस मरण पावले. पुढे गढीत जाऊन दारूगोळा, खजिना होता तो स्वाधीन करून घेतला. त्या गढीखाली मालथो म्हणोन लहानसे शहर होते. तेथील रयत पळाली होती. काही माणसे वृद्ध, मुले, आजारी लोक राहिले होते, मग सर्व बंडवाले लोकांनी तें शहर लुटून टाकिले. हलवी लोकांकडील बर्फी पेढे वगैरे हत्तीचे सलिद्यांत भरून घेतली. काही अर्थही तेथे मिळाला. तेथे आठ दिवस वस्ती करून पुन्हा परत फिरले. पलटणी लोकांजवळ रुो फार जाहाल्यामुळे ते लोक फार उन्मत्त होऊन हुकूम ऐकत नाहीसे जाहाले. कितिक पलटणी लढवाईक पळूनही गेले. किती येक लोकांनी असे केले की, इंग्रज सरकारानी जाहीरनामा लाविला होता त्यात असे लिहिले होते की, ज्या लोकांस आमचे भय वाटत असेल त्याणी आमचे भय न धरिता सिपाईपणाचा दरेस टाकून हतेर सोडून खुशाल आपोपले घरी जाऊन निर्भयपणे राहावे. त्याजवरूनही काही लोक बंड सोडून घरी गेले. राहिलेले लोक माळवे देशात आले. आम्हीही विचार केला की, आपण अर्थ संपादनेकरिता या बंडात आह्ो तर तो अर्थ मिळत नाही, त्यास आपणही हे सोडून ब्रह्मावर्तास जावे. असा विचार करून त्यातून बाहेर पडून जात आहे. तुमची आमची संगत चांगली चालली आहे. आता येकमेकास जपून जाऊ. असा विचार करून मजल दरमजल जाता जाता यमुना उतरून ब्रह्मावर्तास गेलो. तेथे गेल्यावर वेदशास्त्रसंपन्न बाबा कर्वे यांजकडे बिराड करून राहिलो होतो. तेथे ते समई श्रीमंताचे बाग मोकळे होते. त्यास सकाळी बागांत जाऊन फुले बहुत प्रकारची व बोर वगैरे फले प्रति दिवसी आणीत होतो. क्षेत्रसमंधे देवांची दर्शने घेत होतो. श्री वाल्मिकेश्वरादि देवतांस प्रतिदिवसी नमस्कारास जात होतो. तो कार्तिक मास संपला. पुढे श्री क्षेत्र कासीस जाण्याचा विचार करीत होतो तों वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री बाबाकडून मजला बोलावणे आले. म्हणोन शास्त्रीबाबाकडे जाऊन विचारले तों त्याणी असे सांगितले की, मार्गशीर्ष व।। ३० रोजी बिलसियाचा राजा तुला पुरुष दान करणार आहे. त्यास ते अनुष्ठान कुंडमंडपाचे आहे. तर तुम्हास आम्हाबराबर येऊन अनुष्ठान पार पाडिले पाहिजे. त्याजवरून आम्ही त्यास प्रश्न असा केला की, बिलसिया हा गांव येथून किती लांब आहे व तो राजा कोणत्या जातीचा आहे वगैरे विचारिल्यावरून शास्त्रीबाबा सांगू लागले की, बिलसिया हा गांव येथून चाळीस पंचेचाळीस कोश आहे. ते संस्थान तीन लक्षाचे आहे. गौड ब्राह्मण

धर्मशाळा मुशाफरास उतरण्याकरिता बांधिल्या आहेत. तेथे सर्व जिनस मिळतात. दुसरे दिवसी शहरांत वस्ती करावी लागली आणि पाहाटेस उठोन गाड्या भरून रस्त्यानी चालू जाहालो. वाटेने प्रहर दिवसास गोमती गंगेवर पुलानजीक उतरून स्नाने वगैरे करून पुन्हा रस्त्याने चालू लागलो. आम्ही काही लोक व बायका काही पायी चालत होत्या. गाड्या येका मागे अशा थाटाने जात असता, येके ठिकाणी काही जिनस घेण्यास मी व दोन विधवा स्त्रिया दुकानावर उभ्यानी जिनस घेत होतो तों गाड्या व पायी चालणारी मनुष्ये सर्व निघोन गेली. आमचे ध्यानांत राहिले नाही. आम्ही जिनस घेऊन घाईने लौकर मनुष्ये अटपावी म्हणोन रस्ता चालू लागलो तों, आम्ही समोर निघोन गेलो. नैमिषारण्यांत जाण्याचा रस्ता सुटला. येक दोन कोश शहर तुडवीत गेलो. तेथे विचारिता ठिकाण लागेना. मग लोकांस विचारून जाता जाता रात्र पडली, तेव्हा महासंकष्टात पडलो. परंतु मजपासी रुपये खर्चास होते. मग सराईत उतरून जेवण केले. तेथे वस्ती करून सकाळी शहर सोडून चालता चालता यात्रेचे लोकांचे ठिकाण लागू लागले. बारावर दोन वाजता सर्व मंडळीच्या भेटी जाहाल्या. दुसरे दिवसी लोधेश्वर सांब प्रसिद्ध स्थानास जाऊन पूजा वगैरे करून पुढे मजल दर मजल चालते झालो. वाटेने भय राहिले नव्हते. तों येके दिवसी दोन प्रहरी रस्ता चालत असता पाच साहा स्वार दोन आसामी दक्षणी ब्राह्मण रस्त्यावर भेटून वाटेने अनेक गोष्टी सांगत अस्ता, त्याणी आम्ही घरून निघाल्या तागाईत सर्व गोष्टी ऐकून परिणामी अर्थ संपादित केला नाही असे समजून ती।। काकांचे परिचयाचे ब्राह्मण ब्रह्मवर्तपो असल्यामुळे भरवसा धरून व बंडापो हे लोक आहेत असी खूण त्याजपासी पाहून आम्ही त्याजबराबर जाण्याचा ठराव करून आपले ओझे वगैरे निराळे काढिले असे पाहून ब्रह्मावर्तापो मंडळी होती त्यापो तीन आसामी आम्हाबराबर येण्यास कबूल जाहाले आणि आम्ही सर्व स्वाराबराबर चालते झालो. यात्रेचे लोकही गेले. पुढे आम्ही जंगलात जाताजाता नैमिषारण्याचे दक्षण बाजूनी जाताजाता काळे लोकांचे तळावर जाऊन पोचलो. नंतर त्याजबराबर जाताना येक दोन ठिकाणी इंग्रजाबराबर चार चार घटका युद्ध झाले. त्यात येक ठिकाणी ईश्वरे काळे लोकांस जय दिल्ह्या कारणानी इंग्रज सरकारचा खजिना व तोफा, तंबू वगैरे लुटून आणण्यास ठीक झाले व गहू वगैरे धान्यही बरेच मिळाले. पुढे आठ दाह रोजी पुन्हा लढाई जाहाली. त्यात काळे लोकांचा पळ निघाला. तेव्हा खजिना तोफा वगैरे सर्व सामान इंग्रजानी नेले

आणि लोकही दशदिशा पळून गेले. तेव्हा दक्षणी लोकांपासी अर्थ बराच होता. ज्याचे कंबरेस होता तो आपला जीव बचाऊन दोन सोबती पाहून चालते झाले. बंडवाले लोक नेपाळास जावे या हेतूने निघोन गेले.

## नैमिषारण्यांत

नंतर आम्हाबराबर चार ब्राह्मण दक्षणी सोबती राहिले होते. त्यासमेत आम्ही नैमिषारण्यांत गेलो. प्रथम पंचप्रयाग तीर्थावर वस्ती केली. दुसरे दिवशी क्षौरश्राध्ध करून दधीच ऋषीचे आश्रमास गेलो आणि नैमिषारण्यसंमधे तीर्थे व देवयात्रा करू लागलो. येकंदर नैमिषारण्य क्षेत्र चौऱ्यांशी कोशांचे आहे. ती भूमि देवांची आहे. तपश्चर्येस जागा योग्य फार आहे. सर्व अरण्यांत दोन हातावर पाणी महापूर आहे. तेथे तृण, दर्भ, कुश, काश, वगैरे यज्ञीय तृणे असून सर्व क्षेत्राची सपाटी आहे. कोठेही टेपटाप नाही व दगड खडा मुळीच नाही. तेथे पाऊस बहुधा दर महिना पडतो. अरण्यांत वृक्ष, आंबे, जांबूळ, उंबर थोडा थोडा पळस, शमी वगैरे यज्ञीय वृक्ष फार आहेत. ते सर्व देववन असल्यामुळे फुलेझाडे अतिशइत आहेत. तांबड्या पांढऱ्या कणेरी व पिंपळ, रासतुरे, पिवळे, तांबडे, नागचाफे, जासवंदी सर्व प्रकारच्या मोठ्या मोठ्या आपाप झालेल्या व सर्व प्रकारच्या कुरांटिका जागोजाग सदागुलाबाची बेटे बहुत आहेत. चमेली, मोगरी वगैरे वेलीची फुले वृक्ष वेष्टून आहेत. नैमिषारण्यांत सर्व ऋसी दीर्घसत्रास आरंभ करून कलियुग समाप्त होईपर्यंत सूतापासून पौराणे श्रवण करण्यास सभेचा नियम करून राहिले आहेत असे शास्त्रांत वर्णन आहे. ती जागा पाहाता पाच हात लांब व पाच हात रुंदीचा चौथरा बांधला आहे. त्या चौथऱ्यावर कोणी बसेल सबब उंच देवळासारखे करून वर कळस केला आहे. त्याजवर येक गालिच्या हातरून ठेविला आहे. त्या चौथऱ्याचे पूर्वपश्चम, दक्षणोत्तर ओळीने आंब्याचे वृक्ष हजारो आहेत. ती व्यास गादी असे म्हणताल. तेथून वायव्य कोणावर सूताचे दहन केले आहे. तेथे तीर्थ आहे आणि गंगापुत्रांनी असे आम्हास सांगितले की, या तीर्थावर असी प्रचीती आहे की, हे दोन आंबे आहेत ह्या आंबावर काटेसिवती आहे ही बारा महिने फुलत असत्ये. कधीही खंड पडत नाही. येके दिवसी सिवतीचे फुलांचा लक्ष होईल असे फुले आहेत. आम्ही असा नियम ठेविला होता. सकाळी पंचप्रयागी स्नानसंध्यादि करून हातात मूठभर दर्भ घेऊन तीर्थे हिंडत असो. गंगापुत्रानी तीर्थमहिमा अति सांगितल्यास स्नान करीत असो. नाहीपेक्षां दर्भानी

पाठवून दिल्हे. रात्रौ सर्वास बिछाने रजया पांघरण्याच्या समेत दिल्ह्या. रात्रौ स्वस्थ निद्रा केली. पाहाटेस उठोन रोजक्रमाप्रमाणे मी शास्त्रीबाबापासी जाऊन बसलो. ते समई शास्त्रीबाबा मजपाशी अनेक गोष्टी बोलत होते. त्यात असे सांगितले की, मी असीच मंडळी घेऊन पाच चारदा येथे आलो. परंतु मजला येश मिलोन आनंदानी परत गेलो. आता गंगाबाई पार पाडील ते खरे. याचे कारण या राजधानीपासून बारा कोशावर कनोज म्हणोन क्षेत्र शहरासारखे आहे. बारा कोश वस्ती क्षेत्राची आहे. ते क्षेत्र गंगा-यमुनेमध्ये भागिर्थी तीरी आहे. तेथे ब्रह्मदेवाने बहुत वर्षे तपश्चर्या करून ब्राह्मण उत्पन्न केले. याजमुळे सर्वेपिकान्कुब्जा भवन्ति।। सर्व ब्राह्मणांची उत्पत्ति त्या क्षेत्रात जाहाल्यामुळे जन्मस्थान क्षेत्र ते आहे. हाली तेथे ब्राह्मण वस्ती दाहा हाजार तरी होईल. तेथील पंडित विद्वान येथे फार येतात व भूयसी करिता रमण्याचे आशेने सेवटचे दिवसाला हजारो येतात. पुढे येखादी सभाही होत्ये. हे गौड ब्राह्मण आपले ब्राह्मणाबराबर शुद्ध मनानी नसतात. अनेक प्रकारचे कूटार्थ काढून फसविण्यास पाहातात. असे त्याणी सांगताच मीही त्यास असे कळविले की, आम्ही दक्षणी ब्राह्मण येथे आलो आहो. त्यात निःसंशयानी कुंडमंडप तयार होणे कठीण आहे. आम्हास प्रसंग नसल्यामुळे प्रसंगी पाहून जड जाते. परंतु प्रयोग अनुष्ठान त्यांच्यांनी आम्हा समक्ष होणेही कठीण आहे. आम्हास येक साधन आहे व त्यासही येक साधन आहे. आपण काळजी करू नये. मग आम्ही सर्व ब्राह्मण मंडळी उठोन स्नानसंध्यादि कर्मे करून भोजने केली. तिसरे प्रहरी गौड ब्राह्मण विद्वान् व राजोपाध्ये असी सर्व मंडळी मिलोन बागांत कुंडमंडप तयार केलेला होता, तेथे जाऊन आम्हास बोलावणे पाठविले. मी शास्त्रीबाबांनी सोमयाजीबाबा व महादेव भटजी वगैरे ब्राह्मण पाठविले. मी शास्त्रीबाबापासी बिराडी होतो. हे ब्राह्मण तेथे गेल्यावर गौड व दक्षणी येकत्र होऊन पद्मकुंड तयार करावयाचे मात्र राहिले होते. बाकी पांच कुंडे तयार जाहाली होती. त्या पद्मकुंडावर दक्षणी व गौड ब्राह्मण खडू हातांत घेऊन खडूनी कुंड तयार करू लागले. दक्षणी लोकानी तयार केले म्हणजे गौडांनी बराबर जाहाले नाही, असे म्हणोन पुसून टाकावे. गौडांनी तयार केले म्हणजे दक्षणी ब्राह्मणांनी मोडावे. याप्रो पाच चारदा जाहाले. नंतर गौडांनी विचार करून शास्त्रीबाबांस बोलावणे पाठविले आणि तेथील हकीगत समजाविली. तेव्हा शास्त्रीबाबांस फार विचार जाहाला आणि संकष्टात पडले. मग असे त्यास कळविले की, आपण तेथे मेण्यांत बसून येऊन सिध्धीस गेल्यास ठीक आहे,

नैमिषारण्यांत पायास काटा लागणे, तो सदा गुलाबाचा लागेल. जंगली कंटक वृक्ष मुळीच नाही. थंडी फार आहे. येकंदर अरण्यसंमध्ये यात्रेस दिवस दाहा बारा लागले. नंतर श्रीक्षेत्र अयोध्येस चालते झालो. ते मजल दर मजल करीत जात अस्ता चार सोबती बराबर आमचे होते. वाटेने जाताना.एका गांवी गेलो. तिकडे असी चाल आहे की, सर्व मुलुख सपाट. प्रत्येक गावांभोवताली मोठे कळकीचे बांबूची बेटे फार दाट असतात गांवात जाण्यायेण्यास रस्ता येक असतो. बाहेरून तोफ सुरू केली तरी गोळा गांवात जाणे कठीण व लोकही फार चोरटे आहेत. मुशाफर तेथे कसाही गरीब जावो त्याजला लुटून त्याजपासी भोपळ्याचा तुंबा असल्यास त्याजला लादी मारून काही अर्थ असेल म्हणोन तो तुंबा आपण घेऊन दुसरा तुंबा त्यास देतात. असी चोरीबाो त्या लोकांची सिकस्त आहे. आणि तो मुलुख लखनौ खाली असल्यामुळे नबाबांनी चांगला बंदोबस्त केला नव्हता. परंतु इंग्रज सरकारांनी तो मुलुख बंडप्रकर्णी घेतल्यावर इंग्रजांनी प्रथम आपला अमल बसवण्याकरिता चोर लोकांचे बंदोबस्ताकरिता येक कप्तान साहेब नेमून काम सुरू ठेविले होते.

आम्ही चौघेही मुशाफर एका गांवी वस्तीस गेलो. तेथे गांवाबाहेर पिंपळाचे वृक्षाखाली पारावर उतरलो. तेव्हा गांवात आम्ही मुशाफर आलो आहो असी बातमी लागताच दाहा बारा आसामी तेथे येऊन धुमी लाऊन जागत बसले. त्यास आम्ही असे सांगितले की, आम्हाकरिता तुम्ही जागत बसू नये. कारण आम्ही चार असामी आहों. तशात आम्हापाशी विशेष अर्थही नाही. मग त्याणी सर्व म।।र सांगण्यास आरंभ केला. तो मजकूर स्मरण जाहाले तो लिहितो. पूरवी हा मुलूख लखनौ खाली निजामाचा होता. परंतु या बंडाचे घालमेलीत इंग्रज सरकारांनी घेऊन गांवोगावी सर्व लोक जमा करून चोरीबाो ताकिदी दिल्ह्या. तुमचे गांवचे हादीत चोरी जाहाल्यास गांववाले लोकांस चौकसी न करिता फासी देऊ. चोरी गांवापासून भरून घेऊ. इंग्रजांचा अमल जाहाला आहे. चोरी लुटालूट कर्णे हे काम आजपर्यंत चालले, परंतु आता कोणी करू नये. याप्राो सर्व मुलखात साहेबानी समक्ष ताकिदी दिल्ह्या. नंतर जाहीरनामे लाविले. त्यात विशेष म ।। र असा होता की, ज्या गांवी मुशाफराची चोरी होईल त्या गांवात पाच वर्षाहून पलीकडे ऐसी वर्षांपर्यंत जो पुरुष सापडले त्यास बिज्यनात मारला जाईल, यास्तव चोरी करू नये. असे जाहीरनामे लागल्यावर कोणी येक साहेब सायंकाळी सूर्यास्त जाहाल्यावर ब्राह्मणाचा वेष घेऊन येकटाच येथून दाहा

कोशावर गांव आहे तेथे वस्तीस गेला. तोंडास दारूची घाण चालली होती. रसीलोटा लिंबाचे पारावर टाकून काही वस्त्रांचे गाठोडे बांधलेले पारावर टाकून आपण पारावर येक बाजूस खाली वस्त्र टाकून झोपेचे सोंग करून राहिला होता. गांवातले लोक संरक्षणाकरिता अवसीस दोन आसामी तेथे येऊन निजले होते. नंतर मध्यरात्री त्या मुशाफराचे गाठोडे व रसीलोटा चोरांनी नेला. पहाटेस तो साहेब उठोन गेला. नंतर तिसरे दिवसी येक पलटण व पाचसे स्वार बराबर घेऊन उजाडता गांवाभोवताली सर्व लोक उभे केले. प्रातःकाळी लोक उठोन झाडा करण्याकरिता गावाबाहेर येऊ लागले तेव्हा स्वारांनी कडामिनीच्या गोळ्या घालून ठार मारिले. आणि गांवातही शिरून शोधून पुरुष ठार मारिले. येकंदर पावणेदोनशे पुरुष बिज्यनांत मेले गेले. मग शोध करून गाठोडे व रसीलोटा सांपडला. तो घेऊन सरकारी लोक तो गांव सोडून गेले. त्यायोगाने सर्व मुलुखांत बंदोबस्त चांगला जाहाला. या प्रांतात या गांवचे लोक मेले ते शेजारचे गांवचे लोक अप्त असल्यामुळे हा जाहाला कहर फारच आहे. याप्राो मा॥र त्या लोकांनी सांगितला आणि सर्व रात्रभर पहारा करीत होते . दुसरे दिवसी आम्ही रस्त्यानी चालते जाहालो.

## अयोध्या नगरींत

जाता जाता श्री क्षेत्र अयोध्या चवदा कोशावर राहिली. तो तेथे शरयू गंगा आणि घागरा नद यांचा संगम जाहाला आहे. तेथे बिल्ववृक्ष बरेच आहेत. हे पाहून सर्व आम्ही तेथे उतरून स्नानसंध्यादि कृत्य करून तेथून निघोन श्रीक्षेत्र अयोध्येस पोचलो. तेथे काळे रामाचे मंदिरात उतरलो. रामनवमीचे पर्वास लोक फार जमले होते. पृथ्वीवरचे बैरागी लोक जमले होते व खेरीज यात्राही फार जमली होती. येकंदर सात आठ लक्ष यात्रा अयोध्येत जमली. काळे रामाचे देवळांत दक्षणी लोक फार उतरले होते. त्यांत वेदशास्त्रादि संपन्न पुरुषोत्तम शास्त्री कासीकरही तेथेच होते. क्षौरश्राध्धादि कृत्ये यात्री लोक करीत होते. ते समई विधवा स्त्रियांनी तमाम श्राध्धे करण्याचा आरंभ केल्यावर मी शास्त्रीबाबांस असा शास्त्रार्थ विचारिला की, स्त्रियांस पिंडदानपूर्वक श्राद्ध करण्यास अधिकार आहे किंवा कसे ? त्याजवरून शास्त्रीबाबांनी असे सांगितले की, विधवा स्त्रियांनी मुख्य संकल्प करून ब्राह्मणद्वारा श्राद्ध करावे. आपण तेथे पवित्रक घालून बसावे. परंतु स्त्रियांनी स्वता पिंडदानादि श्राद्ध करू नये. करतात ते अशुध्ध आहे, असे

त्याणी सांगितले शास्त्रीबाबांची योग्यता असी होती की, शास्त्रीबाबा हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण राहणार श्री क्षेत्र कासी वय सुम्मार पाउणसे वर्षाचे असावे. दशग्रंथ वेद पढलेले व न्याय व्याकर्ण वेदांतशास्त्रांत निपुण. श्रौतात त्याजबरोबरीचा कासीत कोणी नाही. गृहस्तपणाचे विद्येत निपुण. बायजाबाई सिंदीचे साहा लक्ष रुपये जमाबंदीचे मुलखाचे काम दिवाणगिरी पाच साहा वर्षे केलेली. याप्रो विद्येचा ब्राह्मण श्रेष्ठ होता. रामनवमीचे दिवसी सकाळी स्नाने वगैरे करून शास्त्रीबाबांस असे विचारिले की, या देशात येथे रामाची पूजा दक्षणी ब्राह्मणाची असल्याचे कारण काय? तेव्हा त्याणी असे सांगितले की, हाली हा देशस्त ऋग्वेदी श्रीरामाची पूजा करीत आहे. याचे पूरवी याचा पूर्वज श्रीरामभक्त अतिशईत होता. दक्षणेत गोदातीरी गंगाखेड म्हणोन क्षेत्र आहे तेथील राहाणार. प्रापंच करिता करिता लोकांचे कर्ज रुपये फार जाहाले म्हणोन तेथून निघून अयोध्येस येऊन बहुत दिवस शरयूचे स्नान करून तप करीत बसला असता येके दिवसी रात्रौ स्वप्नात ब्राह्मण वेशानी श्रीराम येऊन असे सांगितले की, उदईक शरयूत स्नान कर्ण्यास जाल तेव्हा तुमचे पायास मूर्ती सापडतील. त्या तुम्ही देवळात बसऊन पूजा करीत जावी. हा स्वप्न जाहाल्यावर जागृत होऊन शरयूत स्नान कर्ण्यास जाण्याबराबर मांडीवर पाण्यांत श्रीराम, लक्षुमण, सीता अशा वाळूच्या मूर्ती एक ओळीने येक प्रभावळीनी हातात आल्या. त्या अति हलक्या लागल्या. त्या घेऊन काठी वाळुवंटीवर ठेविताच सर्व लोकांस ही खबर समजली. अयोध्येचा राजा मानसिंग राजाचा पूर्वज होता. तो तेथे येऊन पूजाअर्चा करून देवालय बांधण्याचा हुकुम करून गेला. नंतर अर्चेचे दिवशी शरयू तीरातून मूर्ती आणण्यास लोक गेले. परंतु मूर्ती हालत नाहीशा जाहाल्या. बहुत लोकानी यत्न केला, परंतु मूर्ती उचलत नाही. असे जाहाल्यावर त्या ब्राह्मणास सांगितले तुम्ही मूर्ती उचलण्यास लागावे. तेव्हा त्या ब्राह्मणानी एका उजवे हातानी उचलून देवळात नेऊन ठेविल्या. अर्चा जाहाल्यावर देशस्त ब्राह्मणानी आपले कुटुंब अयोध्येस आणोन पूजा करून राहिला. तो वंश आजपर्यंत आहे. अशा कारणानी येथे पूजा दक्षणी ब्राह्मणाची आहे. दक्षणी लोक या रामास मानितात असा म||र आहे. अयोध्येत त्रेताचा राम म्हणोन देऊळ आहे. ती मूर्ती सुवर्णाची आहे. पहारेबंदी वगैरे बंदोबस्त ठेविला आहे. रामनवमी खेरीज दर्शन सवा रुपया द्यावा लागतो. तोही मुख्य राम मानितात. येकंदर रामाची देवालये सुमार चारशेपासून पाचशेपर्यंत आहेत आहेत. हाली शहर गंगातीरानी तीन कोश लांबीचे, कोश दीड

कोश रुंदीचे वसलेले आहे. आत नागेश्वर सांब वगैरे देवस्थाने बहुत आहेत व तीर्थेही फार आहेत. आम्ही येक दिवस तीर्थे अयोध्येपाो बहुधा पाहिली. अप्सरस तीर्थी स्नान केले. तेथे अष्टहरी आहेत. तीही यात्रा केली. अयोध्या क्षेत्र साठ कोश राहिले म्हणजे आंब्याची झाडी फार लागत्ये. पूर्व पश्चिम- दक्षण या तीन बाजूनी झाडी फार आहे. उत्तरेस शरयु गंगा व घागरा नद आहे. ते पाणी तीन कोश रुंदीचे मोठे वहात ओह. अयोध्येचे वस्तीपलिकडे दक्षणेस हणमंत गडी म्हणोन लहानसा पर्वत आहे, तेथे जंगल बरेच आहे. मारुतीचे राहण्याचे मुख्य स्थान आहे. मारुतीचे देऊळ चिरेबंदी आहे. तेथेही लोक दर्शनार्थ फार जातात. रामनवमीकरिता बैरागी आलेले हनुमंत गडीवर वस्ती धरून राहतात. पंधरा दिवस ते लोक क्षेत्री वस्ती करून जातात.

## वानरांचा उपद्रव

अयोध्या क्षेत्रास वांदर फार आहेत व माकडे बरीच आहेत. तेथे येक वानर काळा मोठा पिंपळावर बसून कोणाचे तरी गाठोडे किंवा दागिना पाहून तो वानर नेत असे. त्यास झिलबी अदशेर घेऊन त्यास दाखवताच वस्तु नेलेली आणोन देऊन झिलबीचा द्रोण वृक्षावर न्यावा. असा येक वानर सवकलेला होता. असे तेथे राहणार रामभट देशस्त याणी सांगून आपआपोपले वस्तुमात्राचा बंदोबस्त ठेवावा असे कळविले अस्ता पुणेकरीण येक विधवा होती तिणे आपले गाठोडे काही वस्तु काढण्याकरिता गच्चीवर जाऊन सोडले होते. तो वांदर याची नजर झाडावरून पोचताच त्या बाईचे मागून येऊन मुकट्याची गाठोडी होती ती उचलून झाडावर निघोन गेला. बाई माडीवरून मोठ्यानी ओरडू लागली. माझा सर्वस्व घात जाहाला कारण त्या गाठोडीत कर्डा आहे त्यात मोहरा दोन व पुतळ्या आहेत. मजला श्रीक्षेत्र काशीस जाणे असून ईश्वरे मध्येच संकष्ट आणिले आहे असे म्हणोन बाई घाबरून गेली. हे रामभट याणी पाहून बाईपासून आठ आणे घेऊन झिलबीचा द्रोण आणोन पिंपळावर बसलेला वानर यास दाखवून गच्चीवर दूर ठेऊन आपण पलीकडे गेला. नंतर अर्धी घटकेने गाठोडे आणोन वांदर याणी तेथे ठेऊन झिलबीचा द्रोण घेऊन झाडावर गेला. बाईने रामास एक रुपयाचे पेढे लोकांस वाटिले. अयोध्येत श्रीरामभक्त परशराम बाबा म्हणोन महासाधु जाहाला होता. त्यांचा हाली मठ प्रसिद्ध अयोध्येत आहे. त्या मठात मारुती स्थापना केली आहे. याजबाो शास्त्रीबावानी सांगितला म ।। र लिहून ठेवितो. परशुराम बावा म्हणोन

चित्तपावन जातीचा ऋग्वेदी ब्राह्मण परमभक्त रामाचा, वेदान्त शास्त्राचा अनुभव घेणार असा फिरत फिरत श्रीअयोध्येस येऊन बहुत दिवस शरयू तीरी राहिले. जेथे मठ करून राहिले होते तेथून शरयू लांब असल्याकारणानी साधूस वृध्धापकाळामुळे व काही प्रकृत बिघाडल्यामुळे शरयू गंगेचे स्नान होत नाही असा दिवस प्राप्त जाहाला. तेव्हा परशराम बावा पाहाटेस उभे राहून श्री गंगेची प्रार्थना करू लागले. तेव्हा श्री गंगेने कृपा करून शरयूचा ओघ फिरून जवळ आला आणि साधु स्नान करून मठात आले. शरयूचा ओघ आला ही खबर क्षेत्रात समजताच हजारो लोक साधुदर्शनार्थ जमले आणि देशोदेशी मोठी कीर्ति जाहाली. नंतर सिंदेसरकारास समजून सिंदे यांची स्वारी अयोध्येस आली. पंधरा दिवस राहून मारुती स्थापनापूर्वक मठ बांधण्याचा ठराव करून प्रतिवर्षीची नेमणूक तीनसे रुपयापासून चारसे रुपये मठाकडे खर्चास मिळावे असी नेमणूक करून सिंदे आपले लस्करात गेले. पुढे काही दिवसी साधुपासी सिष्येही बहुत जमले. पुढे अति वृद्धापकाळी काही विकृति साधूस जाहाली. तेव्हा सिंदे सरकार भेटीस अयोध्येस आले आठ दाहा रोज राहून साधूंचे मर्जीप्रो खर्चवेच करून आणखीही नेमणूक करून साधूस असे विचारिले की, आम्ही आपले दर्शनास आलो त्यापेक्षा आपण काही मजला खर्च कर्ण्यास आज्ञा करावी. त्याजवरून साधूनी असे सांगितले की, मी येथे वांदर यांचे सोबतीने बहुत वर्षे काढिली आणि आता माझे शरीराचा भरवसा नाही. त्यापेक्षा येकवार वानर मंडळीस लाडूभोजन घालावे. असे सिंदे याणी ऐकून वांदर किती होतील असे विचारिता साधूनी असे कळविले की, येकंदर वानर पाच साहा हजार होतील. बारा पंधरा हजार बुंदीचे लाडू केले पाहिजेत. बहुत उत्तम आहे असे सांगोन सिंदे आचारी वगैरे लाऊन लाडू तयार करू लागले. इकडे सायंकाळी साधू हणुमंतगडीवर जाऊन सर्व वांदरास हात जोडून प्रार्थना केली की, तुम्ही उदईक सर्व वानर जातीचे लोक जमा होऊन येथे येऊन प्रत्येकानी दोन दोन लाडू घेऊन जावे. याप्रो सर्वांस आमंत्रणे केली. नंतर दुसरे दिवसी सकाळी प्रहर दिवसास लाडू हणुमंतगडीवर नेऊन देवालयाभोवती रासी घालून ठेविल्या. साधू महाराजानी तेथे येऊन पूजा प्रार्थना करताच सर्व वानर येऊन प्रत्येकानी दोन्ही हातात दोन दोन लाडू घेऊन झाडावर पळून गेले. याप्रो वानरभोजन होऊन सिंदे लस्करात गेले. असा महासाधु येथे होऊन गेला. तो मठ अद्यापि आहे व नेमणूक वगैरे सिंदे सरकारची चालू आहे. याप्रो मठाबो शोध लागला. आम्ही सोबतीसुो विचार करून गौड ब्राह्मणास पके सिधे देण्याचा

ठराव करून शरयू तीरी येक मोधी आणोन बसविला होता आणि ब्राह्मणभोजनार्थ सिधे देण्याचे संकल्प करून सिधे दिल्हे आणि दक्षणी मठात वगैरे राहणार लोकास बुंदीचे लाडू करून सुवासिणीसुा़ो भाजन दिल्हे. रामनवमीचे दिवसी असे तेथे माहात्म्य आहे की, दोन प्रहरी शरयू गंगेत स्नान करून रामजन्म ज्या जाग्यावर जाहालेला आहे तेथे जाऊन जन्मभूमीचे दर्शन त्या समई ज्या घडेल त्यास पुनः जन्म नाही असे श्रुतिस्मृति पुराणप्रसिद्ध आहे. म्हणोन सर्व लोक ज्यन्म दिवसी तो मध्यान्ही स्नाने करून हातात तुलसी, पैसासुपारी घेऊन सर्व लोक राम जन्मभूमीचे दर्शन घेऊन तुलसी तेथे वाहतात. तेथे जागा आसी आहे की, मोठे मैदान झाडीचे आहे. बहुत प्राचीन भिंताडे दूर दूर आहेत. कौसल्येची खोलीची जागा पन्नास हात लांबी व चालीस हात रुंदीची असोन पका चुना सिसे ओतून चौथरा कंबरभर उंचीचा बांधून व दोन हात उंच फक्त कठडा मारिला आहे. सात आठ लक्ष यात्रेची येकवेळी गर्दी होत्ये. परंतु भोवताली जागा मोठी असल्याकारणानी व सरकारातून सिपाई लोक स्वार व काही हात्ती मधुन मधून उभे करितात तरी पाच चार मनुष्ये मरण पावतात असी गर्दी होऊन जात असत्ये. तेथेही आम्ही जाऊन दर्शन घेतले. दुसरे दिवसी स्वर्गद्वार म्हणजे श्री लक्ष्मण प्रायोपवेशन करून स्वर्गास गेले तेथे स्नाने करून श्री नागेश्वर सांबावर पाणी शरयूगंगेचे घातले म्हणजे यात्रा सफळ होते आसे आहे म्हणोन आम्ही स्नाने करून तेथे घाटावर घरासारख्या मडक्यांच्या रासी असतात त्याप्रो चार चार कवड्या देऊन येकक मडके घेऊन शरयू गंगेत भरून नागेश्वराचे देवालयाजवळ गेलो तों पूर्व दिवसासारखी गर्दी होती. सर्व लोक दरवाज्यांतून पाण्याची मडकी सिवलिंगावर टाकीत होते. असे देवालयास चार दरवाजे होते. आम्ही मडके न टाकिता प्रहरपर्यंत झटून देवाचे दरवाज्यात जाऊन पाणी मात्र उडविले आणि बाहेर आलो. याप्रो यात्राकृत्ये सर्व केली.

## अयोध्येविषयी एक कथा

श्रीक्षेत्र अयोध्ये विसी जुनी खबर असी समजली ती सर्व या जागी लिहून ठेवितो. ती असी की अयोध्या क्षेत्रास पूरवी शाप असा जाहाला होता की, हे अयोध्ये तुझे नांवसुा़ो राहणार नाही, अगदी नाबुद होशील. पुढे अयोध्या नामक देवीने प्रार्थना करून असा उःशाप मिळविला की, कलियुगांत विक्रम राजा होईल. तो पुनः तुझे उध्धरण करून प्रसिद्धीस आणील. त्याजवरून कलियुगात राजा

विक्रम सार्वभौम मोठा पुण्यश्लोक जाहाला होता. तो प्रसिध्ध सर्वांस ठाऊक आहेच. त्याणे कोणे येके समई सप्तपुऱ्या पृथ्वीवर कोठे कोठे आहेत म्हणून शोध करू लागला. तों पंडितानी असे सांगितले की, विराट पुरुषाचे नाक अयोध्या आहे, परंतु सप्तपुऱ्यांत अयोध्येचे ठिकाण मुळीच नाही. परंतु शरयूगंगा, घागरा नदास मिळून अयोध्येवर पुढे गेली आहे. त्या संधीत अयोध्या आहे. असे समजताच विक्रम राजा येकाकी येकटा निघून शरयूतीरी संगमावर येऊन तपश्चर्येचे बेतानी राहिला. पलीकडे अलीकडे बारीक गांवी जाऊन अयोध्या या नांवाचा खेडागांव देखील नाही. नंतर राजाने असा क्रम ठेविला होता तो मोठे पाहाटेस गंगास्नान करून गंमातीरी तपश्चर्येस बसून बराबर येक वाजला म्हणजे जवळचे गांवी भिक्षा मागून बाजरी आणोन भिजत घालून सायंकाळी तसीच हिरवी गंगोदकाबराबर भक्षण करून काळ घालवावा. याप्राो राजा विक्रम बारा वर्षे तेथे तपश्चर्या करून येके दिवसी अयोध्या नामक देवी राजाचे समोर येऊन राजास 'वरं ब्रूहि, वरं ब्रूहि' असे म्हणतांच राजाने विनयपूर्वक नमस्कार करून प्रार्थना केली की, मातोश्री आपले नांवाची कथा ऐकिण्याची इच्छा आहे. त्याजवरून देवीने सांगितले की मजला अयोध्या नामक देवी म्हणतात. मी तुजला प्रसन्न आहे. नंतर राजाने हात जोडून विनंति केली की, माते सप्तपुऱ्यांत अयोध्यापुरीचे ठिकाण नाही. अयोध्या हे विराटपुराषाचे नासिक आहे. त्यास मजला निमित्त करून क्षेत्र सर्व दृष्टीस पडावे. असे भाषण राजाचे श्रवण करून राजाची स्तुति बहुत करून राजा तूं शूर औदार्य बत्तिस लक्षणी परोपकारी आहेस. त्यास मजलाही पूरवी शाप जाहाल्या कारणानी मी गुप्त जाहाल्ये होते. पुढे उःशापही असा होता की, कलियुगात राजा विक्रम होईल तो तुझा उध्धार करील, तो समय आला आहे. असे म्हणोन ती अयोध्या देवी क्षेत्री जाऊन नागेश्वर सिवलिंग दाखवून असे सांगितले की, राजा आतां पंडितांचे आश्रयाने अयोध्या माहात्म्य हाती धरून नागेश्वरापासून तीर्थे व देवता सांपडतील असे राजास सांगून अन्तरधान देवी होती जाहाली. मग राजाने उज्जनीहून प्रधान लस्कर वगैरे बोलाऊन तेथे राजाने वस्ती केली.

नंतर पंडितांचे आश्रयानी अयोध्या माहात्म्यावरून दरोबस्त तीर्थे व देवता सांपडल्या. राजा राहिल्याकारणानी मोठमोठे वाडे तेथे तयार जाहाले व देवालयेही बहुत जाहाली व तीर्थेही बहुत बांधिली गेली. सात आठ वर्षे राजा तेथे

राहून उज्जनीस परत आला. अयोध्येत राजा दशरथ याणी पुत्रकामेष्टी यज्ञ केला ती जागा आद्यापि थोडी खणली असता जळके तांदूळ बहुत सापडतात, असा लौकिक आम्ही ऐकिल्यावरून त्या जाग्यावर जाऊन पाहाता सेकडो लोक तांदूळ जळके काढून नेत आहेत. हे पाहून आम्हीही वैरणभर तांदूळ तेथे मिळवले. नंतर शरयू तीरी जाऊन पिवळी मातीही आणिली. त्यास राम-रज असे म्हणतात. आम्ही अयोध्येस येकंदर बेवीस दिवस वस्ती करून राहिलो होतो. दक्षणी आमचे मित्र सोबती यांचा विचार असा जाहाला की, आपण येथें रुो धर्मकृत्यात बरेच उडविले. परंतु आपण चैनेत पैसा उडविला नाही. त्यास बुध्धीपूर्वक लखनौस जाऊन स्वइच्छ नाच बैठकी पाहून सुख भोगून मौजही पाहू. असे त्यांचे बोलणे ऐकून तीाो काकांस असे सांगितले की, लखनौ क्षेत्र किंवा तीर्थ नाही. त्यापेक्षा तुम्ही येथे श्री शरयू गंगेचे स्नान करून या रामभटजीकडे किंवा श्री मारुतीचे मठांत राहावे. आम्ही पंधरा दिवसांचे आंत अयोध्येस येतो. असा म।।र काकांस कळविताच त्याणी क्षेत्री राहण्याबाो रुकार दिल्हा. नंतर अयोध्येहून वरसईस पत्र पावेल असे सर्व लोक सांगू लागले म्हणोन घरी तीर्थरूपांस पत्र लिहिले. त्यात विशेष म ।। र की, आम्ही घरून निघाल्यापासून सुख दुःख भोगीत आज मि।। पर्यंत दिवस इकडे घालविले. प्रापंचाकरिता पैसा तर उत्पन्न नाही, परंतु अनेक देवता तीर्थे हिंडलो. घरचा समाचार काहीच कळला नाही. त्यास आपण हे पत्र पावताच उत्तर श्रीक्षेत्र कासीस दुर्गघाटी बाबा पेंडसे यांचे वाड्यात वाो रा. रा. श्रीगोपाळभटजी सोमण याचे नांवे पत्र यावे म्हणजे आम्हास पावेल. आम्ही श्रीकासीस येथून जाणार सबब लिाो आहे आणि येथील मंडळीस शोध करिता सर्वांचे म्हणणे असे आहे की '' यष्टव्यो बहवः पुत्रा यद्येकोपि गयां व्रजेत् '' बहुत पुत्र उत्पन्न करावे, एखादा तरी गयेस जाऊन पित्रोद्धार करील. तर याजवरून त्रिस्थली यात्रा केली पाहिजे. तर पूर्ववय अस्ता पायात जोडा न घालिता शरीरकष्ट करून यात्रा करावी. पुढे असे न होई तर घोडे वगैरे पाहून यात्रा कर्णे अवस्य आहे. हेही न घडे तर द्रव्य असल्यास डोली वगैरे आपल्यास करून पुत्र बराबर घेऊन जाऊन यात्रा करावी. हे द्रव्याधीन आहे, परंतु द्रव्य नाही. वृद्धापकाळ तर जाहाला आणि पित्याबाो गयेस जाणे राहिले. तर ' आत्मा वै पुत्रानामासि ' असी श्रुति प्रमाण आहे. याजवरून पुत्राचे तर तारुण्य आहे ना? त्यास पुत्रास आज्ञा करावी म्हणजे पुत्रास अधिकार येतो ।। अवश्यं पितुराज्ञया ।। असा शास्त्रार्थ स्पष्ट येथे समजण्यात आला म्हणोन लिहिले आहे. तर आपण

मजला आज्ञा द्यावी म्हणजे मी आपले आज्ञेवरून त्रिस्थली यात्रा करून देशी निघोन येतो. याप्राो पत्र लिहून डाकेत टाकून आम्ही गाडी भाड्याची करून दुसरे दिवसी लखनु पाहाण्यास निघोन चालते जाहालो.

## लखनौ शहरी

ते लखनौत उत्तम माडीवर परभारे जाण्यायेण्यास वाट असी जागा भाड्यानी घेऊन शहर पाहाण्यास राहिलो. केशरिया बाग वगैरे जी कामे मोठी मोठी लाखो रुपये खर्चाची पाहिली व लखनौत गाणार स्त्रिया मुसलमानी फार उत्तम आहेत म्हणोन लौकिक होता. यास्तव आम्ही शोध करून करून त्या त्या यवनी स्त्रियांची गाणी बहुत ऐकली. पैसा त्यांत खराब बराच केला व काही गवई लोकांचेही गाणे ऐकून त्यांसही द्रव्य बरेच दिल्हे. प्रतिदिवसी रात्रौ जागरण होत होते. परंतु चाहा, कापी वरचेवर घेत होतो. लौकर भोजने करून प्रहर दीड प्रहर दोन प्रहरी निद्रा घेऊन मग गाडीत बसून शहर पाहण्यास जात होतो. सोबती व आम्ही आमचे वयासारखेच होते. त्यायोगाने फार चैन होत असे. जे जे पदार्थ आम्हास मनास चांगले वाटत ते ते आम्ही करीत होतो. बरेच दिवस तेथे राहून मौजा करून उदईक निघणार तों तेथे कलकत्त्याकडील बंगाली खेळ शहरात प्रसिद्ध आला होता असी बातमी आम्हास लागताच शहरात शोध करण्यास निघालो. तों सायंकाळी ते तमाशा खेळ करणार मुसलमान आम्हास भेटले. त्याजपासी बोलणी बहुत बोलून दुसरे दिवसी खेळ कर्ण्याचा ठराऊन बिराडी आलो. नंतर ठरल्याप्राो बंगाली खेळ मंत्रविद्येचा वगैरे सर्व खेळ त्याजपासून करऊन त्यास रुपये दिल्हे. खुसी केले. नंतर भाड्याची गाडी पाहून मजल दर मजल करीत अयोध्येनजीक तीन कोशावर बंगला म्हणोन लहानसे शहर आहे तेथे आलो. ते शहर पाहण्यासारखे आहे. नवीन बसविलेले आहे. सोंगट्याचे पटीप्रमाणे शहर वसविले आहे. मध्ये चौकासारखी जागा मोठी आणि चारी बाजूनी घरे यााो सर्व शहर वसविलेले पाहून श्रीक्षेत्र अयोध्येस आलो. तेथे काकांची भेट जाहाली. नंतर तेथे आणखी तीन दिवस राहिलो. ब्रह्मावर्तापाो सोबती घरघरनद उतरून पलीकडे श्रीमंत गेले, म्हणोन त्यांचा जाण्याचा निश्चय जाहाला. आम्हासही तुम्ही आम्हाबराबर यावे असे वारंवार सांगत असत. परंतु तीर्थस्वरूप काकांनी त्यांस उत्तर दिल्हे की, आम्ही घरून निघाल्यास दिवस बहुत जाहाले आहेत. आमचे तर वयच जाहाले आहे. परंतु हा विष्णु उमेदवार याची

घरी माणसे आई, बाप, भाऊ, बायको फार वाट पाहात असतील. आम्ही इकडे आल्यापासून आजपर्यंत पत्रव्यवहार नाही. त्यास आम्ही घरून निघाल्या तागाईत सुखे व दुःखे बहुत भोगिली. परंतु प्रापंचास द्रव्यसाधन झाले नाही. असो देश पाहाण्यांत आले व यात्राही जाहाल्या. आता आम्ही अर्थसंपादनाचा नाद सोडून देशी जाणार. तुम्ही पुन्हा त्या लोकांकडे जावे. असे काकांनी सांगताच ते लोक पहाटेस निघोन गेले. पुढी कासीयात्रेस जाण्याबाो विचार करू लागलो. अयोध्येहून कासी क्षेत्र सुमार ऐसी पंचायसी कोश दूर आहे. रस्ता आपण पाहिला नाही तर सोबत पाहाण्याचा विचार आवस्य केला पाहिजे. नंतर शोध करिता मठांत रा. रा. श्री. रावसाहेब हिंगणे नासिककर कुटुंब-मातोश्रीसह कासीस जाणार आहेत असा शोध लागला. नंतर परशराम बाबाचे मठात जाऊन रावसाहेब यांस नमस्कार करून कासीस अमुक तिथीस जातो असे समजताच आम्हास आपले बराबर सोबतीने जावे अशी इच्छा आहे. त्यास आम्हास घेऊन आपण कासीयात्रेस जावे, असे सांगताच तो गृहस्त स्तब्ध राहिला. हे पाहून त्यांस असे कळविले की, आम्हा बराबर घोडे माणुस आहे. फक्त हा देश वाईट, यास्तव सोबत आपली धरून गेले पाहिजे. असे म्हणताच बहुत उत्तम आहे असे बोलून बिराडी आलो.
बिराडी आलो.

### हिंगणे यांचे सोबतीने काशीक्षेत्री

नंतर हिंगणे यांची सोबत पाहून श्री अयोध्येहून श्रीरामास नमस्कार करून निघालो ते चार पाच कोशावर बिल्वहरी म्हणोन क्षेत्रसंमधे यात्रा आहे, तेथे राजा दशरथाचे दहन केलेली जागा प्रसिद्ध आहे, श्री दशरथ राजाच्या पादुका व मूर्ती आहे व रामलक्ष्मणांच्याही मूर्ति आहेत. तेथे वस्ती केली. रात्रौ रावसाहेब हिंगणे यांचे व आमचे बोलणे वगैरे थोडेबहुत जाहाले. हिंगणे हे गृहस्त पूर्वापार आहेत. पूरवी दिल्लीचे बादशाहाकडे वकील शिवाजीराजे यांजकडून होते. दौलतीचा त्याजपासी अंत नवता, एवढी दौलत होती. पुढे कालगतीने सर्व ऐश्वर्य जाऊन गरिबीपाो दिवस आले. रावसाहेब या पुरुषाचे वय पंचवीस पासून तिसीपर्यंत असावे. कन्या पुत्र संतती नव्हती. काही जाहागीर नासीक जिल्ह्यांत आहे व काही जाहागिरी बादशाहाकडून हिंदुस्थात दिल्लीपासी आहे. त्यापाो हिंगणे यांची वहिवाट फार दिवस नसल्यामुळे सरकारात गेली व काही वहिवाट यांचे नावे असून सावकाराकडी गुतीव जाहाली होती ती सोडविली. येकंदर आठ हजार

जमाबंदीची जाहागीर राहिली. असा सर्व विचार रावसाहेब याणी करून दरिद्र बहुत करून दूर घालविण्याचा रस्ता शोधन घरण्यास हिंदुस्थानांत येऊन दोन वर्षे त्यास जाहाली होती. सर्व कामे काजे आटपून सेवटी कासीस काही इस्टेट आहे त्याची व्यवस्था पाहाण्यास व यात्राही कर्ण्यास जात होते. कासींत वाडा त्यांचा प्रसिद्ध आहे व मंगळागौरीचा घाटही त्यांचे पूर्वजांनीच बांधिला आहे. हाली बराबर मनुष्ये आचारी व सिष्या व कारकून आठ असामी गडी, पहारेकरी व काही त्यांच्या आप्त बायका मिलोन चार गाड्या मनुष्यांच्या होत्या व भिक्षुकही दोन असामी बराबर होते. मातोश्री व कुटुंबासमेत बसण्यास गाडी छकडी-लहानसी तीनशे रुपये किमतीचे बैल अति उत्तम याप्रो बेतानी मजल दर मजल चालत होतो. आम्ही उभयता मिलोन येक घोडे भाड्याचे करून जात होतो. वाटेने गोखरू फार होते. भोवताली मोठे मोठे डोंगर होते. परंतु त्याजवर तृण नाही. पांढरे होते. दगड हातानी चुरले तरी चुरत, असे दगड पाहिले. तेव्हा शोध करिता हरिश्चंद राजा तारामती स्त्री व रोहिदास पुत्र या रस्त्याने श्री क्षेत्र कासीस गेला. तेव्हा विश्वामित्र ऋसीनी राजाचे छळबाो सूर्याच्या विशेष कळा खुल्या करून देशात पाणी नाहीसे केले व गोखरूचे हातरूण केले. त्या तापानी दगड चुन्यासारखे जाहाले आहेत असा शोध लागला. पुढे हिंगणे यांचा आमचा परिचय फार जाहाला. तेव्हा त्याणी आम्हास असे कळविले की, तुम्ही उभयता मुशाफरीत हाती करून भोजन करिता त्यास आमचे कडे भोजनास यावे. तेव्हा ती।। काकांनी उत्तर दिल्हे की, अयोध्येहून आम्ही निघतेसमई कासीस जाण्याचा निश्चय केला तेव्हाच परान्न सोडिले आहे. जन्मपर्यंत परान्न सेवन केले पुढेही करणे आहे. परंतु यात्रा पार पडे तेथपर्यंत आम्हास आपण भोजनाचा आग्रह करू नये. भोजनाखेरीज लोभ काय कमी आहे असे बोलून भोजन चुकविले. कासीस ज्या रोजी प्रथम गेलो तेव्हा उजाडता क्षेत्रात येताना वरुण वक्रतुंड गणपतीस आलो. तेथे साष्टांग नमस्कार करून पुढे आमचे जाग्यावर जाऊन हमाल करून ओझी ज्याची त्याणी आपआपोपले बिराडी गेले. आम्हीही ब्रह्मघाटी केळकर यांचे वाड्यात गेलो. नंतर तेथून वरसईचे घरचे पत्र लिहिल्याप्रमाणे आले असेल म्हणोन दुर्गाघाटी पेंडसे यांचे वाड्यात सोमण यांजकडे गेलो. तेथे पत्र वरसईचे येऊन आठ दिवस जाहाले होते. ते पत्र चिरंजीव हरिपंत याणी लिहिलेले होते. बारीक अक्षर अस्ता दोन बंद पत्र होते. कारण घरून निघाल्या तागाईत आमचे पत्र घरी नाही, घरचे आम्हास नाहीं याजमुळे पत्र फार वाढले होते. पत्री सर्व

खुशाल आहेत, परंतु आम्ही हिंदुस्थानात निघालो तेव्हा प्रथम मजला कन्या जाहाली होती तिचे नांव गोदावरी ठेविले होते. ती कन्या दोन वर्षांची होऊन ती मात्र कैलासवासी जाहाल्याचे लि।। होते. बाकी ते पत्र वाचता वाचता ऐकिणार लोकांचे डोळ्यास पाणीच यावे असा सर्व म ।। र होता. सारांश लौकर देशी येऊन सर्वांस काळजीतून काढावे. असे पत्र पाहून घेऊन बिराडी येऊन गंगेवर जाऊन यात्रा कृत्ये केली. पत्री वडिलांनी आज्ञा यात्रेची दिल्ही होती. त्याजवरून सर्व कृत्ये उपाध्येमार्फत केली. श्राध्ये काळाष्टकेही केली. नंतर श्री क्षेत्र कासीत प्रतिदिवसी नित्ययात्रा ।। विश्वेशं माधवं धुडिं दण्डपाणिंच भैरवम् ।। वंदे कासीं गुहां गंगां भवानिं मणिकर्णिकां ।। ही नित्ययात्रा करून विशेष यात्रा काही तरी करीत होतो. याप्रो तेथे यात्रा तीर्थे देवतांचे दर्शन करून माध्यान्ही मणिकर्णिकेवर स्नाने करून बिराडी येऊन स्वता हाती भोजनाचे करून भोजने करीत होतो. व्यास कासीस जाऊनही यात्रा केली. कासी क्षेत्रात अनेक आचारभ्रष्ट सारखे दिसतात. त्या लोकांची कृति बराबर नाही, असे आम्ही समजून येका विद्वानास प्रश्न केला की, ही कासी म्हणजे मुख्य विद्यापीठ असून आचार विचार येथे उत्तम असावा त्याजबाो तर फार लोप दिसतो हे कसे ? असे विचारिताच त्याणी असे सांगितले की, एकवीस स्वर्ग सोडून कासी क्षेत्र आहे. या भूमीसारखे दुसरें स्थान नाही. याचा शास्त्रार्थही निराळाच आहे।। पाहा ।। काश्यां महोदयो नित्यः ० इत्यादी वाक्ये ग्रंथी स्पष्ट आहेत आणि-काश्यां कृतयुगो धर्मो० अशा वाक्यावरून हाली तेथे पातक मुळीच होत नाही असी आमची समजूत केली. कासीत गेल्यापासून आठा दाहा रोजी येके दिवसी भैरवाचे देवळांत रा. श्री. नाना राहाळकर वरसईकर भेटले त्याणी असे कळविले की, तुम्ही घरून निघाल्यावर येक वर्षांनी आम्ही निघालो ते अद्याप इकडेच आहो. यात्रा सर्व केल्या. आता तुम्ही आम्ही ग्रामस्त शेजारी, त्यापेक्षा येक विचारे राहून देशीही बराबरच जाऊ. हाली कासींत मात्र जी निराळी बिराडे आहेत ती ठीकच आहेत. असी बोलणी होऊन तिघेही यात्रेस गेलो. बेचाळीस लिंगांची यात्रा व अन्तर्गृही पंचक्रोशी वगैरे यात्रा बहुत करून राहाळकर आणि आम्ही बराबरच केल्या. नंतर ब्राह्मण सुवासिणी भोजनही सामर्थ्यानुरूप केले. पुढे येके दिवसी तिघेजण बसून देशी घरी जाण्याबाो विचार ठराऊन प्रथम गयेस जाऊन तेथील कृत्य सर्व करून पुन्हा कासीक्षेत्रात येऊन मुहूर्त पाहून सर्व विश्वश्वर प्रभृति देवांची दर्शने घेऊन देशी जाण्याबाो निरोप घेतले आणि मुहूर्तावर कासीक्षेत्र सोडून प्रयागास आलो.

तेथे तारागंजांत राहिलो होतो. तेथील यात्राकृत्य सामर्थ्यानुरूप करून ब्राह्मण भोजनही केले. क्षेत्रसंबंधे सर्व देवतांची दर्शने व तीर्थे केली. येके दिवसी आम्ही वेदशास्त्र संपन्न पुरुषोत्तमशास्त्री बाबाकडे पूरवीचे ओळखीमुळे भेटीस गेलो, तों तेथे त्रिस्थली सेतु म्हणून धर्मशास्त्राचा ग्रंथ शास्त्रीबाबा पाहात बसले होते आणि पुत्रानी गंगा आणोन मातापित्यास स्नाने घातल्याबाो व्याख्यान चालले होते. आम्ही त्यांस असे विचारिले की आम्हास कावड गंगेची येथे भरून घरी देशी नेणे आहे. त्याजबाो आपण शास्त्रार्थ सांगावा. त्याजवरून शास्त्रीबाबांनी असे सांगितले की, येथे दशाश्वमेधी श्रीभागीर्थी गंगा कावडीत भरून स्कंधावर कावड घेऊन पायांत जोडा वगैरे न घालितां... घातल्यानी यथाविधी रामेश्वराचे फळ मिळते. त्यास ज्यांची मातापित्रे असतील त्याणी कावड भरून गंगा नेऊन स्नाने करवावी आणि पुत्रांचे स्कंदावर भागीर्थी गंगा येऊन स्नान ज्याचे झाले तो कृतार्थ होतो. असे उभयतांस अति पुण्य आहे. पुत्रधर्म तुम्ही केला. कारण त्याणी येऊन ज्या ज्या यात्रा करावयाच्या त्या त्या तुम्ही त्यांच्या उदे केल्या.

# परिशिष्ट

## गंगेची कावड

कोणी लोक असे म्हणत की, कावडीने गंगा घरी जाणे फार कठीण आहे. गंगा येखाद दिवसी प्रातःकाळापासून जड होत्ये. कावड उचलत नाहीसी होत्ये. इत्यादी गोष्टी बहुत ऐकून मी विचार केला की, मातापित्यांचे पुण्याने हे काम सिद्धीस जाईल. आम्हास बराबर घरी नेण्यास अर्थ नाही, यास्तव गंगाबाईस नेली पाहिजे. असा विचार करून नंतर असा विचार ठरला की, येथून विंध्यवासिनी देवी जवळ आहे. त्यास तिचे दर्शन घेऊन येऊ. असे ठरल्यावर दुसरे दिवसी प्रातःकाळी प्रायागाहून निघोन चालते जाहालो. विंध्यवासिनीस जाऊन पोहोचलो. तेथे देवीचे देऊळ पश्चमाभिमुख आहे. देवालयास सोपे दक्षणोत्तर आहेत. पुढे थोडा सोपा असोन दरवाजा मध्येच आहे. दोन्ही सोप्यात देवी स्थापना केली आहे. मुख्य विंध्यवासिनी देवी पश्चमाभिमुख आहे. मध्ये चौक चांगला साघन केला आहे. तेथे इतका चमत्कार आहे की, चौकात दर मंगळवारी व शुक्रवारी बंगाली लोक हजारो पशु तेथे मारितात. देवीचे समोर चौकात पशु मारून ते मुंडके रक्त पागळत अस्ता तसेच हातात घेऊन देवीवर रक्तस्राव करीत असतात. आणि चौकात दोन आडीच विती खोलीचे रक्त साचलेले असते. ते रक्त तेथेच काही सुकूनही जाते परंतु गंधी नाही व तेथे मासी बिलकूल नाही हे आश्चर्य आहे. आम्ही तेथे स्नानसंध्यादि करून मी ते दिवसी सकाळी दोन घटके दिवसास देवीजवळ बसून नवचंडीचा संकल्प करून चंडीपाठास आरंभ केला. तो त्याच दिवशी आवसीचे चार घटका रात्री अकरा पाठ सप्तशतीचे पुरे केले. नंतर देवीची पूजा करून भोजन केले. दुसरे दिवसी गंगापुत्र बराबर घेऊन पाहाडात मुख्य विंध्यवासिनी देवी आहे तिचे दर्शन घेण्यास निघोन गेलो. तीन कोश डोंगर चढावा लागतो, तो डोंगर चढून गेलो. तेथे शंभर लोक उभे राहतील येवढी जागा देवीपासी मैदान आहे. देवी पाहाडास लागून आहे. मनुष्यायेवढी मूर्ति आहे.

तिजला शेंदूर नाही. देवीचे पायापासून दोन हातावर कातळ दगड अस्ता, येथे येक लहानसे कुंड आहे. त्यात पाणी आहे. भरून वाहात असते. तांब्या बुडवून काढिला कीं, दुसरा तयारच आहे. असे पाणी बहुत स्वच्छ आहे. तेथे झाडी बरीच आहे. तेथे देवीची पूजा करून परत येऊ लागलो, तो गंगापुत्रानी विशेष शिवलिंग दाखवितो असे म्हणोन आम्हास घेऊन बराच लांब गेला. तो मोठा एक ओढा पाण्यानी भरून वाहात आहे असे पाहिले. पुढे जाता जाता बारीकसा डोंगर होता. त्याचे पायथी ओढ्याचे काठी पाषाणी देवालय होते. त्यात जाऊन पाहाता श्री सिवलिंग हात भर उंची व लिंगाचा माथा दीड वीत होईल येवंढे मोठे लिंग, परंतु सर्व लिंग अति तांबडे दृष्टीस पडले. किंबहुना तांबडे जासवंदीचे पुष्पाप्रा‌ो तांबडे लिंग तेथे पाहिले. दुसरे असे लिंग कोठे पाहिले नाही. गंगापुत्र याणी असे कळविले की, हे सिवलिंग पुराणप्रसिद्ध आहे. श्री राम लंकेहून अयोध्येस जाते समई गंगेवर स्नानार्थ उतरून हे लिंग स्थापून पूजा केली आहे. असे त्याणी सांगताच आम्ही पुनः स्नाने करून पूजा अभिषेक केला. नंतर बिराडी येऊन भोजनाचे करून सायंकाळी भोजने केली. नंतर दुसरे दिवसी सकाळी निघोन श्रीक्षेत्र प्रयागास आलो. नंतर कावड विकत घेऊन उपाध्ये यांचे विचारे गंगापूजानादि यथाविधी कर्म करून दोन रुद्र म्हणजे बेवीस कुप्या उदक भरून गवत वगैरे घालून कावडीत कुप्या ठेऊन कावड बंद केली. नंतर मुहूर्त पाहून आषाढ शु. ५ रोजी प्रयागहून निघोन ब्रह्मावर्तक्षेत्री जाण्याचे इराद्याने प्रयागराजास नमस्कार करून राहाळकर व आम्ही दोघे चालते जाहालो. ते ब्रह्मवर्त क्षेत्री बाबा कर्वे यांचे वाड्यात उतरलो. गंगेची कावड नेण्यासंमधी व्रताविसी विचार करून येवढाच नेम ठेविला होता की- श्राध्धादि संस्कारांचे अन्न घ्यावयाचे नाही. शुद्ध परान्न मिळाल्यास घ्यावे. पायात जोडा न घालिता अनवहाणी चालाचे, पागोटे घालाचे नाही, वगैरे नेम ठेविले होते.

ब्रह्मावर्तास अस्ता येके दिवसी सासू-सुनेचा कज्जा जबर जाहाला. त्यात सुनबाईने सासूबाईस असे सांगितले की, आम्ही गंगास्नानास जाते समई येखादे मित्राकडे जातो. परंतु पूरवी तुमचे उमेदीत माजघरांत चोळी लुगडे सोडून टाकून जिन्यानी माडीवर जाऊन दिवाणखान्यांत पाच चार मंडळी महाराज श्रीमंतांपासी बसली अस्ता तेथे येऊन सर्वांस नमस्कार करून खुंटीवर ठेविलेली पैठणी घेऊन त्याजसमोर नेसून चोळी घालून त्या मंडळीत श्रीमंत सांगतील त्याचे मांडीवर बसून विडा खात असा, असा तर आमचा धिंगाणा नाही ना ?

इत्यादि भाषणे ऐकून फार मौज वाटली.

## ग्वाल्हेरचे मार्गावर

पुढे पाच चार दिवसानी आम्ही ग्वालेरीस जाण्याचे विचारे निघालो, तों वाटेत जाताजाता सोबत आणखी कावडींची मिळाली व गाड्याही बराबर होत्या. ती।। काकांस ओझ्यासुाो गाडीत बसण्याची सोई केली होती आणि मजल दर मजल जात होतो. येके दिवसी नित्यनेमाप्राो प्रातःकाळी उठोन शौचमुखमार्ज्यन करून स्नानादि श्रीपार्थिव लिंगपूजादि करून श्रीगंगेस हलद कुंकुम वाहून प्रार्थना करून कावड उचलून रस्ता चालू लागलो. तों येकायेकी ती कावड अति जड जाहाली. खांद्यास भार सहन होईनासा जाहाला. वारंवार डावे उजवे खांद्यावर कावड फिरऊ लागलो. सकाळी प्रहर दिवसास गाड्या सोबतीच्या आटोपून फराळही केला. तेथून गाड्या चालू जाहाल्या. आम्हीही चालू लागलो. माझी कावड अति जड जाहाल्यामुळे मागे मागे राहू लागलो. बराबर चार वाजतांचे सुमारे मुकामावर सर्व लोक उतरले. आम्ही येकटेच राहिलो. जों मुकाम जवळ आला तों तों कावड जड फार होऊ लागली. मजला तर खांद्यावरून कावड फिरविता येईना. दोन अडीच मणांचे ओझे जाहाले. त्या योगानी माझे दोन्ही पायास ढोप्याखाली सूज बरीच आली व पावले दोन्ही फार सुजली होती. मजलेवर येऊन पोहोंचलो तों जेवणाची तयारी जाहाली होती. येतांच भोजने केली. नंतर मंडळी असे आम्हास सांगू लागली की, तुम्ही मातापित्यांकरिता कावडीने गंगा नेणार, परंतु मातापित्यांस पुण्याई नाही. पुत्रांनी स्कंधावर गंगा आणोन स्नान होणे फार कठीण आहे. यास्तव तुम्ही आमचे ऐकून येथे सिवलिंग आहे त्यास गंगोदकानी स्नान घालावे. हाली आज तुम्हास चालण्याची शक्ति नाही. पावले अति सुजली आहेत इत्यादि मंडळी फार बोलू लागली. सर्व ऐकून घेऊन उत्तर न देता नित्याप्राो कावड उशागती ठेऊन निद्रा करण्याचे बेतानी हातरुणावर बसून प्रथम कुलस्वामिणी श्री योगेश्वरीची प्रार्थना केली, आणि गंगाबाईची प्रार्थना केली. हे गंगे माझी सर्व मनुष्ये अस्ता मी कुटुंबाकरिता परदेशांत आलो, तो अर्थ संपादित जाहाला नाही. जीव वाचण्याबाो भ्रांति जाहाली. बरे जाहाल्या गोष्टीस उपाय नाही. शेवट गंगेची कावड घरी नेली तर तोच जगांत मोठेपणा येईल. सर्व यात्रा करून मातापित्यांस गंगास्नान जाहाले. हे घडल्यास ठीकच आहे नाहीपेक्षा उदईक गंगा येथे सिवलिंगावर वाहिली अस्ता मी देशी परत जाणार नाही. बैरागी

होऊन बद्रीनारायणास जाऊन स्वर्गारोहण करीन असा अखेर निश्चय करून श्रीदेवीचे स्मरण करून निद्रा घेतली, तो येक प्रहरानी स्वप्न पडून जागा जाहालो. आणि घाईने नित्याप्रो उठोन पाणी घेऊन चूळ वगैरे भरून टाकिले. तों पाय किमपि दुखत नाहीसे जाहाले. सूज पायावरची व पावलावर अमदीच राहिली नाही. पहिल्यापेक्षा शक्तीही बरीच आहे असे मजला समजताच ती।। काका वगैरे सर्व मंडळीस उठऊन मोठ्या आनंदानी पाय दाखऊन स्वप्न सांगण्यास आरंभ केला. स्वप्नांत माजघरात दोन प्रहरी निजलो अस्ता कोणी ब्राह्मणाची मुलगी बारा तेरा वर्ष वयाची कानात कुडूक मोत्याचे व नाकात मोठी नथ व मोत्यांचे पेंडे गळ्यात याप्रो सर्व दागिने घातलेली गौरवर्णाची हस्तमुख असी येऊन दरवाज्यात उभी राहून मजपासी भाषणे करू लागली. तेव्हा मजला भास बहिणीचा जाहाला. ती असे बोलिली की, दादा तूं फार घाबरलास. मी तर येक दिवस खेळ केला. तर तूं भिऊ नको. स्वस्थ चित्त करून घरी जावे. मीही तुजबराबर घरी येणार. तेव्हा स्वप्नात मीही असे सांगितले की, असी जर कावड जड होऊ लागली तर माझे शरीरसामर्थ्य नाही, यास्तव विचार पडला आहे. तेव्हा त्या मुलीने असे भाषण केले की, इतःपर मी जड होणार नाही, परंतु तूं त्रासू नयेस. हे सांगून ती घरात सिरली आणि मीही जागृत अवस्थेत आलो. तो प्रकृति खुशाल पायास विकार राहिला नाही. तेणेकरून मजला आनंद जाहाला.सबब आपल्यास सर्वांस उठविले आहे. मग सर्वांनी आश्चर्य करून प्रत्यक्ष गंगेने दर्शन दिल्हे. असे बोलून सर्वांनी निद्रा केली. दुसरे दिवसी नित्याप्रो रस्ता चालू लागलो. ग्वालेरीस जाऊन वेदशास्त्रसंपन्न भाऊ वैशंपायन दानाध्यक्ष याजकडे उतरलो. तो पूरवी चार दिवस मजला आंवेचा उपद्रव बराच जाहाला होता, तोच जास्त जाहाला. दिवसात सात आठ वेळा व रात्री तीन चार वेळ परसाकडे जावे लागे. तेणेकरून फार बेजारी जाहाली. आणि वैशंपायन याजकडे मनुष्ये बहुत असल्या कारणानी दुखणेकरी याची अव्यवस्था होते असे मनात येऊन वो. रा. रा. श्री केशव भटजी मांडवगणे झासीकर येथे आले आहेत ते कोठे राहातात असी चौकसी करू लागलो तों ठिकाण लागलो, आणि ती।। काकास बराबर घेऊन जाऊन मांडवगणे यांची भेट जाहालो. त्यांस आनंद फारच जाहाला. मांडवगणे यांचे कुटुंब सौ।।वतीसुो सर्व मनुष्ये पाहून आम्हासही फार आनंद जाहाला. झासीहून निघाल्यापासून आमचे ठिकाण त्यास नवते. याजमुळे व माझी प्रकृति हगवणीमुळे अशक्त पाहून लागलीच मजला असे सांगितले की,

आमचे बिराड खाली आहे. शौचकूपही वाड्यात नजीक आहे. तुम्ही येथे राहावे व काका वैशंपायन याजकडे राहातील. असे सांगताच आम्ही कबूल करून तेथे राहिलो. नंतर औषधे वगैरे घेऊन प्रकृत हुशार आठादाहा दिवसी जाहाली.

## पुन: एकदा झाशीस

नंतर तेथून निघोन जावे असे मनात आणिले तों असे स्मरण जाहाले की, आपण झासीचे किल्यांतून निघोन मांडवगणे याजकडे आलो त्या दिवसापासून झासीहून निघ तेथपर्यंत पर्यंत पैसे देण्याबाो भंगी यास ठराव स्वतंत्र आपण केला अस्ता पैसे त्याचे विसरून न देता आपण तेथून निघोन गेलो. आता या देशांतून स्वदेसी गेल्यावर या नीच जातीचे पैसे कसे पावतील. तर आपल्यास दिवस जास्त लागल्यास चिंता नाहीं, परंतु या जातीचे लोकांचा पैसा देणे राहू नये. असा विचार करून मुहूर्त पाहून तेथून निघालो. मजल दर मजल वाटेने हळुहळू झासीस जाऊन पोचलो. तेथे येका मित्राकडे राहिलो. नंतर सर्व लहान मोठ्या मंडळींच्या भेटी घेतल्या. तेथून निघते समई सर्वांस पुन: भेटून देशी जाऊ म्हणोन कबूल केल्याप्रो येऊन भेटी जाहाल्या व भंगी यास त्याचे म्हणण्याप्रो पैसे देऊन हिशेब पुरा करविला. नंतर राहाळकर व आम्ही उभयता मिलोन झासीहून सागरास जाण्याचा रस्ता विंध्याचल पर्वतातून नवीन सडक समोर काढिली आहे, त्या रस्त्यानी जाऊ लागलो. सडकेवर चार चार शिपायांच्या चौक्या बंदोबस्ताकरिता फारच ठेविल्या होत्या. मुशाफर चौकीवर आला म्हणजे चौकीदारानी पुढे पन्नास पाऊणसे कदम जाऊन मोठ्यानी आरोळी देऊन विचारावे की, मुसाफर आवत हाय. तिकडील चौकीदारानी आवना देव असा जबाब मिलाल्यावर त्या चौकीवर जावे. याप्रो शेकडो चौक्या इंग्रज सरकारने ठेविल्या आहेत. कारण मुशाफर यास दगा होऊ नये. अशा रस्त्यानी जाता जाता वाटेत जंगली वस्तीमुळे सिधा सरंजामही मिळण्याची पंचाईत. कितिक ठिकाणी रात्रौ उतरण्यास जागाही मिळाली नाही. गुरांचे बंड्यांत काही मुकामी राहिलो. येक दोन ठिकाणी झाडाखाली चिखलवट जमिनीवर रात्री काढिल्या. दिवस पर्ज्यन्यकाळचे. श्रावण व॥ ८ जन्माष्टमी सागरात पडली. तेथे येका ब्राह्मणाकडे बिराड करून तिघेही राहिलो होतो. तेथे आठ दिवस राहून तेथे असा विचार केला की, आपण शांडिल्य गोत्राचे आहो तर नर्मदा गंगेतटी शांडिल्य ऋसीचा आश्रम आहे तेथे जाऊन यात्रा करावी. तेथून हुसंगाबादेवरून जाण्याचा विचार

सहज होईल. हा निश्चय करून श्रावण व।। १० रोजी बाजारातून निर्शन फराळाचे सामान येऊन घेऊन वद्य ।। ११ चे दिवसी तेथून चालते जाहालो. वाटेने भाजीपाला किंवा स्वच्छ मनासारखा सिधाही कोठे मिलाला नाही. तसेच जाता जाता साडियाचा घाट शांडिल्य ऋसीचे आश्रमास म्हणतात, तेथे जाऊन पोचलो. साडिया या नांवाचा तेथे गांव आहे. त्या गांवात देवाचे मंदिर आहे तेथे आम्ही उतरलो. तो गांव नर्मदा तीरीच आहे. तेथे असी वहिवाट आहे की, सर्व स्त्रिया पाच वर्षापासून शंभरपर्यंत नर्मदा गंगेवर लुगडी सोडून निःशंकपणे स्नानास गंगेत नागव्यानी उतरतात. जवळ पुरुष मंडळी असली तरी त्या स्त्रियांचे मनात कपट नाही. अंगे चोळीत उभ्या राहातात. याप्रमाणे विशेष मौज दृष्ट जाहाली. तेथे तीन दिवस राहून हुसंगाबादेस निघोन गेलो.

## नवे संकट व त्यांतून सुटका

तो जिल्हा नवीनच ते समई जाहाला होता. आम्ही सडकेने जाता जाता शहरांत गेलो. तो चौकीदार याणी आम्हास चौकीवर बसऊन पुढे साहेबाकडे नेले. सकाळी प्रहर दिवस बंगल्यावर गेलो. तेथे दोन घटका बसलो, तो साहेब खाली येऊन खुर्ची टाकून आमची चौकशी सुरू केली. त्यांत आम्ही शुद्ध यात्री ठरलो, आम्हाकडे बंडाबाो किंवा कोणताही दोष नाही आणि मुंबई ताब्यात पेणे तालुक्यात आमचे घर खरे असी पकी खात्री करून घेतली. कारण तो साहेब ठाणे जिल्ह्यात कामगार बरेच वर्षे होता. नंतर साहेबानी असे सांगितले की, तुम्ही गंगेची कावड घेऊन देशी जाणार परंतु जागोजाग बहुत बंदोबस्त तूर्त मुशाफराचा आहे. सबब मी तुम्हास सरटिपिकिट लिहून देतो ते बराबर ठेवावें आणि चौकसीस कोण येईल त्यास दाखवीत जावे. असे सांगताच बहुत उत्तम आहे असें सांगोन साहेबानी दिल्हेले पत्र घेतले. परंतु ते इंग्रजी होते याजमुळे साहेबास आम्ही सांगितले की आम्हास इंग्रजी समजत नाही, त्यास मराठी याची कापी करून द्यावी. त्याजवरून त्याच पत्रामागे तोच मजकूर मराठी कारकुनापासून लिहून दिल्हा आणि आम्ही सलाम करून शहरात बिराडाची वगैरे तजविजेकरिता चालते जाहालो. बाजारात जाता जाता येक ब्राह्मण गौड जातीचा पुस्तक भागवताचे काखेस घेऊन समोर येत होता. त्याणी आम्हास पाहून दक्षणी ब्राह्मण तुम्ही आहा कोठे उतरणार हे विचारिता आम्ही येथे आलो आहो तर धर्मशाला किंवा देऊळ पाहून उतरू असे सांगताच त्याणी आम्हास असे

सांगितले की, माझे घर मोठे आहे, तुम्ही माझे घरी चलावे, असे सांगताच आम्ही त्या ब्राह्मणाकडे बिराड करून राहिलों.

## सत्त्व परीक्षा

नंतर त्या ब्राह्मणाकडील सर्व मनुष्यांची चौकसी करिता मुख्य यजमान पंचावन वर्षांचा व त्याची बायको पन्नास वर्षांची असी उभयता होती व येक पुत्र आहे म्हणोन सांगितले. तो परगांवी काही कामास गेला आहे व त्याची बायको माहेरी आहे. ही घरात मुलगी आहे, हिचे सासुरे येथून दाहा कोशावर आहे. मुलीचे वय तीस वर्षांचे आहे. परंतु या मुलीस तिचा नवरा बाळगीत नाही. त्याणी दुसरे आपले लग्नसुद्धा केले आहे, असी सर्व चौकसी करून तेथेच राहिलो होतो. कारण त्या शहरांत भाजीपाला, चिंच, दूध, दई वगैरे जिनस स्वस्त फार होते, याचे कारण जवळ शहर मोठे नाही. इंदूर तेथून शंभर कोश सुमार आहे. म्हणोन स्वस्ताई फार आहे. आम्ही स्वइच्छ तेथे होतो. येके दिवसी असा प्रसंग आला. आश्वीन शु।। १५ रोजी तो गौड ब्राह्मण कोजागिरीकरिता कथा सांगण्यास बाहेर रात्रौ गेला व ती।। काका व राहाळकर हे दोघेही रात्री कोजागिरीकरिता दप्तरदार दक्षणी होता त्याजकडे बोलाविले, सबब रात्रौ तेही गेले. नंतर ती वृद्ध स्त्री ब्राह्मणाची व उमेदवार मुलगी असी दोन्ही माणसे मजपाशी दिवाणखान्यांत गोष्टी सांगत येऊन बसल्या होत्या. पुढे दोन घटकेने ती वृद्ध स्त्री निजण्यास गेली. उमेदवार मुलगी तेथेच बसली होती. ती गोष्टी सांगता सांगता माझे जवळ सरत सरत हातरुणावर येऊन बसली. तेव्हा मी फार घाबरून गेलो, कारण प्रयागास गंगा भरल्यापासून या काळापर्यंत ईश्वरे व्रत बरेच चालविले. येते समई झासीस गेलो होतो तेथे ओळखीही बऱ्याच होत्या. परंतु हा प्रसंग फार वाईट आहे. ईश्वर निभावील ते खरे. क्षणभर सुखाकरिता व्रत मोडणे हे बराबर नाही. हे मनात आणोन तिजला वारंवार रात्र फार जाहाली तूं आता निद्रा करण्यास जावे, असेही बहुत वेळा सांगितले. परंतु त्या स्त्रीने असे कळविले की, मी गौरवर्णाची सुरूप चांगली असून माझे चित्त जर तुम्हाकडे वेधिले आहे, तर माझे समाधान केल्यासिवाय तुम्हास बरे नाही व असी बायको गळी पडल्यास पुरुष तिजकडे पाहीना तर माझे ऐकिण्यात असे आहे की, पुरुषास दोष फार आहे. त्याजवरून मजला आपण सोडू नये असे बोलून हात अंगावर टाकिला. ते समई मजला भीति उत्पन्न होऊन सर्वांगास कंप घाम सुटला. तो ईश्वरी इच्छेने राहाळकर व काका

असे दरवाज्यावर येऊन हाका मारू लागले. नंतर मी लागलीच उठोन खाली जाऊन दरवाजा उघडला. ते माडीवर आले. ती स्त्री घरांत उठोन गेली. पुढे प्रातःकाळी ब्राह्मणास विचारून आम्ही रात्रीचे कृत्यामुळे नर्मदातीरी धर्मशाळेत बिराडास आलो. तेथे आठ दिवस राहिलो. तेथे असा निश्चय जाहाला की, आम्हापासी खर्चास रुपये नाहीत, त्यापेक्षा आम्ही टेंभुर्णीस जाऊन नेमावर क्षेत्री जाऊन इंदुरास जाऊ, आणि खर्चास रुपये मिळऊन देशी मार्गशीर्षपौष मासी येऊ. हा निश्चय राहाळकर यास सांगितला. नंतर राहाळकर येकटेच निघोन देशी गेले. मग आम्ही उभयता टैभुर्णीस गेलो, तेथे भुसकुटे यांचे गाडीत दोन तीन दिवस राहून नेमावर क्षेत्री गेलो.

## नेमावर क्षेत्री

नेमावर क्षेत्र म्हणजे नर्मदागंगेचे नाभीस्थान आहे. तेथे शास्त्र प्रमाणानी साडेतीन कोटी तीर्थे वास करितात. महाक्षेत्र वर्णनीय आहे. तेथे नर्मदेचे दक्षणभागी ऋध्धेश्वर सांब आहे व उत्तरतीरी सिध्धेश्वर या नांवाचे स्वयंभू सिवलिंग आहे. ते देऊळ हेमाडपंती आहे. पाषाणी देवालय बहुत रुो किंमतीचे असून कळस फार आहेत आणि सर्व काम कोरे आहे चुना नाही. तेथे अहिल्याबाई होळकरीण हिची टाकी सुरू आहे म्हणजे गांव इनाम टाकीवाल्यास आहे. त्याणी प्रतिदिवसी चिरे घडत जावे. देवाचे संस्थान होळकर याजकडून चालत आहे. बहुत चिरे जाहाले म्हणजे गंगेचा घाट बांधीत असतात. देवालय नर्मदातीरी आहे. त्या तीरास धोत्र्याची फुले फार आहेत. तेथे एकेरी धोत्रे व काळे व पिवळे व दुहेरी, तिहेरी असे धोत्रे फार आहेत. तेच जंगल आहे. येके दिवसी सर्व फुले काढिल्यास लक्ष पूजाही घडेल, अशा क्षेत्रात वाो. रा. श्री. बैरंभट तेलंग याजकडे आम्ही उतरून सिवपूजा धोत्र्याचे पुष्पांनी सात दिवस केली. तेलंग याजकडे नवीन पुस्तक पाहाण्यात आले. वेदशास्त्रसंपन्न कृष्णंभट आरडे याणी निर्णयसिंधु ग्रंथावर टीका केली आहे ते पुस्तक ऐकिण्यात होते, परंतु पाहिले नव्हते, ते तेथे पाहिले. तेथे पुस्तक साग्र आहे. मूळ निर्णयसिंधुपेक्षा ग्रंथ चौपट जाहाला आहे. काही काही विषय पाहिले. तेथून इंदूरची सोबत चांगली गाडीची लागल्या कारणानी निघोन इंदुरास गेलो. तेथे मुशाफरखान्यात उतरलो. तो तेथे असे ऐकिण्यात आले येथे किबे होळकर यांचे सावकार फार थोर आहेत. त्यांचे प्रिय कन्येचा विवाह आजपासून चार पाच दिवसी आहे. त्या लग्नास खर्च दीड

लक्ष रुपये होणार. त्याजवरून इंदूर-देवासे व धारानगर व श्रीक्षेत्र अवंतिका या जाग्यातून येकंदर ब्राह्मण पाच साहा हजार जमले आहेत. परंतु चांगले विद्वान् विद्वान् पाहून थोडी परीक्षा घेऊन याद करीत आहेत. म्हणजे पुण्याहवाचनापासून प्रत्येक कर्मास यादीचे मात्र ब्राह्मण कर्माचे ठिकाणी घ्यावे, बाकी ब्राह्मण रमण्यात जावे याप्रो येथील व्यवस्था सुरू आहे. असे समजताच आम्ही विचार केला आपले नांव यादीत पडेल तर येथे राहाणे ठीक आहे. नाहीपेक्षा सोबत सोडून राहाण्याचे कारण नाही. नंतर काका व मी दोघेही शहरात शोध कर्ण्यास गेलो. तों किबे याचे वाड्यानजीक बंगला आहे तेथे ब्राह्मण जमले आहेत, यादी तेथे होत आहे, असा शोध समजून बंगल्यावर जाऊ लागलो. तों जिन्यानी जाता जाता माडीवर मंडळी काही विवाह प्रकर्णी शास्त्रार्थ बोलत आहे असे समजून आत गेलो. तों तेथे दोनशे ब्राह्मण समुदाय बसला आहे व दिनकर शास्त्री वगैरे आश्रित मंडळी बसली आहे. आम्ही जाताच सभा सर्व स्तब्ध जाहाली तेव्हा तेव्हा आम्ही विचारिले की, पूरवी काय विषय सुरू होता ? त्याजवरून त्याणी प्रश्न केला की, विवाह प्रकर्णी सूत्रकार-कुलमग्रे परीक्षेत- या खंडात कन्येची परीक्षा करावी असे आहे, परंतु सूत्रकार वराविसी परीक्षेबद्दल लिहीत नाही याचे कारण समजत नाही. असा प्रश्न होताच आम्ही त्यास असे सांगितले की अग्रे परीक्षेत- याजवर वृत्तिकारांनी व भाष्यकारांनी असे भाष्य केले आहे की प्रथम कन्येची परीक्षा करून नंतर हीच परीक्षा वराची करावी म्हणोन अग्र शब्द दिल्हा आहे, वृत्ति काढून पाहावी. असे सांगताच वृत्तीचे पुस्तक लागलीच सोडून पाहाता खरे आहे. प्रथम मुलीची परीक्षा करून नंतर वराची करावी हा विषय जाहाल्यावर याज्ञिक समंधे पाच चार संशय दिनकर शास्त्री यांस होते तेही यथामति सांगितले आणि यादीत नांवे लिहिली. नंतर दिनकरशास्त्री याणी आम्हाबराबर सिपाई देऊन कावडीसुाो बिराडी आपले घरी नेले. आम्ही शास्त्रीबाबांकडे राहिलो. लग्नास चार दिवस राहिले तेव्हा गडकनेर जाहाला. साखरभात, बुंदीचे लाडू करून मुक्तद्वार त्या दिवसापासून सुरू होते. प्रतिदिवसी झिलबी वगैरे नवे पक्वान्न करून ब्राह्मणभोजन सुरू होते. आम्हास दिनकरशास्त्री यांजकडे सिधा येत असे. तो लग्नसमारंभ फार मोठा जाहाला. श्रीमंत पूजेपासून यादीची मंडळी कर्माचे जागी वाड्यात याद वाचून घेत असत. बाकी मंडळी रमण्यात जात. याप्रो सर्व समारंभ जाहाला. वरातेचे दिवसी या यादीची विद्वान् मंडळी सर्व जवळ बसली अस्ता दाजीसाहेब किबे व त्यांची स्त्री चौकात येऊन पाट पासोड्यावर बसली.

तथापि वंशपात्रातील दिवे लाविले नव्हते. सबब दिवे लावण्यास हरकत काय आहे म्हणोन दाजीसाहेबांनी उपाध्ये यास विचारले. त्याणी उत्तर दिल्हे की, दिवे आपल्याकडील आहेत वाती व दिव्यातील तेल वराकडील आले पाहिजे. तें आले नाही सबब खोटी आहे. असे ऐकून सर्व शास्त्री पंडित विद्वान् यास प्रश्न केला की, हजारो रुपये तुपाकडे खर्च विवाहात होतो. या मात्र दिव्यास तेल घालितात. तेव्हा शास्त्र तेल घालावे किंवा तूप दिव्यास असावे हा निर्णय करून सांगावे. ते समई शास्त्रीमंडळीने असे ठरविले की दीप जेथे लावावा असे आहे, तेथे तूपच दिव्यास पाहिजे. तुपाचा अभाव तर ते तिलाचे असावे. पलीकडे प्रतिनिधीही पुष्कळ आहेत. परंतु मुख्य दिव्यास तूपच आहे. असे ऐकून विद्वान् याज्ञिक मंडळीने या दिव्यास तूप घालण्याचे कबूल केले नाही. कारण तेल घालावे किंवा तूप असावे याजबाो ग्रंथी वाचनीक सापडत नाही. परंतु कासी रामेश्वरासही चार मुलखांत तेल वराकडील घालण्याचा संप्रदाय आहे. यास्तव वाडवडील पुरुष करीत आले तेच केले पाहिजे. आजच तूप या दिव्यांत घालू नये, असा वादविवाद बराच जाहाला. पुढे वराकडील तेल दिव्यात घालून कर्म समाप्ति केली. विवाहकृत्य सर्व आटोपल्यावर यादीचे मंडळीस मेजवानीचा थाट करून दाहा वाजता पाच सात पक्वान्ने करून भोजन दिल्हे. नंतर ज्याची योग्यता जसी त्यास वस्त्रे व दक्षणा देऊन बिदागी केली. आम्हास महेश्वरी रेसिमकाठी धोत्रजोडे दोघास आले होते व रुपये मजला दाहा व काकांस रुपये पाच मिळाले होते. नंतर राजाकडील नित्यदाने समई व घागर व वस्त्र याप्राो तींही आम्हास मिळाली. नंतर गाडीत बसण्याची व ओझ्याची सोई करून काकासमेत इंदुराहून निघोन मजल दरमजल दरीत सातपुड्यात आलो. येके दिवसी सकाळी दाहा घटका दिवसास नदीवर सर्व गाड्या उतरून स्नानसंध्या फराळ करून निघणार तो मी कावड घेऊन व दुसरा सोबती वीरेश्वरशास्त्री चितळे पुणेकर हे बराबर चालत. अस्ता नदीवर आलो, तों सर्व यात्री लोक निघण्याचे घालमेलीत होते. आम्ही त्याजपासून फराळाचे घेऊन त्यांत जाण्याबाो सांगितले. पुढे तेथून दोन घटकानी आम्ही निघोन चालते जाहालो. वाटेने दोन रस्ते मोठे गाडीचे लागले. त्यात भलतेच रस्त्यानी निघोन गेलो. पलढे ऊन फार जाहाले म्हणोन दोन घटका आराम करून पुढे चालते जाहालो. तों रस्ता फार बारीक होऊन गाडेरस्ता नाहीसा होऊन गुरांचा गोट म्हणजे रस्ता लागला. त्या रस्त्यानी जाता जाता सायंकाळ जाहाला. तों तो रस्ता भील लोकांचे घरानजीक गेला. मग आम्ही तेथे

जाऊन भीलांची गुरे बांधण्याचे जाग्यांत जाऊन उतरलो. भीलही तेथे बरेच जमले होते. त्याणी गंगेची कावड पाहून त्यासही आनंद जाहाला. मग पाण्यावर जाऊन संध्यादि करून उपोशित बसलो. पुढे भीलांनी दूध दोन शेर व साखर असी आणोन आम्हास दिल्हे. नंतर दूध तापऊन प्राशन केले. पुढें रामायण पुराण समंधे गोष्टीही आम्ही त्यास सांगोन त्याणी आम्हास संभावना गेली. वीरेश्वरशास्त्री यांस दोन रुपये दिल्हे व मजला तीन रुपये दिल्हे. सकाळी येक भील वाट दाखविण्यास बराबर दिल्हा. त्याणी डोंगरातून जवळचे वाटेने सकाळी प्रहर दिवसात गाड्यावगैरे सर्व सोबतीचे मनुष्याची गाठ पडली. भील परत गेला. पुढें सातपुड्यांतून धुळे, मालेगांवी येऊन खानदेशांतून येतायेता पिंपळगावांस आलो. थंडी फार, पायांचे पावलास कापुसाचे रजईचे फडके बांधिले होते. तथापि पाय फार फुटून भेगा खोटास फार पडल्या होत्या. कोठेकोठे पावलाबराबर रक्तसुाो पडत असे. राळमेण वगैरे पळीत लुकण करून पायांस भेगा पडलेल्या भरून दोहोचोहो रोजी पायास औषध करीत होतो. पिंपळगांवचे मुकामी सर्वांचे मनांत असे आले की, येथून नऊ कोशावर सप्तशृंगाची देवी, सरस्वती अष्टादशभुजा साडेतीन पीठे पृथ्वीवर आहेत त्यापो हे देवीचे स्थान आदिपीठ आहे. यास्तव ती यात्रा करून नासिकास जावे.

### सप्तशृंगास

मग दुसरे दिवसी सप्तशृंगास सायंकाळपर्यंत सर्वांसह आलो. तेथे उपाध्ये यजुर्वेदीकडे उतरून दुसरे दिवसी वणी म्हणोन सप्तशृंगीखाली गांव आहे, तेथे भोगमूर्ति अष्टादशभुजा आहे, तिचे दर्शन घेऊन डोंगर चढू लागलो. तो डोंगर फार मोठा आहे. तेथे हेमाडपंतानी टाकीने पायऱ्या तयार केलेल्या आहेत. खाली पाहिले अस्ता सहज डोळे फिरतात. येकंदर चढाव तीन कोशांचा आहे. पाो दोन कोश हेमाडपंती पायऱ्यांनी चढावे लागते. वर जाऊन पाहाता बरेच मैदान आहे. तेथे जागोजाग पाणीही बहुत आहे. राजे राजवाडे यांजकडून नेमणुकाही देवीस आहेत. तेथे स्नाने करून, तेथून पुनः चढाव येक मैल लागतो तेही चढून जाऊन देवीचे दर्शन घेतले. देवी पाहाडास आहे. स्वरूप फार भयंकर दिसते. दोन आडीच पुरुष उंचीची देवी आहे. तिची नथ लहानशे परातीयेवढी आहे. तेथील यात्रा कृत्य करून सायंकाळी पुनः वणी गावी वस्ती करून नासिकचे रस्त्याने चालते जाहालो. ज्या दिवसी पंचवटीत सकाळी साहा घटका दिवसास आलो, त्या

दिवसी पाहाटेपासून चालता चालता गंगेची कावड हलकी अति जाहाली. पंचवटी अदकोश राहिली, तों कावडीतील सर्व कुप्यांच्या गुड्या कावडीत उडून पडून गंगा आंतून उसळून आतील गवत भिजून बाहेर पंचवटीत सि(र)ताना दृष्टीस पडू लागली, ते समई ब्राह्मण मंडळी तेथील जमली होती त्याणी आम्हास सांगितले की, कावडीतील गंगा लौकर गोदागंगेस भेटवा. विलंब जाहाल्यास भागिर्थी गंगा कावडीत राहाणार नाही. असे सांगताच तसीच कावड रामतीर्थी नेऊन सर्व कुप्या गोदागंगेने भरून गुड्या मारून बंद करून बिराडी येऊन कावड ठेविली. नंतर ती।। काकाही सर्व यात्राकृत्य केले. नंतर आम्ही उभयता श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरी जाऊन तेथील यात्राकृत्य करून पंचवटीत वस्तीस आलो. तेथे पाच चार दिवस राहून पुण्यास जाण्याबाो विचार ठरला. नंतर कावडसमवेत पुण्यात वेदशास्त्रसंपन्न वीरेश्वरशास्त्री चितळे यांजकडे राजेबहादुरांचे वाड्यात उतरलो. पाच चार दिवस तेथे राहून ती।। काकांस भाड्याचे घोडे करून त्याजवर ओझे घालून मुकाम करीत खालापुरास वस्ती केली. आम्ही ब्रह्मावर्ताहून मात्र पत्र वरसईस पाठविले होते, त्याजवर पत्र नाही. पुढे राहाळकर घरी आले त्या समई हुसंगाबादेपर्यंत सुखरूपतेचा मजकूर कलला होता. पुढे पत्र नाही. तेणेकरून काळजी फार लागली होती तिजला उपमा नाही.

## माता-पितरांची भेट

दुसरे दिवसी दाहा वाजता खालापुरास जेऊन घोडे भाड्याचे करून निघालो ते सायंकाळचे चार घटका दिवसास वरसईस नदीचे बांधावर येऊन सुखरूप पोचलो. बांधावर वाो. रा. रा. श्री. अण्णासाहेब कर्वे सहज उभे होते त्याणी नमस्कार करून हे काय यकायेकीच आला. गुरव सिंग घेऊन मंडळी पुढे येऊन समारंभानी यावे, ते असे कसे केले इत्यादि बोलून लवकर गुरव यास बलावून श्रीवैजेनाथ देवाचे दर्शनार्थ जाता जाता दाहावीस मंडळी जमली. तीर्थरूपांस निरोप पाठविला की, आपण घर सोडून येऊ नये. घरी भेट जाहाली पाहिजे. पुढे श्रीचे देवळास जाते समई मोकासी यांचे गणपतीचे देवालयानजीक देवळातून मातोश्री येत होती. हे मी दुरून पाहून कावड तेथेच ठेऊन पाच दाहा पाऊले चालत जाऊन पायावर डोकी ठेविली. तिणेही हा आपला विष्णु आहे असे समजली. तों उभा राहून गळयास गच्च मिठी मारून सुखदु:खाबाो भेटी अंती जी स्थिती जाहाली, ती माझ्याने लिहिता येत नाही. मातोश्रीचाही कंठ भरून आला

व माझेनेही बोलवेना. कंठ सुटेना, नेत्रावाटे पाण्याच्या धारा सुरू होत्या. तिजला घरी जा मीही येतो असे सांगोन, श्रीवैजेनाथाचे देवळास गेलो. तों मंडळी पाचपन्नास जमली. देवदर्शन घेऊन सर्व मंडळीसुद्धां घरी आलो. श्रीकुलस्वामिणीस नमस्कार करून कावड देवांजवळ ठेविली आणि ओटीवर येऊन तीर्थरूपांचे पायावर मस्तक ठेविला आणि गळ्यास मिठी मारली. त्यांचेही नेत्रांस पाणी फार आले व माझा तर गळा भरून आला होता. नंतर क्रमानी सर्वांस भेटून मांडवांत मंडळी बसली होती तेथे जाऊन बसलो.

चिरंजीव सौ।। वती कृष्णाबाईस झारी गंगाजमुनी देऊन समाधान केले. नंतर मंडळीस पानसुपारी देऊन मंडळी गेली. नंतर ग्रामस्त सर्व येऊन भेटून गेले. वेदशास्त्रसंपन्न विनायक जोशी दिवे लागावे तों भेटीस आले. मग मी पुढे जाऊन पाय धरून सा।। नमस्कार केला. त्यांसही आनंद फार जाहाला. पुढे रात्रौ तीर्थरूप मातोश्रीपासी सर्व कुशलवृत्त निघाल्या तागायत निवेदन केले. सर्व मनुष्ये भेटली परंतु धोंडभट व हरिपंत हे उभयता पेणेस होते. त्यांस तेथे बातमी लागल्यावरून सकाळी चार घटका दिवसास वरसईस आले. येताच हरिपंत याणे पायावर डोकी ठेऊन गळ्यास मिठी मारून बराच वेळ धरून ठेऊन गहिव्‌रु आला तो आवरेनासा जाहाला. धोंडभटही याप्रमाणे भेटून स्वस्थ जाहाले. पुढे थोडेच दिवसानी पेणेहून जिनस वगैरे आणोन मावद्याचा बेत केला. सोमवारी मावद्याबाबत निश्चय करून पेण व वाकरूळ व वावोसी, गागोदे या गांवी इष्टमित्र आप्तांस मावद्यास बलावणे केले व वरसईत पुरुष व बायकांचा पहिपावणा केला होता. बाहेरगांवची भिक्षुक मंडळी सकाळी चार साहा घटके दिवसात येऊन पोचली. वरसईचे भिक्षुकही सर्व जमा जाहाले आणि मागील दारी परसात रांगोळी घालून पाट मांडून मातापित्यांस बसऊन विनायक जोसी याणी त्यांजपासून संकल्प करविला. मजपासूनही संकल्प करविला आणि गंगापूजन करून यथाविधीनी स्नाने झाली. सर्व भिक्षुक मंडळीस दक्षणा, साखर दिल्ही. दोन प्रहरी मावद्याचे प्रयोजन जाहाले. बाहेरगांवची मंडळी व गांवची व बायकामुले मिलोन पाने साडे चारशे जाहाली. पुर्णाच्या पोळ्यांचा बेत केला होता. जेवणपूर्वी तीर्थरूपांनी गंगापूजन करून सर्व यात्रा जाहाल्याबाबत ब्राह्मण-सुवासिणीचे भोजनाचा संकल्प केला. भोजने सर्वांची जाहाली. ते समई आप्त, इष्टमित्र, जावई वगैरे सर्व मनुष्ये जमली होती. बाहेर कोणी राहिले नव्हते. रात्रौ मंत्रजागर मध्यरात्रपर्यंत जाहाला. पुढे सर्वांनी निद्रा केली. सकाळी वावोसीकर वगैरे मंडळी घरोघर गेली. नंतर

आम्ही तिघे बंधु व येक भगिनी, मातोश्री, तीर्थरूप व आमच्या बायका असी सर्व मनुष्ये काही दिवस घरीच होतो. पुढे ज्याचा तो उद्योगास गेला. आता हा भाग येथे पुरता करतों. ।। श्री पार्थिवलिंगरूपी सदासिवाय नमाः ।।

( सदरहू पहिले भागापासून इतिहास लिहिला आहे. या इतिहासात येकंदर विचार करता द्रव्य मिळणे फार कठीण आहे. मिळाल्यास संरक्षण होणे कठीण. मिळऊ असा निश्चय द्रव्याबाो केल्यास सिद्धीस जात नाही. जन्मापासून सुखाची इच्छा करतात व उद्योगही सुखाकरिता करतात. पण उद्योग न करिता अवचित दुःखही प्राप्त होते. याजवरून सुखदुःखाचा उद्योग न करिता ज्या वेळेवर सुख होणे ते होते, तसेच दुःखाची वेळ आली म्हणजे दुःख प्राप्त होते. याकरिता ईश्वराधीन कृत्य आहे. पाहा घरून कुटुंबास कर्ज फार जाहाल्यामुळे बाहेर प्रवासास गेलो. अनेक दुःखे सुखे भोगून परिणामी घरी येते समई द्रव्य नाही. तेव्हा मुख्य प्रारब्ध आहे. द्रव्याबाो उपाय करून मिळते हेही नाही. असो येकंदर मी सत्तावनचे बंडाबाो जे जे स्मरण मजला जाहाले ते सर्व लिहून ठेविले आहे. हस्ताक्षर विष्णुभट गोडसे वाो वरसई ताो पेण, जिल्हा कुलाबा शके १८०५ सुभानुनाम संवत्सरे माहे माघ शु. ११ गुरुवार. )

**विष्णुभट गोडसे वरसईकर**

REFBK-0026717

(library stamp) क्र. 6883 / 26676